# मुक्तेश्वरकृत महाभारत

## आदिपर्व ( खंड चवथा व शेवटचा )

संपादक
अनंत काकबा प्रियोळकर
डायरेक्टर, मराठी संशोधनमंडळ

९५८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

मुंबई सरकार आणि मुंबई व पुणें विद्यापीठ यांच्या आश्रयाखालीं

REFBK-0010568

मुंबई
मराठी संशोधनमंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाकुरद्वार, मुंबई २.

१९५१

# मुक्तेश्वरकृत महाभारत

## आदिपर्व ( खंड चवथा व शेवटचा )

संपादक


अनंत काकबा प्रियोळकर

डायरेक्टर, मराठी संशोधनमंडळ



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत

REFBK-0010568

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे


मुंबई सरकार आणि मुंबई व पुणें विद्यापीठ यांच्या आश्रयाखालीं


मुंबई

मराठी संशोधनमंडळ,

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाकुरद्वार, मुंबई २.

१९५१

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १. प्राक्कथन ... ... ... ... | ३—६ |
| २ मुक्तेश्वर ... ... ... .. | ७-१४ |
| ३. चवथ्या खंडांतील कथाभाग ... ... ... | १६ |
| ४. आदिपर्व ( अ. ३९-५० ) ... ... | ८२५-१०६६ |
| ५. शब्दकोश ... ... | १०६७-१०७१ |
| ६. शुद्धिपत्र ... ... ... | १०७२ |


★

किंमत पांच रुपये


मुद्रक—के. एल्. एन्. राव,
मुंबईवैभव प्रेस, ४१७।४२१ सरदार वल्लभभाई पटेल रोड, गिरगांव, मुंबई ४.

प्रकाशक— अ. का. प्रियोळकर,
डायरेक्टर, मराठी संशोधनमंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई नं. २.

# प्राक्कथन

मुक्तेश्वरी आदिपर्वाच्या पहिल्या खंडांत पाठचिकित्सेची आमची साधनसामुग्री, संपादकीय धोरण आणि मुक्तेश्वरासंबंधीं सुचविलेले विचार विस्तारपूर्वक मांडिले आहेत. या खंडांत त्यांची पुनरावृत्ति करण्याची वस्तुतः आवश्यकता नव्हती; परंतु निरनिराळ्या विद्यापीठांमध्यें वरिष्ठ वर्गांना पाठ्यपुस्तक म्हणूनही याचा उपयोग व्हावयाचा असल्यामुळें, प्रत्येक खंडाला स्वयंपूर्णता लाभावी म्हणून कांहीं प्राध्यापकमित्रांच्या सूचनेवरून या चवथ्या खंडामध्येंही जुनी माहिती कमीजास्त करून निराळ्या स्वरूपांत थोडक्यांत पुनः छापीत आहोंत.

पाठचिकित्सेला विद्यापीठाच्या शिक्षणक्रमांत महत्त्व दिलें जात नाहीं, असें कळतें. तरीपण त्यासंबंधीं या खंडांतही दोन शब्द लिहिणें अवश्य वाटतें. विशेष माहितीकरितां जिज्ञासू विद्यार्थ्यांनीं आदिपर्वाचा पहिला खंड आणि रघुनाथपंडिताच्या दमयंतीस्वयंवराची आम्हीं संपादिलेली प्रत ( आवृत्ति १ ली ) पहावी.

पहिल्या खंडाच्या प्रकाशनापूर्वी आम्हांला आदिपर्वाच्या एकंदर एकोणतीस हस्तलिखित प्रती मिळाल्या होत्या. त्यांपैकीं बऱ्याचशा हस्तलिखितांच्या बाराही अध्यायांची व कांहींच्या कांहीं अध्यायांची पाठनोंदणी केली, आणि निर्णयसागरची ( काव्यसंग्रह ) छापील प्रत Vulgate[1] कल्पून वरील हस्तलिखितांपैकीं प्रातिनिधिक व निर्दिष्टकाल अशीं अकरा निवडून त्यांच्या आधारानें पहिल्या खंडांतील बारा अध्यायांची संहिता निश्चित केली. त्यानंतर हस्तलिखितांच्या शोधार्थ आम्हीं पुष्कळ प्रवास केला. उज्जैन, कोल्हापूर, हुबळी, अलिबाग, नांदेड, परभणी वगैरे भागांतील आणखी वीसवर हस्तलिखितें पहावयास मिळालीं. परंतु पाठदृष्ट्या तपासणी करतां त्यांचें विशेष महत्त्व न वाटल्यामुळें पहिल्या खंडाकरितां उपयोग केलेल्या प्रतींचाच या चवथ्या खंडाच्या बारा अध्यायांच्या कामीं उपयोग करण्यांत आला आहे. त्यांची बोधाक्षरांसह ( Sigla ) थोडक्यांत खालीं माहिती देतों.

---

१ Vulgate याचा अर्थ सध्यां लोकांसमोर असलेली एकाद्या ग्रंथाची संहिता असा आहे. ही संज्ञा प्रथम चवथ्या शतकामध्यें तयार झालेल्या लॅटिन बायबलाला लावण्यांत आली; पण सांप्रत हा शब्द कोणत्याही ग्रंथाच्या सर्वसंमत संहितेला ( accepted form of a text ) लावण्यांत येतो. याच्या उलट, शुद्ध केलेल्या संहितेला critical text ( चिकित्सापूर्ण किंवा संशोधित संहिता ) असें म्हणण्याचा प्रघात आहे. एकाद्या जुन्या ग्रंथाचें संशोधन करतांना प्रथम ही लोकांपुढें असलेली सर्वसंमत संहिता ( Vulgate ) मूळ धरून त्याच्याखालीं निरनिराळ्या हस्तलिखितांतील पाठांची नोंदणी करण्यांत येते, व अशा प्रकारें संशोधित संहिता निर्माण होते.

## छापील प्रती

( १ ) **नि**—काव्यसंग्रहमालेंत वा. दा. ओक यांनीं संपादिलेली **नि**र्णयसागरप्रत ( Vulgate ), मुंबई १८९३.

( २ ) **स**—माधव चंद्रोबा यांनीं संपादिलेली **स**र्वसंग्रहप्रत, मुंबई १८६५.

## हस्तलिखितें

( १ ) **औं**—कै. श्री. भवानराव पंडितप्रतिनिधि, **औं**ध, यांजकडून मिळालेली पोथी. लेखनकाल श. १६९२.

( २ ) **ख**—'**ख**ट्वांगग्रामीं समाप्त' केलेली पोथी. लेखनकाल श. १६८१.

( ३ ) **गो**—**गो**मंतकांत कै. व्यंकटेश शां. दळवी यांजकडून मिळालेली पोथी.

( ४ ) **गो** २—**गो**मंतकांतील दुसरी पोथी. रा. गावणेकर यांजकडून मिळालेली.

( ५ ) **तं**—**तं**जावर येथील सरस्वतीमहाल ग्रंथसंग्रहालयांतील क्रमांक १३७२ ची पोथी.

( ६ ) **धु**—**धु**ळें येथील श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांतील क्रमांक ९६० ची पोथी. लेखनकाल श. १६७६.

( ७ ) **नां**—**नां**देडचे श्री. वि. अं. कानोले यांजकडून मिळालेली प्रत. लेखनकाल सुमारें श. १६७४.

( ८ ) **पु**—**पु**णें भारत इतिहास-संशोधकमंडळांतील ना. य. मिरीकर हस्तलिखितसंग्रह नं. $\frac{१७६}{१३}$ पोथी. लेखनकाल श. १६८४.


( ९ ) **पु**·४—पुणें येथील डेक्कन कॉलेज पोस्टग्रॅज्युएट ॲंड रिसर्च इंस्टिट्यूटमधील पोथी. A. N. 6862. श. १६८८.

(१०) **मुं**—मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयांतील पोथी.

(११) **रा**—राजापूर संस्कृत पाठशाळेंतून पं. रघुनाथ कृष्णशास्त्री पाटणकर यांजकडून मिळालेली पोथी. लेखनकाल श. १७०६.

या ज्या मुख्य आधारभूत प्रती वर दिल्या आहेत त्यांचा परस्परसंबंध काय आहे तें पहा :—

**नि** प्रत **स** वर आधारलेली असून तिच्यामध्यें पुष्कळ फेरफार केलेले आहेत. वरील हस्तलिखितांचे त्यांच्या परस्पर साम्यावरून दोन वर्ग पाडतां येतील :



वरील पहिल्या वर्गाला ख वर्ग असें नांव दिलें आहे. यांपैकीं दुसऱ्या वर्गांतील पाठ जास्त शुद्ध व ग्राह्य आहेत.

अर्थाच्या दृष्टीनें सुबोध, काव्याच्या दृष्टीनें सरस व आजच्या व्याकरणाच्या कल्पनां-प्रमाणें शुद्ध असा जो पाठ तो **बरा** ही आपली कल्पना; परंतु हस्तलिखितांच्या पुराव्यावरून जो पाठ कवीच्या हातचा किंवा त्याच्या काळचा असें ठरेल तोच पाठ **खरा. 'बरा'** अणि **'खरा'** यांच्यामधील हा फरक अवश्य लक्षांत ठेवण्यासारखा आहे. पाठसंशोधनामध्यें **'बऱ्या'** पेक्षां **'खरा'** पाठच शुद्ध किंवा ग्राह्य मानावयाचा असतो. एकाद्या कुरूप बाईच्या फोटोमध्यें फरक करून चित्रकाराला तिला अप्सरा बनवितां येईल. हें त्या बाईचें रूप **'बरें'** ( सौंदर्याच्या दृष्टीनें ) होईल; परंतु **'खरें'** राहणार नाहीं. पाठसंशोधनालाही हाच नियम लागू आहे. एकाद्या कवीच्या काव्यांत असे बदल केल्यास तें काव्य त्या कवीचें म्हणतां येणार नाहीं. जुना **खरा** पाठ अपरिचित, दुर्बोध व आजच्या लेखनपद्धतीला किंवा आजच्या व्याकरणाला धरून नाहीं म्हणून तो बदलणें अशास्त्रीय आहे. ही गोष्ट पुष्कळशा जुन्या लोकांना माहीत नसल्यामुळें जुन्या ग्रंथांच्या संहितांना आज अशुद्ध व भिन्न स्वरूप प्राप्त झालें आहे. काव्यसंग्रहप्रतींत असे पुष्कळ संस्कार केलेले आहेत. लेखनपद्धतीसंबंधीं आम्हीं स्वीकारलेल्या मार्गाचें साधार विवेचन पहिल्या खंडाच्या प्राक्कथनांत केलेलें आहे, तें वाचकांनीं जरूर पाहावें.

आपल्यापुढें असलेल्या संस्कृत महाभारताच्या नीळकंठी संहितेला धरून जे मुक्तेश्वरी महाभारतांत पाठ नाहींत ते अशुद्ध असेंही म्हणण्याची कांहीं लोकांची प्रवृत्ति आहे. **नि** म्हणजे 'काव्यसंग्रह'प्रतींत तर असे बरेच बदल करण्यांत आलेले दिसतात. संस्कृत महाभारताच्या निरनिराळ्या पोथ्यांमध्येंही विलक्षण पाठांतरें असतात. आपल्यापुढें असलेलीच महाभारताची संहिता मुक्तेश्वरापुढें होती, असें मानणें चुकीचें होईल.

वरील धोरण लक्षांत ठेविलें म्हणजे आदिपर्वाची पुढील संहिता वाचतांना वाचकाला गोंधळल्यासारखें होणार नाहीं.

पाठांतरें देतांना निरनिराळ्या हस्तलिखितांचीं बोधाक्षरें वर दिलेलींच आहेत. पु पु४ किंवा गो गो २ अशा दोन हस्तलिखितांत एकच पाठ असल्यास तीं अनुक्रमें पु·४ व गो·२ अशीं दाखविलीं आहेत. ( + ) खूण आहे तो अधिक पाठ व ( – ) खूण आहे तो कमी पाठ समजावा. कसरीनें खाल्ल्यामुळें किंवा अन्य कारणानें एकादा पाठ दुर्वाच्य किंवा नष्ट झाला असल्यास तो ( × × ) अशी खूण दाखवून निर्दिष्ट केला आहे. प्रक्षिप्त वाटलेल्या ओव्या तळटीपांत पाठांतरांबरोबर दाखविलेल्या आहेत. **प्रसंप्रा** याचा अर्थ 'प्रस्थापित संहितेप्रमाणें' असा समजावा.

जीं अशुद्धें लक्षांत आलीं त्यांचें शुद्धिपत्रक या पुस्तकाच्या शेवटीं जोडिलें आहे. पुस्तक वाचण्यास आरंभ करण्यापूर्वी शुद्धिपत्राप्रमाणें त्याची दुरुस्ती करून घ्यावी, अशी विनंति आहे.

अशा संशोधनाला मनाची एकाग्रता व बारीक सारीक तपशिलांत शिरण्यास भरपूर सवड व स्वास्थ्य पाहिजे. इतर जबाबदाऱ्या सांभाळून आहे त्या परिस्थितींत जें करतां आलें तें यथाशक्ति व यथामति केलेलें आहे. तें अगदीं निर्दोष आहे किंवा अखेरचें आहे असा आमचा मुळींच दावा नाहीं. कै. डॉ. वि. स. सुखटणकर यांच्यासारख्या विद्वानानीं आपल्या संस्कृत महाभारताच्या पहिल्या खंडाच्या ( १९२७ ) प्रस्तावनेंत काढलेले उद्गार आम्हीं आदिपर्वाच्या मागच्या खंडांत उद्धृत केले होते, तेच पुनः येथें देतों—

"......that in these circumstances the editor will occasionally make mistakes–at times perhaps gross mistakes–is as certain as inevitable; for it is to be feared that there is no royal road to success in this incomparably difficult field... More than one attempt will probably have to be made before the ideal is attained. It will, therefore, be prudent not to expect too much from the *first* critical edition, nor to claim too much for it."

या ग्रंथाच्या शेवटीं जो शब्दकोश जोडला आहे तो सर्वसामान्य वाचकांच्या उपयोगाकरितां आहे. विद्यार्थ्यांनीं या आयत्या कोशावर अवलंबून न रहातां स्वतःच योग्य प्रतिशब्द शोधून स्वतंत्रपणें अर्थ लावण्याचा प्रयत्न करावा.

## आभार

आदिपर्वाच्या प्रस्तुत चवथ्या खंडाच्या प्रकाशनाला मुंबई विद्यापीठानें ७५० आणि पुणें विद्यापीठानें ७५० रुपयांची देणगी दिली, याबद्दल आम्ही या दोन्ही विद्यापीठांचे आभारी आहोंत.

मुंबई सरकार आणि मुंबई व पुणें विद्यापीठांप्रमाणेंच मराठी भाषिकांचीं जीं इतर सरकारें व विद्यापीठें आहेत त्यांच्याकडूनही मराठी संशोधनमंडळाला मदत मिळणें योग्य आहे. मराठी संशोधनमंडळाचें कार्यालय जरी मुंबई शहरांत असलें, तरी पण तें करीत असलेलें कार्य साऱ्या मराठी भाषिकांकरितां आहे. बृहन्महाराष्ट्रांतील इतर संस्थांनीं व व्यक्तींनींही या कार्याला आपल्या शक्त्यनुसार हातभार लावणें त्यांचें कर्तव्य ठरतें. हे आपलें कर्तव्य जर सर्वांनीं जाणलें तर मुक्तेश्वराचीं उपलब्ध पांचही पर्वें शुद्ध स्वरूपांत आम्ही प्रसिद्ध करूंच, परंतु इतर कवींचीं पुढील पर्वें त्यांना जोडून 'चक्री महाभारत' महाराष्ट्राला सादर करणें आम्हांला शक्य होईल. याशिवाय कितीतरी अप्रकाशित ग्रंथांचें प्रसिद्धीकरण व द्रव्याच्या अभावीं अडून राहिलेले आमचे इतर बहुसंख्य संकल्प आम्हांला तडीस नेतां येतील.

१० अक्टोबर १९५९ **अ. का. प्रियोळकर**

# मुक्तेश्वर

कवि या दृष्टीनें जुन्या मराठी वाङ्मयांत मुक्तेश्वराचें स्थान पहिलें आहे, ही गोष्ट त्याच्याविषयीं जुन्या-नव्या पंडितांनीं जे उद्गार काढले आहेत, त्यांच्यावरून स्पष्ट दिसून येते.[1] मुक्तेश्वर हा जरी 'लोकोत्तर' कवि असला तरी त्याच्यासंबंधीं वैयक्तिक माहिती असावी तितकी उपलब्ध नाहीं. युरोपांत तेथील अत्यंत जुन्या कवींच्याही चरित्रावर नवा प्रकाश पाडणारे समकालीन कागदपत्र मिळूं शकतात. फार काय, मुक्तेश्वराच्याही पूर्वीचा आपल्या मराठीचा इंग्रज कवि, तोमास स्टीफन्स, याचीं स्वाक्षरीसह दोन अस्सल नवीं पत्रें अलिकडेच रोम येथें उपलब्ध झालीं आहेत.[2] आपल्या इकडील जुन्या महाराष्ट्रीय मराठी कवींची स्वाक्षरी सोडाच, परंतु मोरोपंतासारखा एकादा अलीकडचा कवि वगळला तर खात्रीलायक म्हणतां येण्यासारखें त्यांचें हस्ताक्षरही उपलब्ध नाहीं !

ज्यांच्याभोवतीं भाविकतेचें वलय असतें अशा संतकवींचा संप्रदाय निर्माण होतो, व त्यांच्या शिष्यप्रशिष्यांमुळें चमत्कारपूर्ण कां होईना, खरीखोटी अतिशयोक्तीची माहिती जमा होते व ती मागें राहूं शकते. मुक्तेश्वर हा संतकवि नसून कलाकवि आहे. त्यामुळें अशाप्रकारें त्याची विशेष माहिती सांपडत नाहीं. तरीपण समाधानाची गोष्ट ही कीं, त्यानें आपल्या ग्रंथांमध्यें स्वतःसंबंधीं माहिती मधून मधून नमूद करून ठेवलेली आहे. पण त्याचें वाङ्मय शुद्ध स्वरूपांत आपल्यापुढें नसल्यामुळें अपपाठांनीं माहितीला क्वचित् विकृत स्वरूप प्राप्त झालें असून त्यापासून भलतेच समज पुढें आले. मुक्तेश्वराच्याच शब्दांत मुक्तेश्वर आपणास कसा दिसतो हें आतां पाहूं :—

१. मुक्तेश्वर हा एकनाथाच्या मुलीचा मुलगा होता :—

**मातृजनक** जनार्दनी । **येकनाथ** नमियेला ॥
— आदि० अ. १,७७.

गुरु म्हणूनही त्यानें एकनाथाचा निर्देश केला आहे :—

मुक्तेश्वरें **एकनाथु** । यातें साष्टांग प्रणिपातु ।
**गुरुस्वरूप** म्हणोनि हेतु । ग्रंथारंभीं वंदावा ॥
— वन० उपोद्घात.

२. त्याचें वास्तव्यस्थान गोदावरीचा कांठ, गोत्र अत्रि, वडिलांचें नांव चिंतामणि व स्वतःचें मूळ वैयक्तिक नांव मुद्गल असें होतें :—

---

१. आदिपर्वाच्या पहिल्या खंडाच्या आरंभीं जोडलेला 'श्रीमुक्तेश्वराचा शोध' हा निबंध पहा. पृ. १–४.

२. अन्नमलाईनगर ( मद्रास ) येथें सर राधाकृष्णन् यांच्या अध्यक्षतेखालीं १९५५ मध्यें भरलेल्या अखिलभारतीय प्राच्यपरिषदेपुढें आम्हीं या पत्रासंबंधीं इतिहास-विभागांत एक निबंध वाचला. (The Journal of the University of Bombay, Vol. XXV, Part 2, September 1956)

सुचिरसहजवासें **गौतमीच्या तटाकीं** ।
अतुट भजनपंथें पंथ टाकीत टाकी ।
द्विजवर कवि**नामा मुद्गल अत्रिगोत्री** ।
— रामायण, ( युद्धकांड ) ४७.

प्रसिद्ध महाराष्ट्रदेशीं । **गोदावरीतट**निवासी ।
**अत्रिगोत्र**पवित्रवंशीं । जन्म जाला जयातें ।
तो **चिंतामणिभूदेवकुमर** । श्रीदत्तांघ्रिपादाब्जभ्रमर ।
श्रोतयां विनवी मुक्तेश्वर । क्षमा कीजे समस्तीं ॥
— आदि० ( उपसंहार ).

**गोदावरीतटनिवासी** । **अत्रिगोत्री** पवित्र ऋषी ।
**चिंतामणि** गुणैकरासी- । पासाव जन्म जयाचा ॥
तो **मुद्गल चिंतामणिसुत** । **लीलाविश्वंभरा**नुग्रहीत ।
व्यासभारतींचा अर्थ । महाराष्ट्र बोलिला ।।
—— सभा० ( उपसंहार ).

'मुक्तेश्वर' हें मुद्रानाम आपल्या आराध्यदेवतेच्या नांवावरून भारत रचतांना त्यानें धारण केलें.

मुक्तेश्वर आपल्या आईचें नांव कोठेंही नमूद करीत नाहीं. महीपतीनें भक्तिविजयांत (अ. २३) **गोदावरी** ही एकनाथाची कन्या व चिंतोपंताची बायको म्हटलें आहे. ग्रंथमालेंत ( सप्टेंबर १९०२ ) प्रसिद्ध झालेल्या ता. २२ जुलै १७२७ व ३ मे १७५९ च्या कोल्हापुरच्या छत्रपतीच्या सनदांत मुक्तेश्वराच्या आईचा उल्लेख **गंगा** असा केलेला आहे. राजवाडे म्हणतात तसें **गोदावरी** हें तिचें माहेरचें नांव आणि **गंगा** हें सासरचें नांव असेल; किंवा गोदावरी नदीलाच गंगा हें दुसरें नांव प्रचारांत असल्यामुळें गोदावरीबद्दल गंगा असाही नांवाचा घोंटाळा झाला असणें शक्य आहे. "मुक्तेश्वरानें आपल्या मातापितरांच्या नांवाचा निर्देश 'लीला-विश्वंभर' या सामासिक पदानें केला आहे," असें काव्यसंग्रहकार ठिकठिकाणीं म्हणतात तें आम्हांला मान्य नाहीं. 'लीलाविश्वंभर' हें त्याच्या आराध्यदेवतेचें म्हणजे दत्तात्रयाचें नांव आहे.

३. कोल्हापुरची महालक्ष्मी व सोनारीचा भैरव या मुक्तेश्वराच्या कुलदेवताः—

करवीर**लक्ष्मी** विष्णुभाजा । **भैरव** सुवर्णपुरींचा राजा ।
उभय कुळदेवतीं माझा । मस्तक पायें स्पर्शिला ॥ —आदि० ( उपसंहार ).

नमूं करवीरनिवासिनी । जे **महालक्ष्मी** विश्वजननी ।
वंदूं **सोनारी भैरव** । तेणें दिधला हा गौरव । —सभा० ( मंगलाचरण ).

या आपल्या कुलदेवतांच्या आरत्याही मुक्तेश्वरानें लिहिलेल्या उपलब्ध आहेत.

४. 'मुक्तेश्वर' हें या कवीच्या आराध्यदेवतेचें नांव आहे. मुक्तेश्वर म्हणजे शिवस्वरूपी दत्तात्रय. त्यालाच तो विश्वंभर किंवा लीलाविश्वंभर याही नांवानें संबोधतो:—

( १ ) देवतात्मक मुक्तेश्वराचे निर्देश पहा:—

कवतुकें वदेल कवीची वाणी । **मुक्तेश्वरप्रसादें** । —आदि० १–१९३.
कवि **मुक्तेश्वर शूलपाणी** । त्याचेनि प्रसादें हे वाणी ।
सुखी करो श्रोतियां ॥—आदि० ४–१८८.
**मुक्तेश्वरप्रसादें** ह्मणे । कविकिंकर आवडी ।—आदि० ५–१३१.
**मुक्तेश्वर अवधूतमूर्ती** । तत्प्रसादें श्रोतयांप्रती । कविकिंकर अनुवादे ॥
—आदि० १३–१२९.

( २ ) मुक्तेश्वर म्हणजेच लीलाविश्वंभर :—

आदिकवीचा आदिगुरु । विश्वेश **लीलाविश्वंभरू** ।
भक्तिशक्ती **मुक्तेश्वरु** । वाक्यपुष्पीं अर्चिजे ॥ —आदि० १४–१६६.
परेश **लीलाविश्वंभरू** । **मुक्तीश**वाणी **मुक्तेश्वरु** ।
वदेल तेथें प्रेमादरु । सज्जनीं केला पाहिजे ॥ —आदि० २१–८८.

( ३ ) लीलाविश्वंभर म्हणजेच दत्तात्रेय :—

विश्वेश **लीलाविश्वंभरू** । **दत्तात्रय** जगद्गुरु ।
तत्प्रसादें मुक्तेश्वरु । निरोपी तें परिसावें ॥— आदि० २६–१२२.
चिन्मूर्ति **लीलाविश्वंभरू** । **दत्तात्रय** जगद्गुरु ।
त्याचेनि नामें मुक्तेश्वरू । कथा बोले भारती ॥— आदि० ३३–३८.
**लीलाविश्वंभर** स्वामियां । **दत्तात्रया** जगदात्मया ।
मनोभावें वंदूनि पायां । मुक्तेश्वर अनुवादे ॥— आदि ४६–८६.
**लीलाविश्वंभर** ईश्वरु । **दत्तात्रेय** जगद्गुरु ।
ज्याचेनि नामें भवसागरु । मागां तरले असंख्य ॥— सभा० १–६.
ॐ नमो जी **विश्वंभरु** । तो देव **दत्तात्रय** जगद्गुरु ।
जनार्दना अभयकरु । कटाक्षेंशीं बाणला ॥— एकनाथचरित्र.

वरील ओव्यांवरून लीलाविश्वंभर म्हणजे मुक्तेश्वराचीं मातापितरें नसून तो कोण आहे तें सहज कळून येईल.

५. विश्वंभर किंवा लीलाविश्वंभर याचा गुरु म्हणूनही हा कवि निर्देश करतो :—

परी विश्वंभर**गुरु**प्रसादें । मुक्तेश वदे आरुषशब्दें ।—आदि० ९–९७.
पवित्र मुक्तेश्वराचें वदन । विश्वंभर **गुरु**नामें ।—सभा० १४–१७१.
विश्वंभरश्री**गुरु**च्या प्रसादें । आनंदवाचा वदलों विनोदें ।—रामायण.
लीलाविश्वंभर **गुरु**चरणीं । पुष्पांजली वचनसुमनीं ।
मुक्तेश्वरें अर्पूनी मनीं । कृतकृत्यता मानिली ॥—वन० उपसंहार.

लीला ही मुक्तेश्वराची आई व विश्वंभर हा त्याचा बाप ह्या कल्पनेला जरी काव्यसंग्रहकार, राजवाडे, पांगारकर वगैरेंनीं उचलून धरलें असलें तरी बाळकृष्ण अनंत भिडे व दा. के. ओक यांनीं ती त्याज्य ठरविली आहे. परंतु विश्वंभरबोवा नांवाचा कवीचा मानवी गुरु होता, अशी त्यांची समजूत झालेली दिसते. वास्तविक आराध्यदेवतेलाच मुक्तेश्वर गुरुस्वरूप मानतो. पहाः—

मुक्तेश्वराचा **श्रीगुरु** । **दत्तात्रय** हा अवतारु ॥–सभा० ८–१६८.
शक्रविधिच्या मस्तकीं । ज्याची पादुका मिरवे निकी ।
तो **विश्वंभर गुरु पिनाकी** । विष्णु आपण विश्वात्मा ॥–विराट० ८–१२१.
**सद्गुरुपांडुरंग**चरणीं । स्पर्शों आली प्रवाहें ॥—आदि० ३२–१०४.
लीळाविश्वंभर **सद्गुरु** । सकळ सिद्धांचा ईश्वरु ।—आदि० ४८–११६.
मुक्तेश्वराचा श्रीगुरु । **दत्तात्रय** परब्रह्म अवतारु ।–हनुमंताख्यान.

सभापर्वाच्या अखेरीला काव्यसंग्रहादि जुन्या प्रतींच्या शेवटीं असलेल्या

तो मुद्गल चिंतामणिसुत । **लीलाविश्वंभर जगविख्यात** ।
व्यासभारतीचा अर्थ । महाराष्ट्र बोलिला ॥

या ओवींतील दुसऱ्या चरणांतील अर्थहीन **अप**पाठामुळें पुष्कळांचा चिंतामणि म्हणजेच लीलाविश्वंभर असा चुकीचा समज झाला. वास्तविक, विश्वसनीय अशा सभापर्वाच्या अनेक हस्तलिखितांमध्यें 'लीलाविश्वंभर जगविख्यात' या चरणाऐवजीं **लीलाविश्वंभरानुग्रहीत** । असा चरण आहे आणि तोच खरा पाठ आहे. 'लीलाविश्वंभरानुग्रहीत' असें या कवीनें स्वतः अन्यत्रही ठिकठिकाणीं म्हटलें आहे. ( सभा० २–१३३, वन० १–१६०, ४–१६२ ).

६. एकनाथाचा गुरु जनार्दनस्वामी हा दत्तोपासक होता व त्याचाच सांप्रदाय एकनाथ व मुक्तेश्वर यांनीं पुढें चालविला :—

'एकनाथचरित्रा'च्या आरंभीं मुक्तेश्वर म्हणतो,

ॐ नमो जी विश्वंभरु । तो देव **दत्तात्रय** जगद्गुरु ।
जनार्दना अभयकरु । कटाक्षेंशीं बाणला ॥

आणि शेवटीं लिहितो,

एका जनार्दनीं स्वार्थ । मुक्तेश्वराचा मुख्य परमार्थ ।
धरूनि मूळचें सूत्र । लीलाविश्वंभर म्हणविलें ॥

आपणास 'श्रीदत्तांघ्रिपद्मभ्रमर' असें मुक्तेश्वरानें ठिकठिकाणीं म्हणविलें आहे. ( आदि० ८–९२, ११–१७१ )

एकनाथमुक्तेश्वराचा दत्तात्रयपंथ म्हणजेच अवधूतपंथ असावा. अवधूतपंथ हा नाथपंथाचीच एक शाखा असून त्याचा संस्थापक गोरक्षनाथ होता, असें कै. सरदार ना. य. मिरीकर लिहितात.[3] एकनाथानें आपल्या एका अभंगांत ( २०२ ) 'अत्रिनाथ दीनानाथ

३ **श्रीज्ञानेश्वरदर्शन**, भा. १, अहमदनगर, १९३४, पृ. ५०.

अ. क्र. २०२४... दि: ..........
मुक्तेश्वर ...१५१८ (१२)१५

ब्रह्मरूप दत्तगुरु । ' असें म्हटलें आहे ' नारायण विधि अत्रिनाथ । दत्त जनार्दन एकनाथ ' ही परंपरा सांगणारा एकनाथांचा दुसरा एक अभंग[४] आहे :—

जो निर्गुण निराभास । जेथून उद्भव शबल ब्रह्मास ।
आदिनारायण ह्मणती ज्यास । तो आदिगुरु सर्वांस ।। १ ।।

तयाचा ब्रह्मा अनुग्रहीत । ब्रह्मा अत्रीस उपदेशीत ।
अत्रीपाद प्रसादीत । **श्रीदत्तात्रेय अवधूत** ॥ २ ॥

दत्तात्रेयपरंपरा । सहस्रार्जुन यदु दुसरा ।
जनार्दन शिष्य तिसरा । केला कलीयुगीं खरा ।। ३ ।।

जनार्दनकृपेस्तव जाण । समूळ निरसलें भवबंधन ।
एका जनार्दना शरण । झाली परंपरा संपूर्ण ॥ ४ ॥

मुक्तेश्वरानें एकनाथाचा गुरु म्हणून निर्देश केल्याचा उल्लेख वर आलाच आहे. मुक्तेश्वराच्या आदिपर्वाच्या संशोधित प्रतीमध्यें दोन ठिकाणीं '**मुक्तिनाथ**' असा अध्यायाच्या शेवटास पाठ आढळतो :-

सेवा ह्मणे कविकिंकर । '**मुक्तिनाथ**' श्रोतियां ॥ -( आदि० १२ ).
**मुक्तिनाथ** कवि वदे -( आदि० ४४ ).

या सूचक नामांतरावरून एकनाथाची परंपरा पुढें चालविण्याचा कविमुक्तेश्वराचा भाव व्यक्त होतो·

'मुक्तेश्वर जो मी **अवधूत**' ( आदि० १-४४ ),
'मुक्तेश्वर **अवधूत**मूर्ती ' ( आदि० १३-१२९ ),
**अवधूतपदजळ**सरोवरीं । मुक्तेश्वर सप्रेम शफरी ।'( आदि० २९-१७२ ),

या निर्देशांवरून मुक्तेश्वराची अवधूतपंथाविषयींची निष्ठा दिसून येते. शिव व विष्णु यांच्यामध्यें भेद नसून एकाच देवतेचीं तीं दोन अंगें आहेत, हें दाखविण्याकरितां श्री दत्तात्रयाची उपासना प्रथम सुरू झालेली दिसते; परंतु या अवधूतसांप्रदायांत पुढें शैव व वैष्णव असे दोन भेद निर्माण झाले असें म्हणतात. लीलाविश्वंभराच्या परब्रह्मस्वरूपाची मुक्तेश्वरानें दोन प्रकारें कल्पना केली आहे. आदिपर्वाच्या आरंभींच पहिल्या पंचायतनस्वरूपाचें त्यानें पुढील-प्रमाणें वर्णन केलें आहे :—

ॐ नमो लीलाविश्वंभरा स्वामी । तुझिये स्वरूपपरब्रह्मीं ।
पंचायतन पंचनामीं । कल्पिजेती अवयव ॥ १ ॥

---

४ **श्रीएकनाथमहाराजांच्या अभंगांची गाथा** – ( तुकारामतात्या ), मुंबई, १९०३, अभंग ७२.

तेथें **शिव** तो निज मस्तक । **विष्णुसूर्य** द्वय हस्तक ।
सव्य चरण **विनायक** । वाम तो **शक्ति** साजिरा ॥ २ ॥



लगेच पांचव्या ओवींत दुसऱ्या त्रिमूर्तिस्वरूपाचें म्हणजे श्री दत्तात्रयस्वरूपाचें त्यानें वर्णन केलें आहे तें पहा :—

कां नाभिपाद्‌ांत **कमळासनु** ।
मध्यकंठांत **रमारमणु** ।
स्कंधावरुता **त्रिलोचनु** ।
अंगत्रयीं जो येकु ॥ ५ ॥

यावरून मुक्तेश्वर हा अवधूतसांप्रदायी शैव म्हणावा लागतो.

७. या कवीनें आपलें श्लोकरामायण प्रथम लिहिलेलें दिसतें. या ग्रंथाला ‘ संक्षेपरामायण ’ असें त्यानें नांव दिलें आहे. युद्धकांडाच्या अखेरीला ‘ सादरें शेवटीं ग्रंथ नेला ’ असें म्हणून,

द्विजवर कविनामा मुद्गल अत्रिगोत्रीं ।
विमल वचनमुक्तीं लेववी संतश्रोत्रीं ॥

या श्लोकांत ‘ मुद्गल ’ असें आपलें मुद्रानाम त्यानें नोंदलें आहे.

मुक्तेश्वरकृत रामायणाच्या उपलब्ध प्रतींत सांपडणारे आरंभींचे तीन संस्कृत श्लोक व शेवटचें उत्तरकांड हे भाग मूळ संक्षेपरामायणाला मागाहून जोडले गेले असावेत. त्यांत ‘ मुक्तेश ’ किंवा ‘ मुक्तेश्वर ’ हें त्यानें पुढें धारण केलेलें नांव नमूद आहे.

तो **मुद्गल** चिंतामणिसुत । लीलाविश्वंभरानुग्रहीत ।

या सभापर्वाच्या अखेरीच्या उपरिनिर्दिष्ट ओवींत ‘ मुद्गल ’ हें मूळ आपलें व्यक्तिनामच कवीनें गोवलें आहे ‘ **चिंतामणिसुत मुद्गलीं** सुख ठेलें । ’ किंवा ‘ **मुद्गल चिंतामणि** अनुसरे जाणा । ’ असे शेवटास चरण असलेल्याही कविता अलीकडे आम्हांला उपलब्ध झाल्या. त्या ‘ मुक्तेश्वर ’ हें पारमार्थिक नांव धारण करण्याच्या अगोदर या कवीनें रचिलेल्या उघड दिसतात. वरील ओव्यांत आढळणारें ‘ मुद्गल ’ हें व्यक्तिनाम नसून उपनाम आहे, असा कांहीं लोकांचा आग्रह आहे; तो कितपत योग्य आहे तें वाचकांनींच ठरवावें. भिडे व भावे मुद्गल हें कवीचें व्यक्तिनामच मानतात. पांगारकरांच्या ‘ कविवर्य मुक्तेश्वर ’

या पुस्तकाचें परीक्षण करतांना 'महाराष्ट्र–साहित्य'[5] मासिकांत भिडयांनीं आपल्या मताचा जोरानें पुनः पुरस्कार केलेला नुकताच आमच्या वाचनांत आला.

८. मुद्गल हें जरी कवीचें मूळ व्यक्तिनाम असलें तरी 'मुक्तेश्वर' हें नवें नांव त्यानें केव्हां व कसें धारण केलें, यासंबंधीं आदिपर्वाच्या आरंभींच तो म्हणतोः—

हो. कां डोळसु पायाळ निका । परी गुरुआज्ञेचें अंजन देखा ।
प्रसन्नतेची भाग्यरेखा । नसतां निधान कैं जोडे ॥ ४० ॥

ह्मणवुनी देवतारूपें वहिला । येक श्रीगुरु म्यां स्तविला ।
अभेदभक्तिचेनि भुलला । आज्ञापितु निजमुखें ॥ ४१ ॥

ह्मणे रे बाळकें घेतला थाया । तो साच करोनि दाखवी माया ।
तेवीं त्वां आदरिलें तें वायां । केवीं आह्मीं धाडणें ॥ ४३ ॥

**मुक्तेश्वर जो मी अवधूत । माझेनि नामें मुद्रांकित ।**
**कथा विस्तारीं भारत । महाराष्ट्रपदबंधीं ॥ ४४ ॥**

'मुक्तेश्वर' हा देवतावाचक शब्द हा कवि आदिपर्वाच्या आरंभींच्या कांहीं अध्यायांतच वापरतो; परंतु आराध्यदेवता व कवि यांचें नांव एकच झाल्यामुळें घोटाळा होऊं नये म्हणून पुढें 'लीलाविश्वंभर' याच नांवानें तो आराध्यदेवतेचा निर्देश करतो तरीपण आराध्यदेवतेचें नांव धारण करून आपण भारतकथा वर्णन करतों असें त्यानें पुढेंही म्हटलें आहे हें पुढील ओवीवरून दिसतें :—

चिन्मूर्ति लीलाविश्वंभरू । दत्तात्रय जगद्गुरु ।
त्याचेनि **नामें** मुक्तेश्वरू । कथा बोले भारती ॥ —आदि० ३३–३८.

कवीच्या आत्मचरित्रपर शब्दांत दिलेल्या या माहितीबद्दल शंका घेण्यास कारण आहे, असें आम्हांला वाटत नाहीं. हा **श्रीमुक्तेश्वर** देव कुठला हा मात्र प्रश्न आहे. म्हणूनच 'श्रीमुक्तेश्वराचा शोध' (search) हें नांव आदिपर्वाच्या पहिल्या दोन खंडांना आरंभीं जोडलेल्या निबंधाला आम्हीं दिलें होतें. महाराष्ट्रांत मुक्तेश्वराचीं देवालयें आहेत, हें प्रथम आम्हांला माहीत नव्हतें. आदिपर्वाच्या आरंभीं मुक्तेश्वरानें दक्षिणेंतील कांचीचा वरदराज वगैरे अनेक देवतांना नमन केलें असल्यामुळें कांचीला असलेला श्रीमुक्तेश्वरच आपल्या कवीची आराध्यदेवता तर नसेल, अशी आम्हांला प्रथम शंका आली. त्या देवालयाचा म्हणून एक फोटो आदिपर्वाच्या पहिल्या खंडांत आम्हीं प्रसिद्धही केला. अलिकडे दक्षिणेंतील कांहीं क्षेत्रें आम्हीं पाहिलीं. आणि कांचीला जाऊन या मुक्तेश्वराचें दर्शन घेण्याचा प्रयत्न केला; परंतु मुक्तेश्वराच्या देवालयाचा म्हणून जो उपरिनिर्दिष्ट फोटो आर्क्यॉलॉजिकल डिपार्टमेंट सदर्न सर्कलनें (मद्रास) आमच्याकडे पाठविला तो मुक्तेश्वराच्या देवळाचा नसून मातंगेश्वराच्या देवळाचा आहे, असें आम्हांस दिसून आलें ! श्रीमुक्तेश्वराचें निराळेंच एक लहान देवालय आहे, तेंही आम्हीं पाहिलें.

अलीकडे महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं श्रीमुक्तेश्वराचीं देवालयें असल्याचें आढळून आल्यामुळें आपल्या कवीच्या आराध्यदेवतेचा शोध करण्यास मद्रासपर्यंत दूर जाण्याचें

---

५ महाराष्ट्र-साहित्य, मुंबई, पुस्तक ३, अ. १० (१९२२). पृ० २७९.

कारण आहे, असें वाटत नाहीं. ( महिकावतीच्या बखरीमध्यें " प्रतापश्या मुक्तेश्वरीं स्नानास आतां आंधेरिस देशक मिळोन मारिला," असें वर्णन आहे[६] त्यावरून बृहन्मुंबईतही श्रीमुक्तेश्वराचें देवालय होतें असें दिसतें. ) एकंदर विचार करतां पैठणच्या शेजारींच प्रवरा-गोदावरीसंगमावर असलेला कायगांव येथील श्रीमुक्तेश्वर हाच आमच्या कवीची आराध्यदेवता असणें जास्त संभवनीय आहे, असें आम्हांस वाटतें.

कवि मुक्तेश्वराचे अखेरचे दिवस कुरुंदवाडजवळ तेरवाड या गांवांत गेलेले दिसतात. त्याच्या पूजेच्या पादुका असललें एक लहानसें देऊळ तिकडे आहे. मुक्तेश्वराचें वृंदावन तिकडे असल्याचा कोल्हापूरच्या छत्रपतीच्या सनदांत निर्देश आढळतो; परंतु आज तें तेथें दिसत नाहीं. आम्ही तिकडे गेलों असतां मुक्तेश्वराच्या वंशजांकडून पुरानें तें वाहून गेल्याचें सांगण्यांत आलें.

मुक्तेश्वराच्या चरित्रापेक्षां त्याचें वाङ्मय जास्त महत्त्वाचें आहे. त्यानें प्रथम लिहिलेल्या श्लोकरामायणाचा उल्लेख वर आलाच आहे. मुक्तेश्वराचीं आदि, सभा, वन आणि विराट अशीं चारच पर्वें प्रथम उपलब्ध होतीं. अलीकडे त्याच्या नांवावर सौप्तिक हें मधलेंच एक पर्व सांपडल्यामुळें भारताची इतर पर्वेंही आज ना उद्यां उपलब्ध होतील अशी आशा बाळगण्यास जागा झाली; परंतु गेल्या दहा वर्षांत जो आम्हीं मुक्तेश्वरवाङ्मयाचा सर्वत्र कसून शोध केला, त्यावरून ती अनाठायीं म्हणावी लागते. 'मुक्तेश्वरकृत स्फुट काव्यें,' या पुस्तकांत प्रसिद्ध झालेलीं हरिश्चंद्राख्यान, शुकरंभासंवाद, मूर्खांचीं लक्षणें, हनुमंताख्यान हीं काव्यें मुक्तेश्वराचीं आहेत; परंतु भगवद्गीता, गजेंद्रमोक्ष, विश्वामित्रभोजन, दुर्योधनशल्य-परिस्फोट, अर्जुनकामपूर्ति ही काव्यें व कांहीं पदें महाभारतकार-मुक्तेश्वराचीं असतील असें त्यांच्या भाषेवरून आह्मांस वाटत नाहीं. नांदेडचे रा. वि. अं. कानोले यांना अलीकडे रामायणाचें एक त्रुटित ओवीबद्ध उतरकांड सांपडलें आहे व तें मुक्तेश्वराचें असावें, असें त्यांचें म्हणणें आहे. याच उत्तरकांडाची एक संपूर्ण प्रत आम्हांस सांपडली असून आणखीही अशा दोन संपूर्ण प्रती उपलब्ध असल्याचें कळतें. त्या मिळविण्याचा आमचा प्रयत्न असून या काव्याची एक संशोधित प्रत तयार करण्याचा आमचा विचार आहे. म्हणजे हें काव्य मुक्तेश्वराचेंच आहे कीं काय हें निर्णयात्मक रीतीनें सांगतां येईल.

मुक्तेश्वराच्या सभा, वन व विराट या पर्वांच्या संशोधित प्रती तयार करण्याची आमच्या कांहीं विद्यार्थी मित्रांची मनीषा आहे. त्या प्रती तयार झाल्यावर मुक्तेश्वरी वाङ्मयावर एक समालोचनपर स्वतंत्र ग्रंथ आम्हीं प्रसिद्ध करूं इच्छितों.

मुक्तेश्वराचें चरित्र व काव्य यासंबंधीं जास्त तपशीलवार माहिती तसेंच मुक्तेश्वरकृत व मुक्तेश्वरविषयक वाङ्मयाची यादी आदिपर्वाच्या पहिल्या खंडांत दिली आहे, तीही जिज्ञासू वाचकांनीं अवश्य पहावी, अशी आमची सूचना आहे.

---

६ महिकावती ऊर्फ माहीमची बखर, सं. वि. का. राजवाडे, श. १८४६. पृ. ५८.

# मुक्तेश्वरकृत महाभारत

## आदिपर्व

### खंड चवथा

# चवथ्या खंडांतील कथाभाग


**अध्याय ३९ वा**—द्रुपदास पुत्र व कन्या यांची प्राप्ति ( १–६३ ), द्रौपदीच्या स्वयंवराची वातमी पांडवांस कळते ( ६४–८२ ), स्वयंवरास जाण्यास पांडवांना व्यासाचा आदेश ( ८३-९९ ). पृ० ८२६–८३८

**अध्याय ४० वा**—अर्जुनास चित्ररथ गंधर्व चक्षुषीविद्या देतो (१–४७), तापत्याचा जन्म (४८–६१), वसिष्ठाख्यान (६२–१२९), पराशराचें राक्षससत्र व और्वाख्यान (१३०–१६९). पृ० ८३९–८६१

**अध्याय ४१ वा**—द्रौपदीस्वयंवरांतील अर्जुनाचा यंत्रभेद. ( १–७८ ); संक्षुब्ध कौरवांबरोबर भीमाचें युद्ध ( ७९–१५० ) पृ० ८६२–८८४

**अध्याय ४२ वा**—भिक्षुक जांवई मिळाल्याबद्दल द्रुपदाला खंत (१–३१), पांडव ओळख देतात (३२–८३), द्रौपदीला पांच पति कां याबद्दल व्यासाचें निवेदन. (८४–१४८). पृ० ८८५–९१०

**अध्याय ४३ वा**—द्रौपदीचा विवाहोत्सव. (१–५२). पृ० ९११–९२४

**अध्याय ४४ वा**—पांडव जिवंत आहेत हें कळून कौरवांमध्यें उडालेली खळबळ ( १–५० ), कौरवांची द्रुपदावरील स्वारी व पराभव (५१–१२३). पृ० ९२५–९४४

**अध्याय ४५ वा**—पांडवांच्या आगमनाची धृतराष्ट्र, विदुर, दुर्योधन, भीष्म, द्रोण व कर्ण यांवरील प्रतिक्रिया ( १–६४ ), पांडवांना बोलावण्यास धृतराष्ट्र विदुरास पाठवितो ( ६५–७३ ), द्रुपदाकडून पांडवांचा गौरव व त्यांचें हस्तिनापुरास गमन (७४–१०७), पांडवांचें स्वागत व धर्मराजाचा इंद्रप्रस्थ येथें अभिषेक (१०८–१५३), कौरवांचा खेद (१५४–१६१). पृ० ९४५–९६६

**अध्याय ४६ वा**—इंद्रप्रस्थाची रचना व वर्णन (१–२५), सुंदोपसुंदांचें आख्यान (२६–७७), द्रौपदीविषयीं नारदानें पांडवांना घालून दिलेला नियम (७८–८६). पृ० ९६७–९८१

**अध्याय ४७ वा**—चोरांपासून ब्राह्मणांच्या गाईंचें रक्षण करण्यांत अर्जुनाकडून झालेला नियमभंग व तीर्थाटण (१–१८), उलुपीची भेट (१९-२८), पुढील यात्रा (२९–३६), चित्रांगदेशीं अर्जुनाचा विवाह (३७–४८), पुढील यात्रा व पंच अप्सरांचा उद्धार (४९–६३), बभ्रुवाहनाचा जन्म (६४–६७), द्वारावतीस गमन व सुभद्राहरण (६८–१३५), इंद्रप्रस्थास आगमन (१३६–१४७). पृ० ९८२–१००४

**अध्याय ४८ वा**—सुभद्रेचा विवाह ( १–३३ ), सुभद्रा व द्रौपदी यांना पुत्रप्राप्ति (३४–४८), कृष्णार्जुनांचा वनविहार (४९–७२), खांडववनदहनाची मागणी (७३–८७). पृ० १००५–१०२२

**अध्याय ४९ वा**—श्वेतकेतूच्या यज्ञामुळें अग्नीस उदररोग ( १–३७ ), खांडववनदहन ( ६८–१४८ ). पृ० १०२३–१०४८

**अध्याय ५० वा**—मंदपाल व जरिता या पक्ष्यांचें आख्यान ( १–१०६ ), उपसंहार ( १०७–११८ ). पृ० १०४९–१०६६

२८२९

॥ श्री ॥

# अध्याय एकोणचाळिसावा

## श्रीगणेशाय नमः

येकचक्र नाम नगरीं । पांडव असतां[1] ऐसिये परी[2] ।
अकस्मात येके[3] अवसरीं[4] । ब्राह्मण येक पातला ॥ १ ॥

निशा क्रमावया[1] वस्ती[2] । ठाव मागे यादवीप्रती ।
सन्मानूनि परम भक्ती । धर्मराजें पूजिला[3] ॥ २ ॥

निशाकाळीं घालूनि शय्या । पार्थ स्वहस्तें[1] चुरी[2] पायां[3] ।
ह्मणे स्वामी कवणा ठायां[4] । गमनइछा[5] सांगीजे ॥ ३ ॥

ब्राह्मण ह्मणे गा[1] सुपवित्रा । जाणें नगरा अहिछत्रा[2] ।
द्रुपदराजपृषद्पुत्रा–। घरीं उत्साह[3] मांडला[4] ॥ ४ ॥

द्रुपदरायाची नंदिनी । जिये नाम याज्ञसेनी ।
अयोनिजा[1] लावण्यखाणी[2] । उपमे आन असेना ॥ ५ ॥

हो कां वैकुंठविलासिनी । अथवा[1] कैलासनगरवासिनी[2] ।
दोंवेगळी[3] उपमा वाणी । देवों नेदी आणिकां[4] ॥ ६ ॥

---

१. १ वर्तती नि , आसतां धु पु४ ; २ परीं पु ख रा ; ३ ते नि मुं , तये पु ख , त्या औं ; ४ अवसरीं नि पु४ मुं गो रा तं.

२. १ क्रमावयाचे नि , कर्मावया औं धु तं , झालिया गो· २ ; २ आर्ती नि , त्वरीती ख ; ३ राहविला नि.

३. १–२ चुरी स्वहस्तें खत्रगं ; ३ पांया नि ; ४ ठाया नि पु मुं गो ; ५ गमनेच्छा नि , गमनेछा औं पु.

४. १ ( – ) नि ; २ अहीक्षेत्रा गो२, आहीसत्रा धु तं ; ३ उत्सव नि ( स प्रसंप्रा ) ; ४ मांडिला नि औं पु नां.

५. १ अयोनिज नि धु गो२ ; १–२ अथवा कैलासनिवासिणी मुं.

६. १–२ अयोनिजा लावण्यखाणीं मुं ; ३ दोघींवेगळी नि , दैवावेगळी नां ; ४ आणिका नि पु४ गो.

कुमरी आणि कुमर येक । होमीं प्रसवला पावक ।
त्यांसी योनिसंभव लोक[१] । सांग कैसे[२] उपमावे[३] ॥ ७ ॥
धर्म ह्मणे ब्राह्मणोत्तमा । अग्नीपासाव[१] मनुष्यप्रतिमा[२] ।
जन्मल्या[३] हें कौतुक आह्मां । विस्तारूनि सांगीजे ॥ ८ ॥
तापसी[१] ह्मणे मुनिश्चळ । कथा ऐक[२] पवित्र विमळ[३] ।
श्रवण कीजे[४] तें[५] तात्काळ । फळ पाविजे निर्धारें ॥ ९ ॥
द्रोणें गांजिला पृषदात्मज । पांडवांहातीं[१] हिरतलें[२] राज्य ।
त्या[३] दुःखाची[४] धरूनि लाज । संतापला तळमळी[५] ॥ १० ॥
ह्मणे ब्राह्मणें कपट पोटीं । धरूनि यश साधिलें शृष्टीं[१] ।
जळो हे[२] क्षात्रत्वाची गोष्टी । तृणासाटीं[३] सरेना[४] ॥ ११ ॥
राज्यभोगीं संताप मना । विषाद वाढला[१] चौंगुणा[२] ।
तपोवनीं तपोधना । मंत्रसिद्धा[३] शोधितु ॥ १२ ॥
भाग्यें भागीरथीच्या[१] कुळीं । देखिली[२] विस्तीर्ण[३] ऋषिमंडळी[४] ।
अतपी[५] अव्रती[६] जिये[७] स्थळीं । अंश्नातक[८] असेना ॥ १३ ॥
त्यामाजी[१] श्रेष्ठत्वें प्रसिद्ध । दोघां मिरवे आचार्यशब्दु ।
याज उपयाज सखे[२] बंधु । तपोतेजें[३] आगळे ॥ १४ ॥

---

७. १ देख नां मुं ; २–३ कैसें उपमात्रें पु·४ ख मुं गो·२ रा.
८. १ °पासूनि नि ; २ मानुष प्रतिमा नि; ३ जन्मली नि पु४.
९. १ तापस नि औं पु·४ मुं; २ ऐका औं पु४ ख नां गो·२; ३ निर्मळ नि औं पु मुं गो·२ रा; ४–५ करितां नि.
१०. १ पांडवांहस्तें नि; २ हरितलें नि ख नां मुं गो·२; ३ या पु ख नां मु गो·२; ३–४ याची धु; ४ अवमानाची नि; ५ तळमळीं गो२ रा.
११. १ सृष्टीं नि; २ (–) नि, ते पु४; ३ °साठीं नि धु; ४ जालों धु.
१२. १ वाढे औं मुं, वाढी पु; २ चहूंगुणा नि, °गुणां पु४ ख धु; ३ °सिध नां मुं गो, °सिद्धांत तं, मंत्रसीधि पु४ ख.
१३. १ °रथीचे नि; २–३ विस्तीर्ण देखिली नि खवर्ग; ४ रुषी° पु४ धु; ५ तपी नि; ६ असती नि, आवृति पु४ धु; ७ तये नि; ८ अस्नात स, (+) कोणी नि.
१४. १ त्यांमाजि नि; २ सख्खे नि; ३ तपस्तेजें नि.

ज्यांचा क्रोध ब्रह्मांड जाळी । कृपा बैसवी सुरेंद्रमौळीं ।
रिद्धि[1] सिद्धी[2] पादधूळी–। माजी रुळती सर्वदा ॥ १५ ॥
ब्रह्मऋषि समसमान[1] । संहिताध्ययनिं[2] सांग निपुण[3] ।
कश्यपगोत्री तपोधन[4] । वरें शापें समर्थ[5] ॥ १६ ॥
वडील याज वसे वनीं । कनिष्ट[1] उपयाज आश्रमसदनीं ।
द्रुपदें येवूनियां तया[2] चरणीं । लोटांगण घातलें ॥ १७ ॥
ह्मणे तूं[1] स्वामी[2] समर्थ[3] । पुरवीं माझे[4] मनोरथ[5] ।
अभय देसी तरी यथार्थ[6] । निवेदीन[7] वृतांतु[8] ॥ १८ ॥
उपयाज ह्मणे बोल वचनें । जरी मानलें[1] माझेनि[2] मनें ।
तरी न शकिजे[3] चतुराननें । तें मी शक्त करावया[4] ॥ १९ ॥
समरीं द्रोणातें संव्हारी[1] । ऐसा पुत्र द्यावा उदरीं ।
होय अर्जुना[2] अंतुरी । ऐसी कुमरी दे[3] मातें[4] ॥ २० ॥
इतुका रक्षिल्यां[1] माझा[2] मान[3] । अर्बुदसंख्या अर्पीन धन[4] ।
याहीवेगळें[5] इछिल मन[6] । तें मी सर्व पुरविता[7] ॥ २१ ॥

---

१५. १ **ऋद्धी** नि, **रिधी** पु४ गो; २ **सीधि** पु४.

१६. १ °**समानू** नि; २ °**ध्ययन** नि पु ख नां मुं, °**ध्ययनें** पु४; ३ **ज्ञानू** नि; ४ **तपोधनू** नि; ५ **समर्थू** नि.

१७. १ **कनिष्ठ** नि तं, (–) धु; २ (–) नि खवर्ग.

१८. १–२ **गा तूं** नि औं पु४, **स्वामी तूं** गो·२ रा, **तूं गा** ख नां; ३ **अतिसमर्थू** नि; ४ **माझा** नि मुं; ५ **मनोरथू** नि; ६ **यथार्थू** नि; ७ **व्रतांत** पु४; ८ **वृत्तांता** नि, **व्रतांत** मुं, **निवेदीन** पु४.

१९. १ **मानेल** नि औं पु४ ख नां, **मानिजेल** मुं; २ **माझिया** नि धु; ३ **शंकिजे** नि (स प्रसंप्रा); ४ **द्यावया** धु, **कराव्या** तं.

२०. १ **संहारी** नि मुं; २ (+) **ची** औं पु गो२; ३–४ **देईं मज** धु तं.

२१. १ **रक्षिल्या** गो·२ ख; १–२ **माझा रक्षिलिया** नि, **माझा रक्षिल्यां** औं पु; ३ **मानु** औं पु ख मुं; ४ **धेनु** औं पु धु रा, **धनु** ख मुं; ५ **यावेगळें** नि; ६ **मनु** खवर्ग (**मनें** नां) धु; ७ **पुरवीन** औं पु.

ऐसी परिसोनियां विनंती[1] । ऋषी आदरें न[2] धरी चित्तीं ।
समर्थ जाणोनि अहोरातीं । सेवा करी सद्भावें ॥ २२ ॥
लोटल्यां[1] येक संवत्सर । कृपा[2] द्रवला करुणाकर ।
बोले आज्ञेचें उत्तर । कार्यसिद्धीकारणें[3] ॥ २३ ॥
याज ऋषी वसे वनीं । तपोतेजें तीव्र[1] तरणी ।
नित्यनेमें संहिताध्ययनीं । विष्णुस्मरणीं सावध[2] ॥ २४ ॥
असज्जनाचिया[1] स्मरणा । कदां आतळों[2] नेदी रसना ।
पवित्र पुरुषाचिया गुणा[3] । श्रोत्रीं वक्त्रीं रिघुनिघुं[4] ॥ २५ ॥
नेणतां[1] शुद्धाशुद्ध स्थळ । हातीं न सिवे[2] पडिलें फळ ।
आचारहीनाचें[3] अळुमाळ । अवलोकन करीना ॥ २६ ॥
हेमरत्नादि[1] अनर्घ्य वस्तु । विजनीं[2] पडल्यां न[3] लवी[4] हातु ।
तेथ प्रतिग्रहाची[5] मातु । केवीं झगटे तयासी[6] ॥ २७ ॥
मधुकरें[1] आणिलें[2] अन्न । ब्राह्मण त्यागिती उपेक्षून ।
तें भक्षूनि रक्षी प्राण । स्वादास्वाद न[3] ह्मणतां[4] ॥ २८ ॥
तयाप्रति[1] जाऊनि विनीत । निवेदीं आपुलें मनोगत ।
तेणें अंगीकारिल्यां अर्थ । इछिला[2] तो पावसी ॥ २९ ॥

---

२२. १ विनती खवर्ग ( श्रोत्तीं ख ); २ (–) पु ४ मुं गो·२.

२३. १ लोटल्या नि ख मुं गो·२ रा ; २ कृपें नि, कृपे ख ; ३ कार्यसीधिकारणें पु४ ख.

२४. १ जेंवी नि ( जेवीं स ); २ सादर नां, सावधान मुं.

२५. १ आप्तजना° ख ; २ आतळो नि ( स प्रसंप्रा ); ३ वचना ख ; ४ वसविलें नि, रिगुनिगु आँ पु, रिघेनीघे पु४, रिघूनी गो·२, रिघे गुण तं, रिघनिग मुं, धरीतसे धु.

२६. १ नेणवे खवर्ग ( नवेचे मुं ); २ शिवे नि गो·२ ; ३ (+) अन्न नि, आचारहीनातें आँ पु.

२७. १ °रत्नाची आँ पु·४, °रत्नी ख ; २ (–) आँ पु ; ३–४ नातळावा आँ पु ; ४ लाश्री नि पु४ ख ; ५ परिग्रहाची नि तं ; ६ तयातें नि.

२८. १ मधुकरी मागोनि नि ; २ मागीतलें खवर्ग ; ३–४ नेणतां नि.

२९. १ त्याप्रति नि ; २ इच्छीत ख, इच्छिला नि.

शिरीं वंदूनि ऋषिवचना[1] । द्रुपदराजा पातला वना ।
दृष्टी[2] देखोनि तपोधना । केलें चरणां दंडवत ॥ ३० ॥
उभा देखोनि जोडल्या हस्तीं । तापसी[1] पुसे भ्रूसंकेतीं[2] ।
कवण कार्याचिये अर्थी[3] । आगमन या ठायां[4] ॥ ३१ ॥
द्रुपद बोले[1] सद्गदकंठ[2] । मज[3] मस्तकींचा कीर्तिमुकुट ।
द्रोणाचार्यें[4] हरिला[5] प्रगट । लाजऊनि[6] वंशातें ॥ ३२ ॥
शिष्यबळें जिंकोनि[1] पैज । अवमानूनि हिरतलें[2] राज्य ।
शब्दशस्त्रीं[3] माझें तेज । निस्तेजिलें[4] धिःकारें[5] ॥ ३३ ॥
दीन करूनि सोडिलें शृष्टी[1] । स्वामीनें[2] घालावें मज[3] पाठीं ।
पुढती[4] यशाचिये पटीं[5] । बैसें ऐसें करावें ॥ ३४ ॥
विद्याबळ मंत्रबळ । ब्रह्मतेजाचें आगळें[1] बळ[2] ।
सर्वांपरी[3] सबळ । मी निर्बळ सर्वार्थी ॥ ३५ ॥
षडरत्नी[1] वाहे धनुष्य । भार्गवातुल्य मिरवी[2] यश ।
त्याचा करावया नाश । तूंचि येक मी मानीं ॥ ३६ ॥

---

३०. १ **ऋषीच्या वचना** नि ख नां मुं; २ **दृष्टीं** नि पु.

३१. १ **तापस** नि पु; २ **भ्रूसंकेतीं** नि; ३ **आर्ती** औं पु·४ मुं गो; ४ **ठाया** नि ख गो·२ रा.

३२. १ **ह्मणे** ख गो, **सांगे** धु, (–) तं; २ **सद्गतकंठ** नि (स प्रसंप्रा), **संकठ** धु; ३ **मम** औं पु; ४ **द्रोणें** औं पु; ५ **हिरतला** औं, **हारला** ख; ६ **लाज लाऊनि** नि औं पु·४ ख मुं गो·२.

३३. १ **जिंतोनि** खवर्ग गो·२ रा; २ **हरितलें** नि नां गो·२, **हारतिलें** पु४ ख; ३ **शब्दशास्त्रीं** नि; ४ **निषेधिलें** धु, **निःछेदिलें** तं; ५ **धिक्कारें** नि औं.

३४. १ **सृष्टीं** नि, **श्रृष्टीं** पु ख रा; २ **स्वामी** खवर्ग (**स्वामिनी** मुं); ३ **मजला** नि; ४ **पुडति** पु·४ औं; ५ **पट्टीं** पु४ ख रा, **पांटी** नां.

३५. १–२ **आंगबळ** पु·४ ख, **ब्रह्मबळ** औं; ३ **सर्वांपरींसही** नि, **वैरी सर्वापरी** खवर्ग गो·२ रा.

३६. १ **रणीं** नि, **षड्रत्नी** मुं, **शडआरणी** धु, **शडअरत्नि** रा, **षडअरत्नी** तं; २ **मिरवे** नि, **पैं** खवर्ग.

छेदी द्रोणाचें मस्तक । ऐसा पुत्र[1] द्यावा[2] येक ।
पांचाळकुळीं[3] प्रतापार्क । उगवे ऐसें करावें ॥ ३७ ॥
अर्जुन करावा[1] जामात । ऐसें[2] बहुसाल[3] जीविं[4] आर्त ।
लक्ष्मीसमान रूपवंत । कन्यारत्न मज द्यावें ॥ ३८ ॥
कार्यारंभीं साळंकृत । धेनु अर्पीन अष्टायुत ।
सवत्स दक्षणा[1] पटकुळावृत[2] । सुवर्णशृंगी शोभिता[3] ॥ ३९ ॥
फळसिद्धीचियां[1] अवसरीं[2] । अर्बुद[3] येक[4] रौप्यखुरीं[5] ।
दक्षणा[6] मेरूचिये[7] सरी । सुवर्णभारा[8] वोपीन ॥ ४० ॥
गुरुदक्षणे[1] जनयाचना । कराव्या[2] उद्वेग[3] ऋषीच्या मना ।
द्रुपदें करितां[4] हे[5] प्रार्थना । अत्यादरें आश्वासी[6] ॥ ४१ ॥
ह्मणे मी करीन तुझें काज । कुमर[1] देईन अयोनिज ।
ज्याचेनि[2] हस्तें[3] भारद्वाज । मृत्यु पावे[4] निर्धारें ॥ ४२ ॥
जामात करावया अर्जुन । अनर्घ्य[1] वोपीन[2] कन्यारत्न ।
तेंचि होऊनि कारण । भार फेडील पृथ्वीचा[3] ॥ ४३ ॥

---

३७. १–२ द्यावा पुत्र पु४ ; ३ पांचाळपुरीं मुं गो.

३८. १ करावया नि खवर्ग ( कराव्या औं ); २ असी नि ; ३ °साळ नि ; ३–४ जीविं बहुसाल धु तं ; ४ मनीं नि.

३९. १ दक्षिणा नि पु४ गो·२ ; २ पट्टकूळासहित नि धु, पट्टकुळव्रत पु४, °कुळाव्रत रा नां तं, वस्त्रायुक्त औं ; ३ साजिऱ्या नि, शोभीत औं गो तं, शोभत पु ख.

४०. १ °सिद्धीच्या नि, °सिद्धीचा ( चां ) नां धु गो रा, °सीधिचा पु४ ; २ अवस्वरीं औं पु ; ३–४ एक अर्बुद नि ; ५ °खुरी नि औं पु४ ख ( स प्रसंप्रा ); ६ दक्षिणा नि औं ; ७ °चिया नि ; ८ °भार नि खवर्ग.

४१. १ °दक्षिणा नि ; २ करावया नि औं पु४ नां मुं ; ३ उद्योग नि औं पु धु गो रा तं, उदेग पु४, उद्देग ख मुं; ४ (+) च नि खवर्ग ; ५ (–) खवर्ग ; ६ स्वीकारी नि.

४२. १ पुत्र नि खवर्ग ; २ त्याचेनि नि खवर्ग ( त्याचे पु४ ); ३ हातें नि ; ४ पावेल नि औं पु४ ख. ही ओवी मुं मध्यें नाहीं.

४३. १–२ देईन अनर्घ्य नि ; धरेचा पु४.

द्रोणवधार्थी प्रतिज्ञानेम । स्वीकारूनि मांडिला होम ।
सांग जाणता[1] मंत्रागम । तो उपयाज आणिला ॥ ४४ ॥
सर्व सामग्रीसीं[1] राया । वना पातली द्रुपदजाया ।
पुत्रार्थी[2] वंदी पायां । तापसाच्या आदरें ॥ ४५ ॥
याजें हवनद्रव्य अर्पिलें[1] । तें[2] उपयाजें अभिमंत्रिलें ।
होम[3] करितां[4] नवल जालें । तें सुकर्णी ऐक[5] पां[6] ॥ ४६ ॥
होमांतूनि देदीप्यमान[1] । बाळार्कतेजा[2] तेजसमान[3] ।
कुमर निघाला धृष्टद्युम्न । हेमकवचें मंडित ॥ ४७ ॥
किरीट[1] कुंडलें चाप तूणीर । अश्वीं[2] जुंपिला रहंवर[3] ।
दिव्यखड्गमंडितकर । ऐसा कुमर निघाला ॥ ४८ ॥
हें देखोनि सर्व पांचाळीं । जयजयकारें पिटिली टाळी ।
तेणें घोषें अंतराळीं । मेघचक्रा[1] भेदिलें ॥ ४९ ॥
वेदीपासाव तेचि क्षणीं[1] । वेदीमध्या[2] शुभलक्षणीं[3] ।
कुमरी[4] जन्मली जे[5] सगुणी[6] । लाज लावी शचीतें ॥ ५० ॥

---

४४. १ जाणतां नि.

४५. १ सामुग्रीसीं नि, सामोग्रीसीं औं गो ; २ पुत्रार्थिनी नि नां रा पु४ मुं.

४६. १ आणिलें नि खवर्ग, (आणविलें मुं) : २ (–) नि खवर्ग ; ३ हवन नि खवर्ग ; ३–४ अर्पितांचि धु ; ५–६ आकर्णा नि, देख पां पु·४ ख रा तं.

४७. १ दैदीप्य° नि ख नां, दिदीप्य° मुं धु गो रा ; २ °तेजें नि औं ख, बाळार्क मुं गो२, बाळार्क जैसा धु, बालार्क दुजा तं ; ३ तेजासमान औं मुं गो२.

४८. १ कनक पु४ ; २ दीव्याश्वीं औं पु ; ३ रंहवर नि (स प्रसंप्रा).

४९. १ °चक्र औं नां मुं.

५०. १ क्षीणि पु४ गो·२ ; २ वेदविद्या नि ; ३ सुलक्षणीं नि औं पु नां ख मुं ; ४ कुमारी नि ; ५ (–) नि ; ६ रूपगुणी नि, सुयोगिणी नां, स्वगुणीं गो·२ रा तं. नि मध्यें २ व ३ चरणांची अदलाबदल आहे.

इंद्रनीळकीळरंगी । नीळसरोजसुवास आंगीं ।
नित्य नूतन अंगसंगीं । प्रतीति[1] पंच पुरुषांतें[2] ॥ ५१ ॥
अधर प्रवाळ सुरंग । दंतपंक्ती पद्मराग ।
श्वासआमोदा[1] वेधले[2] भृंग । वोंवाळिती मुखातें ॥ ५२ ॥
ऐसी प्रकट होतां नयनीं[1] । घोषें गर्जे आकाशवाणी[2] ।
स्त्रियांमाजी[3] हे मुखरणी[4] । मनुष्यलोकीं जाणिजे ॥ ५३ ॥
इचेनि योगें क्षत्रियां[1] अंत[2] । वाढेल पुरुषांचा पुरुषार्थ ।
दुष्टनाशें भारातीत । भूगोळक[3] इचेनि[4] ॥ ५४ ॥
पुत्र जन्मला नृपनाथा । हा[1] द्रोणाचा प्राणहर्ता ।
हें परिसोनि द्रुपदाचित्ता[2] । परमानंद न संटे[3] ॥ ५५ ॥
वीर्यतेजें[1] बळसंपन्न । यालागीं नामें[2] धृष्टद्युम्न ।
कन्या अतसीकुसुमवर्ण । ह्मणोनि[3] कृष्णा द्रौपदी ॥ ५६ ॥
भविष्यार्थ जाणोनि द्रोणें । कीर्तीलागीं निर्वैरमनें ।
धृष्टद्युम्न विद्यादानें । समर्थ केला शस्त्रास्त्रीं[1] ॥ ५७ ॥
मांडिये बैसऊनि कुमरी । पिता बोले हर्षोत्तरीं ।
अर्जुनाचे[1] प्राणेश्वरी । स्नुषे[2] पंडुनृपाचे[3] ॥ ५८ ॥

---

५१. १ पत्नी नि ( स प्रसंप्रा ), प्रचिती गो ; २ पुरुषांची नि.

५२. १ श्वासामोदा नि ( स प्रसंप्रा ) मुं गो२ ; २ भुलले नि. ही ओवी पु४ मध्यें नाहीं.

५३. १ नदिनी नि ( स प्रसंप्रा) ; २ आकाशध्वनी पु ; ३ स्त्रियामाजी नि ( स प्रसंप्रा ) पु४ ख नां धु गो२ रा तं ; ४ मुख्य राणी स गो-२.

५४. १–२ क्षत्रियांत गो-२ ; ३ भूगोळ होय गो-२ ; ४ इचेनीं नि रा.

५५. १ तो नि; २ द्रुपदाच्या चित्ता नि ; ३ सांठवे नि.

५६. १ °तेज नि मुं ; २ नांव नि ; ३ ह्मणों स.

५७. १ सर्वार्थी नि ( सर्वार्थी स ).

५८. १ अर्जुनाची नि ; २ स्नुषा नि ; ३ पांडुनृपाची नि.

मनें इछिलें फळ पाविजे । त्या संतोषा काय तुळिजे ।
ज्याचेनि[1] घडे त्याला[2] जीजे[3] । जीव तोही वोपितां[4] ॥ ५९ ॥
ह्मणोनि[1] याज उपयाज दोन्ही । राजा गौरवी मस्तकनमनीं[2] ।
वदला त्याहूनि चतुर्गुणीं । द्रव्यदानीं तोषविलें[3] ॥ ६० ॥
प्रार्थूनि बोले द्रुपदपत्नी । हेचि आमुची सखी[1] जननी ।
ऐसा भाव अपत्यमनीं[2] । थारे[3] ऐसें करावें ॥ ६१ ॥
हो तैसेंचि ह्मणोनि वर । देऊनि[1] मस्तकीं[2] ठेविला[3] कर ।
तियेकाळीं संभ्रम थोर । दोहींतेंही वर्तला ॥ ६२ ॥
आज्ञा[1] वंदूनियां[2] शिरीं । सर्व घेऊनि कुमरकुमरी ।
पांचाळ[3] प्रवेशला नगरी । जयानंदें निर्भर ॥ ६३ ॥
कन्या जालियां[1] उपवर । जनकाहृदईं वरविचार ।
गुण[2] कौशल्य[3] अतिसुंदर[4] । ऐकोनि राजे[5] वेधले[6] ॥ ६४ ॥
द्रुपदरायाचे[1] अंतरीं । अर्जुनालागीं द्यावी कुमरी ।
तवं ते दग्धले[2] जोहरीं[3] । ऐसें मंत्री बोलिले[4] ॥ ६५ ॥
रायें मानूनि असंतोष । क्षणक्षणा[1] सांडी[2] श्वास[3] ।
ह्मणे द्रौपदीयोग्य पुरुष । दुजा ऐसा दिसेना ॥ ६६ ॥

---

५९. १ ज्यालागीं नि, ज्याची पु ख, ज्यासि नां, त्याची औं; २–३ त्यासि दीजे नि मुं, पालाजिजे गो·२ रा; ४ ओपिता नि, अर्पितां औं पु.

६०. १ ह्मणौनि औं पु, ह्मणउनी धु नां; २ मस्तकें नमुनी औं पु४ ख, मस्तक नमुनी पु नां मुं गो·२; ३ तोषवी नि.

६१. १ सख्खी नि (स प्रसंप्रा); २ आपुल्या मनीं नि ख; ३ थोर नां मुं धु रा, थोरें तं.

६२. १–३ मस्तकीं ठेविला अभय नि.

६३. १–२ मग आज्ञा वंदूनि नि; ३ राजा नि.

६४. १ झालिया नि; २–३ गुणें स्वरूपें नि. धांडोळितां जामात धु तं; ४ मनोहर धु तं, सकुमार गो२; ५ भूप धु; ६ धावले ख.

६५. १ °रायाच्या नि, २ भस्मले नि; ३ लाखाजोहरीं औं ख, जोहारीं नि गो·२; ४ बोलती गो२ रा.

६६. १ क्षिणक्षिणा पु४ गो; २ टाकी मुं, (–) औं; ३ श्वासोश्वास औं ख.

पुरोहित वदे प्रत्योत्तर[1] । जोहरीं वांचले पांचही[2] वीर ।
ऐसें बोलती ऋषेश्वर[3] । सत्य मिथ्या नेणवे ॥ ६७ ॥
राजा पडिला[1] संशयडोहीं । मग विचार विवरी पाहीं ।
घोषें गाजऊनि मही । स्वयंवर[2] मांडावें ॥ ६८ ॥
जरीं वांचले असती[1] सुभट । तरी स्वयंवरीं होती[2] प्रकट ।
दृष्टी देखतां बरवंट[3] । भाज[4] करणें अर्जुना ॥ ६९ ॥
द्रुपदरायाच्या मानसें । निश्चयें नेमूनि ठेविलें[1] ऐसें[2] ।
पुढां[3] काय[4] घडेल[5] कैसें । तें शंकर स्वयें जाणे ॥ ७० ॥
स्वयंवर मांडिलें[1] असे[2] थोर । शृंगारिलें[3] देशनगर ।
हिणाऊनि अमरपुर । शोभा रायें आणिली ॥ ७१ ॥
छपन्न देशींचे राजेश्वर । शाहाण्णव[1] कुळींचे राजकुमर[2] ।
आले आणि ऋषेश्वर । येकें[3] येक पातले ॥ ७२ ॥
यादवेंसीं[1] यादवेश्वर । प्रद्युम्नादि कृष्णकुमर ।
पांडव तवं[2] दग्धले येर । कौरव सर्वही[3] पातले ॥ ७३ ॥
कवण[1] सभाग्य[2] बैसेल पाटीं[3] । कवणा माळ पडेल कंठीं ।
हें कौतुक पाहावया दृष्टी[4] । इछा मातें[5] नेतसे[6] ॥ ७४ ॥

---

६७. १ **प्रत्युत्तर** नि ; २ **पंच** नि , **पांचै** गो·२ रा ; ३ **ऋषीश्वर** नि
६८. १ **पडला** नि ख नां गो ; २ **सैंवर आतां** नि, **सैंवर सत्वर** मुं.
६९. १ **असतील** नि धु , **होतील** खवर्ग ; २ **होतील** नि धु ; ३ **बर-वट** नि ( स प्रसंप्रा ) गो·२ रा ; ४ **भाजा** नि पु४ मुं.
७०. १–२ **ठेविला असे** पु४ नां मुं; ३ **पुढें** नि तं ; ४–५ **घडेल काय** धु तं.
७१. १–२ **मांडलेंसें** नि ख ; ३ **शृंगारिले** नि पु ख मुं गो तं.
७२. १ **शाण्णव** नि गो , **शाहान्नव** औं पु ; २ **नृपवर** औं पु ; ३ **एक** नि पु४ नां.
७३. १ **यादवांसीं** नि ; २ ( – ) औं धु , **तंव** नि ; ३ **सर्व** नि . मुं मध्यें ही ओवी नाहीं.
७४. १–२ **कवणा सभाग्या** नि औं ; ३ **पाठीं** औं पु४ नां गो·२ रा तं ; ४ **दृष्टीं** नि पु रा ; ५–६ **माने येती ते** मुं.

राजा वांटील धनें[1] वसनें । अश्व कुंजर धेनु रत्नें ।
द्ररिद्र दवडूनियां[2] नयनें । समारंभ अवलोकूं[3] ।। ७५ ।।
तुह्मीं दिसतां[1] तेजस्वी । जेवीं भूतळींचे[2] पांचही[3] रवि ।
नकळे प्रारब्धाची ठेवी । भाग्याभाग्य[4] पुरुषाचें ।। ७६ ।।
कौतुक पाहावया[1] सहज । तुह्मींही[2] यावें[3] ऐसें[4] वाटे[5] मज ।
पुढां जें[6] जें[7] वर्तेल[8] चोज । तें येईल प्रतीती[9] ।। ७७ ।।
शुद्ध सप्तमी फाल्गुणमासीं[1] । आजिपासोनि सप्तम[2] दिवसीं ।
जाणें पांचाळनगरासी । महोत्साह[3] पाहावया ।। ७८ ।।
अर्जुन शोधावया जाण । रायें आड[1] घातला[2] पण ।
ताळप्रमाण[3] धनुष्यबाण[4] । लोहमुसळासारिखें[5] ।। ७९ ।।
मत्छयंत्र[1] गगनोदरीं । धनुष्य वाऊनि[2] भेदन करी ।
त्यातें वरील[3] राजकुमरी । ऐसी[4] भेरी गर्जतसे[5] ।। ८० ।।
ब्राह्मणी तुझिया[1] मध्यसुता[2] । दृष्टी[3] देखतां[4] पांचाळदुहिता ।
माळ घालील हें तत्वता[5] । मज[6] मानसीं[7] वाटतसे[8] ।। ८१ ।।

---

७५. १ धन नि नां तं ; २ दवडोनि नि; ३ विलोकूं नि.

७६. १ दिसतसां नि पु मुं गो·२ रा; २–३ पांचै पुतळे खवर्ग; ४ भाग्य अभाग्य नि.

७७. १ पहा° नि ; २ तुह्मीं औं पु४ ख नां मुं गो·२ रा ; ३–४ यावें नि औं पु४ , यावेंसें ख नां मुं रा ; ५ वाटतें नि खवर्ग ; ६–८ वर्तेल जें जें नि ख गो·२ ; ९ प्रचीती नि.

७८. १ फाल्गुनमासीं नि औं मुं ; २ सातवे नि ; ३ महोत्सव नि ( स प्रसंप्रा ).

७९ १ अटक औं, अवघड पु४ , ( – ) मुं ; २ (+) से पु·४ ख मुं ; ३ तालप्रमाण नि मुं ; ४ धनुष्य जाण धु ; ५ लोहोमुसळा° पु ख नां मुं.

८०. १ मत्स्ययंत्र नि , मछ° औं ख नां मुं धु तं , मत्सयंत्र पु४ ; २ बाहूनि नि ; ३ करीन पु४ ; ४ ऐसें नि औं पु ; ५ गर्जती नि.

८१. १ या ख ; २ मध्यमसुता औं गो तं ; ३ दृष्टीं नि पु ; ४ देखोनि मुं ; ५ तत्वतां नि ( स प्रसंप्रा ) पु·४ ; ६–७ मद्हृदयीं नि , माझिया मानसीं औं ; ८ वाटतें औं.

ऐसें करितां अनुवादन । उदया आला सहस्रकिरण[1] ।
आज्ञा मागोनि[2] ब्राह्मण । पांचाळदेशा तो गेला ॥ ८२ ॥
सांगोनि गेलियां[1] ब्राह्मण[2] । आर्ती[3] वेधलें[4] पांचैजण[5] ।
कार्यी[6] जाती चंचळमन[7] । तें देखिलें जननिया[8] ॥ ८३ ॥
ह्मणे पुत्र हो चिरकाळ वास । येके स्थळीं[1] करितां विरस ।
आतां त्यागूनि हा देश । पुढें[2] गंतव्य करावें ॥ ८४ ॥
देखिल्या ठाया न वचोनि पुढती । जावें पांचाळनगराप्रती[1] ।
द्रुपदरायाची संपती[2] । आपुली ऐसी देखाल ॥ ८५ ॥
घडतील[1] ऋषींचीं दर्शनें । भूकेलीं[2] तृप्त होती[3] अशनें[4] ।
विधिनें जें[5] ज्या कारणें । निर्मिलें[6] तें[7] पावेल ॥ ८६ ॥
ऐसा विचारी[1] पुत्रभावो[2] । तवं चिंतितां पावे देवो ।
तैसा योगियांचा रावो । व्यास तेथें पातला[3] ॥ ८७ ॥
पूर्वी नियमिल्या[1] नेमें । दर्शन देतां सर्वोत्तमें ।
बंधुमातेसहित धर्मे । नमस्कारीं[2] पूजिला ॥ ८८ ॥
कृपेनें बोले द्वैपायन । क्लेशातीत करूनि मन ।
सांगेन त्या ठायां[1] गमन । साहीजणीं करावें ॥ ८९ ॥

---

८२. १ **सहस्रकीर्ण** पु·४ ख नां मुं ; २ **मागोनियां** नि धु ख. ८२ ते ८९ ओव्यां गो·२ मध्यें नाहींत.

८३. १ **गेलिया** नि ; २ **ब्राह्मणा** स ; ३ **आर्ती** स औं पु ; ४ **वेधलें** स ; ५ °**जणा** स ; ६ **कार्य** औं पु४ नां धु तं ; ७ **चंचलपण** खवर्ग, °**मना** स ; ८ **जननियें** नि ख मुं.

८४. १ **ठायीं** नि ; २ **पुढां** नि ख मुं रा.

८५. १ **पांचाळ देशाप्रती** नि ख ; २ **संपत्ती** नि.

८६. १ **घडती** खवर्ग ( ख प्रसंप्रा ) रा ; २ **भुकेल्या** औं पु४ मुं, **भुकेलियां** पु ; ३ **होतील** नि ; ४ **मनें** नि ; ५ **नेमिलें** औं ; ६–७ **तेंचि सिद्धि** औं, **तो तें फळ** ख ; ७ **तो तें** नि, **तें तो** पु४ नां मुं.

८७. १ **विचार** औं ख ; २ **करितां पाहा हो** औं ; ३ **पावला** नां मुं.

८८. १ **नेमिलिया** खवर्ग ; २ **नमस्कारूनि** नि.

८९. १ **ठाया** नि पु·४ मुं.

पूर्वीं तपोवनीं नियमें । ऋषिकन्या पवित्रधर्में ।
भर्तारप्राप्तीलागी[1] कामें । तपश्चर्या आचरे ॥ ९० ॥
तीसि[1] तपांतीं[2] द्यावया फळ । कृपेनें पातला शिव[3] दयाळ[4] ।
माग[5] ह्मणतां पांच वेळ । दे भर्तार[6] बोलिली ॥ ९१ ॥
हांसोनि बोले[1] दयासिंधु । होसी[2] पांचांजणांची[3] वधू ।
येरी ह्मणे समर्थशब्दु । कोणें[4] विपरीत करावा[5] ॥ ९२ ॥
ते हे द्रुपदाची नंदिनी । जन्म पावली याज्ञसेनी ।
तुह्मां[1] पांचाजणांची[2] पत्नी[3] । ते[4] होईल[5] निर्धारें[6] ॥ ९३ ॥
आजिपासूनि सप्तमदिनीं । अंगना जोडेल याज्ञसेनी ।
अरण्यवासातें त्यजूनी[1] । राजधानीं पावाल ॥ ९४ ॥
पांचाळपुरा करावें गमन । तेथें भेटती रामकृष्ण ।
पुढती[1] देईन दर्शन । लग्नकाळीं तुह्मांतें ॥ ९५ ॥
ऐसें[1] वदोनि[2] आज्ञावचन । अदृश्य जाला द्वैपायन ।
गृहस्वामीसि करूनि[3] नमन[4] । साहीजणें[5] निघालीं[6] ॥ ९६ ॥

---

९०. १ भ्रतारप्राप्तीचिया नि, भर्तारालागी प्राप्त ख नां मुं, भ्रतारालागी प्राप्त औं पु, भर्तारालागी पवित्र पु४.

९१. १ तीस नि; २ (–) ख; ३–४ जाश्वनीळ औं पु; ५ मग औं पु४ ख; ६ भ्रतार नि;

९२. १ वदे औं पु नां गो तं; २ होसील नि, होईल मुं; ३ पांचजणाची नि; ४ कोण नि तं; ५ करील नि.

९३. १–३ आरण्यवासातें त्यजूनी पु ख नां मुं, भारातित करावया धरणि पु४; ४–६ राजधानी पाव्राल पु ख नां मुं, पतिव्रता निर्मिली पु४. औं मध्यें ९३ व्या ओवींतील पहिला चरण व ९४ व्या ओवींतील ३ व ४ चरण मिळून तीन चरणीं ओवी बनविली आहे.

९४. १ निरसोनी औं. ही ओवी पु व मुं मध्यें नाहीं.

९५. १ पुडती औं पु४.

९६. १–२ इतुकें बोलोनि पु४; ३–४ साहीजण नि खवर्ग, ५–६ नमस्कारूनि निघाले नि खवर्ग.

उन्मेषसुवातें[1] झडाडें[2] । व्यासघन वोळला[3] विश्वचाडें[4] ।
अवधान कीजे[5] पृथ्वीयेवढें[6] । तरीच धरे[7] वर्षाव[8] ॥ ९७ ॥
सखोल हृदयाचे सागर । भरोनि उचंबळती[1] अपार ।
तेथें स्वयें इंदिरावर । ये जळशेन[2] न्हावया[3] ॥ ९८ ॥
इति श्रीमहाभारते[1] आदिपर्वणि । श्रवणसुखाचे गंगाजीवनीं ।
मुक्तेश्वरकवीची वाणी । संकल्प सांगे स्नानार्थ ॥ ९९ ॥

॥ इति श्रीमहाभारते आदिपर्वणि एकोनचत्वारिंशोऽध्यायः ॥

---

९७. १ °सुवात पु ख गो२ , °सुवास औं गो , °सुवावो मुं, °सुवायु नां; २ झडाडे नि ; ३ वोळला नि ( स प्रसंप्रा ); ४ चाडें ख , °चाडे नि औं पु·४ ; ५ देइजे नि ( स प्रसंप्रा ) , करी ख ; ६ °येव्हडें नि रा ; ७ धारीं नि ( धरिजे स ), धरी खवर्ग ; ८ वर्षावें नि , वर्षावो ख नां गो·२ , वर्षावे तं.

९८. १ उलथती खवर्ग गो·२ रा ; २ जळसेतु नि , जळसिंधु गो , जळशेत गो२ ; ३ बांधाया गो·२.

९९. १ श्री पु गो.

॥ श्री ॥

## अध्याय चाळिसावा

### श्रीगणेशाय नमः

पांचही[1] वीर निर्भय चित्तीं[2] । पंथ चालती[3] अहोराती[4] ।
सोमश्रवायणतीर्थाप्रती[5] । अस्तमानीं पातले ॥ १ ॥
संध्या सारूनि सायंकाळीं[1] । पुढें[2] चालिले महाबळी ।
भीमस्कंधीं[3] पृथा काळी । जेवीं पृष्टीं[4] नंदीच्या[5] ॥ २ ॥
चंद्रप्रकाशें[1] अर्धरात्री । चालतां लोटली पंथधात्री[2] ।
चंद्रअस्त जालियां[3] नेत्रीं । अंधकार दाटला ॥ ३ ॥
रत्न झांकणें[1] समुद्रीं[2] पडिलें । कीं[3] ब्रह्मांडकरंडां काजळ भरिलें ।
विश्वलोचनीं लेऊनि[4] उरलें । अपरमित[5] दशदिशा ॥ ४ ॥
मायामोहो[1] निबिड जाण । अंध होती जगाचे नयन ।
योगी लेऊनि ज्ञानांजन[2] । निघती[3] निधान[4] साधावया ॥ ५ ॥
कीं[1] निशा नव्हे[2] ते[3] भद्रकाळी । पूजिली[4] नक्षत्रमुक्ताफळीं ।
आरती उजळावया[5] करतळीं । दीप[6] अर्जुनें[7] लाविला ॥ ६ ॥

---

१. १ **पांचै** औं पु ख गो ; २ **चीती** पु४ ख ; ३ **क्रमितां** नि ; ४ °**रार्ती** नि पु रा , °**रात्रीं** तं ; ५ **सोमाश्रयायण**° नि (**सोमश्रवतीर्था**° स), °**श्रवापणें-तीर्था**° पु४ , °**श्रवापणवतीर्था**° ख.

२. १ **सकळीं** नि खवर्ग (**संध्याकाळीं** ख) ; २ **पुढां** नि ; ३ **भीम-स्कंदीं** पु ख नां मुं धु गो रा ; ४ **पुष्टी** औं पु नां ; ५ **नंदीचे** नि.

३. १ °**प्रकाश** पु४ गो·२; २ **पथधात्री** नि, **पंथधरत्री** नां, **धरत्री** गो ; ३ **झालिया** नि , **जालेया** गो·२.

१९. १ उदयीक नि पु रा ; २–३ होईल याहूनि खवर्ग ; ४ न्यून्य पु४ ख नां गो·२ ; ५ वैरी नि.

२०. १ योध्ये आँ ख धु गो रा ; २ कितुली नि पु४, कायसी गो२, केंउती नां, तुळितां मुं ; ३ °वेगीं नि पु४ गो ; ४ °उठीं आँ पु गो रा ; ५–६ सावरोनियां जुंझावें पु४.

ऐकोनि बोले सोमदंती[१] । ह्मणे हे[२] न मने[३] कुश्चित युक्ती[४] ।
जे या विचारें[५] वर्तती । ते अनर्थी पडतील ॥ २१ ॥
पांडव ह्मणावया निर्बळ । समर्थ नव्हे[१] अमरपाळ ।
येकला[२] अर्जुन पृथ्वीतळ । करूं शके[३] निक्षेत्री ॥ २२ ॥
गदाघातें[१] बळप्रचंडें[२] । नवखंडधरेचीं[३] शतखंडें[४] ।
भीम करूं शके त्या[५] तोंडें[६] । निर्बळ कैसें[७] ह्मणतसां[८] ॥ २३ ॥
पांचाळ आकळेल[१] तुह्मां । याही न पडावें जी[२] भ्रमा ।
पळतां हस्तनापुरींची[३] सीमा । दाखवील संग्रामीं ॥ २४ ॥
घेऊनि यादवांच्या कोटी[१] । आतांचि कृष्ण[२] उभा[३] पाठी ।
पांडवाचे रोमेसाठीं[३] । द्रुपद[४] वेंचील[५] प्राणातें ॥ २५ ॥
जो[१] बळिष्ठ सर्वशक्ती । इछिले[२] काळीं[३] त्याची[४] क्षिती[५] ।
सकळ जगाची[६] संपत्ती[७] । त्याचीच ऐसें जाणपां[८] ॥ २६ ॥

---

२१. १ **सोमदत्ती** नि मुं ; २ **हें** मुं धु रा तं, (–) औं पु४ ख ; ३ **मनें** नि मुं धु रा तं ; ४ **युक्तीं** नि ( स प्रसंप्रा ), **मती** औं ; ५ **विचारीं** औं पु.

२२. १ **नोव्हे** नि ; २ **एकला** नि खवर्ग धु ; ३ **पाहे** ख.

२३. १ °**घायें** नि, **गदा घेतां** औं ; २ °**प्रचंडे** ख, °**प्रचंड** औं पु रा तं ; ३ °**खंडभूमीचीं** ख, °**धरत्रीचीं** धु ; ४ °**खंड** औं पु तं ; ५ **तो या** नि, **तो** पु, **त्यासि** धु तं ; ६ **खंड** पु, **कोड** औं, **तोड तं** ; ७ **कैसे** पु, **केविं** औं ; ८ **ह्मणावे** औं पु.

२४. १ **आटोपेल** नि खवर्ग ( **नाटोपे** ख ) ; २ (–) औं मुं ; ३ °**पुराची** नि पु४ धु. नि मध्यें २४ व २५ ओव्यांची अदलाबदल आहे.

२५. १ **थाटी** खवर्ग ; २–३ **उभा कृष्ण** ख रा ; ३ **प्राणांसाठीं** नि ; ४–५ **कृष्ण घेईल** खवर्ग.

२६. १ (+) **कां** खवर्ग गो२ रा ; २ **इच्छिल्या** नि, **इछिलें** औं पु ; ३ **फळ** औं पु ; ४ **त्याचे** औं पु ; ५ **स्थिती** नि पु८, **हातीं** औं पु, **विपत्ती** मुं ; ६ **जनाची** औं पु ; ७ **संपती** खवर्ग ( औं प्रसंप्रा ) धु गो२ रा ; ८ **जाणावें** नि औं पु नां मुं.

आतां विचार ऐका बरवा । वाढऊनि स्नेहभावा ।
मागील अपराधाचा[1] ठेवा[2] । मिथ्या करूनि दावावा[3] । २७ ॥
यांपासूनि[1] न घडे ऐसें[2] । प्रतीती[3] मानिजे निज[4] मानसें ।
ऐसा स्नेह दिवसेंदिवसें । वाढवावा सुहृदेसीं ॥ २८ ॥
स्तुती[1] नाशील[2] मागील निंदा । मैत्री निर्दळी[3] विषादक्रोधा[4] ।
जेवीं[5] अमृत प्राशिल्यां[6] बाधा । खंडे[7] मागील विषाची[8] ॥ २९ ॥
तेवीं[1] पुढील निर्मळ[2] राहाटी[3] । हारपती[4] मागील कुटी ।
आतां वैर सांडोनि पोटीं । मैत्री त्यांसी[5] करावी ॥ ३० ॥
सांडुनि जीवींचा[1] कपटभावो । दुराभिमान[2] करूनि वावो ।
समुदायेंसी अवघे जावों । भेटावया पांडवांतें[3] ॥ ३१ ॥
वंदूनियां श्रीकृष्णातें । क्षेमालिंगनीं[1] पांडवांतें ।
समाधान करूनि[2] बहुतें[3] । श्नेहशब्दें[4] गौरवा ॥ ३२ ॥
भेटी गेलियां[1] तात्काळ । धर्म[2] हृदईचा[3] अति[4] निर्मळ ।
मागील अपकारांचें[5] जाळ[6] । क्षणें जाईल विसरोनी ॥ ३३ ॥

---

२७. १ **अपायाचा** खवर्ग ( **उपायाचा** पु४ ); २ **यावा** खवर्ग ( **आवा** मुं ); ३ **दावणें** नि पु·४ ख नां , **दाखविणें** औं मुं , **दाखविजे** गो२.

२८. १ **यापासूनि** नि पु४ गो ; २ **अनारिसें** औं ; ३ **प्रचीत** नि नां ; ४ ( – ) नि औं पु४.

२९. १–२ **श्रुत नाहीं** औं पु ; २ **नाशी** नि ; ३ **निर्दाळील** नि पु४ नां मुं ; ४ **शेषक्रोधा** औं पु , **नीषेधक्रोधा** पु४ , **निःशेषक्रोधा** ख नां मुं , **वीशाळक्रोधा** धु; ५ **जेंवी** नि (स प्रसंप्रा) ; ६ **प्राशिल्या** नि गो·२ ख; ७ **खंडें** नि , **खंडेल** औं पु४ ख ; ८ **वीखारी** ख , **जीवींची** धु तं , **विषयांची** गो२.

३०. १ **तेंवी** नि ( स प्रसंप्रा ) ; २ **निर्बळ** नि , ( – ) खवर्ग ; ३ **राहटी** नि ख नां मुं , **हटी** औं ; ४ **हरपती** नि पु४ ; ५ **धर्मासि** गो२.

३१. १ **जीवाचा** औं रा , **मनींचा** ख ; २ **दुरभिमान** नि ( ख प्रसंप्रा); ३ **धर्मातें** नि खवर्ग.

३२. १ **क्षेमालिंगन** नि ; २ **करूं** औं ; ३ **पृथुतें** औं , **त्यातें** गो२ ; ४ **स्नेहभावें** नि , **स्नेहवादें** खवर्ग.

३३. १ **गेलिया** नि, **गेलेया** गो·२ ; २ **ब्रह्म** पु४ ; ३ **अंतरींचा** नि ; ४ (–) खवर्ग गो·२ रा; ५ **अपराधाचे** औं पु४ ; ६ **सळ** नां , **ज्वाळ** मुं.

द्रुपदातें[1] नमस्कार । करूनि[2] करावें[3] मनोहर[4] ।
देऊनि उपायनें अपार । स्नेहभाव[5] दुणावा[6] ॥ ३४ ॥
पांडव धरूनियां[1] हातीं । घेऊनि जावें[2] नगराप्रती ।
राज्यविभाग[3] वोपूनि प्रीती[4] । यथासुखें[5] वर्तावें[6] ॥ ३५ ॥
विरोध करितां[1] पावाल क्लेश । बहुतेकां[2] होईल[3] जीवाचा[4] नाश[5] ।
वाचल्यां[6] घेऊनि[7] अपेश[8] । जाणें[9] घडेल[10] येथुनि[11] ॥ ३६ ॥
ऐकोनि भूरिश्रवाचें वचन । निषेधूनि[1] बोले कर्ण ।
पुरुषधर्माचें लक्षण । येकनिष्ठ चळेना[2] ॥ ३७ ॥
युक्त अथवा हो[1] अयुक्त । कार्यजातीं द्विधा[2] चित्त ।
केलियां[3] स्वार्थ ना परमार्थ[4] । येकही अर्थ साधेना[5] ॥ ३८ ॥
कार्याकार्यीं येक पक्ष । अंगीकारी तो[1] पुरुष दक्ष ।
जीतां अर्थ मेल्या मोक्ष । साधूनि जाय प्रतापें ॥ ३९ ॥
हृदई विकल्पाची वस्ती । जालियां विचिकीत्सा[1] कुयुक्ती[2] ।
उपजोनि प्रयोजन नासिती । आपुलें[3] आणि[4] पराचें[5] ॥ ४० ॥

---

३४. १ (+) करूनि नि ; २ भाषण नि ; ३–४ करा अत्यादर औं ; ५ °भावें पु४ नां मुं गो२ रा तं ; ६ दुणवावा नि.

३५. १ घेउनिया औं पु ; २ यावें नि ; ३ राजभोग पु , राजभाग औं मुं , राज्यभार नां ; ४ निगुती खवर्ग , पुढती मुं ; ५ यथापूर्वक खवर्ग ; ६ नांदावें नि ख नां मुं.

३६. १ करुनी ख ; २ बहुतेक पु४ ख नां मुं गो२ रा , बहुतां जिवांचा औं ; ३ घडेल नि ; ४–५ जीवनाश नि नां , जीवा नाश पु४ मुं , जीविता नाश गो२ रा तं ; ६ वांचलिया नि , वांचवावया पु , वांचवावयाचें पु४ नां ; ६–८ वांचावयाची असलीयां आश औं ; ८ अशेष पु , यश नां ; ९–११ तरी सौजन्य करावें औं ; १० लागे पु.

३७. १ निरोधोनि नि ; २ चालेना खवर्ग.

३८. १ (–) नि औं पु ख मुं , हों गो·२ ; २ द्विविधा औं पु , द्विविध नां धु , विविध तं ; ३ केलिया नि ; ४ परार्थ नि ; ५ आसेना धु , दिसेना त.

३९. १ तोचि नि गो२.

४०. १ चित्संकल्प औं पु , चिकित्सक पु४ ख नां ; २ युक्ती नि खवर्ग ; ३–५ इहपरत्र सर्वही औं ; ५ परावें धु रा तं.

निवटावया[1] शत्रुकुळ । जिंकावया पृथ्वीपाळ[2] ।
वस्य करावया धरणीतळ[3] । हाचि काळ तुह्मांतें[4] ॥ ४१ ॥
न करितां पांडवांचें हनन । रणीं[1] न[2] जीणतां[3] यज्ञसेन[4] ।
परतोनि जातां विश्वजन । उपहासिती सर्वस्वें[5] ॥ ४२ ॥
काळसर्पातें दुखविलें । सेखीं जीतचि[1] त्या[2] सोडिलें ।
तें महाव्यसन[3] प्राप्त जालें । पांडव जोहरीं[4] वांचतां ॥ ४३ ॥
तें दुःख स्मरोनियां चित्तीं । भीमराक्षस पापमूर्ती ।
रक्त प्राशोनियां दांतीं । अस्ती[1] त्याही भक्षील ॥ ४४ ॥
त्यासि[1] मारितां[2] यत्न[3] वहिला[4] । टाके[5] तितुका[6] पाहिजे केला[7] ।
प्रस्तुत येकटियावरी[8] घाला[9] । घालुनियां[10] वधावें[11] ॥ ४५ ॥
मरणभय[1] जयांचे उदरीं । तेहीं[2] सुखें राहावें शिबिरीं ।
आह्मी रिघों रणसागरीं[3] । यश काढूं बुडालें ॥ ४६ ॥
पांडव धरूनि अभिमान । जुझा[1] निघती[2] पांचही[3] जण[4] ।
बहुत[5] हस्तीं करूं[6] कंदन । जेविं कां कण कृषीवळीं ॥ ४७ ॥

---

४१. १ **निवटुनियां** नां ; २ **पृथ्वीतळ** नि ; ३ **धरणीपाळ** नि, **धरापाळ** औं ; ४ **अयुतें** धु.

४२. १ (–) औं पु गो ; २ (–) ख ; ३ **जिंकितां** नि, **जिणावे** पु४ ख ; ४ **याज्ञ°** नि औं पु ; ५ **सर्वैश्वें** गो·२.

४३. १–२ **तया जीतची** पु४ ; ३ **माहांव्यसन** पु·४ नां मुं, **महद्व्यसन** नि ; ४ **जोहारीं** पु४ गो२.

४४. १ **अस्थी** नि.

४५. १ **यासि** खवर्ग ( पु प्रसंप्रा ) ; २ **मारावया** नि ; ३ **यत्नें** पु ख नां ; ४ **वहिलें** खवर्ग ; ५ **ठाके** नि, **टांके** गो·२ ; ६ **तितुकें** खवर्ग ; ७ **केलें** खवर्ग ; ८ **येकटीया** खवर्ग ; ९ **वधिलें** खवर्ग ; १०–११ **घालोनि वधिलें पाहिजे** नि, **घाला घालूनि पाहिजे** खवर्ग.

४६. १ **मरण** पु ; २ **तिहीं** नि खवर्ग ( पु४ प्रसंप्रा ) गो रा ; ३ **रण-चत्वरीं** नि.

४७. १ **झुंजों** नि, **जुंझा** औं पु ; २ **येती** पु४ ; ३ **पांचै** औं गो·२ ख रा ; ४ **जन** औं पु ; ५ **बहु** नि मुं पु४ ख नां ; ६ **करुनि** नि खवर्ग रा.

दंडोनि पांचाळ नृपवर । असंख्य[१] साधणें[२] करभार[३] ।
दाहा सहस्र मत्त कुंजर । अश्वभार दशगुणी[४] ॥ ४८ ॥
रत्नहाटकवर्णी[१] रथ । द्रव्य घेणें अर्बुदांत[२] ।
तरीच आलियाचें येथ । सार्थक कांहीं जाणिजे ॥ ४९ ॥
ऐकोनि कर्णाचिया वचना । परम आवेश[१] दुर्योधना
वंधूसहीत दुःशासना । हांव चढली चौगुणी[२] ॥ ५० ॥
ठोकिल्या संग्रामसंकेतभेरी[१] । कोल्हाळ गाजविला[२] रणतुरीं[३] ।
सिंहनाद केले[४] वीरीं । महायंत्रीं भूकंप ॥ ५१ ॥
अश्वकुंजरवीरवर्गी । कवचें वाणलीं[१] वज्रांगीं[२] ।
शस्त्रें झळकती धगागी[३] । वन्हिजिव्हेसारिखीं ॥ ५२ ॥
वळें[१] चालिला[२] दळभार[३] । जेवीं मातला[४] जळसागर[५] ।
बुडवावया पांचाळपुर । करिती भ्यासुर गर्जना ॥ ५३ ॥
कर्ण महापुराचा लोट । शैल्य[१] तो[२] उर्मीचा[३] संघाट[४] ।
दुःशासनादि परम[५] दुष्ट[६] । मच्छ[७] सैरा[८] तळपती ॥ ५४ ॥

---

४८. १ **अनेक** खवर्ग ; २ **साधूं** नि औं पु४ ख, **साधूनि** पु नां मुं ; ३ **कनकभार** औं पु ख मुं ; ४ °**गुणित** नि.

४९. १ **रत्नें हाटकवर्ण** नि ; २ **अर्बुदशत** नि.

५०. १ **आल्हाद** नि ; २ **चौगुणी** औं धु गो·२.

५१. १ **संकेतसंग्रामभेरी** औं पु ; २ **माजविला** नि ; ३ **रणचतुरीं** पु , **चतुरीं** औं , **रणचत्वारीं** ख ; ४ **केला** खवर्ग.

५२. १ **बांधिलीं** नि ; २ **सर्वांगीं** मुं ; ३ **झगमगीं** नि , **झगझगीं** पु·४ ख नां मुं , **तगतगी** औं.

५३. १–३ **चालिले कौरवदळभार** नि ; ३ **कौरवभार** खवर्ग ; ४ **माजला** नि खवर्ग ; ५ **वळ**° औं नां गो·२.

५४. १ **शल्य** नि तं ; २ (–) औं मुं ; ३ **महाउर्मीचा** नि ख , **मांहांउर्मीचा** पु·४ ; ४ **संघट** पु४ ख ; ५ **महा** ख ; ६ **नष्ट** नि खवर्ग ; ७ **मत्स्य** नि , **मत्छ** पु गो , **मत्सर** पु४ ; ८ **सैरां** नि , **शेष** पु , **मकर** औं.

दुर्योधन महाग्रहो[1] । शकुनी आवर्त[2] भंवे[3] पाहा हो ।
ऐसिया[4] महार्णवाचा ग्राहो[5] । पांचाळपुरीं[6] झगटला[7] ॥ ५५ ॥
बांधिला[1] मथिला[2] उलंघिला[3] । येकीं प्राशनें[4] निर्मूळ केला[5] ।
तरी निर्लज्ज गर्वाथिला[6] । गर्जना करी[7] गडगर्जें[8] ॥ ५६ ॥
तेवीं पांडवहस्तीं बरळ[1] । अवमान[2] पावले बहुत वेळ ।
तरी गर्वाचा गोंधळ । घालीत आले युद्धार्थ[3] ॥ ५७ ॥
कौरव पातले दळभारीं । मात जाणवली[1] पांचाळपुरीं ।
द्रुपद कुमरातें[2] आज्ञा करी । निघा वेगीं सामोरें[3] ॥ ५८ ॥
श्नेहें[1] जामात पातले भेटी । शस्त्रघाईं गौरवा पाठी ।
तृप्ती[2] यथेष्ट[3] बाणल्या पोटीं । नागपुरा[4] बोळवा ॥ ५९ ॥
धृष्टद्युम्न आणि सिखंडी[1] । दोघां संग्रामाची गोडी ।
ह्मणती[2] आजि बळाची प्रौढी । कौरवांतें दाखवूं ॥ ६० ॥

---

५५. १ महाग्राहो नि; २ आवर्ता नि, आवर्तें पु४, अर्त ख; ३ भोंवे नि धु, (–) खवर्ग ; ४ पेसा नि खवर्ग (नां प्रसंप्रा); ५ प्रवाहो नि, धावो मुं; ६ °पुरा नि; ७ प्रगटला नि (स प्रसंप्रा).

५६. १ बांधल्यावरि पु, मारूनी पु४; बांधोनि ख नां मुं; २ मैथळी पु, मैथुळे पु४ मुं, मैथुळी ख नां; ३ वरी लंघिला नि, लंघिलें पु, वरि लंघिलें पु४ ख, वरें लंघिलें नां, प्रतिलंघिलें मुं, उडविलें धु; ४ प्राशुनि नि खवर्ग; ५ केलें खवर्ग; ६ गर्वाथिलें खवर्ग; ७ करितो नि, करिती पु·४, करित मुं; ८ जलनिधी नि, गडगडां मुं.

औं मध्यें ही ओवी पुढीलप्रमाणें आहे :—

द्रुपदें पूर्वी पराभविलें । पांचाळजनि धिःकारिलें ।
तरी निर्लज्य गर्वाथिले । गर्जना करित गडगजरें ॥ ५६ अ ॥

५७. १ सकळ नि (स प्रसंप्रा); २ अपमान औं पु ख मुं; ३ युद्धार्थी नि, गुह्यार्थं पु४, गर्वार्थं ख, युध्यार्थी पु गो औं.

५८. १ जाणविली नि पु, जाणितली पु४ ख नां मुं; २ पुत्रांतें नि, पुत्रातें स औं पु ख धु गो; ३ संग्रामा औं पु.

५९. १ स्नेहें नि पु मुं गो·२ तं; २ तुष्टी नि खवर्ग; ३ येथुनि औं पु; ४ निजनगराप्रती नि, निजनगरासि खवर्ग.

६०. १ शिखंडी नि औं पु तं; २ ह्मणे औं ख नां मुं.

सन्नद्ध[१] बद्ध पांचाळसेना । घावो घातला निशाणा ।
दुंदुभिनाद कौरवकर्णा । आलों ह्मणोनि सांगती ॥ ६१ ॥
छत्रचामरें[१] ध्वजपताकीं । वाद्यें गर्जती नाना घोकीं[२] ।
चहुं[३] समुद्राचिये[४] तुकीं[५] । चातुरंगणीं[६] शोभत ॥ ६२ ॥
अश्व गज रथ पदाती[१] । हारी रचिल्या येक पंक्ती ।
चत्वारिमुखीं[२] भागीरथी । उठिली[३] दोष[४] दंडावया[५] ॥ ६३ ॥
ज्येष्ठपुत्र धृष्टद्युम्न । सिखंडी सुमित्र प्रियदर्शन[१] ।
चित्रकेतु[२] सुकेतु[३] सगुण । ध्वजकेतु[४] धनुर्वाडा[५] ॥ ६४ ॥
रथारूढ राजकुमर । कडोविकडी संग्रामचतुर ।
चरणीं ब्रीदांचे[१] तोडर । धनुष्यधर[२] निघाले ॥ ६५ ॥
प्रधान सेनानी बळीयाडे[१] । महारथिये चालिले पुढें ।
ह्मणती यश आह्मांकडे । पांडवबळें जाण[२] पां[३] ॥ ६६ ॥
श्वेत चामरें श्वेत छत्रें[१] । श्वेत[२] वाजी[३] श्वेत[४] वस्त्रें[५] ।
रथीं भरूनि शस्त्रास्त्रें । द्रुपदराजा निघाला ॥ ६७ ॥

---

६१. १ **सन्नध** खवर्ग ( पु४ **संन्निध** ).

६२. १ **छत्रचामर** नि खवर्ग ( आँ प्रसंप्रा ); २ **तोखीं** नि, **घोषीं** पु·४ ख नां मुं गो·२ रा ; ३ **चमू** नि आँ पु नां ; ४–५ **समुद्राचि येतुकीं** नि ; ६ **चतुरंगिणी** नि, **चातुरंग** मुं.

६३. १ **पदांति** पु·४ गो·२ ; २ °**मुखी** नि, **चत्वारमुखीं** पु४ ख मुं ; ३ **जेंवी उठे** नि, (+) **तै** पु४ ख मुं ; ४–५ **दोषनाशा** नि.

६४. १ **प्रियवर्धन** गो२ ; २ **चित्रकेत** नि गो·२ रा ; ३ **सुकेत** नि गो·२ रा, **स्वेतकेत** आँ, **सेतकेत** पु ; ४ **ध्वजकेत** नि गो रा ; ५ **धनुर्गाढा** नि, **धनुवाडा** पु·४ धु गो.

६५. १ **बिरुदांचे** तं ; २ **धनुष्येंसीं** धु तं.

६६. १ **बळियाढे** नि मुं गो·२ ; २–३ **जाणिजे** नि.

६७. १ **च्छत्रें** नि, **वस्त्रें** पु, **वस्त्र** आँ ; २–४ **ऐसा करूनि** आँ पु ; ५ **निजभारें** पु, **भार** आँ.

तयापाठीं पंडुकुमर[1] । सुवर्णरथीं पांचही[2] वीर ।
दिव्यधनुर्ष्यीं[3] मंडित कर । रत्नतूणीर पाठीसी ॥ ६८ ॥
राहोनि द्रुपदाचिये पाठीं । नावेक अवलोकिती दृष्टी ।
उभयदळां पडिली गांठी । कौरवां[1] आणि पांचाळां[2] ॥ ६९ ॥
दोहीं सैन्याचिये मिळणीं । प्रळयवृष्टी मांडिली बाणीं ।
शस्त्रधारांचां[1] खणाणीं । वन्ही वर्षों लागला ॥ ७० ॥
कुंजर संघटले[1] कुंजरा । राऊत झगटले अश्वस्वारां[2] ।
प्रवर्तले घोर मारा[3] । महारथी[4] रथियांसी ॥ ७१ ॥

---

६८. १ पांडु° नि, बंधुकुमर औं पु ; २ पांचै औं पु ख गो·२ रा ; ३ °धनुष्यें औं नां, °धनुष्य नि ख मुं.

६९. १ कौरव नि खवर्ग ( औं प्रसंप्रा ) ; २ पांचाळ नि ख मुं.

७०. १ शस्त्रधराचे पु४ गो·२, °धारांचिये नि.

७१. १ संघट्टले नि ; २ अश्वभारा गो२ ; ३ समरा नि ; ४ °रथ नि.

यापुढें नि खवर्गमध्यें पुढील ओव्या अधिक आहेतः—

येकमेकांते जुंझती । येकमेकां युद्ध[1] करिती[2] ।
बाणें बाण सोडिती[3] । येकमेकां[4] अपार[5] ॥ ७१ अ ॥

१–२ निखंदिती औं ; ३ तोडिती औं, झोडिती नां ; ४ येरयेरांचे औं ; ५ पै तेव्हां औं. ही ओवी स मध्यें नाहीं.

येक शरें[1] मार[2] करिती[3] । येक खर्गें खर्ग तोडिती ।
येकांग जुझें जुंझति । येकमेकां निकरेंसी[4] ॥ ७१ आ ॥

१ मारा खवर्ग ; २ मारा औं ; ३ ह्मणती औं ; ४ निकुरें खवर्ग.

येक खड्गें पैं तोडिती । येक शूळें पैं खोचिती ।
येक भूतळीं पाडिती । क्षणयेकें[1] शस्त्रधारीं ॥ ७१ इ ॥

१ क्षणार्धेंच नि.

येक घोरांद्र जुंझती । येकमेकां थडका हाणिती[1] ।
येक आंगबळें पुढती[2] । जुंझणार सक्रोधें[3] ॥ ७१ ई ॥

१ देती नि ; २ पाडिती नि ( स प्रसंप्रा ) ; ३ सक्रोधी नि.

सुटतां शस्त्रधरांचीं[1] शस्त्रें । मल्लयुद्धीं मोडिती गात्रें ।
चडकणा[2] फोडिती वक्त्रें[3] । मुष्टी[4] हृदई[5] भेदिती[6] ॥ ७२ ॥
कुंजर पडती[1] कुंजरघातें । राउत मरती[2] राउतहस्तें[3] ।
रथिये[4] मारिती रथियातें । निर्बळातें बळिष्ठ ॥ ७३ ॥
हस्तकमळें पादकमळें । किरिटकुंडलें वीरमौळें ।
पडिलीं[1] जैसीं रातोत्पळें । रक्तगंगातटाकीं[2] ॥ ७४ ॥
जुंझतां[1] पांचाळाचें दळ । नावेक माघारतां[2] विकळ ॥
देखोनि पांचही प्रळयानळ । पांडववीर क्षोभले ॥ ७५ ॥

---

७२. १ **शस्त्रधारांचीं** औं पु·४ तं; २ (+) **हाणोनि** नि; ३ **वग्त्रें** पु४ ख, **वगत्रें** नां धु; ४–६ **मुष्टिघातें शतचूर्ण** औं.

यांपुढें नि खवर्ग मध्यें पुढील ओव्या जास्त आहेत :

**येक[1] अंगसंगें[2] धरोनि[3] हातीं[4] । वज्रप्राय मुष्टी हाणिती ।**
**येक कवळोनि[5] धरिती[6] । नक्रप्राय[7] येकातें[8] ॥ ७२ अ ॥**

१–२ एकांगसंग नि; ३–४ झगटतां औं; ५ (+) पायीं नि, अंगबळें औं पु; ६ पुडती पु, तोलिती औं; ७–८ क्रोधें जुंझा मिसळती पु, जुंझताती सक्रोधें औं.

**येक बाण सोडिती । येकमेकां टाळिती ।**
**मूर्छना[1] येवोनिया पडती । वीर[2] धरणीये[3] अपार[4] ॥ ७२ आ ॥**

१ मुर्छा पु४ ख; २–४ धरणीवरी औं मुं; ३–४ अनिवार धरणीये नि; ४ अपाडें पु.

७३. १ **पीडिती** औं, **मरती** पु४ ख, **पळती** धु; २ **मारिती** नि औं पु, **पडती** ख; ३ **राउतातें** नि औं मुं; ४ **रथी** नि पु·४ ख नां मुं.

नि खवर्ग मध्यें याच्यापुढें पुढील ओवी अधिक आहे :—

**खर्गें खर्ग हाणिती । बाण[1] येके[2] सरें[3] सोडिती[4] ।**
**येकमेकांतें[5] खोंचिती[6] । रुधिर वाहे अपार[7] ॥ ७३ अ ॥**

१ बाणें औं पु; २ एक पु४ ख मुं, बाण औं पु; ३ (–) औं पु; ४ तोडिती पु, निवारिती औं; ५ येकमेकां नि, येरयेरांतें औं; ६ विंधिती औं; ७ भडभडा ख.

७४. १ **पडलीं** नि; २ **रणगंगेतटाकीं** पु, °**गंगा लोटल्या** औं.

७५. १ **झुंजतां** नि; २ **झालें** नि, **माघारलें** औं पु, **माघारे** पु४ ख नां मुं.

मनोवेगाहूनि देखा[1] । पांचही[2] पातले[3] सेनामुखा[4] ।
देखोनि भूपाळां[5] सकळिकां । मरणावस्था मांडली[7] ॥ ७६ ॥
अवघे ह्मणती हे पांडव । आतां कायसी वाटीव[1] ।
रक्षूनि आपुलाले जीव । सीघ्र येथूनि पळावें ॥ ७७ ॥
मंदबुद्धी पापी कर्ण । येणें[1] झकविला[2] दुर्योधन ।
सर्वां प्राप्त जालें मरण । सोडवी[3] कोण येथुनी ॥ ७८ ॥
शकुनि कर्ण दुःशासन । शैल्य[1] सैंधव पांचही जण[2] ।
यांचिये बुद्धी[3] दुर्योधन । क्षयो करील वंशाचा ॥ ७९ ॥
तवं जयद्रथ आणि कर्ण । दृष्टी[1] लक्षूनि तो[2] फाल्गुन ।
धांविन्नले ह्मणती प्राण । घेऊं याचा संग्रामीं ॥ ८० ॥
तया दोघांचे दोघे[1] कुमर । तारुण्यमदें माजले[2] थोर ।
पुढां[3] लोटोनि[4] रहंवर । पार्थासमोर पातले[5] ॥ ८१ ॥
दोघीं[1] राहोनि दोंभागीं । पार्थां[2] लाविली[3] बाणलागी[4] ।
हांसोनि अर्जुन ह्मणे[5] निसुगीं[6] । मरणभय टाकिलें ॥ ८२ ॥
दोनी[1] सहस्र कंकपत्रीं । अर्जुन ताडितां अमित्रपुत्रीं ।
येरें तोडूनि हेळामात्रीं । चोज पाहे तयांचें ॥ ८३ ॥

---

७६. १ **देख** नि खवर्ग ( **जे कां** औं ) ; २ ( – ) औं पु ; ३ **आले** औं पु ; ४ **सेनासन्मुख** नि खवर्ग ( **सेनेचिया मुखा** औं ) ; ५ **भूप म्हणती** नि , **भूपाळ ह्मणती** खवर्ग ( **भूपाळ मारितो** औं ) ; ६ **सकळीक** नि खवर्ग ( **हाका** औं ) ; ७ **मांडिली** नि औं पु·४ नां.

७७. १ **वांठीवं** औं पु·४ नां धु.

७८. १ **तेणें** नि ; २ **शिकविला** नि ( स प्रसंप्रा ) ; ३ **सोडवील** नि.

७९. १ **शल्य** नि तं ; २ **जन** औं पु ; ३ **बुद्धीनें** नि.

८०. १ **दृष्टीं** नि औं पु ; २ ( – ) नि खवर्ग.

८१. १ **दोन** नि पु ; २ **मातले** नि खवर्ग ; ३ **पुढें** नि ; ४ **लाटोनि** नि ; ५. **धावीन्नले** पु४.

८२. १ **दोघे** नां मुं धु तं ; २ **बाण** नि खवर्ग ; ३ **विंधिले** नि ; ४ **पार्थालागीं** नि खवर्ग ; ५ **बोले** नि ; ६ **वेगीं** नि , **निःसंगी** तं.

८३. १ **दोन** नि.

धनुष्यापासोनि सुटतां[1] बाण । छेदूनि सांडी[2] ते[3] अर्जुन ।
पिते देखत[4] असतां[5] निर्वाण । करिता जाला तयांतें ॥ ८४ ॥
विशाळ[1] रंभापर्णतुंडें[2] । दोघां[3] ताडिलीं[4] दोनी[5] कडे[6] ।
धरातळीं पडलीं[7] मुंडें । जपाकुसुमासारिखीं ॥ ८५ ॥
दृष्टी देखतां पुत्रमरण । खेद न करी त्यांचें मन ।
तवकें[1] वेढूनि अर्जुन । रागें मारूं लागले ॥ ८६ ॥
वृत्र शंबर[1] दोघे पूर्वीं । इंद्रासि[2] मारूं[3] धाविन्नले[4] गर्वीं ।
तैसा वधावया वासवी[5] । कर्णसैंधव धाविन्नले[6] ॥ ८७ ॥
कौरववीर मीनले पाठीं । अवघे[1] करिती बाणवृष्टी ।
विकट[2] हाकांचां[3] बोभाटीं । भूतसृष्टी भेदरा[4] ॥ ८८ ॥
आगळीक करूनि कर्णें । अर्जुनरथींचीं अश्वरत्नें ।
तिनी[1] मारितां भीमसेनें । नूतन आणूनि[2] जोडिलीं[3] ॥ ८९ ॥
हें देखोनि कौरवदळीं । अवघे[1] हर्षें पिटिती[2] टाळी ।
ह्मणती अर्जुन पडिला[3] तळीं । यश आलें आमुतें ॥ ९० ॥

---

८४. १ **सुटती** नि; २–३ **पाडी तो** धु, **सोडी तो** तं; ४–५ **देखतां** गो·२ रा. ही ओवी खवर्ग मध्यें नाहीं.

८५. १ **विषाळ** औं धु रा; २ **रंभापूर्ण तुंडें** नि; ३ **दोघे** औं पु; ४ **ताडिलें** नि खवर्ग ( **ताडिले** पु·४ ); ५ **दोहीं** – नि खवर्ग; ६ **कांडें** धु गो२ रा तं; ७ **पाडिलीं** नि खवर्ग ( नां प्रसंप्रा ).

८६. १ **तवकें** नि पु४ ख नां.

८७. १ **जंभ** नि ( स प्रसंप्रा ); २–३ **इंद्रेसीं** औं; ४ **धांवले** नि, **जुझले** औं, **लागले** पु·४ ख नां मुं गो२; ५ **सात्रेवीं** औं पु·४ नां, **सर्वीं** ख मुं; ६ **धांवले** नि. गो मध्यें ही ओवी नाहीं.

८८. १ **अनेक** पु; २ **निकट** औं पु; ३ **हाकांचे** नि; ४ **भेदरली** नि, **भेदरे** पु·४ ख नां मुं, **वोथरे** औं.

८९. १ **बाणें** नि खवर्ग, ( – ) धु, **ती** तं; २ **आन** गो रा तं; ३ **दीधलीं** नि.

९०. १ **अवघीं** पु४ गो; २ **वाहाती** पु ख गो२ रा, **वाजविती** नां मुं, **पिटिली** पु४ गो; ३ **पाडिला** पु मुं गो·२.

सोमदंती[1] शकुनी कर्ण । सैंधवराजा[2] दुर्योधन ।
भीमा उजू पांचही जण । शस्त्रपाणी धाविन्नले ॥ ९१ ॥
ताळप्रमाण चंड[1] चाप[2] । भीमें वाहिलें[3] सकोप[4] ।
त्रिशुळबाणधरांवरी[5] वोप[6] । झळके काळानळाची[7] ॥ ९२ ॥
तो येकेक[1] येकेकातें[2] । लागतां[3] पावले[4] प्राणांतवेथे[5] ।
जेवीं ताडितां वज्रघातें[6] । उलंडती गिरिवर ॥ ९३ ॥
मरणभय सरलें मागां । तवं माद्रेय पातले[1] लागा[2] ।
धृष्टद्युम्नादि[3] शिखंडी वेगा[4] । द्रुपदपुत्र पावले ॥ ९४ ॥
तीहीं[1] धार्तराष्ट्र सकळ । आणि असंख्य[2] कौरवदळ ।
विध्वंसिलें जैसें अनिळ । भंगी मेघपटलातें[3] ॥ ९५ ॥
धृष्टद्युम्न आणि शिखंडी । शरसंधान कडोविकडी ।
हस्तिपासीं[1] गजकरवंडी । असंख्यात[2] पाडियल्या[3] ॥ ९६ ॥
राऊत पाडिले वारुवांसीं । उष्ट्र[1] लोळती[2] बैसलेत्यांसीं[3] ।
सशस्त्र[4] पाईच्या वीरांसी । लेखा तेथ[5] असेना ॥ ९७ ॥

---

९१. १ **सोमदत्ती** नि; २ °**राज** नि गो रा.

९२. १ **प्रचंड** नि ख नां गो॰२ रा; २ **चापा** आँ पु; ३ **वाइलें** पु ख मुं धु गो२ रा; ४ **सकोपा** आँ पु; ५ °**बाण धरेवरी** नि; ६ **वोपा** आँ धु; ७ **कळानळाची** नि ( स प्रसंप्रा ).

९३. १–२ **एक एकातें लागतां** नि खवर्ग; ३–४ **पावती** नि खवर्ग; ५ **प्राणांतव्यथा** नि खवर्ग; ६ °**घाता** नि खवर्ग.

९४. १ **लागले** नि, **पावले** पु॰४ नां मुं धु; २ **सवेगां** आँ पु ख नां मुं, **वेगा** पु४; ३ °**द्युम्न** नि; ४ **लागा** पु४ ख नां मुं.

९५. १ **आवेशें** नि पु४ ख नां मुं, **आवेश** आँ पु; २ **समस्त** नि; ३ **मेघमंडळातें** नि. गो मध्यें ही ओवी नाहीं.

९६. १ **हस्तिपांसहित** नि, **हस्तपाशीं** पु, **हस्तपादें** पु४, **शस्त्रपाशीं** आँ; २ **पडिलिया** आँ पु, **पाडिलियां** पु४; ३ **असंख्य** आँ पु, **असंख्यात** पु४.

९७. १ **उष्ट्रें** नि खवर्ग; २ **लोळविती** नि; ३ **बसलेल्यांशीं** नि, **बाणासरिसीं** आँ; ४ **असंख्यात** नि, **शस्त्रें** आ पु॰४, **शस्त्र** तं; ५ **त्यांस** नि खवर्ग.

पडिले[1] अश्वेंसीं सारथी । शस्त्रें टाकूनि[2] पळाले रथी ।
छत्रें[3] पताका लोळती क्षिती । शुष्कपर्णासारिखीं ॥ ९८ ॥
अर्जुनें[1] रथ[2] लोटूनि समरीं । पुढति[3] धाविन्नला[4] कर्णावरी ।
तेणें असंख्यात शरीं । पंडुपुत्रा भेदिलें[5] ॥ ९९ ॥
अर्जुनें घेऊनि तिनी बाण । हृदयवर्मीं[1] विंधिला[2] कर्ण ।
मूर्छा दाटोनि[3] दारुण । ध्वजस्तंभीं टेंकला ॥ १०० ॥
उतरला[1] वीरश्रियेचा[2] वारा । रथ[3] काढविला[4] माघारा ।
भीमसेनें त्या अवसरा । दुर्योधना[5] देखिलें[6] ॥ १०१ ॥
आठउनि जातुषागारा[1] । दांत खादले[2] करकरां[3] ।
उपडूनि प्रचंड तरुवरा[4] । उभयहस्तीं झाडिलें[5] ॥ १०२ ॥
वाटारिले[1] पावकनेत्र[2] । ऊर्ध्वदशनीं चाविले अधर ।
जैसा प्रळयकाळींचा रुद्र । तैसा भासे सकळांतें[3] ॥ १०३ ॥

---

९८. १ **पाडिले** पु४ गो२ रा; २ **सोडोनि** नि, **सांडूनि** औं गो२; ३ **छत्र** नि ख, **ध्वजा** औं.

मुं मध्यें तिसरा चरण दुसऱ्या चरणाच्या जागीं असून तिसरा चरण **राउत पडिले नेणों किती** असा आहे.

९९. १ **अर्जुन** नि पु तं; २ (–) औं पु; ३–४ **पुढें धांवला** नि; ५ **ताडिलें** नि, **विंधिला** औं पु.

१००. १ **हृदईं** औं पु; २ **ताडिला** नि; ३ **दाटली** नि खवर्ग.

१०१. १ **उडाला** नां; २ **वीरश्रीचा** नि; ३ **सूतें रथ** नि; ४ **काढिला** नि खवर्ग रा; ५–६ **दुर्योधन देखिला** खवर्ग (औं प्रसंप्रा).

१०२. १ **जातुसैन्यसागरीं** पु, **जातुशालयीचें समरीं** औं, **°गारीं** पु४ खं नां मुं; २ **खात** नि, **खाउनि** औं मुं ध; ३ **°करा** नि, **°करीं** खवर्ग; ४ **°वरीं** खवर्ग; ५ **ताडिला** नि, **झोडिलें** ध.

१०३. १ **वटा°** नि मुं तं; २ **पावकातुल्य नेत्र** नि खवर्ग; ३ **सर्वांतें** नि, **कौरवांतें** औं.

मरणभय घेऊनि पोटीं। कौरव पळती[1] देऊनि पाठी[2]।
भीमें कोप[3] धरूनि मुष्टीं। स्वस्थानींच[4] थोकला ॥ १०४ ॥

पांडवप्रताप पुरुष तरुणा[1]। नववधू कौरवराजसेना[2]।
शृंगारिली परी संघटणा[3]। युद्धसुरतीं[4] न थरवे[5] ॥ १०५ ॥

गळाला[1] अभिमानाचा[2] वास। अधैर्याचे मोकळे केश[3]।
रणशय्यासनीं[4] त्रास। पावोनियां[5] पळाली ॥ १०६ ॥

---

१०४. १ पळाले नि ; २ पाठीं नि (स प्रसंप्रा) ; ३ कोपें नि ; ४ स्वस्थानातें नि.

औं मध्यें या ओवीच्या जागीं पुढील ओवी आहेः—

भीमें वृक्ष कवळुनि मुष्टी। धांवतां कौरवीं देखिला दृष्टी।
मरणभय घेउनि पोटीं। ठाईंचा ठाईं थोकले ॥ १०४ ॥

पु मध्यें दुसऱ्या चरणाऐवजीं तिसरा असून दुसरा चरण असा आहेः—

पेस्या सैन्याच्या थाटी।

या ओवी पुढें नि आणि खवर्ग मध्यें खालील ओव्या आहेतः—

कौरवदळ[1] मारिलें। उरलें तें पळोनि गेलें।
दुर्योधन तयेवेळे[2]। पडिला क्षीण[3] होउनि ॥ १०४ अ ॥

१ आपार कौरवदळ औं, (+) फार नि, (+) बहु ख ; २ °वेळें नि (स प्रसंप्रा) ; ३ खेदाखिन्न औं.

अनेक[1] लोक[2] पाडिले। भूमीवरी लोळविले।
मागें जे होते[3] उरले। तेही मारिले तत्काळीं ॥ १०४ आ ॥

१–२ वीर अनेक रणी औं, वीर अनेक नां ; ३ कां नि.

१०५. १ तरणा नि पु ख मुं ; २ कौरवसेना नि ; ३ संघट्टना नि ; ४ °सुरता नि औं पु४ ख नां मुं ; ५ थारवे नि, धरवे खवर्ग.

१०६. १–२ गळालें अभिमानाचें नि औं ; ३ केस नि, केंश पु·४ ख नां धु गो ; ४ रणसौख्यासनीं पु·४ ख, रणमंचकीं पावोनि औं ; ५ अधोमुख औं.

कर्ण शैल्य[1] पयोधर पीन । मर्दितां जाले रक्तवर्ण[2] ।
शकुनि कंचुकी आवरण । पडिलें कोठें नेणवे ॥ १०७ ॥
शस्त्रनाराच[1] तीक्ष्णदंती[2] । चुंबितां मुख आतलें[3] क्षिती ।
जाली रूपाची उपहती । कौरवसेनावधूचे[4] ॥ १०८ ॥
आंगीं भेदले दंडघावो[1] । ह्मणोनि दुर्योधनरावो ।
चुकवोनि पळाला ठावो[2] । कोण आतां विचारा[3] ॥ १०९ ॥
असो[1] हस्ती वाजी रथ । सांडोनि पळाले असंख्यात ।
शस्त्रभार अपरमित[2] । पांचाळातें लाधले ॥ ११० ॥
किरीट कुंडलें कंकणें । बाहुअंगदें कटिभूषणें ।
माळा पदकीं[1] जडित[2] रत्नें[3] । अंगोळियेकें[4] अमोलें[5] ॥ १११ ॥
तितुकीं वोपिलीं नगरलोकां । हर्षें उभविती[1] ध्वजपताका ।
साखरा[2] वांटिती येकमेकां । जयो जाला ह्मणोनी ॥ ११२ ॥
पराभव[1] पावलियां[2] कौरव । श्रीकृष्ण बळराम यादव ।
प्रीती[3] येवोनि पांडव । आळंगिले[4] आवडी ॥ ११३ ॥

---

१०७. १ सैंधव नि पु औं ; २ आरक्त° नि.

पुढील ओवी खवर्गामध्यें जास्त आहे :-

लोक पडिले अपार । कौरवदळीं भंगले[1] वीर[2] ।
भूमी पडिले असंख्य थोर । कोट्यानकोटि परियेसा[3] ॥ १०७ अ ॥

१-२ हाहाकार औं ; ३ ते काळीं ख.

१०८. १ शस्त्रधारा नि, शस्त्रसंचलें पु, शस्त्रसांचल औं, शस्त्रसींचणें पु४, शस्त्रासिंचनी ख, शस्त्रसींचने नां; २ तीक्ष्णदांतीं नि, दक्षण हस्तीं पु, दक्षिण हस्तीं औं; ३ आंतलें नि, आपुले पु४ औं ; ४ °वधूची नि खवर्ग.

१०९. १ उदंड घावो नि औं ख नां मुं ; २ रणठावो नि ; ३ विचारी नि.

११०. १ ऐसे नि खवर्ग ; २ अपरिमित नि.

१११. १-३ जडितपदकरत्नें नि ; ४ अंगोठिका नि, अंगोळीकें पु ; ५ अमोल्य नि.

११२. १ वोपिती पु ख नां मुं ; २ शर्करा नि औं पु४.

११३. १-२ पराभविल्या नि, पराभविले औं पु ; ३ प्रीतीनें नि, त्याप्रति पु औं ; ४ आलिंगिले नि.

द्रुपद धरूनियां करीं । नगर[1] प्रवेशले गजरीं[2] ।
अक्षवाणें करिती नारी । वोवाळिती सर्वस्वें[3] ॥ ११४ ॥
आले द्रुपदाच्या मंदिरा[1] । कृष्णें[2] पूजिलें राजेश्वरा[3] ।
रत्नें[4] वस्त्रें[5] अलंकारा[6] । दाराकुमरां[7] दीधलीं[8] ॥ ११५ ॥
अन्नपानादि नाना भोग । स्वेच्छा[1] भोगित रमारंग ।
लाहोनि पांडवांचा संग । पांचाळपुरीं क्रीडत[2] ॥ ११६ ॥
येरीकडे दीनवदनें[1] । कौरव दुःखित अंतःकरणें[2] ।
मुखीं अवलंबूनि मौन्यें[3] । हस्तनापुरा पातले ॥ ११७ ॥
कोणी कोणा न बोले[1] शब्दीं[2] । कोणी कोणा न पुसे[3] बुद्धी[4] ।
जळो पुरुषार्थ प्रयत्नसिद्धी[5] । अदृष्टकळा वेगळी ॥ ११८ ॥
मर मर पुरोचना मूढा । काय[1] कार्य[2] साधिलें दगडा ।
आपण मरोनि मागिले[3] कडां[4] । अपकीर्ति[5] सर्वां आणिली[6] ॥ ११९ ॥

---

११४. १ **मग** नि खवर्ग. २ **नगरीं** नि पु मुं, **राजमंदिरीं** औं ; ३ **सर्वांतें** नि खवर्ग.

खालील ओवी नि खवर्ग यांमध्यें जास्त आहे :

**नगरा आला श्रीकृष्णदेवो । द्रुपदें दंडवत घालोनि भावो ॥**
**धरूनि आळंगिला[2] स्वमेवो । अत्यादरें[4] करूनियां ॥ ११४अ ॥**

१–३ आलिंगिला द्वारकानाहो नि ; ४ प्रीति आदरें नां, बहुत आदरें मुं.

११५. १ **मंदिरीं** नि ; २ **श्रीकृष्णा** नि ; ३ **राजेश्वरीं** नि ; ४ **वस्त्रें** नि ; ५ **रत्नें** नि, **भूषणें** औं, **धनें** पु४ ख नां मुं ; ६ **अळंकारीं** नि ; ७ **दारां कुमरां** नि, **द्वारकारायें** तं ; ८ **तोषविलें** नि.

अर्थाच्या दृष्टीनें नि पाठ बरा वाटतो; पण त्याला हस्तलिखितांत आधार नाहीं.

११६. १ **स्वस्थ** नि ; २ **क्रीडतु** नि.

११७. १ °**वदन** पु औं ; २ **अंतःकरण** पु·४ औं ; ३ **मौन** पु औं, **मौन्य** पु४.

११८. १ **पुसे** ख नां मुं ; २ **बुत्धी** ख नां मुं ; ३ **बोले** नां मुं ; ४ **शब्दीं** ख नां मुं, **शुद्धि** गो ; ५ **यत्नसिद्धी** नि, **जतसीधि** पु४.

•११९. १–२ **काय काय** नि ख ; ३ **मागिलें** नि ; ४ **कडा** नि औं ख नां मुं तं ; ५ **अकीर्त्तीं** पु·४ नां मुं गो२ तं ; ६ **लाविली** औं.

ऐसें बोले[1] दुर्योधन । यथार्थ ह्मणे[2] दुःशासन ।
मौन[3] धरा ह्मणे कर्ण[4] । व्यर्थ[5] कांहीं न बोला[6] ।। १२० ।।
कृष्णबळें तेणें[1] कृष्णें[2] । करूनि शत्रूचीं[3] कृष्णाननें[4] ।
प्रतापें सैवरीं[4] जिंकिलें[5] कृष्णे[6] । जाणवलें[7] विदुरातें[8] ।। १२१ ।।
ऐकोनि जाला परम हर्ष । ह्मणे कर्ता[1] द्वारकाधीश ।
आतां वार्ता हे[2] निर्दोष । धृतराष्ट्रातें जाणऊं ।। १२२ ।।
विदुर निघाला राजसदना । पुढें[1] कथेची कैसी रचना[2] ।
ते[3] पंडितीं आणिजे मना । मुक्तिनाथ[4] कवि वदे ।। १२३ ।।

इति श्रीभारते आदिपर्वणि चतुश्चत्वारिंशोऽध्यायः ।।

---

१२०. १ बोलोनि पु·४ ख नां मुं, वदोनि औं; २ बोले पु·४ गो; ३ मौन्य पु नां गो२ रा; ४ कवण पु; ५ कथा पु; ६ बोले औं पु.

१२१. १–२ ते पांचजण नि खवर्ग; ३–४ शत्रूचें हनन नि खवर्ग; ४ जिंकोनि नि, जिंकीलें पु मुं, जितिलें गो·२ रा; ५–६ द्रौपदीरत्न नि खवर्ग; ७ जाणविलें नि; ८ विदुरासी नि खवर्ग ( ख प्रसंप्रा ).

१२२. १ (+) स्वामी औं; २ (–) औं पु ख नां मुं गो.

१२३. १ पुढां धु तं, पुढील औं; २ सुचना धु; ३ ती नि, तें मुं गो२; ४ मुक्तेश्वर नि खवर्ग.

॥ श्री ॥

# अध्याय पंचेचाळिसावा

## श्रीगणेशाय नमः

विदुर ह्मणे ऐश्वर्यनिधी । तुतें सून जाली द्रौपदी ।
या सुखाचा अमृतोद्धी । अगस्तीसही घोंटेना[1] ॥ १ ॥
राजा ह्मणे प्रचंड दैव । आवडी विदुरा दीधली[1] खेंव ।
ह्मणे ऋषींचे[2] आशीर्वाद सर्व । फळा आले[3] येकदां[4] ॥ २ ॥
आतां दुर्योधन[1] पांचाळी । सीघ्र[2] आणावी[3] मजजवळीं ।
अळंकारमुक्ताफळीं । लेववीन स्वहस्तें[4] ॥ ३ ॥
विदुर ह्मणे गा सुजाणा । पुरा[1] वृत्तांत[2] आणीं मना[3] ।
पंडुपुत्र[4] हुताशना-। पासूनियां[5] वांचले ॥ ४ ॥
प्रगट जाले पांचाळपुरीं । प्रतापें जिंकिली[1] राजकुमरी ।
पराभविले राजे[2] क्षेत्री[3] । जे जे आले संग्रामा ॥ ५ ॥
मुहूर्त[1] स्तब्ध होऊनि[2] राजा । मग[3] ह्मणे पुरला[4] मनोरथ[5] माझा ।
अधिक[6] माझिया आत्मजां- । हूनि मातें पांडव ॥ ६ ॥
बहुत आनंद जाला चित्तीं[1] । निमाला पंडु जन्मला पुढती[2] ।
पुढां गोड होय ते युक्ती । सांगसी ते[3] करीन ॥ ७ ॥

---

१. १ **लोटेना** धु तं.

२. १ **दिधलें** आँ पु नां धु तं; २ **ऋषीचा** खवर्ग (**रुसीचा** पु४), **रुषीचे** धु तं; ३ **आला** खवर्ग; ४ **येकाळीं** नि.

३. १ **पांडव आणि** रा; २ **वेगीं** नि खवर्ग; ३ **आणा** नि; ४ **हस्तकें** आँ पु;

४. १ **पुरता** नि; २ **व्रतांत** पु४ मुं रा; ३ **काना** नि, **कां मना** पु४ नां गो रा; ४ **पांडु°** नि; ५-**पासूनि जाण** नि.

५. १ **जिंतिली** गो२ रा; २ **सर्व** आँ; ३ **क्षत्री** नि.

६. १ **मुहुर्तें** आँ पु४ धु, (+) **एक** नि मुं; २ (–) नि; ३ (–) नि; ४-५ **मनोरथ पुरला** नि खवर्ग; ६ **आधिक** पु४ नां धु गो२.

७. १ **चिर्ति** पु४ नां गो२; २ **मागुती** आँ पु, **क्षीति** नां, **पुणति** गो२ ३ **तें** पु४ ख.

विदुरें हस्त ठेऊनि पायीं । ह्मणे हे बुद्धि असो दे ठाईं[1] ।
ऐक्यें[2] वर्ततां अपाईं । कदांकाळीं पडिजेना[3] ॥ ८ ॥
विदुर नसतां दुर्योधन । रायापासीं पातला जाण ।
ह्मणे विदुरबुद्धीसि[1] मन[2] । सहसा[3] तुवां नेंदावें[4] ॥ ९ ॥
पांडव वांचले काळानळीं । तो वन्ही लागला आमुचे मुळीं[1] ।
त्यांसि वधावया त्रिकाळीं[2] । यत्न आह्मीं करितसों ॥ १० ॥
द्यावया राज्यविभागधना । विदुर बोधील क्षणक्षणा[1] ।
तुवां[2] तें[3] नाणूनियां[4] मना । आश्रय त्यांतें नेंदावा[5] ॥ ११ ॥
सापत्नबुद्धीनें[1] आपुली वृद्धी । मानिसी ऐसा[2] विवेकउदधि[3] ।
वर्तसी विदुराचिये बुद्धी । हेचि मुळीं मूर्खता ॥ १२ ॥
श्रेष्ठनीति विलक्षण । तुझी वर्तणूक भिन्न ।
आतां शत्रुकुळाचें हनन । नाना यत्नें[1] करावें ॥ १३ ॥
धृतराष्ट्र ह्मणे दुर्योधना । ऐसेंचि येतसे माझिया मना ।
माझा मनोभाव जाणा । क्षता[1] नेणे सर्वथा[2] ॥ १४ ॥
रक्षावया तयाचें मन । करीन[1] पांडवांचें स्तवन ।
तूतें विचार सुचला कवण । तो मज सांगें[2] सुपुत्रा[3] ॥ १५ ॥

---

८. १ **हृदईं** खवर्ग ; २ **ऐका** औं पु ; ३ **पडेना** नि ख मुं गो२.

९. १ °**बुद्धींत** नि , °**बुद्धी** खवर्ग गो·२ रा ; २ **मान** औं गो·२ ; ३ **सहसां** पु·४ रा ; ४ **न घालावें** नि , **न द्यावें** ख.

१०. १ **कुळीं** नि खवर्ग ( पु४ प्रसंप्रा ) ; २ **कळिकाळीं** नां.

११. १ **क्षीणक्षीणां** पु४ ; २–३ **तें त्वां** नि ; ४ **नेणोनियां** पु४ ; ५ **न द्यावा** नि ख मुं.

१२. १ **सपत्न**° नि गो२ रा ; २ **जे** नि, **ह्मणें** औं ; ३ **विवेकनिधी** नि.

१३. १ **युक्ती** नि , **यत्नीं** खवर्ग.

१४. १ **विदुर** नि ; २ **सर्वथां** पु४ धु.

१५. १ **करीं** खवर्ग ( नां प्रसंप्रा ) ; २–३ **सांग सर्वज्ञा** नि. धु तं·मध्यें ही ओवी नाहीं.

पुत्र[१] ह्मणे ऐक वचन । मंत्री पाठवूं[२] बुद्धिनिपुण ।
उपदेशूनियां याज्ञसेन । ते[३] तेथेंचि[४] ठेवावे ॥ १६ ॥
येथें आलियां[१] अपाय[२] कोटी । ऐसा धाक घालिजे पोटीं ।
न करिती राज्यविभागगोष्ठी । ऐसें[३] करूनि ठेवावें ॥ १७ ॥
सुपुत्र फोडावा द्रुपद । द्रौपदीनिमित्य[१] उपजे भेद ।
बंधुबंधूसीं विरोध । वाढे[२] हेंही करावें ॥ १८ ॥
दाऊनि[१] राज्यविभागदान । भेदूं माद्रीचे नंदन ।
पाठीं[२] उरले तिघेजण । तेही करूं तींठाईं ॥ १९ ॥
रचूनियां नाना यत्न । प्राणें घेतल्यां[१] भीमसेन ।
उरला[२] येकला[३] अर्जुन । तो[४] तृणप्राय कर्णातें[५] ॥ २० ॥
भीमाचेनि बळें जाणा । आम्हुचि करिती हो[१] हेळणा ।
त्याचेनि मरणें चौघेही[२] मरणा । पावले[३] हें[४] जाण[५] पां[६] ॥ २१ ॥
धर्म अंतरींचा संन्यासी । सर्वकार्यीं क्लीबता त्यासी ।
राज्यलोभें भीष्मद्रोणांसी । झुंझा[१] ठाकों शकेना ॥ २२ ॥
करूनि कृष्णासीं[१] आर्जव । त्यागवावे[२] हे पांडव ।
त्यासीं समान आह्मीं सर्व । शत्रुमित्र असेना ॥ २३ ॥

---

१६. १ शकुनि नां; २ पाठऊनि नि; ३–४ तेथेंचि ते नि.

१७. १ आलिया नि पु गो॰२ रा; २ अनर्थ नि; ३ ऐसे नि.

१८. १ °निमित्त नि; २ वाटे नि.

१९. १ देवोनि गो२; २ पाठी नि पु४ मुं गो॰२ रा.

२०. १ घेतल्या नि मुं गो॰२ रा; २ उरल्यां ख मुं धु रा; ३ एक खवर्ग गो; ४ (–) नि खवर्ग ( पु४ प्रसंप्रा ) गो॰२ रा; ५ आमुते मुं.

२१. १ हे धु, (–) पु४ ख नां मुं गो॰२; २ (–) नि; ३ पावेल मुं धु, पावतील पु४ ख; ३–६ चौघेजण पावती नि. औं पु मध्यें ही ओवी नाहीं.

•२२. १ झुजा नि, झुझुं औं पु.

२३. १ कृष्णाचें नि; २ त्यागा पु.

ऐसें दुर्योधनाचें वचन । वारूनियां[1] बोले कर्ण ।
मागां[2] केले जे[3] जे[4] यत्न । कोणते सिद्धी पावले ॥ २४ ॥
द्रुपद[1] द्रौपदी[2] आणि कृष्ण । पांडवां[3] मानिती जैसे[4] प्राण ।
वधिला जाईल भीमसेन । हेंही[5] असाध्य[6] दिसताहे ॥ २५ ॥
पांचा पुरुषां[1] येक वधू । ते केवीं भेदिले[2] जाती बंधू ।
आतां ऐका विचार शुद्ध । जो कां मान्य सर्वांतें ॥ २६ ॥
क्षत्रियां[1] क्षात्रधर्माचें[2] बळ । तेणें[3] बळें रक्षावें पृथ्वीतळ ।
आलियां[4] पांडवपांचाळ । युद्धीं सिक्षा करावी ॥ २७ ॥
वेळेसारिखें येश[1] अपेश[2] । याचे[3] कांहीं न मनी[4] क्लेश ।
अनालस्यें दिवसेंदिवस । वृद्धी कीजे बळाची ॥ २८ ॥
वारंवार पडतां क्षिती । सेवटीं[1] कीटक चढे भिंती ।
खणत[2] खणतां[3] हो[4] पर्वतीं[5] । खचोनि जाय येकदां ॥ २९ ॥
तेवि आपुलेनि पुरुषार्थें । क्षया न्यावें शत्रुगणातें[1] ।
मागतां राज्यविभागातें । उपेक्षूनि सांडावे ॥ ३० ॥
जितुकें पाहिजे ऐश्वर्य[1] बळ । तितुकें तुमचे ठाईं सकळ ।
धैर्यप्रतापें[2] अव्याकुळ[3] । राज्य भोगीं पृथ्वीचें ॥ ३१ ॥

---

२४. १ **ऐकोनियां** औं पु ; २ **मागें** नि ; ३–४ **ते** खवर्ग ( **ते कोण** ख ).

२५. १ **द्रौपद** औं पु मुं , **द्रोपद** पु४ ; २ **द्रोपदेय** नि , (–) औं ख मुं ; ३ **पांडव** नि ; ४ **जैसा** पु४ ख मुं ; ५ **हें** नि ; ६ **अघटित** नि.

२६. १ **पुरुषांची** नि ; २ **भेदले** नि औं मुं.

२७. १ **क्षेत्रियां** खवर्ग मुं ; २ **क्षेत्र°** खवर्ग धु ; ३ (–) नि ; ४ **आलिया** नि मुं , **आलेया** गो·२.

२८. १ **यश** नि मुं गो२ ; २ **आपेश** पु·४ धु ; ३ **याचा** नि पु४ ; ४ **कीजे** नि पु·४ नां मुं.

२९. १ **शेवटीं** नि पु४ मुं तं ; २ **खाणत** ख मुं धु ; ३ **खाणतां** ख मुं धु , **खणत** नि पु४ नां ; ४ (-) नि औं पु मुं ; ५ **प्रवृत्ती** पु , **भिंती** औं.

३०. १ **शत्रुकुळातें** नि मुं.

३१. १ **धैर्य** ख ; २ **धैर्यबळें** ख ; ३ **व्याकुळ** मुं गो.

पांडव पडिले दूरदेशीं । तैसेचि असों द्या[1] तयांसी ।
संधि-मैत्री-शब्दपाशीं[2] । गुंतों नका[3] सर्वथा ॥ ३२ ॥
ऐकोनि कर्णाचें बोलणें । कौरवराजा[1] संतुष्ट मनें ।
काय बोलिजे भीष्मद्रोणें । तेंही ऐकों[2] इछित[3] ॥ ३३ ॥
भीष्मद्रोण पाचारिले । येऊनि स्वस्थानीं बैसले ।
रायें पुसतां सार[1] बोले[2] । हितस्वार्थ सर्वांचा[3] ॥ ३४ ॥
भीष्म ह्मणे विचारखाणी । या दुर्बुद्धी नाइकें[1] कानीं[2] ।
विरोध करितां माझिये मनीं[3] । कल्याण कांहीं दिसेना ॥ ३५ ॥
पांडवेंसी[1] विरोधमंत्रु । सांगती ते तुझे शत्रू ।
आतां होईं तूं[2] स्वतंत्रु । वर्तों नको[3] परबुद्धी ॥ ३६ ॥
स्वार्थ सकळांचा सारिखा । इहीं[1] भोगणें राज्यसुखा ।
पंडुपुत्रीं मागणें भिका । हा[3] विवेक विचारीं ॥ ३७ ॥
आतां करूनि समाधान । आणवीं पंडूचे नंदन ।
अर्धराज्य देऊनि दान । सुखें असा[1] समस्त[2] ॥ ३८ ॥

---

३२. १ द्यावें नि औं पु मुं; २ **संधी मैत्री विभागासी** नि, **मैत्रीच्या स्नेहपाशीं** औं, °**मैत्री संधिपाशी** पु नां मुं, °**मैत्री साधीयासी** पु४; ३ **नको** नि, **न शके** पु४.

३३. १ °**राज** नि खवर्ग (औं प्रसंप्रा); २ **ऐकें** ख; ३ **इच्छिती** नि नां मुं, **नरेंद्रा** ख.

३४. १ **च्चि** औं, **सादर** पु४; २ **बोलें** पु ख नां मुं धु रा; ३ **सर्वांतें** नि, **सर्वांचें** खवर्ग.

३५. १ **नायकें** नि औं पु, **नायेकें** पु४ धु; २ **कर्णीं** गो·२ रा, **कोण्ही** पु४; ३ **नयनीं** नि खवर्ग (मुं प्रसंप्रा) गो२ रा.

३६. १ **पांडवांसीं** नि औं मुं; २ (–) नि पु·४ ख मुं, **कां** धु; ३ **नकों** पु नां धु रा, **निशंकें** पु४.

३७. १ **इहीं** पु·४ नां, **द्रष्टि** ख, **भोगू** मुं; २ **भोगिजे** औं पु·४ गो, **भोगीं** ख, **इछिसी** मुं; ३ (+) **काय** धु तं.

३८. १–२ **समस्तीं असावें** नि.

द्रोण ह्मणे[1] भला गा[2] भीष्मा । पुरुषांमाजी पुरुषोत्तमा ।
हा[3] विचार मानला आह्मां । आणि सर्वां ऋषींतें ।। ३९ ।।
आप्तपुरुष विवेकवंत । हितसाधक चातुर्यभरित ।
उत्तम उपायनेंसहित[1] । द्रुपदाप्रती पाठवा ।। ४० ।।
त्याचें करूनि समाधान । आप्त करावा धृष्टद्युम्न ।
कुंती कृष्णा[1] संकर्षण । गौरवावीं मधुरोक्तीं ।। ४१ ।।
पांचाळाचीं[1] दाराकुमरें[2] । गौरवावीं[3] स्नेहादरें[4] ।
वस्त्रें भूषणें अपारें[5] । समर्पावीं[6] समस्तां ।। ४२ ।।
मागील विसरउनि मनें । पांडव आणूनि[1] समाधानें ।
राज्य विभागूनि देणें । समसमान दों ठाईं ।। ४३ ।।
अद्यापि नव्हती[1] स्वतंत्र । उभय पक्षीं तूंचि छत्र[2] ।
नेमें स्थापूनियां पुत्र । कीर्तिपात्र तूं होईं ।। ४४ ।।
ऐसें न करूनियां राया । बुद्धि पुससी पुत्रां[1] ययां[2] ।
तरी स्वकुळ न्यावया क्षया । तूंचि कारण निर्धारें ।। ४५ ।।
ऐकोनि आचार्यांची युक्ती[1] । कर्ण ह्मणे हे[2] बरवी रीती[3] ।
बळिष्ठ असलियां[4] नृपसंगती[5] । जाय संपति त्या[6] घरा ।। ४६ ।।

---

३९. १ (+) गा पु·४ ख नां ; २ (−) पु·४ ख नां मुं धु ; ३ हाचि नि औं पु रा.

४०. १ उपायनासमवेत नि.

४१. १ कृष्ण नि पु ख मुं गो·२ रा.

४२. १ पांचाळादि मुं गो·२, पांचाळाचे नि; २ दारा कुमर नि, राजकुमरें मुं गो२; ३ गौरवावे नि; ४ स्नेहादर नि; ५ अपार नि ; ६ समर्पूनि नि.

४३. १ आणावे नि.

४४. १ (+) हे नि औं नां रा ; २ च्छत्र नि, सूत्र तं.

४५. १ पुत्र नि, पुत्रा पु४ ख मुं ; २ यया नि पु४ ख मुं.

४६. १ उक्ती औं , उत्तरोक्ति नां ; २ ही नि ( स प्रसंप्रा ) , तों मुं ; ३ निती पु , युक्ति नां मुं गो·२ रा तं ; ४ असतां नि खवर्ग , असिल्या गो·२ रा ; ५ °संतती नि ; ६ त्याचे नि.

धेनूमाजी पाळिजे व्याघ्रा । विडाल सूदलें[1] शुकपांजिरां[2] ।
हाही विचार त्या विचारा–। सारिखा दिसे वडिल हो ॥ ४७ ॥
मवाळ[1] लागती[2] हस्तकें । ह्मणोनि[3] सर्पाचीं बाळकें ।
गृहीं[4] संग्रहितां कौतुकें । ते मृत्याचींचि[5] देखावीं[6] ॥ ४८ ॥
बुद्धिबळ[1] जनआर्जव । सद्गुणीं[2] आथिले[3] पांडव ।
बुद्धीचि[4] साधिती[5] राज्य सर्व । पडिले[6] कौरव पाताळीं[7] ॥ ४९ ॥
आम्रुचा[1] मागध[2] राजा[3] जाण । चक्षुहीन कर्णहीन ।
तेणें[4] महाकर्णि[5] प्रधान[6] । नियोजिला विश्वासें ॥ ५० ॥
तेणें आटोपूनि क्षिती । स्वामी जाला सर्वसंपती[1] ।
राजा आणि राजसंपती[2] । नाहींचि[3] केली भूतळीं ॥ ५१ ॥
पाचारिल्यां[1] पंडुसुत । तोचि विचार दिसतसे[2] येथ ।
बुद्धि सांगतां समर्थ । धाकुटीं[3] बोलों शकीजेना ॥ ५२ ॥
ऐकोनि कर्णाचें उत्तर । विदुर बोले न्यायनिष्ठुर ।
दुष्टनष्टाचा विचार । ऐसिया बोलीं[1] जाणवे[2] ॥ ५३ ॥

---

४७. १ सूदला ख मुं; २ शुकपंजरा नि, शुकपिंजिरां ख मुं.

४८. १ मांवळ पु४; २ लागलीं नि; ३ ह्मणौनि औं पु४ तं; ४ ग्रहीं पु४ ख मुं रा; ५ मृत्यूसींच नि, मृत्यासि खवर्ग; ६ कारण नि खवर्ग.

४९. १ °बळें औं पु ख नां; २ षड्गुणीं औं पु मुं, शड्गुणी ख गो; ३ (+) हे नि; ४ बुद्धीनें नि, बुद्धीं पु मुं; ५ साधितील नि, साधिलें ख; ६ पडती नि; ७ पायातळीं मुं.

५०. १ झाला नि (स प्रसंप्रा), आजीच मुं; १–३ मग अमुची धरा ख; २–३ राजा मागधांचा नि; ४–५ जेणें महांकारणी मुं; ६ समाधान मुं.

५१. १ °संपत्ती नि औं तं, जगती गो; २ राजसंतती नि, राज्य-संपती औं पु मुं, राजयुवती ख, राजशक्ति धु; ३ नाहींसीचि पु.

५२. १ पाचारिल्या नि गो·२, पाचारितां औं पु ख; २ दिसे नि औं पु४ ख; ३ धाकुटें नि औं पु मुं; ४ शकेना नि औं पु, न शकीजे नां, न शकती मुं.

५३. १ बोलें औं पु मुं; २ जाणावा नि औं पु, जाण पां पु४, जाणिजे ख.

जे[1] नेणती[2] कपटलेश[3] । आप्तभावीं[4] अतिविश्वास ।
त्यांसीं निष्कारण द्वेष[5] । मूळींहूनि चाळिसी[6] ॥ ५४ ॥
तुह्मांकडूनि[1] रे[2] दुर्बुद्धी । अपराध घडले[3] पदोपदीं ।
त्यांचा एक[4] अन्याय[5] शब्दीं । प्रकट करोनी बोल पां ॥ ५५ ॥
हित सांगतां भीष्मद्रोणें[1] । तेथ तूं लाविसी दूषणें[2] ।
धार्तराष्ट्र जाती[3] प्राणें[4] । तुझीये बुद्धी वर्ततां ॥ ५६ ॥
राया पुत्रशोकाचा वन्ही । तुज न[1] लगावा[2] वृद्धपणीं[3] ।
हेंचि धरूनि अंतःकरणीं । वारंवार बोलतसों[4] ॥ ५७ ॥
ह्मणती पांडव जाळिले[1] जोहरीं[2] । ते[3] मात[4] लटिकी[5] पृथ्वीवरी[6] ।
राया ब्रह्मकल्पांतवरी[7] । येश तुझें जाळिलें ॥ ५८ ॥
तया पातका प्रायश्चित । हेंचि जाण[1] पां[2] निश्चित ।
बुझावूनि पंडुसुत । पुत्रस्नेहें प्रतिपाळीं ॥ ५९ ॥
सुखें ठेवितां पंडुसुत । क्षेम[1] उरती हे समस्त ।
तूंही[2] होसी[3] कीर्तिवंत । इहलोकीं आणि[4] परलोकीं ॥ ६० ॥

---

५४. १–२ जेणे पावती पु, ज्याचे पोटिं ऑं; ३ कपटवेश पु, कपट अशेष ऑं; ४ °भावें नि; ५ दोष ऑं पु·४; ६ चालविसी नि मुं.

५५. १–२ तुह्मांकडे ख; ३ घडे पु·४ नां; ४–५ अन्याय एक नि मुं.

५६. १ °द्रोणा नि, °द्रोण ख नां मुं; २ दूषणा नि, दूषण पु४ ख नां मुं धु गो२ तं; ३ मुकतील नि; ४ प्राणा नि, प्राण गो२ तं.

५७. १ (–) ऑं पु मुं; २ लागावा नि नां गो२ रा, लागे पु, लागेल ऑं; ३ अर्दक्षिणी गो२; ४ बोलतों नि, बोलतसें पु४ ख नां मुं धु.

५८. १ जळाले पु४; २ तऱ्हीं पु, वैश्वानरीं पु४, जोहारीं गो·२; ३ हे नि; ३–४ हेतो पु४; ५ लटकी नि पु ख नां मुं, लटीकें पु४, मिथ्या ऑं; ६ चराचरीं खवर्ग (लोकाचारीं ऑं); ७ °कल्पवरी नि ऑं नां मुं, °कल्पवेरी गो२.

५९. १ जाणा गो रा तं, जाणिजे नां; २ तूं नि, (–) ख नां मुं गो२, जि रा तं.

६०. १ क्षेमें नि पु रा; २–३ तूं होसील नि; ४ (–) खवर्ग गो·२ रा.

जे बोलती पुरुषार्थवचनें । ते[1] ते[2] वांजवृक्षाचीं सुमनें[3] ।
राया विचारूनि मनें । हित आपुलें तें करीं[4] ॥ ६१ ॥
हिडंब[1] वधिला वनांतरीं । बक मारिला येकचक्रीं ।
राजे विटंबिले[2] सैंवरीं[3] । शैल्यादिक[4] बळियाढे ॥ ६२ ॥
तेवेळीं यांची वीरवांटीव[1] । कोठें गुप्त[2] ठेली[3] सर्व ।
आतां शब्दाचें वैभव । विस्तारूनि सांगती[4] ॥ ६३ ॥
पांडवेंसी[1] युध्यकंदन[2] । करूं ह्मणतां आवंतिलें[3] मरण ।
राया तूंहि सर्वसुजाण[4] । काय आह्मीं बोलणें ॥ ६४ ॥
परिसोनि सकळिकांच्या युक्ती । प्रज्ञाचक्षु विशाळ सुमती ।
ह्मणे विदुरा आरुढें[1] रथीं । द्रुपदाप्रती[2] जावया[3] ॥ ६५ ॥
शोधूनि पांचाळनरेश्वर । भेटवीं उपायनें अपार ।
धृष्टद्युम्नादि राजकुमर । येकेंयेक[1] गौरवीं ॥ ६६ ॥
जांबूनददिव्याभरणीं । शृंगारावी याज्ञसेनी ।
स्नुषासहित द्रुपदपत्नी । रत्नीं[1] वस्त्रीं[2] पूजाव्या[3] ॥ ६७ ॥
पृथेचिया चरणां[1] नमन । स्नेहशब्दीं[2] शांतवन ।
करूनि माझें आशीर्वचन । पांचही[3] पुत्रां[4] सांगावें ॥ ६८ ॥

---

६१. १-२ ते नि, तें तें धु गो रा, तें तव गो२, तें पु नां, तिं ख; ३ शुष्कपर्णें नां; ४ वीचारी ख.

६२. १ हिडिंब नि नां तं; २ पराभविले नि, निवटिले पु; ३ समरीं नि; ४ शल्यादिक नि.

६३. १ वीरवाटीव नि; २ (-) खवर्ग; ३ ठेविली होती नि खवर्ग; ४ बोलती नि.

६४. १ पांडवांसीं नि औं; २ युद्धकदन नि गो रा तं; ३ आंवतिलें नि, अवंतिलें खवर्ग (पु प्रसंप्रा); ४ सर्वजाण नि, सुजाण औं पु ख.

६५. १ बैस नि; २-३ पांडवांप्रती तुं जाइं ख.

६६. १ एक एक नि.

६७. १-२ रत्नीं वसनीं नि, वस्त्राभरणी मुं, वस्त्रीं रत्नीं धु तं; ३ पुजावी नि औं पु.

६८. १ चरणा नि; २ स्नेहशब्दें नि गो२; ३-४ पांचाळपुत्रा औं पु मुं.

मज वृद्धातें प्रतिपाळावें । मागील कांहीं नाठवावें ।
द्रौपदीसहित सीघ्र यावें । राजनगरा[1] आपुलेया[2] ।। ६९ ।।
त्रैलोक्यपति[1] द्वारकापति । लक्ष्मीपति रुक्मिणीपति ।
निर्जरपति भक्तपति । रेवतीपंतीसमवेत ।। ७० ।।
त्या कृष्णासी वारंवार । लोटांगणीं नमस्कार ।
निवेदूनि मग[1] उत्तर[2] । माझें तया सांगावें[3] ।। ७१ ।।
पांडव घेऊनि सांगातें । कृपेनें सीघ्र येइजे येथें ।
माझें वचन तो निश्चितें । न मोडी हें मी[1] जाणें[2] ।। ७२ ।।
आज्ञा होतां विदुर[1] सुमति[2] । मार्ग क्रमूनि मानसगती[3] ।
पांचाळपुरा[4] पातला[5] नृपती[6] । सभास्थानीं भेटला[7] ।। ७३ ।।
प्रीती[1] दीधलें आळिंगन । कुशळ विचारी यज्ञसेन[2] ।
तुमचे कृपे[3] समाधान । क्षेमकल्याण सर्वदा ।। ७४ ।।
धृष्टद्युम्न सिखंडीवीर । आळंगिले[1] राजकुमर ।
सुहृद सोइरे इष्ट मित्र । तयां क्षेम दीधलें[2] ।। ७५ ।।
अपार वस्तु सुवर्णरत्नें । जे[1] पाठविलीं कुरुनंदनें[2] ।
विदुरें[3] देतां[4] यज्ञसेनें[5] । अंगिकारिलीं आवडी ।। ७६ ।।

---

६९. १–२ आपुलिया नगरातें नि, आपुलिया राज्य नगरा औं पु नां, आपुलिया निजनगरा पु४ ख.

७०. १ त्रैलोक्यनाथ नि, त्रैलोक्याधीश औं पु.

७१. १ मधुर नि ; १–२ मंगळोत्तर मुं ; ३ सांगणें नि.

७२. १–२ जाण पां ख मुं.

७३. १–२ सीघ्र गति ख ; ३ वीदुर सुमती ख ; ४–६ गेला द्रुपद-नगराप्रती पु, गेला पांच्याळनगराप्रती औं ; ७ पातला पु४, बैसला ख.

७४. १ प्रीतीनें नि मुं गो२ रा; २ याज्ञसेन नि औं पु मुं ; ३ कृपेनें नि.

७५. १ आलिंगिले नि मुं, आळिंगिले नां तं; २ दिधलीं औं पु ख धु रा.

७६. १ जीं नि ख गो२, जें पु४ नां धु रा ; २ कुरुभूषणें गो२ ; ३–५ अर्पी विदुर याज्ञसेनीं मुं.

द्रौपदीसि दीधले अलंकार । मोलागळे अति[1] अपार ।
पांचाळाचें अंतःपुर । रत्नाभरणीं कोंदलें[2] ॥ ७७ ॥
पुत्रांसि दीधलीं भूषणें[1] । सिंधुद्वीपींचीं[2] दिव्य वसनें[3] ।
श्रेह[4] दुणावला[5] दुणें[6] । सोहिरिकें[7] तेकाळीं ॥ ७८ ॥
मग येऊनि गृहयेकांतीं[2] । भावें नमस्कारिली कुंती ।
येरी ह्मणे कृपामूर्ति । तुझीया[3] कृपा[4] पांडव[5] ॥ ७९ ॥
लंघूनि अरिष्टं दुर्गम । वांचले[1] हा[2] तुझा धर्म ।
येरू ह्मणे पुरुषोत्तम । सर्वदा यांतें रक्षिता ॥ ८० ॥
चडल्या[1] प्रेमें[2] वोसंडत । अष्टौ[3] भावीं[4] वोथंबरत[5] ।
कृष्णचरणा दंडवत । मनोभावें घातलें ॥ ८१ ॥
कृष्णें[1] कवाळितां[2] हृदयेंसी[3] । प्रत्यक्ष आणि[4] हृदयवासी ।
मिळतां[5] आनंद आकाशीं[7] । सांटवेना[8] तयाचा ॥ ८२ ॥
लागोनि बळदेवाचे[1] चरणीं । मग बैसोनि[2] येकासनीं ।
विदुर ह्मणे राजया[3] श्रवणीं । विज्ञापना परिसिजे ॥ ८३ ॥

---

७७. १ (–) ख मुं ; २ गौरविलें नि , पूजिलें पु.

७८. १ वसनें मुं धु ; २ जंबुद्वीपींची मुं ; ३ भूषणें मुं धु ; ४ श्रेहें पु४ ख मुं गो·२ ; ५ दुणावलें ख गो·२ रा तं, दुणाविली मुं ; ६ तेणें नि ; ७ सोयरिकीचा नि.

७९. १–२ गृहा येऊनि एकांतीं नि , गृहांत जावोनियां त्वरिती औं , येवोनि गृहा येकांतीं पु·४ नां मुं ; ३ तुझे नि ; ४ कृपें नि औं ; ५ पांडवां ख धु गो.

८०. १ वांचविलें धु ; २ गा औं , हें मुं , हे गो·२; ३ सदां नि खवर्ग.

८१. १ चढल्या नि ; २ भावें ख ; ३–४ अष्टभावें नि मुं ; ५ वोथंबत नि , डुलत औं पु , वोतंबरत ख मुं , वोथरत धु.

८२. १ कृष्ण पु४ ख नां तं ; २ कवळोनि ख ; ३ हृदयासीं नि ; ४ जो कां औं ; ५–७ मिठी पडतां नंदासी औं , दोघे मिळतां नंदासी मुं ; ८ सांठवेना नि गो.

८३. १ बळीदेवाचे पु४ नां धु गो२ रा ; २ बैसले नि ; ३ जी नि.

वारंवार जोडूनि हस्त । कौरवराजें प्रार्थिलें बहुत ।
त्यासी देऊनियां चित्त । कार्य[1] केलें[2] पाहिजे ।। ८४ ।।
भाग्यें वांचले वैश्वानरीं[1] । भाग्यें जोडली[2] राजकुमरी[3] ।
भाग्यें पुरोचन दुराचारी । भस्म जाला स्वदोषें[4] ।। ८५ ।।
श्रेष्ठ भाग्य माझें[1] शृष्टी[2] । भाग्यें मागुते[3] देखिले[4] दृष्टीं[5] ।
आतां कृपा करूनि भेटी । पाठवावें पुत्रांतें ।। ८६ ।।
सवें देऊनि कुंती[1] कृष्णा । आणि कुमरा धृष्टद्युम्ना ।
येऊनि द्वारकेचा राणा । सांभाळील[2] मजलागीं ।। ८७ ।।
तुझेनि शरीरसंमंधें[1] सुखी । श्लाघ्यता मानी[2] तिहीं[3] लोकीं ।
इंद्र तोही माझिये[4] तुकीं । तुळावया हलुवट ।। ८८ ।।
द्रुपद ह्मणे जी साचार । माझें[1] राज्यलक्ष्मीनगर[2] ।
पांडवांचें[3] हा[4] निर्धार । निश्चयेसीं मानीजे[5] ।। ८९ ।।
राहाणें[1] जाणें[2] आवडी त्यांची । भावना न चले हो आमुची ।
जें[3] मानेल[4] मनोरुची[5] । तेंचि[6] केलें[7] पाहिजे ।। ९० ।।

---

८४. १–२ सकळीं परिसिलें नि खवर्ग.

८५. १ लाखाजोहरीं नि ; २ जोडिली नि , मोडीली पु४ ; ३ सुंदरी पु४ ख , कुमरी पु नां : ४ हुतांशीं औं पु ख.

८६. १–२ माझिये दृष्टी मुं ; २ दृष्टी ख ; ३–४ देखिले मागुति ख ; ५ सृष्टी मुं.

८७. १ कोंति पु४ नां मुं ; २ सांभाळित गो॰२.

८८. १ °संबंधें नि, °संबंध तं ; २ मानूं नि , मानिती औं गो२ , मानिजे मुं ; ३ उभय नि ; ४ तिहि पु४.

८९. १ माजी गो॰२ , माझी तं ; २ °लक्ष्मुनि नगर मुं , °लक्ष्मिन-घर गो२ ; ३ पांडवाचा पु४ ख ; ४ निज औं , हें पु मुं ; ५ मी मानीं नि , जाण पां मुं.

९०. १–२ जाणें राहाणें नि ; ३ त्यांस नि , जे मुं , तेचि पु ; ४–५ इच्छा असेल तुमची मुं , मानेल तयांचे रुची औं ; ५ यथारुची नि ; ६ तेचि पु ; ७ केली पु.

मी सेवेचा[1] सेवक[2] प्राणें[3] । आज्ञा कराल तें म्यां[4] करणें ।
सांगिजेल[5] कुंती कृष्णें[6] । त्या[7] विचारें वर्तिजे[8] ॥ ९१ ॥
विदुर सर्वज्ञ ज्ञानमूर्ती । सर्वदा[1] वर्ते तुमच्या[2] हितीं ।
तो सांगेल त्याच रीती । वर्तणूक करावी ॥ ९२ ॥
धर्म ह्मणे नृपसत्तमा । स्वतंत्र सामर्थ्य नाहीं आह्मां ।
तुझें[1] आज्ञावचन[2] निगमा[3] । तुल्य मानूं निर्धारें ॥ ९३ ॥
निश्चय बोले यादवराणा । जाणें आवडे माझिया मना ।
दुऱ्हावतां[1] आपुल्या स्थाना । सहजें[2] दुरीं पडतसां[3] ॥९४ ॥
मीही[1] येतसें सांगातें । सकळ[2] विवेक होईल तेथें ।
अवश्य ह्मणोनि कुंतीसुतें । प्रस्थानातें करविलें ॥ ९५ ॥
पंडुपुत्र निघतां पुढतीं । द्रुपदें[1] गौरविले उचितीं ।
उपायनाची संपती[2] । अमर्याद वोपिली ॥ ९६ ॥
सहस्र करटी[1] मदोन्मत्त । सुवर्णकवचिं[2] महावंत ।
सुवर्णांकुशीं[3] करमंडित[4] । च्यारी[5] कलभ[6] येकयेका ॥ ९७ ॥

---

९१. १-२ **शेवक शेवेचा** पु४ ; २ **सेवकाचा** मुं ; ३ **पणें** गो ; ४ **मज** नि मुं ; ५ **सांगिजे** नि, **सांगिजैल** गो ; ६ **श्रीकृष्णें** नि ; ७ **त्याच** नि ; ८ **वर्तेन मी** नि.

९२. १ **सर्वदां** पु४ ख नां ; २ **तुमचे** नि.

९३. १ **तुझी** पु४ गो२ ; २ **वाक्य** नि, **वचन आज्ञा** गो॰२ , **वचन** तं धु ; ३ **निगमागमा** नि धु.

९४. १ **दुरावतां** नि, **दुरावितां** गो॰२ ; २ **सहज** नि औं, **सहजचि** धु : ३ **पडतसों** पु४.

९५. १ **मी** खवर्ग ; २ **सर्व** नि.

९६. १ **द्रौपदें** पु४ ख मुं धु गो तं ; २ **संपत्ती** नि औं, **संपति** पु४.

९७. १ **करिणी** नि गो, **करी** औं मुं, **कीरटी** पु४ गो२ रा नां, **कीरीट** पु ; २ °**कवची** नि पु४ गो तं, °**कवचें** औं पु मुं ; ३-४ °**कुशमंडित** नि पु४ ; ४ **मंडित** औं पु नां; ५-६ **चार लक्ष** नि, **संकल्पित** पु, **संकल्पिले** औं; ६ **कळस** मुं गो२.

घंटा घागरिया नेपुरें । पत्रवेली शृंखळा सूत्रें[1] ।
दशनबंधादि[2] विचित्रें[3] । सर्वाभरणें[4] कनकाचीं ॥ ९८ ॥
इंद्रगोपाहूनि तांबटी[1] । झुली घातल्या सूर्यपुटीं[2] ।
पताका[3] झळकती[4] हेमतगटीं । उभयकर्णीं चामरें ॥ ९९ ॥
शातकुंभमणिमंडित[1] । चत्वारी[2] अश्वीं[3] सहस्र रथ ।
मनोजवीं पंचाशत[4] । सहस्रसंख्या येकेकां[5] ॥ १०० ॥
अयुत दासी[1] सहस्र[2] दास[3] । शय्यासनें[4] विचित्र वास ।
सुवर्णभाजनें बहुवस । पृथकाकारें[5] अर्पिलीं[6] ॥ १०१ ॥
कोटी सुवर्ण येकयेकां[1] । पांचाळराजें[2] अर्पिलें[3] देखा ।
मुक्तजाळी[4] रत्नसिबिका । येकशत येकातें[5] ॥ १०२ ॥
कुंती कृष्णा सुखासनीं[1] । येकत्र पार्थ चक्रपाणी ।
चौघे बंधु भिन्नयानीं । रहंवरीं मिरवले[2] ॥ १०३ ॥
सेनेसहित धृष्टद्युम्न । पाठीं चालिला बळसंपन्न[1] ।
वाद्यध्वनिचेनि[2] गगन[3] । नादविषयें[4] व्यापिलें[5] ॥ १०४ ॥

---

९८. १ **पत्रें** पु, **भारें** औं, **चक्रें** गो२ ; २ °**बंदादी** औं ख धु रा, **दशनवेदनांदि** पु४; ३ **मनोहरें** औं ; ४ **सर्व आभरणें** नि.

९९. १ **तांबटीं** औं पु, **तांबडी** रा तं; २ **सुवर्णपुटी** नि मुं, **सुवर्णपुष्टीं** औं पु, **सुवर्णपिठीं** पु४, **सुवर्णपुटीं** ख नां ; ३ **पीतपताका** औं पु, **शिरीं** नि ; ४ **आच्छादन** नि.

१००. १ **शांत°** नां गो२ रा, **शत°** औं पु४ ख मुं तं ; २–३ **चत्वार अश्व** नि; ३ **आश्व** पु४; ४ **पांचशत** नि खवर्ग (पु प्रसंप्रा); ५ **एकएका** नि पु तं.

१०१. १ **दानीं** नि; २ **आणि** औं; २–३ **दास सहस्र** ख मुं; ४ **शय्यासन** नि, **शय्यासनि** पु४ ; ५ **पृथगाकारें** नि, **पृथुकाकारें** औं पु ख मुं गो ; ६ **ओपिलीं** नि, **अर्पित** औं पु, **अर्पिति** पु४ नां मुं.

१०२. १ **एकएका** नि, **येकयेका** पु४ ख; २ °**रायें** नि, ३ **वोपिली** ख; ४ °**जाळिया** नि; ५ **एक एका** नि, **येकेकातें** ख गो२ रा.

१०३. १ **एकासनीं** नि पु४; २ **मीरविजे** गो२.

१०४. १ **बळवाहन** गो२; २ °**ध्वनींनीं** नि, °**ध्वनीनें** औं पु, **नादध्वनीचें** ख; ३ **गगना** ख, **गगनें** धु तं; ४ **गंधविपयें** ख; ४–५ **नादीं संपूर्ण कोंदलें** औं.

विदुर बैसवूनि निकटीं । कृष्ण बोले सप्रेम गोष्टी ।
विदुरा तुजसमान श्रृष्टी । मित्र मातें[२] असेना ॥ १०५ ॥
क्षत्ता[१] ह्मणे करुणाकरा । काय स्तविसी मज पामरा ।
अनाथबंधु या उत्तरा । साच करिसी या बोलें[२] ॥ १०६ ॥
वंदूनियां पांचाळनरेश्वरा[१] । पांडव पातले[२] कौरवपुरा ।
तो महोत्साह[३] पुरंदरा । दुर्लभ वाटे लोचनीं ॥ १०७ ॥
निकट पातल्यां[१] राजनगरा[२] । विदुर पाठविला पुढारां ।
जाणवितां राजेश्वरा । परमाल्हाद तयातें ॥ १०८ ॥
द्रोण कृप[१] आणि[२] विकर्ण[३] । सकळ दळेंसीं चित्रसेन ।
सन्मुख पाठविले नंदन । आणावया सन्मानें ॥ १०९ ॥
नगरनागरिकजनीं । गुडिया उभविल्या विचित्रवसनीं ।
कुंकुमें[१] रंगवूनि[२] मेदिनी । चौक[३] भरिती[४] मुक्तांचे ॥ ११० ॥
हेमस्तंभी तोरणें मखरें । वाद्यें[१] लागलीं अपारें ।
भेरी निशाण मंगळ तुरें । इडेंपाडें गर्जती ॥ १११ ॥
वोवाळिती नारीनर[१] । पुढती देखिले[२] पंडुकुमर[३] ।
हें आश्चिर्य[४] महाथोर । सर्व आह्मी भाग्याचे ॥ ११२ ॥

---

१०५. १–२ दुसरा मीत्र नां.

१०६. १ क्षता पु नां मुं धु गो॰२ रा तं; २ बोला ख रा.

१०७. १ पांचाळेश्वरा नि खवर्ग; २ पावले गो२ रा तं; ३ महोत्सव नि, मोहोत्साह औं, मोहत्साह पु४ मुं.

१०८. १ पातले नि मुं गो, पावल्यां औं, पातला पु४; २ राजमंदिरा मुं.

१०९. १ भीष्म मुं; १–२ कृपाचार्य औं; ३ कर्ण खवर्ग गो२.

११०. १–२ कुंकु केशरें औं; २ रंगूनी ख धु गो२ रा; ३–४ सिंचुनि चौक औं.

१११. १ (+) वाजूं नि.

११२. १ नगरनारी° नि; २ देखूनि नि; ३ पांडु° नि; ४ आश्चर्य नि, ऐश्वर्य मुं.

आतां[1] आमुच्या[2] दैवसुकृतें[3] । पांडव अक्षई असोत येथें ।
सहज अवलोकितां यांतें । अमृतपान[4] होतसे ॥ ११३ ॥
मिरवत पातले[1] राजसदना । नमस्कारिलें पितृचरणा[2] ।
रायें आळंगितां[3] नयना[4] । अश्रुपात[5] लोटले ॥ ११४ ॥
वारंवार धरूनि पोटीं । स्नेहभावें थापटी[1] पाठी[2] ।
ह्मणे आजि सुखाची भृष्टी । जाली मातें पुत्र हो ॥ ११५ ॥
भीष्म द्रोण कृपाचार्या । वृद्ध बाल्हीक प्रतीपतनया ।
भावें वंदूनिया पायां । आलिंगनें दीधलीं ॥ ११६ ॥
कर्ण[1] सैंधव शैल्य शकुनी । दुर्योधनादि सभास्थानीं ।
निर्मत्सरें[2] बंधुश्रेणी । आळंगिल्या[3] पांडवीं ॥ ११७ ॥
मस्तक ठेऊनियां चरणीं । नमिली[1] गांधारी जननी ।
तिणें स्पर्शोनियां मूर्ध्नी । आसीर्वाद दीधले[2] ॥ ११८ ॥
पृथादेवी[1] आणि[2] सौबळी । स्नेहें[3] मीनल्या[4] खेंवकवळीं[5] ।
तपती पयस्विनींच्या[6] मेळीं[7]। जेविं[8] न[9] दिसे[10] भिन्नता[11]॥११९॥
काशिराजाची[1] नंदिनी । दुर्योधनाची मुख्य[2] पत्नी ।
तिणें नेऊनि[3] याज्ञसेनी । गौरविली[4] सन्मानें ॥ १२० ॥

---

११३. १ असो ख ; २–३ आमुचेनि सुकृतें नि , अमुचे सर्व सुकृतें ख ; ४ अमृत पावन औं.

११४. १ आले नि ; २ पितृव्यचरणा मुं गो·२ ; ३ भावलोकितां ख ; ४ चरणा गो ; ५ मृतअश्रु ख.

११५. १–२ पाठी थापटी धु गो२ ;

११७. १ विकर्ण नि ; २ निर्मछर औं पु४ नां ; ३ आलिंगिल्या नि

११८. १ वंदीलि गो२ ; २ दीधला नि खवर्ग.

११९. १ पृथा गो·२ ; २ (–) औं ; ३ स्नेह पु४ ; ४ मिळाल्या पु४ मुं ; ५ खेवंकळीं नां ; ६ स्वयेंस्वतिचा पु४ , तपस्विनियांच्या गो२ ; ७ जळी पु४ , मीळणि ख ; ८–११ ते विभिन्नता न दिसे ख.

१२०. १ कासेश्वराची औं ख ; २ ज्येष्ठ ख ; ३ पूजिली नि , येउनि खवर्ग गो२ ग ; ४ गौरवूनि नि.

वोपिलीं अळंकार वस्त्रें । पदकमाळा हार[1] कटिसूत्रें[2] ।
कर्णीं ताटंकें विचित्रें[3] । पद्मरागें[4] लेवविलीं ॥ १२१ ॥
गांधारीच्या सुना[1] सकळी । येकशत राजबाळी ।
तिहीं[2] पूजिली पांचाळी । भिन्नभिन्न[3] वैभवें ॥ १२२ ॥
बोले गांधारराजकन्या[1] । ऐकें विदुरा परमप्राज्ञा ।
पंडुराजाचिया[2] सदना । पृथा नेई पुत्रेंसी[3] ॥ १२३ ॥
वोपूनि अपार संपतीतें[1] । सर्व सुरवाड करावयातें[2] ।
वनीं श्रमले[3] त्या दुःखातें । होय[4] परिहार[5] तें करीं ॥ १२४ ॥
पांडव[1] आणि[2] कृष्णा कुंती । हर्षे गेलीं[3] स्वगृहाप्रती[4] ।
तेथीचे[5] सुरवाड सुखवस्ती । सर्व[6] मागील[7] विसरलीं[8] ॥ १२५ ॥
नित्य निकट श्रीकृष्णमूर्ती[1] । अखंड विदुराची संगती ।
तया महासुखाचे[2] पंक्ती[3] । तुळणे[4] काय तुळावें ॥ १२६ ॥
प्रज्ञाचक्षु आणि सौबळी[1] । नमस्कारूनि प्रातःकाळीं ।
स्वकर्म[2] सारूनि मग[3] राउळीं । श्रवण करिती सत्कथा[4] ॥१२७॥

---

१२१. १ (–) औं ख मुं ; २ कंठसुत्रें ख, कंठीसुत्रें तं ; १–२ हरिकिरिटीसुत्रें पु४ ; ३ पवित्रें मुं ; ४ पद्मरागाचीं औं.

१२२. १ स्नुषा औं ; २ तींहीं नि, तेहे पु४, तिन्हि ख ; ३ भीत-भीत औं.

१२३. १ गांधारीराज° नि मुं, मांधार° पु४ ; २ पांडुरायाच्चिया नि, पंडुराजयाच्या पु·४ ख नां ; ३ पुत्रांसी गो·२ रा.

१२४. १ संपत्तीतें नि औं धु तं ; २ करावें येथें नि, करायातें पु, कराव्यातें औं ; ३ श्रांतले नि पु·४ ख नां मुं ; ४–५ परिहार होय औं.

१२५. १–२ पांडवेसी औं ; ३ नेली औं ; ४ गृहाप्रती औं ; ५ तेथील नि खवर्ग ; ६–८ मागील दुःख सर्व विसरले औं.

१२६. १ कृष्णमूर्तीं पु·४ ख मुं ; २ °सुखाच्चिया नि, माजि सुखाचिया पु, माजी सुखाची पु४ ख मुं ; ३ सुखस्थिती औं ; ४ तुळणें नि.

१२७. १ सोवळी तं ; २ स्वकर्में औं पु·४ मुं ; ३ (–) नि खवर्ग (ख प्रसंप्रा) गो२ ; ४ हरिकथा पु४, इस्वरकथा गो.

किंचित्काळ[1] लोटल्यावरी । धृतराष्ट्र धर्मातें पाचारी ।
अत्यादरें धरूनि करीं । गुज कर्णी बोलत ॥ १२८ ॥
दुर्योधनादि[1] माझे कुमर । कोपी मानी अतिनिष्ठुर ।
स्वार्थलोभाचे सागर । मित्रद्रोही मी जाणें ॥ १२९ ॥
दुष्ट दुरात्मे दुर्जन । नाइकिती[1] माझें वचन ।
मज देखूनि चक्षुहीन । अव्हेरिती सर्वस्वें ॥ १३० ॥
पुढती नुपजावा[1] विकल्प । ऐसा माझा शुद्ध[2] संकल्प ।
सर्वी असावें सुखरूप । बंधुवर्ग[3] संवादें[4] ॥ १३१ ॥
अंगिकारोनि अर्धजगती । तुवां राहावें[1] इंद्रप्रस्थीं ।
जैसा इंद्र अमरावती– । माजी मिरवे वैभवें ॥ १३२ ॥
पुत्र कोण्ही[1] न करीती[2] विघ्न । तवं मी करीन अभिषेचन[3] ।
विदुरा[4] बोलावीं[5] सज्ञान । ऋषेश्वर[6] जाणते ॥ १३३ ॥
अष्टोत्तरघटसहस्र[1] । आणवीं[2] जान्हवीचें नीर ।
नूतन घडवीं[3] अलंकार । शुद्ध जांबूनदाचे ॥ १३४ ॥
किरीट कुंडलें करकंकणें[1] । बाहुअंगदें कंठभूषणें[2] ।
मेखळा मुद्रिका[3] नवरत्नें[4] । अमोलिकें[5] आणवी[6] ॥ १३५ ॥

---

१२८. १ कांहीं काळ नि.
१२९. १ म्हणे दुर्यो° नि.
१३०. १ नायकती नि.
१३१. १ नुपजतां पु·४ मुं, नुपजति ख; २ शब्द पु, मन औं; ३ बंधुवर्गी नि औं पु; ४ समभावें नि, सद्भावें औं पु.
१३२. १ असावें नि.
१३३. १ (–) खवर्ग; २ करितील नि धु; ३ अभिषिंचन नि औं; ४ विदुर नि औं पु·४ ख मुं रा तं; ५ बोलाविला नि पु४ गो, बोलावीन पु, बोलाउनि औं; ६ आणी ऋषेश्वर नि खवर्ग.
१३४. १ अष्टोत्तरशतघट° नि; २ आणखी पु, आणोनि मुं; ३ करवी पु४ मुं.
१३५. १ विर° पु४; २ कंठाभरणें औं गो२, कटीभुषणें ख धु, करभूषणें मुं; ३ कंकणें पु४; ४ वीररत्नें पु४; ५ अमोलीक नि औं पु४ ख मुं गो; ६ आणावीं पु·४ ख मुं गो·२.

शिरोवेष्टणें कटिबंधनें । आंगझोल विचित्रवर्णें[1] ।
परिधानपितांबरप्रावर्णें[2] । हे[3] सामग्री[4] आणवीं[5] ॥ १३६ ॥
श्वेतछत्र[1] सूर्यपर्णें[2] । मेघडंबर नीळवर्णें[3] ।
श्वेतचामरें[4] वाळव्यजनें[5] । कनकदंडें[6] आणवीं[7] ॥ १३७ ॥
सुवर्णदंडी[1] सुवर्णमीन[2] । पताकादि राजचिन्ह[3] ।
चवरडोल मत्त करिण[4] । मिरवाया आणवीं ॥ १३८ ॥
सहस्र[1] धेनूंचे पुंजदशक । सवत्स[2] साळंकार देख ।
घेतां ब्राह्मण मानिती सुख । सुवर्णशृंगी आणवीं[3] ॥ १३९ ॥
धान्य फळीं फळिते[1] ग्राम । शतभरी[2] संख्या अति उत्तम ।
दक्षणेलागीं अपार हेम[3] । सीघ्र आतां[4] आणवीं[5] ॥ १४० ॥
पंडूनें[1] वेंचूनि[2] बाहुबळ[3] । सागरान्त पृथ्वीतळ ।
साधूनि[4] मातें[5] वोपिलें फळ[6] । जेविं कां[7] धात्रीतरूचें ॥ १४१ ॥

---

१३६. १ **तगटीत वसनें** औं ; २ **मेघडंबर सूर्यपर्णें** नि, **श्वेतचामरें वाळव्यजनें** नां रा ; ३–५ **कनकदंड आणवी** नि रा, **सर्वसामग्री आणावी** पु४, **सर्वसामग्री आणविली** औं पु, **सामग्रिसी आणवी** ख. मुं मध्यें ही ओवी नाहीं.

१३७. १ **स्वेतपत्र** औं पु·४ ख, **श्वेत आतपत्र** नां; २ **सुवर्णपत्रें** औं पु, **सुवर्णे** नां ; ३ **मेघवर्णें** पु४ ; ४ **छत्राचामरा** गो२ ; ४–५ **विचित्रें स्वेतच्यामरें व्यजनसूत्रें** औं, **रथसिबीका बहुत याने** नां ; ६ °**दंडाची** औं, **माहीनिशाने** नां ; ७ **आणावीं** पु·४ धु गो·२ रा. नि मुं रा मध्यें ही ओवी नाहीं.

१३८. १ **सुवर्णवर्णी** नि; २ **सुवर्णमयी** नि; ३ °**चिन्हीं** नि; ४ **करिणी** नि, **कीरण** पु·४ ख गो२ तं. गो मध्यें ही ओवी नाहीं; नि मध्यें पहिला चरण तिसरा आहे.

१३९. १ **सवत्स** पु४ ; २ **सुवर्च** पु४ ; ३ **आणाव्या** नि. ही ओवी ख मुं मध्यें नाहीं.

१४०. १ **फळित** नि ; २ **शत** औं मुं गो२ ; ३ **धन** गो ; ४ **येथें** नि ; ३ **आणावें** नि औं पु·४ ख ना मुं गो२.

१४१. १ **पांडूनें** नि ; २ **वेचून** नि ; ३ **बाहुबळें** पु४ नां ; ४ **शोधोनी** ख ; ५ (–) औं पु ; ६ **सकळ** औं ख ; ७ (–) नि पु४.

तें उत्तीर्ण व्हावया येथ । अर्धराज्येंसीं इंद्रप्रस्थ ।
देऊनि त्याचा ज्येष्ठ सुत । अभिषेकीन[१] नृपपदीं[२] ॥ १४२ ॥
ऐकोनि बोले यदुनायक । राजया[१] धन्य[२] धन्य[३] तूं[४] येक[५] ।
ऐसें केलियां पुण्यश्लोक । तुझेनि पाडें[६] अमेना[७] ॥ १४३ ॥
साधावया हें कारण[१] । विलंब न करीं अर्धक्षण ।
आजीचि[२] अमृतवेळा[३] जाण[४] । जयवार[५] शुभतिथी ॥ १४४ ॥
ऐसें बोलतां कृष्णनाथ । तेचि[१] क्षणीं[२] कृपावंत ।
ऋषि पराशराचा सुत । व्यासदेवो[३] पातला[४] ॥ १४५ ॥
घेऊनि[१] नमस्कार[२] पूजा । मग ह्मणे योजिलें त्या काजा ।
संपादूनि महाराजा । घे आशेष[३] ऋषींचे ॥ १४६ ॥
सुहृद्राजे[१] ऋषेश्वर । मीनले तपोधन अपार ।
सुवर्णपीठीं[२] युधिष्ठिर[३] । बैसविला ब्राह्मणीं ॥ १४७ ॥
धौम्यव्यासादि[१] वेदविदीं । अभिषेक केला यथाविधी[२] ।
तेवेळीं जयजयकारशब्दीं । गर्जिन्नले समस्त ॥ १४८ ॥
वेढूनि दिव्य पितांबर । लेवविले अळंकार ।
धर्मराजा[१] राजेश्वर । राज्यश्रिया[२] वरियेला ॥ १४९ ॥

---

१४२. १ अभीशेचीं पु ; २ राज्यपदीं औं, नीजपदीं ख.

१४३. १ राया नि, ह्मणे राजया पु४ ; १–५ यां पांडवासि सुखसम्य पु, यां पांडवातें सुख औं ; ६–७ पांही पैं असे पु, तन्ही असो कां औं.

१४४. १ कारणें पु४ नां धु ; २ आजची नि, अजिच ख नां गो२ ; ३ वेळा अमृत ख ; ४ पूर्ण औं ; ५ °वासर नि नां मुं गो रा.

१४५. १ तंव तेच नि ; २ क्षिणी पु४ गो२ रा ; ३ व्यास तेथें नि ; ४ पावला पु४.

१४६. १ ( – ) औं पु ; २ नमस्कारुनि पु, नमस्कारोनि केली औं ; ३ आशिर्वाद नि औं, अशेष पु४ ख नां मुं.

१४७. १ °राज नि पु४, °जन ख ; २ सुवर्णपद्रीं गो ; ३ ऋषेश्वर पु४.

१४८. १ समर्थ व्यासादि औं ; २ मंत्रवादि ख.

१४९. १ °राज नि ; २ राज्यश्रीनें नि.

ब्राह्मण तोषले[1] दक्षणादानीं[2] । रायें कथिलें[3] त्या[4] चौगुणीं[5] ।
विदुरें केली संपादणी । सांगोपांग सुजाणें ॥ १५० ॥
कुंजरारूढ मिरवतां[1] नगरीं । माडियागोपुरीं पुरुषनारी[2] ।
सुवर्णसुमनाचे संभारीं । वृष्टी करिती संतोषें ॥ १५१ ॥
व्यास ह्मणे युधिष्ठिरा[1] । जिणोनि[2] सगळी[3] वसुंधरा[4] ।
वस्य करूनि पृथ्वीश्वरां[5] । भोगीं[6] अक्षयसुखातें ॥ १५२ ॥
राजसूयमहायज्ञीं । सुस्नात होईं अवभृतस्नानीं ।
तुझी कीर्ती विश्वश्रवणीं । युगायुगीं[1] हों[2] वसती[3] ॥ १५३ ॥
विश्व संतोषें[1] निर्भर । दुःखी धृतराष्ट्राचे[2] कुमर[3] ।
हृदईं धडके वैश्वानर । क्रोधाग्नीचा सर्वांतें ॥ १५४ ॥
हें जाणवलें[1] कौरवनाथा । पाचारूनि धर्मा पार्था ।
ह्मणे आतांचि शक्रप्रस्था[2] । गमन केलें पाहिजे ॥ १५५ ॥
आज्ञा समर्थ[1] ह्मणोनि[2] कुमरीं । मस्तकें[3] ठेविलीं[4] चरणावरी ।
भीष्म द्रोण कृप गांधारी । मनोभावें वंदिलीं ॥ १५६ ॥

---

१५०. १ **तोषविले** औं पु४ ; २ **दक्षिणा°** नि पु४ ; ३ **सांगीतलें** धु तं ; ४ ( – ) औं मुं ; ५ **चतुर्गुणी** औं.

१५१. १ **मिरवती** नि ; २ **नगरनारी** औं.

१५२. १ **हृषेश्वरा** ख ; २–४ **जिंतिनली नृपवरा** पु , **जिंतोनियां नृपवरा** औं , **प्रजाद्विजा चराचरा** पु४ , **जाउनिया नीज नगरा** ख , **शांतिदयेच्या सागरा** नां , **राज्य करीं अक्षई वरा** मुं ; ३ **सकळ** नि ; ५ **पृथ्वीवरा** नि , **पृथ्वीधरा** पु नां मुं ; ६ **भागी** औं. नि मध्यें दुसऱ्या व तिसऱ्या चरणांची अदलाबदल आहे.

१५३. १–३ **करो वसती युगायुगीं** नि , **युगीं युगीं हो वसती** पु , **युगोयुगीं हो वसति** धु रा.

१५४. १ **संतोषोनि** मुं ; २–३ **धृतराष्ट्र राजकुमर** ख.

१५५. १ **मानवलें** पु४ ; २ **इंद्रप्रस्था** नि.

• १५६. १–२ **वंदूनियां** नि ; ३ **मस्तक** नि खवर्ग गो·२ तं ; ४ **ठेविलें** नि , **ठेविला** खवर्ग गो·२.

केली नगरप्रदक्षणा[1] । रथीं वाहिल्या[2] कुंती कृष्णा ।
सर्वें घेऊनि यादवराणा । पांचही बंधु निघाले ॥ १५७ ॥
सर्वभावें नमिला[1] क्षत्ता । राहविलें पौरजां[2] समस्तां ।
पांडव गेले इंद्रप्रस्था । पुढील कथा परिसिजे ॥ १५८ ॥
व्यासमुखेपासूनि वहिला । भारतकनकरस[1] फुटला[2] ।
उन्मेषवन्ही आगळा जाला । ब्रह्मांडआगटीं[3] आंतौता ॥ १५९ ॥
गणेशमतीच्या[1] सांडसें । धरिला न वचे जो[2] सायासें ।
तो प्राकृत[3] म्यां[4] माणुसें[5] । केवि हातें स्पर्शावा ॥ १६० ॥
तथापि लीलाविश्वंभरू । सानुकूल जगद्गुरु[1] ।
ह्मणोनि बोले मुक्तेश्वरू । हें सामर्थ्य संतांचें ॥ १६१ ॥

इति श्रीभारते आदिपर्वणि पंचचत्वारिंशोऽध्यायः

---

१५७. १ **नगराप्र°** नि पु रा ; २ **वाहिली** नि औं मुं गो.

१५८. १ **मानीला** पु४ ; २ **प्रजा** ख.

१५९. १–२ **°तह उद्भवला** औं ; ३ **ब्रह्मांडआगी** नां धु.

१६०. १ **गणेशपतिच्या** पु४ ; २ **हो** खवर्ग ; ३-४ **म्यां प्राकृतें** नि; ५ **माणसें** नि पु४ धु , **मनुष्यें** औं पु.

१६१. १ **जगत्रयगुरु** पु ख नां.

॥ श्री ॥

# अध्याय शेचाळिसावा

## श्रीगणेशाय नमः

वनें सरिता गिरी[1] पर्वत । लंघूनि[2] देश पुनीत ।
कृष्ण पांडव हर्षयुक्त । शक्रप्रस्था[3] पातले ॥ १ ॥

आले ऐकोनि धर्मराजासि[1] । आनंदले नगरवासी ।
उपायनाचिया[2] रासी । घेऊनि येती सामोरें[3] ॥ २ ॥

आरूढले रथकुंजरीं । नगर शृंगारिलें मखरीं[1] ।
ध्वज[2] पताका अंबरीं । विद्युत्प्राय[3] झळकती[4] ॥ ३ ॥

सडे चौक रंगमाळा । तोरणीं[1] गुंफिलें[2] मुक्ताफळा[3] ।
कनककळसांचिया[4] कळा[5] । हेळणा करिती हेळीची[6] ॥ ४ ॥

---

१. १ गड नि; २ उल्लंघूनि नि, उलंघूनि पु ख नां गो रा; ३ इंद्र-प्रस्था नि.

२. १ धर्मरासी नि; २ नाना उपा° नि, (+) पैं औं पु; ३ सामोरे खवर्ग (ख प्रसंप्रा).

३. १ तोरणमखरीं औं; २ ध्वजा औं पु·४ नां मुं धु; ३ विद्युल्लता पु४; ४ फडकती ख.

४. १ तोरणें नि; २ गुंफिलीं नि गो·२; ३ °फळां गो·२; ४ °कलश नि; ५ कुळाचळा नि खवर्ग (सोज्वळा ख); ६ हेळाची नि पु नां, हेळांची औं मुं, हेळणी गो२, होळीची गो, हेमांची रा.

खवर्ग मध्यें पुढील ओव्या जास्त आहेत :—

नाना घरेंघर[1] शृंगारिलें[2] । मुक्ताफळाचें तोरण[3] बांधिलें[4] ।
कनककलश उदकीं भरले । अति विस्तारें शोभती ॥ ४ अ ॥

१ घरोघरीं पु, परिग्रहें औं; २ शृंगारिली औं नां मुं; ३ तोरणें औं नां; ४ बांधिलीं औं नां मुं.

घरोघरीं कांचनकलश दिसती[1] । दीप उजळिले झळकती[2] ।
दिव्य वस्त्रें शोभती । अमोलिक तेजिष्ट ॥ ४ आ ॥

१ दिप्ती औं, प्रति पु४; २ रत्नज्योती औं.

कृष्णें[1] स्मरतां[2] अमरनाथ । पातला विश्वकर्म्यासहित ।
ह्मणे सेवा[3] काय[4] ती[5] त्वरित । सांगीतली[6] पाहिजे ॥ ५ ॥
अच्युत ह्मणे आखंडला[1] । निर्जरनगरी[2] भूमंडळा ।
पातली तैसी[3] रचना डोळां । रचूनि येथें दावावी[4] ॥ ६ ॥
आज्ञा वंदूनि विश्वकर्मा । निर्मिता जाला धर्मधामा ।
तेथील उपमावया[1] उपमा । दुजें[2] दृष्टी न[3] देखों[4] ॥ ७ ॥
देवकीपुत्र कुंतीपुत्र । पातीं[1] लाऊनि उघडिती नेत्र ।
इतुक्यामाजी चित्रविचित्र[2] । इंद्रप्रस्थ[3] उभविलें ॥ ८ ॥
मनुष्यकरणी करूनि परती । आवडी विश्वकर्म्या हातीं ।
रची[1] भूतळ-इंद्रावती[2] । इंद्रप्रस्थ या नांवें[3] ॥ ९ ॥
परिघ पौळी[1] गृहगोपुरें । सौधें[2] शतखणी[3] दामोदरें[4] ।
मध्यतळघरें[5] उपरिकागारें[6] । पट्टशाळा[7] देहलिका ॥ १० ॥

---

नि खवर्गमध्यें पुढील ओव्या अधिक आहेत:—

**दिव्य मंडप घातले । नाना आस्तरणें भूषिले ।**
**लोडें[1] मृदासनें[2] विस्तारले[3] । चित्रविचित्र परोपरी ॥ ४ इ ॥**

१–२ लोड तिवासे नि ; ३ मिरवलें औं.

**नगरनागरिक लोक । श्रृंगारिले अनेक[1] ।**
**अळंकार लेइले रत्नादिक[2] । शोभा[3] अनेक[4] शोभती[5] ॥ ४ ई ॥**

१ एक एक नि ; २ अनेक नि ; ३–४ तेणें शोभा औं पु, रत्नादिकें नि ; ५ शोभविती औं पु.

५. १ **कृष्णा** औं पु, **कृष्ण** पु४ नां ; २ **समोर** औं पु, **स्तवीतां** पु८ ; **पाचारितां** मुं ; ३–५ **सेवका कार्यभाग** नि ; ६ **सांगीतला** नि.

६. १ **अमरपाळा** नि, **वज्रपाळा** खवर्ग ; २ **निर्जरसभा** औं पु ; ३ **ऐसी** नि खवर्ग ; ४ **दाखवीं** नि खवर्ग ( **दाविजे** ख ).

७. १ **द्यावया** नि ; २ **दुजी** नि औं पु मुं ; ३–४ **दिसेना** नि गो२.

८. १ **पातें** गो२ ; २ **विचित्र** नि ; ३ **इंद्रभुवन** ख.

९. १ **रचिली** नि खवर्ग गो२ रा ( पु प्रसंप्रा ) ; २ **भूतळीं इंद्रा॰** नि खवर्ग ; ३ **नामें** धु रा.

१०. १ **पौळिया** नि, **पोवळी** गो२ ; २ **शुद्ध** खवर्ग ; ३ **सातखणी** औं पु ; ४ **दामोधरें** गो ; ५ **मध्यें तळघरें** नि औं नां मुं धु ; ६ **उपरिकाकारें** नि, **उपरि कंगोरे** पु८, **गोपुरें** मुं गो२ ; ७ **पडशाळा** नि ख, **पटशाळा** पु धु.

गगनचुंबित[1] विशाळ हुडे । वर्तुळ पर्वताचेनि[2] पाडें[3] ।
द्वारीं कनककपाट जोडे । गर्जतां छळिती वैरियां[4] ॥ ११ ॥
लाज सांडूनियां क्षिती । मेघाआड अमरावती ।
रिघाली[1] आणि भोगावती । पाताळगर्तीं[2] लपाली[3] ॥ १२ ॥
पश्चात्ताप धरूनि चित्तीं[1] । कुबेराची अळकावती[2] ।
कैलासवनामाजी वस्ती । करूनि वसे वैराग्यें ॥ १३ ॥
उपवनें अवलोकितां नयनीं । लज्जा दाटली[1] नंदनवनीं ।
सेऊनि मंदाकिनीचें पाणी । तपश्चर्या आचरे ॥ १४ ॥
वापी कूप तडाग[1] सरें[2] । अमृतस्वादी[3] सरितानीरें ।
अनेक रंगांचीं कल्हारें । विकासलीं[4] मघमघित[5] ॥ १५ ॥
बकुळ मल्लिका[1] जाति[2] शतपत्रें[3] । चंपक केतकी दमनकांकुरें[4] ।
परागधुळोरा[5] मधुकरें[6] । गुंजारवें खेळती ॥ १६ ॥

---

११. १ °चुंब्री नि ; २ पताकाचे औं ; २-३ पर्वताचे निपाडें नि ; ४ वैरिया नि पु४ गो.

१२. १ लपाली नि, निघाली मुं ; २ °गर्तें नि गो, °गर्तें औं पु ख नां गो२ मुं ; ३ निघाली नि, पातली गो.

१३. १ चीतिं पु४ धु गो२ ; २ अलका° नि, अळंका° औं धु गो, आळंका° पु४.

१४. १ वाटली गो२.

१५. १-२ सरोवरें नि ; २ झरे औं पु मुं ; ३ °स्वाद औं पु ख नां मुं, °स्वादु नि, आमृतस्वादा पु४ ; ४ विकासत औं पु, विकासित पु४ नां ; ५ घमघमती नि.

१६. १-२ जातिका नि ; २ मालति धु ; ३ °पत्र नि मुं ; ४ °कांकुर नि, दमनांकुरें पु४ ख, दवनांकुर नां; ५ °धुसर ख; ६ मधुकर नि खवर्ग.

यापुढें खवर्ग मध्यें पुढील ओवी अधिक आहे :—

नाना जातीचे पुष्पवृक्ष । मघमघीत अपार युक्ष[1] ।
परोपरीं पुष्पाक्ष । वास देती सुवासें ॥ १६ अ ॥

१ ईक्ष पु४ ख, लक्ष मुं.

हंस कारंडक[1] मयूर । चातक चक्रवाक चकोर ।
खंजरीट[2] मधुरस्वर । कोकिळांचे उमटती ।। १७ ।।
नहुषययातिराजेश्वरीं । राज्य केलें याचि[1] नगरीं ।
ह्मणोनि[2] रमणीक याचिये सरी । पट्टण आन असेना ।। १८ ।।
आज्ञा मागोनि सत्वर[1] । गेले[2] सुरेंद्र[3] सूत्रधार[4] ।
पांडव प्रवेशले नगर[5] । वाद्यगजरीं[6] संतोषें ।। १९ ।।
हरिखें[1] पातले राजालया । सर्वे[2] पातल्या संपतिश्रिया ।
धर्म तेथें वास[3] विजया[4] । विजयी वसे[5] श्रीकृष्ण ।। २० ।।
माधव तेथें वसे[1] कमळा । कमळा तेथें दया[2] विमळा[3] ।
ह्मणोनि नित्य[4] सोहळा । धर्मधामीं वाढता ।। २१ ।।
नित्यदानीं[1] सदाचारी । जीवमात्रीं परोपकारी ।
देशीं राष्ट्रीं पुरीं नगरीं । दुःखी कोण्ही असेना ।। २२ ।।
सिद्ध साधक तपोरासी । ऋषी पातले कुटुंबेंसी[1] ।
गृहें देऊनि तयांसी । धर्मराजें[2] स्थापिलें ।। २३ ।।
सर्व शाखांचीं[1] अध्ययनें[2] । अनेक शास्त्रांचीं व्याख्यानें ।
स्थळींस्थळीं[3] धर्मपुराणें । देवतार्चनें[4] हरिकथा ।। २४ ।।

---

१७. १ **कारंडव** नि, **कारंड** औं नां ; २ **खंजीरीठ** नां धु.

१८. १ **येचि** खवर्ग ; २ (–) नि.

१९. १ **सत्वरीं** नि ; २ **गमन केलें** नि ; ३–४ **सुरेश्वर सुत्रधारीं** नि ५ **नगरीं** नि ; ६ °**गजरें** नि खवर्ग.

२०. १ **हर्षें** नि खवर्ग ; २ **सेवे** गो·२ रा ; ३ **वासु** औं पु ; ३–४ **वसावया** पु४ ; ५ **सवें** नि ख, **यश** मुं.

२१. १ (–) ख ; २–३ **सिद्धि सकळा** नि ; ४ **नित्यानित्य** धु गो२ . (+) **नित्य** गो रा.

२२. १ **नीतिधर्म** नि.

२३. १ **कुटुंबांसीं** नि ; २ °**रायें** नि.

२४. १ **शास्त्रांची** नि मुं गो२, **शाखेंसी** पु४ ; २ **अध्यापनें** ख नां गो·२ तं ; ३ **स्थळोस्थळीं** नि ; ४ **देवार्चनें** नि औं पु·४ मुं.

क्षुधितइछेनें[1] भोजन। याचकइछेनें[2] देणें दान।
ऐसा पुण्यश्लोक जाण। प्रजापाळक[3] धर्मात्मा ॥ २५ ॥
कृष्ण ह्मणे कुरुनंदना। मातें दीधली पाहिजे आज्ञा
जाणें वसुदेवदर्शना[1]। उग्रसेनादिकांचिया ॥ २६ ॥

---

२५. १ क्षुधिता इच्छेचें नि, क्षुधिता इछाभोजन औं पु, क्षुधिता इछेनें पु४ मुं; २ याचका इच्छेनें नि; ३ प्रजा पाळी औं पु मुं.

२६. १ °देवाच्या दर्शना नि औं पु४ ख.

यापुढें नि खवर्ग मध्यें पुढील ओव्या अधिक आहेत:—

मग धर्में नमस्कार घातला[1]। श्रीकृष्णासि स्तविता जाला।
कर जोडोनि[2] राहिला। हरीपुढें[3] सन्मुख ॥ २६ अ ॥

१ कला नि; २ (+) उभा नि; ३ देवादिदेवा औं.

म्हणे जयजय[1] कृपानिधि। तूंचि सगुण साकार सिद्धी
अपरांपर[2] स्वभाव[3] बोधी[4]। जगबंधु[5] स्वामियां[6] ॥ २६ आ ॥

१ °जया नि; २ आपपरावा नि, अपरांपरा पु४ नां, आपपर मुं; ३ नसे नि, स्वबोध औं पु; ४ बुद्धी नि; ५ जगद्गुरु नि; ६ स्वामिया नि (स प्रसंप्रा) ख.

अगा ये[1] राजीवलोचना। कोटिकंदर्पविराजमाना।
लावण्यगुणनिधाना। परिपूर्णा परब्रह्मा ॥ २६ इ ॥

१ हे नि.

तूंचि आमुचा[1] दाता[2]। आमुच्या[3] जीवाचा[4] प्रतिपाळिता[5]।
साक्षात[6] ब्रह्म[7] समता[8]। निर्गुणा गुणातीता[9] ॥ २६ ई ॥

१ आमुतें नि; २ रक्षिता नि; ३-४ तूंचि आमुतें नि; ५ प्राणदाता नि, प्राणनाथा औं पु; ६-८ तूंचि पूर्ण ब्रह्म स्वसत्ता नि; ९ (+) जी नि, (+) तूं औं.

परमपुरुषा परात्परा। मेघश्यामा[1] तनुसुंदरा[2]।
अनादिगुणनिर्धारा[3]। स्वामी[4] परमपुरुषा[5] ॥ २६ उ ॥

१ लावण्यधामा नि; २ एकसुंदरा नि, सुंदरा औं पु; ३ गुणातीता परात्परा नि, अनर्ध्यगुणनिर्धारा पु, अनर्ध्यरत्नवैरागरा औं; ४-५ स्वामिया तूं निर्धारें नि.

मेघश्याम सांवळा। गळां वैजयंतीमाळा।
तूं[1] सुखाचा[2] सोहळा[3]। जगन्निवासा[4] ॥ २६ ऊ ॥

१-३ सुंदरतनु सोज्वळा मुं; ४ स्वामिया विश्वेशा नि, देवाधिदेवा रमापति, (+) स्वामी पु, श्रीकृष्ण औं.

**स्मरण करितां अन्तःकरणीं । मी येईन ततक्षणीं[1] ।**
**भक्तांचिये हृदयभुवनीं । वस्ती[2] माझी सर्वदा ॥ २७ ॥**

---

वैकुंठनायका लक्ष्मीपती । तूंचि आधार त्रिजगतीं ।
त्राहें त्राहें रुक्मिणीपती । स्वामिया[1] तूं[2] करुणाकरा[3] । २६ ए ॥

१–३ कृपामूर्ति श्रीहरी औं ; २ ( – ) नि.

तुझें[1] श्रीमुख साजिरें[3] । स्वानंदधाम[4] निर्धारें[5] ।
जगन्निवास श्रीधरे[6] । करुणाकर तूं माये[7] ॥ २६ ऐ ॥

१–३ श्रीमुख साजिरें सुंदर नि ; ४ स्वानंदघन नि ; ५ निर्धार नि , निजनिर्धारें औं पु ; ६ श्रीधर नि ; ७ माय नि.

तूं माझी माउली । तूं[1] सुखाची साउली ।
अगाध लीला कुशळी[2] । स्वामी तुझी[3] ॥ २६ ओ ॥

१ तूंचि नि , आंणि पु४ , परम मुं ; २ वहिली नि ; ३ तूंचि देवराया नि.

तुझें श्रीमुख पाहतां । दुःख हरे[1] तत्वतां ।
तूं[2] सांभाळिता । आदि अंतीं तूं[3] ॥ २६ औ ॥

१ हरिलें नि ; २ ( + ) आम्हांसि नि ; ३ जगदीशा नि.

ऐसें कृष्णें[1] ऐकोन[2] । दीधलें पांचांसि आळिंगन ।
मग आसीर्वाद देऊन[3] । निघते[4] जाले[5] ॥ २६ अं ॥

१ श्रीकृष्णें नि ; २ ( + ) स्तवन नि ; ३ ( + ) जाण औं पु ; ४ निघता नि; ५ झाला द्वारके नि , ( + ) ते समई ख , ( + ) तत्काळ मुं , ( + ) स्वानंदें औं पु.

२७. १ **तत्क्षणीं** स पु , **ततक्षीणि** पु४ ; २ **वसति** नि.

तं मध्यें ही ओवी नाहीं. पुढील ओव्या केवळ खवर्ग मध्येंच आहेतः—

मग धर्मराज बोलिले । आरोगणा करा वहिलें ।
ऐसें[1] कृष्णातें[2] विनविलें[3] । कर जोडोनियां[5] ॥ २७ अ ॥

१–२ म्हणोनियां पु ; १–३ आति विनयें प्रार्थिलें औं , पांडव उभे राहिले नां , स्तवन करिते जाले मुं ; ४–५ देवाधिदेवा श्रीकृष्णा औं , परोपरि पु४ ; ५ उभय जोडोनि मुं.

मंगळस्नान करविलें[1] । पितांबर[2] नेसविलें[3] ।
मधुपर्कें[4] पूजिलें[5] । परोपरी[6] जाण[7] ॥ २७ आ ॥

१ घातलें औं ; २ कनकांबर औं पु ; ३ परिधान केलें मुं ; ४ मधुपर्कविधि, औं , मधुपर्क पु४ ख , कनकताटीं मुं ; ५ पुजिले पु४ नां ख , विस्तारिलें मुं ; ६ यथाविधीनें औं ; ६–७ कर जोडोनियां पु४ , भोजन केलें सकळिकीं मुं.

धर्मे[1] देतां आलिंगन। अश्रूपूर्ण[2] जाले नयन।
कुरवाळिले चौघेजण[3]। अमृतहस्तेंकरूनियां[4] ॥ २८ ॥

नमस्कारिली[1] पितृभगिनी। आश्वासिली याज्ञसेनी।
दृष्टीपुढोनि चक्रपाणी। जातां खेद सर्वांतें[2] ॥ २९ ॥

कुंती ह्मणे हृषीकेशा। पुढती पांडव पावले[1] दशा[2]।
हा सर्व[3] प्रसाद तुझा ऐसा। निज[4] निश्चयें[5] मी जाणें ॥ ३० ॥

पुढती सीघ्र[1] येईं[2] भेटी। ह्मणोनि श्रेहें[3] धरिला पोटीं।
नेत्रीं स्वानंदजळवृष्टी[4]। तेणें[5] सिंची[6] हृदयस्था[7] ॥ ३१ ॥

असो राहवूनि[1] समस्तां। सवें बळदेवो ज्येष्ठ भ्राता।
आरूढोनि कनकरथा। प्रयाण केलें द्वारके[2] ॥ ३२ ॥

---

षड्रस पक्वान्नें वाढिलें। कनकताटीं विस्तारिलें।
मग जेवण[1] करविलें[2]। सकळिकांसी[3] ॥ २७ इ ॥

१ भोजन औं ख; २ आरंभिलें औं; ३ सकळिकें येकपंक्ती औं.

ऐसें भोजन सारिलें[1]। सकळिकांसी[2] वीडे[3] दीधले।
वस्त्राभरणें[4] गौरविले[5]। अनेकवर्णी[6] ॥ २७ ई ॥

१ जालें पु; २–३ विडे कर्पूरयुक्त औं; ४–५ वस्त्रें अभरविलें पु, वस्त्रालंकार अर्पिले औं; ६ नानापरी पु.

२८. १ **धर्म** नि पु मुं तं, **धर्मा** औं पु४ ख नां; २ **अश्रूनें पूर्ण** नि, **आश्रु°** पु·४ नां धु; ३ **पांचहीजण** नि, **°जन** औं पु; ४ **°करूनी** नि पु४ ख.

२९. १ **नमस्कारीं** नां मुं; २ **समस्तां** गो२.

३०. १ (+) **हे** पु·४ ख नां मुं; २ **राज्यदेशा** औं; ३ (–) औं पु४ ख नां मुं धु; ४–५ **निश्चयेसीं** नि खवर्ग.

३१. १ **शीघ्र** नि औं पु तं; २ **देईं** रा तं; ३ **स्नेहें** नि औं मुं, **स्नेह** पु तं, **श्रेह** पु४; ४ **°जळाची वृष्टी** नि; ५–७ **तें जाणे हृदयस्थ** खवर्ग.

३२. १ **राहाउनी** पु धु गो२ रा; २ **पाहिजे** पु४.

जातां कथिलें धर्मराजासी । नारद येईल तुह्मापासीं ।
तो सांगेल तें मानसीं । अत्यादरें[1] धरावें ॥ ३३ ॥
वदोनि गेलियां[1] चक्रपाणी । नारद पातला तेचिक्षणीं[2] ।
धर्में[3] लागोनियां चरणीं । सर्वोपचारीं[4] पूजिला[5] ॥ ३४ ॥
बैसऊनि[1] पांचैजण[2] । नारद ह्मणे ऐका वचन ।
माझिये आज्ञेचें पाळन । अचळ[3] केलें पाहिजे ॥ ३५ ॥
पांचाजणा येकी[1] नारी । हेंचि विपरीत लोकाचारीं ।
विरोध उपजावयाची[2] परी । येचि संधी होतसे[3] ॥ ३६ ॥
येकोदरां वैराकार । येकोदरां वेगळेचार ।
कारण स्त्रीसंग साचार । जाणतेनो[1] जाणिजे ॥ ३७ ॥
येचिविषयीं कथा जीर्ण । सुंदोपसुंदांचें[1] आख्यान ।
सावध ऐका अवघेजण[2] । या दृष्टांताकारणें ॥ ३८ ॥
हिरण्यकश्यपाचा कुमर । निकुंभनामा[1] असुरेश्वर ।
त्याचे पुत्र[2] महाक्रूर[3] । सुंदोपसुंद या नामें[4] ॥ ३९ ॥
येक शरीर येक प्राण । येकत्र[1] शय्या[2] भोजनपान[3] ।
येकाहूनि येक भिन्न । अर्ध क्षण न राहती[4] ॥ ४० ॥

---

३३. १ सर्व तुम्हीं नि.

३४. १ गेलिया नि रा, गेला पु·४ ख नां मुं ; २ ततक्षणीं मुं गो ; ३ धर्म नि पु४ ख नां मुं ; ४–५ वरासनीं बैसविला नि खवर्ग.

३५. १ मग बैसवूनि नि ; २ पांचहीजण नि नां ; ३ अचूक औं पु.

३६. १ एक नि पु४ ख मुं गो·२ ; २ उपजावया औं पु·४ ; ३ जाणिजे ख.

३७. १ जाणतेनि नि ( स प्रसंप्रा ), जानतेन गो·२.

३८. १ संदउपसंदाचें औं पु·४ नां मुं धु ; २ °जन औं पु.

३९. १ निकुंभान औं पु ; २ दोघे पुत्र नि, दोघेजण पु४ ख नां मुं, दोघे औं पु ; ३ कुमर खवर्ग ; ४ नांवें नि औं पु·४ नां.

४०. १ एक नि मुं ; २ शयन खवर्ग ; ३ एक भोजन नि, एकत्र. पानखवर्ग ; ४ होती नि खवर्ग.

तिहीं वसवूनि[1] विंध्याचळ । तपश्चर्या मांडिली प्रबळ ।
जे[2] देखोनि देव सकळ । भयशंकित[3] मानसीं[4] ॥ ४१ ॥

द्वादशपंचाग्निधूम्रपान । सूर्यमंडळ अवलोकून ।
च्यारी मास वृष्टि जीवन[1]—। धारा धरिती मस्तकीं ॥ ४२ ॥

येकांगुष्ट[1] तप दारुण[2] । ऊर्ध्वपाद मस्तकासन[3] ।
रक्तमांसें[4] करिती हवन । छेदछेदूं[5] आपणा[6] ॥ ४३ ॥

देवीं छळितां अनेकविघ्नीं[1] । चळले[2] नाहीं नियमासनीं[3] ।
तेवेळीं येऊनि पद्मयोनी । मागा ह्मणे वरातें ॥ ४४ ॥

खडतर तपाचिया[1] गरिमा । प्रसन्न जालियां[2] शंकर[3] ब्रह्मा ।
लोटूनि मर्यादेची सीमा । असुर वर मागती ॥ ४५ ॥

---

४१. १ **असुरें** पु, **असुरानीं** औं ; २ **तें** नि औं पु नां मुं, **हें** गो२, **ते** पु४ ख ; ३ **भय साशंक** नि पु४, **माहांभये** पु, **भयाभीत** औं, **भयशंका** ख नां मुं, **भयें शंकित** धु गो ; ४ **मानिती** पु ख.

नि खवर्ग मध्यें पुढील ओव्या अधिक आहेतः—

**येकाग्रचित्तनिग्रह[1] करूनी । येकांगुष्टीं[2] राहोनी ।**
**निराहार तपश्चर्यासाधनीं[3] । असताती[4] पैं[5] दोघे[6] ॥ ४१ अ ॥**

१ मनएकाग्रता नि, एकाग्रमन औं पु ; २ (+) उभे नि ; ३ तपश्चर्यें लागूनी नि, तपश्चर्येंनी पु४ नां ; ४–६ तेथें असती दोघेजण नि, दोघे तिष्ठत आसती मुं.

**उग्र तपश्चर्या[1] करितां । प्राणापानांची[2] येकाग्रता ।**
**अत्यंत होऊनि विनतना[3] । तप करिती अति उग्र ॥ ४२ आ ॥**

१ तप स्वयें पु४ नां ; २ अन्नपानाची मुं ; ३ विनीता नि.

४२. १ **साहून** नि औं. नि मध्यें ४२ व ४३ या ओव्यांची अदलाबदल आहे.

४३. १ °**गुष्टीं** नि ; २ **करून** पु४ नां मुं, **साधन** ख ; ३ **येकासन** औं पु ; ४ °**मांस** नि पु४ ख नां गो२ तं ; ५ **छेदछेदूनि** नि मुं गो, **छेदुनियां** औं पु ; ६ **आपुलें** नि औं पु ख, **आपुलीं** धु, **आपुला** गो२, **आपुलिया** रा तं.

४४. १ °**विधी** औं पु; २ **चळ** नि ; ३ **नेमसंधी** औं पु, **नेमसंजीवनी** नां.

४५. १ **तपाचा** नि ; २–३ **झाला हर** नि. गो२ मध्यें ही ओवी नाहीं. नि खवर्ग मध्यें ४५ व ४६ ओव्यांची अदलाबदल आहे.

त्रैलोकींची[1] राजपदवी । अचळ[2] करूनि[3] आह्मां द्यावी ।
युद्धीं आमुतें[4] पराभवी । ऐसा उपजों नेदावा[5] ॥ ४६ ॥
अमर होऊनि असावें सुखी । मृत्यु कवणाचे हस्तकीं ।
न हो[1] ऐसें बोलतां[2] मुखीं । विश्वकर्ता अनुवादे ॥ ४७ ॥
त्रैलोकींचें सर्व सामर्थ्य । तुह्मां दीधलें म्यां[1] यथार्थ ।
बंधुबंधुहस्तें[2] मृत्य । सेखीं पावाल विरोधें ॥ ४८ ॥
आणिका[1] हातीं[2] नव्हे[3] मरण । दोघीं करितां युध्यकंदन ।
नाश पावाल दोघेजण । हस्तें येकयेकाच्या ॥ ४९ ॥
असुर ह्मणती[1] विश्ववरदा । आह्मां जीवाचिया सुहृदां ।
वैरविरोध[2] नुपजे कदां । हें[3] निर्धारें[4] जाण पां ॥ ५० ॥
होतां ऐश्वर्याची प्राप्ती । मीनल्या[1] असुरांचिया पंक्ती ।
देवां पळऊनि संपती । स्वेच्छा[2] भोगूं लागले ॥ ५१ ॥
त्रासूनियां पाताळउरग[1] । भोगूं लागले पद्मिणीभोग[2] ।
पृथ्वी जिंतोनि[3] मातंग । मत्त तैसे क्रीडती ॥ ५२ ॥

---

४६. १ त्रैलोक्याची नि; २–३ आळंकारूनि औं पु; ४ आम्हांतें नि ख गो२; ५ न द्यावा नि.

४७. १ होय नि गो; २ (–) ख, त्रैलोक्य मुं.

४८. १ (–) खवर्ग; २ बंधुबंधूंचे हातें नि. ही ओवी गो मध्यें नाहीं.

४९. १ आणिकां नि; २ हातें नि औं; ३ नाहीं मुं गो२.

५०. १ वदती नि; २ विरोध औं पु; ३–४ हा निर्धार खवर्ग.

५१. १ मिळाल्या नि; २ स्वेच्छें नि.

५२. १ पाताळींचे भुजंग नि; २ पद्मिनीभोग नि औं, पाताळ-भोग गो२; ३ जिणोनि नि औं नां ख, जिंकोनि गो.२ तं.

मुं मध्यें ही ओवी नाहीं.

सर्वे असुरांचिया कोटी । मद्यपानें आरक्त दृष्टी ।
परस्त्रिया[1] लागोनि[2] पाठी[3] । बळत्कारें[4] भोगिती ॥ ५३ ॥
विष्णुप्रतिमा शिवस्थानें[1] । भंगिलीं तीर्थं तपोवनें ।
ब्राह्मणवध[2] गोहिंसनें । करिती संख्येवेगळीं[3] ॥ ५४ ॥
स्वेछा[1] सेवा[2] पिशिताशनें[3] । स्वेछा[4] करा[5] मद्यपानें[6] ।
स्वेछा रमा[7] सुखमैथुनें[8] । हेंचि[9] तोंडें[10] जल्पती[11] ॥ ५५ ॥
द्या रे रत्नें[1] वसनें[2] धनें । अश्व कुंजर मनुष्ययानें ।
आनंद[3]. भोगा[4] ऐसीं वचनें । मातलेपणें[5] गर्जती[6] ॥ ५६ ॥
ऋषी मारिले असंख्यात । वरदें शाप जाले व्यर्थ ।
हाहाकार वर्तला[1] तेथ । लोकत्रई सर्वांतें ॥ ५७ ॥
देव[1] ऋषी[2] ब्रह्माप्रती[3] । येऊनि[4] क्लेशातें सांगती ।
तेणें विचारूनि चित्तीं[5] । विश्वकर्म्या निरोपी ॥ ५८ ॥
रत्नें घालोनि अवयवीं । दिव्यांगना निर्मी[1] बरवी ।
जीतें देखतां वैरभावीं[2] । नाश होय असुरांतें ॥ ५९ ॥

---

५३. १ °स्त्रियांचे औं पु ; २-३ **दाटोदाटी** नि, **दाटोंदाटीं** रा ; ४ **बळात्कारें** नि खवर्ग ( नां प्रसंप्रा ).

५४. १ **शवस्थानें** नि ; २ **ब्राह्मण वधोनि** नि ; ३ **शंकेवेगळीं** नि, **संख्येआगळीं** औं पु॰४ ख नां.

नि मध्यें ५३ व ५४ या ओव्यांची अदलाबदल आहे.

५५. १ **स्वेच्छे** नि ; २ **सेविती** नि खवर्ग ( **छेदिती** पु४ ) ; ३ °**शन** नि औं पु तं, **पिशितान्नें** ख नां मुं गो ; ४ **स्वेच्छे** नि ; ५ **करिती** नि खवर्ग ; ६ °**पान** नि औं नां पु तं ; ७ **रमती** नि पु४ ख नां, **करिती** औं पु मुं ; ८ °**मैथुन** नि औं पु॰४ नां ; ९-११ **न विचारिती वर्णावर्ण** औं ; १० **नित्य** पु.

५६. १-२ **वसनें रत्नें** नि मुं ; ३ **आनंदें** नि, **अंगना** औं ; ४ **भोग** पु॰४ नां मुं ; ५ **उन्मत्तपणें** औं पु ; ६ **जल्पती** औं.

५७. १ **वर्तले** नि, **प्रवर्तला** पु४ ख नां मुं.

५८. १-२ **तपस्वी ऋषेश्वर** नि ; ३ **ब्रह्मयाप्रती** नि खवर्ग ; ४ **थोर** औं पु ; ५ **चीतीं** पु४ नां धु.

५९. १ **निर्मावी** पु४ धु ; २ **वैभवीं** औं.

अवश्य ह्मणोनि[1] विश्वकर्मा । तीहीं लोकींच्या ललामा ।
येकवटोनि दिव्यप्रतिमा[2] । तिळोत्तमा निर्मिली ॥ ६० ॥
तीळ तीळ जडोनि रत्नकण[1] । घडिलें[2] सजीव[3] प्रमदारत्न ।
तिळोत्तमा[4] हें अभिधान । ब्रह्मा ठेवी तियेतें ॥ ६१ ॥
सकुमार सुंदर[1] गुणलक्षणी[2] । चातुर्यप्रकाशाची खाणी ।
जीतें अवलोकितां नयनीं । चोज झालें[3] अद्भुत ॥ ६२ ॥
उभी ठाके जिया[1] सवा । तिकडे मुखें निघती देवां ।
सहस्रनयन जाला मघवा । चतुरानन विरंची ॥ ६३ ॥
तीणें होतांचि मागेंपुढें । अग्नि दुतोंडा दोहींकडे ।
अवलोकनाचिये[1] चाडे[2] । स्वामी[3] जाला षण्मुख[4] ॥ ६४ ॥
तिसी बोधूनि वर्मकळा । विरंची[1] पाठवी विंध्याचळा ।
जेथें असुरगणाचा पाळा । महानंदें[2] क्रीडत ॥ ६५ ॥
नृत्यांगनांचीं नर्तनें[1] । किन्नरींचीं[2] मधुर गायनें[3] ।
डोल[4] देती[5] आसवपानें[6] । अंकासनीं अंगना ॥ ६६ ॥
तेचि वनीं वारीजनेत्रा[1] । तिळोत्तमा शशांकवक्त्रा ।
रक्तवर्णा येकवस्त्रा । वेढूनि वेंची पुष्पातें ॥ ६७ ॥

---

६०. १ म्हणे नां; २ सत्वप्रतिमा औं.

६१. १ कण औं मुं; २-३ सजीव घडिलें नि; ४ म्हणोनि तिळोत्तमा नि.

६२. १ सुरंग पु·४ ख नां मुं; २ सुलक्षणीं नि; ३ आलें नि, वाटे औं पु.

६३. १ जया नि गो·२.

६४. १ °लोकनाचेनि नि औं, °लोकनाचे पु·४ नां मुं; २ पाडें नि; ३ स्कंद नि खवर्ग, (+) स्कंद गो·२; ४ सन्मुख पु४.

६५. १ विरिंची नि; २ परमानंदें नि.

६६. १ नर्तन खवर्ग; २ किन्नरांचीं नि, किन्नरांचे खवर्ग; ३ गायन खवर्ग; ४-५ डुलती औं; ६ असुर मद्यपानें औं, असुर पानें रा, अक्षय पानें गो·२.

६७. १ विलोलनेत्रा नि पु४ ख नां मुं, विशाळनेत्रा औं पु.

तीसि[1] अवलोकितां नयनीं । कामव्याधें विंधिलें बाणीं ।
देहस्मरणातें विसरूनि । भोगभूली भूलले ॥ ६८ ॥
मैथुनालागीं[1] उतावेळे । दोघे धाऊनि पातले जवळें ।
परस्परें ताऊनि[2] डोळे । भ्रूसंकेतें[3] वारिती[4] ॥ ६९ ॥
दक्षिणकरीं[1] धरिली सुंदें । वामहस्तकीं[2] उपसुंदें ।
दोघे कामाच्या उन्मादें । रमावया झोंबती ॥ ७० ॥
सुंद ह्मणे रे ज्येष्ठ पत्नी । तुवां मानावी मातृस्थानीं ।
कनिष्ठ[1] ह्मणे कंन्या[2] भगिनी । स्नुषा तुझी मम भार्या ॥ ७१ ॥
दोघे चढले अतिविषादा । वस्य[1] जाले निष्ठुर क्रोधा ।
पडताळूनि प्रचंड गदा । युध्यकंदना[2] मिसळले ॥ ७२ ॥
घे घे ह्मणोनि घालिती घावो । लक्षूनि भेदिती वर्मठावो ।
लोपला सुहृदतेचा[1] भावो । घेऊं पाहाती प्राणातें ॥ ७३ ॥
सुंदें[1] ताडितां हृदयकमळीं । उपसुंद[2] हाणे[3] कर्णमूळीं ।
मूर्छा[4] दाटोनि भूमंडळीं । दोघे प्राणा मूकले ॥ ७४ ॥
होतां प्रमदेचें दर्शन । व्यर्थ दोघे पावले मरण ।
जेवीं करिणीलागीं करीण[1] । युध्य[2] करिती[3] काननीं ॥ ७५ ॥

---

६८. १ **तीसीं** नि.

६९. १ **आलिंगना°** नि ; २ **जाऊनि** नि (स प्रसंप्रा) ; ३ **करसंकेतें** नि , **मुष्टिप्रहरें** औं पु ; ४ **ताडिती** खवर्ग.

७०. १ **करि दक्षणि** पु४ , **करीं दक्षणें** नां मुं ; २ **°हस्तीं** नि, **वामकरीं** औं पु.

७१. १ **येरू** नि ; २ **कन्या** नि ख मुं गो२ रा तं, (+) **रे** गो·२.

७२. १ **वश** नि ख , **वश्य** औं पु नां गो·२ ; २ **युद्धकंदना** नि औं पु मुं रा तं.

७३. १ **सुहृदपणाचा** नि, **सुहृदशब्दाचा** पु४ ख , **सुहृदशब्द** नां मुं.

७४. १ **संदें** औं पु ख नां धु ; २ **उपसंद** औं पु ख नां मुं धु गो·२ , **रायें** मुं ; ३ **हाणी** नि ; ४ **मूर्छना** नि औं पु.

७५. १ **किरण** पु·४ तं ; २ **युद्ध** नि औं पु मुं रा तं ; ३ **करितां** नि पु४ नां गो.

स्त्रिया आणि असुरमेळा । भयें पातला[१] पाताळा ।
ब्रह्मया आणि[२] सुरां सकळां । परमानंद तेकाळीं ॥ ७६ ॥
तिळोत्तमेसि[१] दीधला वर । सूर्यलोकीं[२] सुखविहार ।
करीं ह्मणे सुरेश्वर । अंगसेवा[३] तोषवीं ॥ ७७ ॥
ऐसा असे हो[१] स्त्रीलोभ । सुहृदांलागीं[२] विग्रहक्षोभ[३] ।
ह्मणोनि मर्यादेचा[४] स्तंभ । चळण कोण्ही[५] न[६] करावा[७] ॥ ७८ ॥
मास[१] दिवस[२] येका[३] घरीं[४] । नियमें[५] असो[६] हे[७] द्रुपदकुमरी[८] ।
त्यामाजी[९] चौघांच्या[१०] अंतरीं[११] । विकार[१२] कांहीं[१३] नुपजावा ॥७९॥
जयाच्या[१] दिवसांत गोरटी । येकांतीं असतां तया निकटीं ।
तेथें जो अवलोकील[२] दृष्टी । तो गुरुतल्पक[३] जाणावा ॥ ८० ॥
तेणें द्वादश वर्षें नृपा । अरण्यीं[१] आचरावें तपा[२] ।
नियम[३] भंगील[४] तो[५] मत्शापा[६] । पात्र[७] होईल निर्धारें ॥ ८१ ॥

---

७६. १ **प्रवेशला** गो·२ रा ; २ **आदि** नि. ही ओवी खवर्ग मध्यें नाहीं.

७७. १ **तिळोत्तमेसीं** नि ; २ **सर्वलोकीं** पु , **त्रैलोक्यांत** औं ; ३ **अंगसेवें** नि·

७८. १ **हा** नि पु·४ ख नां , **पैं** औं , (–) पु मुं ; २ **सुहृदालागीं** नि पु·४ ख नां ; ३ **गृहक्षोभ** औं पु ख नां , **ग्रहक्षोभ** पु४ नां ; ४ **मायादेवीचा** पु·४ ख नां मुं ; ५–७ **कोण्हा न करवे** खवर्ग.

७९. १ **दोन मास** नि ; २–४ **द्वादश दिन** नि , **दिवसांचा करी नेम** मुं ; ३–४ **करीं येक नेम** पु , **करावा नेम** औं , **येका करि नेम** पु४ ख नां ; ५–७ **असावा** नि , **असो हे** पु·४ , **असो हा** औं ख नां मुं ; ७ **दे** गो रा ; ८ **द्रौपदीचा काम** नि खवर्ग ; ९–११ **चौघां अंतरीं विरोधधर्म** नि खवर्ग ; १२–१३ **कदाकाळीं** नि खवर्ग ( **कदांकाहिं** पु४ ).

औं मध्यें पुढील दोन ओव्या जास्त आहेत:–

**पांचाजना द्वादशमास । प्रमाणे विभागी येकेकास ।**
**दोनि मास बारा दिवस । नारदें आपण नेमिले ॥ ७९ अ ॥**
**येनेंप्रमाणें नारदमुनी । पांडवांतें नियमस्थानीं ।**
**गोउनि स्वयें महामुनी । योगमार्गें विचरत ॥ ७९ आ ॥**

८०. १ **त्याच्या** खवर्ग गो·२ रा ; २ **अवलोकी** खवर्ग ; ३ **°तल्पग** नि.

८१. १ **वनीं** नि , **विजनी** औं ; २ **तपां** गो·२ रा ; ३ **नेम** नि खवर्ग गो रा ; ४–५ **भंगिल्या** नि खवर्ग ; ६ **महाशापा** औं पु , **महच्छापा** नि , **मम शापा** पु४ ख नां मुं ; ७ **प्राप्त** औं पु मुं

नारदवचनाचेनि पाशें । पांचही सिंह[1] बांधले[2] ऐसे ।
सद्गुरुवाक्य मनोल्हासें[3] । अंगिकारिलें पांडवीं ॥ ८२ ॥
अंगिकारोनि[1] पूजोपचारा[2] । आज्ञा[3] मागोनि[4] राजेश्वरा[5] ।
नारद[6] गेला[7] द्वारकापुरा[8] । यादववरा[9] भेटावया[10] ॥ ८३ ॥
यापरी[1] पूजिला[2] द्वैपायन । अर्पिलीं[3] रत्नें[4] धेनु[5] सुवर्ण[6] ।
तेणेंही[7] देऊनि[8] आशीर्वचन । जाता[9] जाला[10] स्वाश्रमा[11] ॥८४॥
यावरी कथा वर्तली कैसी । वैशंपायन गुणैकरासी ।
निरोपील[1] कुरुरायासी[2] । तेंचि[3] श्रोतीं परिसावें[4] ॥ ८५ ॥
लीलाविश्वंभर स्वामियां[1] । दत्तात्रया[2] जगदात्मया ।
मनोभावें वंदूनि[3] पायां[4] । मुक्तेश्वर अनुवादे[5] ॥ ८६ ॥

**इति श्रीभारते आदिपर्वणि षट्चत्वारिंशोऽध्यायः ॥**

---

८२. १ (–) नि पु·४ नां मुं, **पांडव** औं ; २ **बांधिले** नि रा ; ३ **मन-उल्हासें** नि. ख मध्यें ही ओवी नाहीं.

८३. १ **आज्ञा मागोनि** गो·२ ; २ °**चार** खवर्ग ; ३–५ **नारद गेला द्वारकापुरा** गो·२ ; ५ **सत्वरा** नि, **ऋषेश्वर** खवर्ग ; ६–८ **मार्ग क्रमूनि अपारा** गो·२ ; ७ **पावला** नि खवर्ग ; ८ **द्वारकापूर** पु४ ख नां मुं ; ९ **यादवेश्वरा** नि, **यादवराया** खवर्ग गो ; १० **सभेसी** औं पु, **भेटीसी** पु४ ख नां मुं, **भेटला** गो.

८४. १ **यावरी** नि खवर्ग ( औं प्रसंप्रा ) ; २ **पावला** नि ; ३ **अर्पिलें** पु·४ ख नां, **अर्पूनि** नि ; ४–५ **पूजा धन** नि, **पूजा** ख, **धेनु मुं** ; ५ **धनें** औं पु ; ६ **सुवर्णें** औं पु४ मुं धु गो रा, **सुवर्णधन** ख ; ७–८ **देऊनियां** नि ; ९–१० **तोही गेला** नि ; ११ **द्वारके** औं पु.

८५. १ **निवेदील** नि, **निरोपण करील** पु·४ ख नां मुं, **निरोपिलें** धु, **निरोपिला** तं ; २ **रायासी** पु·४ ख नां मुं, **जन्मेजयासी** औं, **सारांशी** धु, **गुणैकराशी** तं ; ३ **तेचि** नि पु४ ख मुं ; ४ **परिसावी** नि, **परिसवीं** ख.

८६. १ **स्वामिया** नि ; २ **दत्तात्रेय** नि औं पु ख मुं धु गो ; ३–४ **वंदोनियां** नि पु४ मुं ; ५ **कवि वदे** औं पु.

॥ श्री ॥

# अध्याय सत्तेचाळिसावा

## श्रीगणेशाय नमः

यावरी[1] काळ लोटल्यां[2] कांहीं । राष्ट्रीं येका ब्राह्मणगेहीं[3] ।
तस्करीं घाला घालूनि पाहीं[4] । सवत्स धेनू नेलिया[5] ॥ १ ॥

हृदय पिटित उभयहस्तीं[1] । ब्राह्मण पातला अर्जुनाप्रती ।
वीरांमाजी तूं पुरुषार्थी । ऐसें विश्वीं[2] बोलिजे[3] ॥ २ ॥

धांवणें करूनि लागवेगीं[1] । तस्कर दंडूनि[2] निजांगीं ।
गोधनें आणूनि मजलागीं । सुखी केलें पाहिजे ॥ ३ ॥

ऐकोनि लगबगां उठी[1] पार्थ । तवं धनुष्यबाण ठेविलें जेथ ।
ते चित्रशाळे[2] द्रौपदीसहित । धर्मराज पहुडला ॥ ४ ॥

ब्राह्मण आश्वासिला हातीं[1] । परी शस्त्रें घ्यावीं कवणे युक्ती[2] ।
नारदनियमाचिये[3] गुंती[4] । विचार कांहीं सुचेना[5] ॥ ५ ॥

*देखोनि[1] ब्राह्मणाची ग्लानी[2] । वीर न धरे[3] अन्तःकरणीं ।*
शस्त्रें[4] घेतां धर्महानी । तपश्चर्यें[5] निघावें ॥ ६ ॥

---

१. १ **जोवरि** औं; २ **लोटल्या** नि मुं गो तं, **लोटलीयांवरी** धु; ३ **ब्राह्मणाचे गेहीं** नि मुं, **ब्राह्मणगृहीं** औं; ४ **तीहि** ख; ५ **हरितल्या** नि, **गेलिया** तं.

२. १ **द्वयहस्तीं** खवर्ग; २ **विश्व** नि पु४ नां गो रा तं; ३ **बोलतें** नि.

३. १ **लगबगीं** नि, **लागवेगें** मुं गो; २ **दवडोनि** पु४ गो, **निवटुनि** गो२.

४. १ **उठे** नि नां मुं गो२; २ **चित्रशाळेंत** नि ( स प्रसंप्रा ).

५. १ **हस्तीं** नि नां; २ **युक्तीं** नि रा; ३ **नारदनेमाचे** नां; ३–४ **ऐसा चिंताग्रस्त चित्तीं** औं पु; ४ **निगुती** धु तं; ५ **दिसेना** गो२.

६. १ (–) नां; २ **ग्लांति देखोनि** नां; ३ **धरे** पु ख गो२ रा तं; नि४ **शस्त्र** ख गो२; ५ **तपश्चर्या** औं पु गो.

विशेष[1] विचारी नरेश[2] । परिहरूं[3] ब्राह्मणाचे[4] क्लेश ।
पुढां[5] घडेल[6] अरण्यवास । तोही सुखें घडतसो[7] ॥ ७ ॥
ह्मणूनि मंदिरीं[1] प्रवेशला । शस्त्रें घेऊनि सीघ्र आला ।
पाठीलागीं धावींनला[2] । तस्कराचे विप्रेसीं[3] ॥ ८ ॥
टिपोनि[1] तस्करांचें[2] वृंद[3] । शस्त्रीं[4] केला शिरछेद ।
गोधनें आणितां आनंद । अपार जाला द्विजातें ॥ ९ ॥
धेनु आणि[1] नेलीं[2] वित्तें । आणूनि[3] वोपिलीं[4] द्विजातें ।
स्तवनीं पुजूनि[5] पार्थातें । विप्र गेला स्वस्थाना[6] ॥ १० ॥
स्मरोनिया[1] निजनेमातें[2] । येऊनि वंदिलें धर्मातें[3] ।
ह्मणे आज्ञा देईं[4] मातें । तपश्चर्ये जावया ॥ ११ ॥
धर्म ह्मणे अगा अनुजा । तुवां रक्षिला स्वधर्म[1] माझा ।
नेम[2] चळला नाहीं तुझा । गमन न[3] करीं[4] सर्वथा ॥ १२ ॥
पार्थ ह्मणे न घडे ऐसें । असत्य[1] न सिवे मी[2] मानसें ।
आज्ञा देऊनि[3] संतोषें । तीर्थाटणा मज[4] धाडीं[5] ॥ १३ ॥

---

७. १ *विशेषार्थ* नि ; २ *नरवरेश* औं , *अमरेश* गो·२ ; ३ *आर्धी हरीं* नि , *॰हारूं* पु४ नां धु ; ४ *ब्राह्मणाचा* नि पु गो२ ; ५ *पुढें* नि पु४ मुं ; ६ घडलीयां धु , घडलेयां तं ; ७ घडो कां नि मुं.

८. १ चित्रशाळे नि ; २ धाविन्नला नि रा ; ३ ते काळीं नि , पाठिसी मुं , विप्रवेशी पु४.

९. १ पावोनि नि , आटोपूंनि औं पु , पिटोनि गो·२ ; २–३ तस्करवृंद औं ; ४ शस्त्रें नि खवर्ग गो·२.

१०. १ सहित औं ; २ आणूनि मुं ; ३–४ वोपिता जाला मुं ; ५ पूजनी मुं ; ६ स्वाश्रमा औं , स्वस्थळा मुं.

११. १–२ सारुनी नीजममतें ख ; २ निज नियमातें धु तं ; ३ धर्मराजातें नि औं पु·४ ख रा , धर्मरायातें गो·२ ; ४ देइजे नि.

१२. १ नीयेम धु ; २ नीयेम धु , नियम तं ; ३ (–) पु४ मुं ; ४ कीजे ख.

१३. १ असत्या नि पु ; २ (–) ख मुं तं ; ३ द्यावी मज नि , द्यावी जी औं नि , देइजे मुं , देइं पु४ नां ; ४–५ जावया नि मुं , धाडावें औं.

नेम[१] रक्षावया जाणा । करीन पृथ्वीप्रदक्षणा[२] ।<br>
द्वादशवर्षांवरी[३] दर्शना[४] । सीघ्र येईन स्वामियां[५] ॥ १४ ॥<br>
जाणोनि त्याचा अलोट नेम[१] । आज्ञा देऊनि पाठवी धर्म ।<br>
सर्वे चालिले द्विजोत्तम । तपोधन ऋषिवर्य[२] ॥ १५ ॥<br>
वेदपाठक[१] शास्त्रपंडित[२] । पुराणिक[३] विचारनिरत[४] ।<br>
ज्योतिर्विद अतिसमर्थ । पार्थासंगी[५] चालिले ॥ १६ ॥<br>
सवत्स तरुणा[१] धेनु[२] बहुती । रजत सुवर्ण रत्नजाती ।<br>
द्विजां द्यावया तीर्थांतीर्थी[३] । सर्वे[४] संपती घेतल्या ॥ १७ ॥<br>
करीत[१] तीर्थ[२] तपोवनें[३] । स्थळींस्थळीं[४] स्नानें दानें ।<br>
देऊनियां निर्मळ मनें[५] । गंगाद्वारा पातला[६] ॥ १८ ॥<br>
भेटले तीर्थींचे ब्राह्मण । सकळां जालें समाधान ।<br>
सारावया तीर्थस्नान[१] । गंगाजळीं रिघाला[२] ॥ १९ ॥<br>
स्नानसंध्यादि[१] ब्रह्मयज्ञ[२] । गंगाजीवनी[३] संपादून ।<br>
अग्निकार्यालागीं जाण । जवं[४] बाहेरी[५] निघावें[६] ॥ २० ॥

---

१४. १ **नियम** धु तं ; २ **पृथ्वीची प्रदक्षिणा** नि गो·२ ; ३–४ °**वर्षां नंतरें जाण** गो२ ; ५ **मी स्वामी** गो२.

१५. १ **नीयेम** धु तं ; २ °**वर्ण** ख.

१६. १ **वैदिक** औं, **वेदशास्त्र पाठक** ख, **वेदशास्त्रज्ञ** नां ; २ **शास्त्री पंडित** नि , **शास्त्र निरत** पु४ , **शास्त्रज्ञ पंडित** औं पु , **पंडित** ख नां; ३ **पौराणिक** नि धु तं ; ४ °**नियत** औं , **विचारवंत** पु४; ५ **पार्थसंगें** नि पु , **पार्थासंगें** औं मुं गो२.

१७. १ **तरुण** नि ; १–२ **धेनु तरुणा** औं पु४ ख मुं गो२ ; ३ **तीर्थाप्रती** औं ख , **तीर्थातीर्थि** पु४ धु गो२ रा ; ४ **संगे** ख.

१८. १ **अनेक** गो ; २ **तीर्थें** नि गो रा ; ३ **तपोद्मनें** धु , **तपोद्मेनें** तं ; ४ **स्थळोस्थळीं** नि औं पु·४; (+) **करित** गो२ ; ५ **पणें** औं; ६ **पातले** नि. हा ओवी मुं मध्यें नाही.

१९. १ **तीर्थविधान** नि ; २ **निघाला** नि नां मुं.

१०. १ **स्नान संध्या** नि ख गो ; २ **ब्राह्मणयज्ञ** तं ; ३ **गंगाजळीं** ख गो२ ; ४ **जळा** गो२ ; ५ **बाहेर** नि पु ख मुं ; ५–६ **यावें बाहेरी** धु ; ६ **यावें** तं , **रिघावें** औं पु·४ गो.

तवं ऐरावतनागकुळीं । कौरव्यनागराजबाळी[1] ।
उलूपी वसे[2] गंगाजळीं । शचीसमान वैभवें ॥ २१ ॥
तीणें धरूनि[1] धनुर्धरा । वोढूनि नेलें निजमंदिरा ।
शंका नाहीं पंडुकुमरा । अतिनिर्भय ते ठाईं ॥ २२ ॥
उलूपी ह्मणे नरेंद्रोत्तमा । मदनमोहन[1] तुझी[2] प्रतिमा[3] ।
अंगसंगें माझिया कामा । तृप्त केलें पाहिजे ॥ २३ ॥
पार्थ ह्मणे मी व्रतधारी । इंद्रियनेमें[1] तीर्थें करीं ।
बोलसी तें कवणेपरी । घडे[2] सांग[3] सुजाणे ॥ २४ ॥
पद्मिनी ह्मणे ऐक पार्था । संकटीं रक्षिसी[1] शरणांगता[2] ।
जीवदान देऊनि मृता । वांचविसी[3] प्रतापें[4] ॥ २५ ॥
तुझिया अंगसंगेंवीण[1] । तात्काळ जाईल माझा प्राण ।
मज रक्षिल्यां[2] तुझें पुण्य । वृद्धी पावेल[3] विशेषें ॥ २६ ॥
आर्ती वोपिल्या संतोष । नाहीं व्रतभंगाचा दोष ।
अंगीकारूनि मग[1] वीरेश[2] । रात्रीं तेथें वसीनला[3] ॥ २७ ॥
सुरतानंदें देऊनि तृप्ती । उलपीसंगें[1] क्रमूनि राती ।
उदया येतांचि[2] गभस्ती । गंगापारा[3] पातला[4] ॥ २८ ॥

---

२१. १ **कौरव नाग°** नि पु४ मुं धु गो·२, **कौरवगजराज°** औं पु, **कौरव्यराज नागबळि** नां; २ **कंन्यां** पु४, **वेशें** धु.

२२. १ **वोढुनी** ख.

२३. १ **मनमोहन** नि औं; २–३ **पुरुषोत्तमा** नि.

२४. १ **इंद्रियनियमें** औं मुं; २ **घडेल** नि; २–३ **सांग घडेल** धु; ३ **जाण** ख.

२५. १ **रक्षूनि** नि, **रक्षी** मुं; २ **शरणागता** नि औं; ३ **वांचविल्या** नि; ४ **जय असे** नि.

२६. १ **°संगाविण** पु४ मुं गो२; २ **रक्षिल्या** नि गो·२; ३ **होईल** खवर्ग.

२७. १–२ **नरविशेष** नि, **निर्विशेष** पु, **विशेष** औं धु, **नरवरेश** पु४ ख नां; ३ **वसिन्नले** नि, **राहिले** पु४.

२८. १ **उलुपिसवें** गो रा; २ **येतां** ख नां मुं; ३ **गंगाद्वारा** नि, **°पार** पु ख नां मुं, **गंगापुरा** गो·२; ४ **पातले** पु४.

पूजूनि ब्राह्मणां समस्तां । पातला हिमालयपर्वता ।
केदारबदरी[1] महापंथा । धर्मसीळें[2] वंदिलें ॥ २९ ॥
पुढां[1] टाकिला अगस्त्यवट[2] । वसिष्ठ पर्वत महाश्रेष्ठ ।
भृगुराज[3] तीर्थ प्रगट । सिद्धपुरुष देखिले[4] ॥ ३० ॥
गोसहस्र[1] बहुसुवर्णें । तेथें वांटिलीं कुरुनंदनें[2] ।
ब्राह्मण ऋषी संतोषमनें[3] । आशीर्वादें[4] गर्जती ॥ ३१ ॥
करूनि हिरण्यबिंदुतीर्थ[1] । प्राचीदिशे परतला[2] पार्थ ।
उत्पळिनी[3] नदी जेथ । अमृतोदकें[4] प्रवाहे ॥ ३२ ॥
प्रवेशोनि नैमिषारण्या । वंदिलें[1] तापसां तपोधना ।
जें जें आवडे जयाच्या[2] मना । तें तें तया[3] दीधलें ॥ ३३ ॥
नंदापरनंदा[1] कौशिकी । महानदी[2] पवित्रोदकीं ।
गया करूनि शिवमस्तकीं । वसे[3] ते[4] गंगा[5] वंदिली[6] ॥ ३४ ॥
अंगवंगकलिंगदेशीं । तीर्थें करूनि पुण्यरासी ।
चालिला[1] दक्षिणदिसेसी[2] । तवं महेंद्र[3] देखिला ॥ ३५ ॥

---

२९. १ °बद्री औं पु मुं नां गो रा, **केदारभद्री** गो२; २ **धर्मशाळे** पु४.

३०. १ **पुढें** नि पु·४ ख मुं; २ **अगस्तीवर** औं पु ख मुं, **अक्षयवर** गो; ३ **भृंगिराज** नि; ४ **देखिला** औं पु ख.

३१. १ **गोसहस्त्रें** ख गो·२ रा; २ **पांडुनंदनें** नि, **कुरुभूषणें** गो२; ३ **संतोषानें** नि, **संतुष्टमनें** नां धु; ४ **आशीर्वाद** नि तं.

३२. १ **हिरण्य बाहुतीर्थ** ख मुं; २ **परते** औं पु, **पातला** पु४ धु; ३ **उत्पोलणी** ख; ४ **अमृतोदकीं** नि पु४ गो२, **अमृतोदक** औं पु मुं तं.

३३. १ **वंदिले** नि औं पु४ नां मुं धु; २ **जया** पु ख नां मुं गो·२ रा; ३ **तयां** नि औं मुं गो.

३४. १ **निंदा परनींदा** पु४, **नंदापनंदा** गो२; २ (+) **नीमींलि** ख; ३–४ **वसते** नि औं नां गो तं; ५ **गंगे** नि पु४ धु; ६ **वंदिलें** नि धु.

३५. १ **मग चालिला** औं, **चाललासे** मुं; २ **दक्षण देशीं** मुं, **दक्षिणेसी** पु४; ३ **महेंद्राचळ** नि, **महेंद्रपर्वत** ख, **महींद्रगीरि** नां.

तो[1] महेंद्र[2] महापर्वत[3] । ऋषीं[4] सेविला[5] पुण्यवंत ।
पुढां निकट नदीनाथ । रत्नाकर देखिला ॥ ३६ ॥

पश्चिमसागरा[1] परिसरीं । मणिपूरनाम[2] नगरी ।
चित्रवाहन[3] राज्य करी । न्यायनीती[4] धार्मिक ॥ ३७ ॥

त्याची कंन्या[1] गुणलक्षणी । चित्रांगदा लावण्यखाणी ।
तीणें लक्षिला सिंधुजीवनीं । स्नान करितां अर्जुन ॥ ३८ ॥

देखतां व्यापिली[1] मन्मथें । विरहें[2] विसरली[3] देहभावातें ।
येऊनि सांगे निज[4] जनकातें । उतावीळ मानसें ॥ ३९ ॥

पातला[1] असे[2] दिव्य नरू[3] । तेजें जैसा भास्करू[4] ।
तो मज होय प्राणेश्वरू । ऐसें करीं दयाळा ॥ ४० ॥

आश्वासूनियां[1] कुमरीसी । राजा पातला पार्थापासीं[2] ।
नामगोत्र परिसतां त्यासी[3] । परमानंद न संटे[4] ॥ ४१ ॥

---

३६. १ **तया** औं, **तवं** तो गो२ ; १–३ **विशाळ तो महेंद्रपर्वतु** नां ; २ **महेंद्रनामा** नि ; ३ **पर्वत** नि खवर्ग ( **पर्वतीं** औं ) गो२ ; ४ **ऋषींनीं** नि ; ५ **वसविला** नि. ही ओवी मुं मध्यें नाहीं.

औं मध्यें पुढील दोन ओव्या अधिक आहेतः—

**ते चित्रांगदा लावण्यखाणी । स्नाना पातली असतां नयनीं ।**
**अर्जुन विलोकितां नयनी । देहभावी तटस्त ॥ ३६ अ ॥**
**ह्मणे हा लावण्याचा गाभा । किं रत्नाकराची दिव्य प्रभा ।**
**मूर्ती वोतली स्वयंभा । देखतां नयनां आनंद ॥ ३६ आ ॥**

३७. १ **°सागरींचे** नि ; २ **रमणिकनाम** गो२ ; ३ **तेथें चित्र°** मुं, **विचित्र°** गो ; ४ **°नीतीनें** नि , **धर्मनीति** औं पु , **नेमनीति** मुं.

३८. १ **कन्या** नि ख मुं रा तं.

३९. १ **व्यापिलें** औं पु मुं ; २ ( – ) नि खवर्ग ; ३ **व्यापिलें** गो२ . ( + ) **निज** नि ; ४ ( – ) नि औं नां.

४०. १–२ **पातलासे** नि औं ख गो२ ; ३ **नरवरू** पु ; ४ **प्रभाकरू** नि औं ख नां मुं रा तं , **दिवाकर** पु४.

४१. १ **आश्वासूनि त्या** नि , **अस्वासुनि** औं ख नां ; २ **आर्जुनासि** पु४ ; ३ **त्यासीं** नि रा , **तयासी** धु तं ; ४ **संडे** नि ( **संठे** स ).

मनोगत सांगे नरेश्वर । पूर्वज आमुचा प्रभाकर[1] ।
तेणें आराधिला हर[2] । संततिवृद्धीकारणें ॥ ४२ ॥
नेमूनि[1] बोलिला[2] धूर्जटी[3] । येकचि[4] पुत्र येका पोटीं ।
जन्मेल[5] हे यथार्थ गोष्टी । आन[6] नोहे सर्वथा[7] ॥ ४३ ॥
माझा[1] पितापर्यंत[2] वंशीं । पुत्र जाले[3] कुळस्त्रियांसी[4] ।
कंन्या जन्मली[5] माझे कुशी । चित्रांगदा हे[6] जाण पां[7] ॥ ४४ ॥
मनीं[1] आवडी असे[2] थोर । ईच्या पोटीं जन्मेल कुमर ।
त्यासि वोपूनि राज्यभार[3] । तपश्चर्ये[4] म्यां जाणें[5] ॥ ४५ ॥
तरी हे अंगिकारूनि जाया[1] । पुत्रोत्पादन[2] करीं राया[3] ।
हें[4] परिसोनि धनंजया । पंचबाणें[5] मोहिलें[6] ॥ ४६ ॥
यावरी[1] पाणिग्रहणविधी । संपादिली लग्नसिद्धी ।
आंदणरूपें[2] नवनिधी[3] । सिंधु[4] वोपी[5] लक्ष्मीतें[6] ॥ ४७ ॥

---

४२. १ **प्रभंजन वर** नि ( स प्रसंप्रा ), **अभंकर** रा ; २ **श्रीहर** नि धु नां.

४३. १ **नमोनि** पु४ , **नीयेमुनी** धु , **नियमुनी** तं ; २ **वोपिला** पु४; ३ **धूर्जटी** नि मुं तं, **धुर्जठी** औं पु४ नां धु ; ४ **येक** औं , तुं **येकची** ख ; ५ **जन्मले** धु ; ६ **अन्यथा** नि ; ७ **विचारितां** नि.

४४. १ **माझिया** नि औं नां ; २ **पितयापर्यंत** नि औं ; ३ **जन्मले** मुं ; ४ **कुलस्त्रियेसीं** नि ; ५ **जन्मेल** पु४ , **जाली** धु ; ६ ( – ) नि ख ; ७ ( – ) मुं धु गो रा तं.

४५. १ **माझिये मनीं** नि ; २ (–) नि ; ३ **राजभार** गो२; ४ **तपश्चर्या** औं गो तं ; ५ **जात्रें** नि पु४ ख नां मुं

औं मध्यें खालील ओवी अधिक आहे :–

**तरी वचना मान दीजे राया । मीं सांगेन तया कार्या ॥**
**अवश्य माझिया मनोदया । तोषविलें पाहिजे ॥ ४५ अ ॥**

४६. १ **जया** पु४ ; २ **पुत्र उत्पन्न** नि , **पुत्रोत्पटन** गो ; ३ **जाया** ख ; ४ **हेंहि** गो२ ; ५ **वचनबाणें** गो२ ; ६ **विंधिलें** नि.

४७. १ **त्यावरी** औं , **यापरी** गो २ ; २ **आनंदरूपें** औं पु , ( + ) **त्या** नि औं पु४ ख नां गो२ रा तं ; ३ **नरत्रिधी** पु धु ; ४ **जेंवि सिंधु** नि ; ५–६ **जेंवि रमेतें** धु.

वर्षत्रय[१] क्रमूनि तेथें । रायाप्रति बोलिजे[२] पार्थें ।
समुद्रतीरीं[३] उरलीं[४] तीर्थें । करूनि पुढतीं[५] येतसें[६] ॥ ४८ ॥
समुद्रतीरीं पंच कासार । माजी[१] जळचरी[२] महाक्रूर ।
स्नान करितां नारीनर । वोढूनियां ग्रासिती[३] ॥ ४९ ॥
अगस्त्य[१] सौभद्र[२] पौलोम[३] । भारद्वाज करंधम[४] ।
पांचही तीर्थें पवित्र[५] परम[६] । परी तीं[७] जनीं वर्जिलीं ॥ ५० ॥
भयें न[१] करिती[२] कोण्ही[३] स्नान । तेथें[४] पातला[५] कुरुनंदन ।
लोकीं वारितां[६] आपण । तीर्थोदकीं[७] रिघाला[८] ॥ ५१ ॥
स्नान करूनि[१] यावें[२] बाहेरी । तवं[३] पायां[४] झोबींनली[५] जळचरी[६] ।
उचलोनियां[७] दोहीं करीं । बळें थडिये[८] टाकिली[९] ॥ ५२ ॥
चिरूं[१] पाहे[२] जवं[३] सत्वरा । तवं[४] ते[५] जाली दिव्य[६] अप्सरा[७] ।
ह्मणे पवित्रा पंडुकुमरा । दंडवत घे माझें ॥ ५३ ॥

---

४८. १ **वर्ष एक** नि मुं, **वर्ष** पु४; २ **पुशिलें** नि, **बोलें** गो२; ३ **°तीरींचीं** नि, **समुद्र उत्तरी** मुं, **समुद्रातिरि** रा; ४ **उत्तर** नि; ५ **मागुती** नि; ६ **येतसे** नि.

४९. १ **त्यामाजि** गो२; २ **°चरें** नि मुं, **°चर** औं ख गो२; ३ **नासिति** पु४.

५०. १ **मग त्या** औं पु; २ **सौरभ** औं पु, **शोभणे** पु४, **सौम** ख, **सौभ्य** नां, **सौभ** मुं; ३ **पुलोम** औं पु, **लोमा** पु४; ४ **कारंधम** नि, **करें धर्मे** धु, **पुष्करधर्म** स; ५–६ **पवित्रोपमा** औं, **पवीत्रें परमा** पु४, **परम पवित्र** ख; ७ **ते** औं नां मुं धु गो.

५१. १–३ **कोणीं न करिती** नि पु४, **कोण्ही न करी** औं पु ख नां; ४ **तेथ** औं ख गो.२ रा; ५ **पावला** नां गो२; ६ **वारितांही** नि, **न करितां** पु४; ७ **तिर्थोंदका** पु४; ८ **प्रवेशे** औं, **निघाला** पु ख नां मुं गो२ रा.

५२. १ **सारुनी** औं पु ख नां, **सारोनि** गो.२ रा; २ **येतां** नि, (–) औं मुं गो, **ये** पु४ गो२ रा; ३ **तों** नि, (–) औं; ४ **पायीं** औं, (–) मुं; ५ **झोंबली** नि ख नां गो२; ६ **°चरीं** औं पु४ मुं रा; ७ **अर्जुनें उचलोनि** नि पु; ८ **कडीये** पु४, **धडीये** तं; ९ **काढिली** गो२ रा.

५३. १ **फिरोनि** नि, **त्रिरोनि** पु४; २ **धावे** पु४; ३ **तवं** औं पु मुं धु; ४ **तों** नि; ५ (–) धु गो.२; ६ (–) मुं; ६–७ **दिव्याप्सरा** औं पु धु रा.

आह्मीं पंचाप्सरा[1] नारी । कुबेराचिया अनुचरी[2] ।
तारुण्यऐश्वर्यमदभारीं[3] । शक्रलोकीं[4] विचरतां ॥ ५४ ॥
तेथें ऋषी तपोधना[1] । उपहासोनि केली[2] छळणा[3] ।
तो[4] बोलिला[5] शापवचना[6] । तेंही[7] ऐक सांगेन ॥ ५५ ॥
पांचै[1] होऊनि[2] जळचरी । मृत्युलोकीं जळकासारीं[3] ।
वास[4] करा[5] समुद्रतीरीं । दीर्घकाळ या दोषें ॥ ५६ ॥
पुढां[1] ईश्वराचा अंश[2] । भाग्यें[3] येईल पुण्यपुरुष[4] ।
त्याचा होतां हस्तस्पर्श[5] । उद्धरण[6] तुह्मांतें ॥ ५७ ॥
तैसेंचि[1] नारदमुनीश्वरें[2] । वस्तीसि दाविलीं[3] पंचकासारें[4] ।
अर्जुन आलियां[5] काळांतरें[6] । उद्धरील तुह्मांतें ॥ ५८ ॥
तो[1] तूं[2] आजि पातलासि[3] येथें । नाहीं मर्यादा पुण्यातें ।
आतां जोडिलेनि[4] हातें । प्रार्थीतसें[5] अवधारीं ॥ ५९ ॥

---

५४. १ **पांच अप्सरा** नि पु·४ नां मुं गो२ ; २ **अंतुरीं** मुं ; ३ **तारुण्यमदें ऐश्वर्यभारीं** नि ख , °**मदें थोरी** पु , °**मदें भारी** औं पु४ नां मुं धु , °**मदें भरी** गो , °**मदभरीं** रा तं ; ४ **शंखरलोकीं** तं.

५५. १ °**धन** नि ख गो२ ; २–३ **केलें छळण** नि ; ४–६ **ते बोलिले शापदान** नि ; ७ **तोही** ख नां मुं.

५६. १–२ **स्वर्गींहूनि** नि , **पाणी होउनि** पु , **पानडी होउनि** औं , **पात्रा होउनी** ख , **पात्रीं होउनि** नां , **पात्रें होवोनि** मुं ; ३ **पंचका**° औं पु·४ नां मुं गो·२ रा , **जळचरी** ख ; ४ **वास्तव्य** नि ; ५ **कराल** नि , **करावया** पु , **करावा** औं ख नां मुं गो२.

५७. १ **पुढें** नि खवर्ग , **तेथें पुढें** नां, **तेथ** गो२ ; २ **अंशू** नि खवर्ग ; ३ **भाग्य** पु४ तं ; ४ °**पुरुषू** नि खवर्ग ; ५ °**स्पर्शू** नि खवर्ग ( **हातस्पर्शें** पु४ ); ६ **तैं उद्धरण** नि , **उद्धरणें** पु४ नां मुं.

५८. १ **ऐसीं** नि , **तेविंची** औं , **तैसाची** पु४ ; २ °**मुनेश्वरें** औं पु·४ नां धु गो रा ; ३ **दाविलें** धु , **दाखविलीं** नां ; ४ **पंच सरें** नि ; ५ **आलिया** नि ख रा , **आलेया** गो ; ६ **काळांतर** पु४ , **काळांतरीं** गो.

ही ओवी मुं गो२ मध्यें नाहीं.

५९. १ (–) गो·२ , **ते** ख; २ (–) रा तं ; ३ **पातला** औं, **पावलीसि** मुं ; ४ **जोडल्यानि** नि ; ५ **प्राथिंत असे** पु४ नां.

आणीक माझ्या सांगातिणी । चत्वारी[1] तीर्थी[2] चौघीजणी[3] ।
त्यांतें स्पर्शोनियां पाणी । दिव्यदेही[4] कराव्या[5] ॥ ६० ॥

पापदेहीं करूनि वास । मुखें[1] भक्षिले बहु[2] तापस[3] ।
आजि होतां[4] तुझा[5] स्पर्श[6] । पापकर्मा[7] मूकलों ॥ ६१ ॥

तिची ऐकोनि विनवणी[1] । याचिपरी[2] चौघीजणी ।
उद्धरूनि स्वर्गभुवनीं[3] । वसत्या[4] केल्या[5] पवित्रें[6] ॥ ६२ ॥

नंदा[1] सौरभेई[2] वनिता । समीची आणि बुद्बुदा[3] लता[4] ।
जात्या जाल्या स्वर्गपंथा । वंदूनियां पार्थातें ॥ ६३ ॥

पुढती पातला मणिपुरा । चित्रांगदा[1] गरोदरा[2] ।
बत्तीसलक्षणी राजकुमरा । बभ्रुवाहना[3] प्रसवली ॥ ६४ ॥

तोही पुत्रोत्साह[1] देखिला । रायें कनकाचळ वांटिला ।
रूपें बळें अवभासला[2] । जेवीं नवा[3] अर्जुन ॥ ६५ ॥

---

६०. १–२ **चत्वार्थी** ख; ३ **पापीणी** ख; ४ **देह दिव्य** मुं, **पापकर्मा** गो॰२; ५ **करावें** मुं, **मुकवीं** गो॰२.

६१. १ **सुखें** ख मुं; २–३ **बहुत अविष** पु; ३ **तापसें** तं; ४ **हाति** पु॰४, **तुझी** ख; ५ **न** ख; ६ **हस्तस्पर्श** नि, **हातस्पर्श** औं ख; ७ **पापदेहा** औं. ही ओवी गो॰२ मध्यें नाहीं.

६२. १ **वीनीतवाणी** पु४; २ **करें स्पर्शिल्या** नि, **त्याचि॰** औं ख मुं गो२; ३ **तेची क्षीणि** पु४, **ततक्षणी** ख नां, **जीवनीं** मुं; ४–६ **स्वर्गभुवनें वरूत्या केला** पु४, **स्वर्गभुवनि वसत्या केल्या** ख, **स्वर्गभुवनि वसविल्या** नां, **स्वर्गभुवनी त्या गेल्या** मुं; ६ **संतोषें** नि, **अर्जुनें** औं पु.

६३. १ **तदां** नि (स प्रसंप्रा), **मंदा** खवर्ग; २ **सौरभद्र** औं, **सौरभेये** पु४, **सौरभाया** नां; ३–४ **बुधि लता** पु४, **धुवृदा लता** स, **द्रळता** पु.

६४. १ **तंव चित्रां॰** नि; २ **राजेश्वरा** धु; ३ **बळिष्ठवाहान** गो२.

६५. १ **पुत्रोत्सव** मुं रा तं; २ **आभासला** नि औं पु धु, **भावभासला** गो॰२; ३ **अपर** नां.

अश्वमेधपर्वाआंत । ज्याचें युद्ध अत्यद्भुत ।
रणीं मारिले समस्त । ते[1] मग[2] कृष्णें[3] उठविले ॥ ६६ ॥
चित्रवाहनें[1] नृपनाथें । पुढां[2] राज्य वोपिलें त्यातें ।
असो पुसोनि राजयातें[3] । पार्थ[4] पुढें[5] चालिला ॥ ६७ ॥
वंदूनि गोकर्ण पवित्र । वोलांडिलें[1] हरिहरक्षेत्र[2] ।
महाबळेश[3] भाळनेत्र[4] । दाल्भेश्वर[5] वंदिला ॥ ६८ ॥
च्यवनऋषीचा आश्रम । अवलोकूनि[1] पवित्र परम ।
स्थळोस्थळीं[2] दानधर्म । करीत चाले ब्राह्मणा ॥ ६९ ॥
तपती[1] नर्मदेचे[2] लोट[3] । समुद्रीं[4] जाले[5] येकवट[6] ।
ते[7] ते[8] क्षेत्रीं परम श्रेष्ठ । ऋषेश्वर पूजिले ॥ ७० ॥
पश्चिमसमुद्रींचीं[1] तीर्थें । अवघीं अवलोकूनि पार्थें[2] ।
मग पातला प्रभासेतें[3] । तेथें सोमेश[4] वंदिला[5] ॥ ७१ ॥

---

६६. १–२ **मग ते** गो२ ; २ **पुढती** नि, (–) धु, **कृष्ण** – मुं ; ३ **श्रीकृष्णें** धु, **कृपे** मुं. ही ओवी पु४ मध्यें नाहीं.

६७. १ **विचित्र°** स खवर्ग ( नां प्रसंप्रा ); २ **पुढें** पु४ ख मुं ; ३ **राज्यातें** पु ख, **रायातें** पु४, **राजातें** नां ; ४–५ **पुढें पार्थ** नां ; ५ **पुढारीं** नि.

६८. १ **वोलंडूनि** नि खवर्ग ( **लोटुनि** मुं ), **वोलांडिला** रा; २ **हरीहर** पु, **कुरुक्षेत्र** मुं ; ३ **महाबळेश्वर** नि आँ पु४ ख मुं, **क्षेत्र महाबळेश्वर** पु, **माभळेश्वर** नां, **महांबळ** गो ; ४ **संभाळ°** गो ; ५ **दालभ्येश्वर** नि मुं धु **दुर्लभेश्वर** आँ पु, **दुर्लभ्यश्वर** पु४ नां.

६९. १ **विलोकुनि** आँ मुं; २ **स्छळींस्छळीं** पु ख नां गो रा.

७०. १ **तापती** नि मुं धु ; २ **नर्मदेचा** पु ख ; ३ **पाट** आँ, **तिरलोट** गो२ ; ४ **समुद्र** पु४ ; ५ **जाला** आँ, **जालें** गो रा; ६ **येकवाट** पु धु रा ; ७–८ **तेथें** मुं, **तेथ** गो२.

७१. १ **पश्चम°** पु४ ख नां मुं धु ; २ **प्राथें** ख ; ३ **प्रभासातें** नि धु गो, **प्रभातें** पु४ ; ४ **लोमेश** ख, **सोमेशें** पु४ ; ५ **वंदिलें** पु४.

तीर्थें करीत पातला पार्थ । हें परिसोनि कृष्णनाथ[1] ।
रथारूढ[2] दारुकेंसहित[3] । भेटीलागीं पातला ।। ७२ ।।
क्षेमालिंगनीं[1] अद्वयानंद[2] । तो केवीं बोलों शके वेद[3] ।
नरनारायणा[4] भेद । विचारितां असेना ।। ७३ ।।
तीर्थयात्रेसि[1] कारण । अर्जुनें[2] सांगतां[3] जनार्दन ।
पाहिजे ऐसेंचि ह्मणोन । भला भला ह्मणतसे[4] ।। ७४ ।।
प्रभासक्षेत्रीं क्रमूनि रात्री[1] । उदया आलियां[2] गभस्ती ।
पंडुकुमर परम प्रीती । द्वारावतिये आणिला ।। ७५ ।।
सकळ[1] पुरांचा[2] शृंगार । द्वारावती वैकुंठपुर ।
तेंही[3] शृंगारी श्रीधर[4] । पार्थ आला[5] ह्मणउनी[6] ।। ७६ ।।
यादव पातले सामोरे[1] । वाजती[2] भेरी मंगळतुरें ।
माडियागोपुरीं नारीनरें[3] । पाहों ठेलीं[4] आवडी ।। ७७ ।।
पाहोनि[1] सुधर्म[2] सभास्थान । नमिले[3] वसुदेव उग्रसेन ।
सात्यकी[4] सांब संकर्षण । प्रद्युम्नादि भेटले[5] ।। ७८ ।।

---

७२. १ **श्रीकृष्ण**° नि धु गो२ ; २ **महावीर** औं, **रथालागी** ख ; ३ **दारुकासहीत** नि , **द्वारके आंत** पु , **भद्रजात** औं , **द्वारकेसहित** पु४ , **रुढ द्वारकासहित** ख , **द्वारकाधीश** मुं , **माधवसहित** गो.

७३. १ **क्षमाळिंगने** औं, **क्षमआळींगणीं** नां, **क्षेमानंद** मुं, **क्षमाळिंगण** गो२ , **क्षमालिंगनि** रा ; २ **परमानंद** पु४ ; ३ **शब्द** नि ; ४ °**नारायणां** नि ( स प्रसंप्रा ), (+) **तेथ** औं. ही ओवी गो मध्यें नाहीं.

७४. १ °**यात्रेचें** नि, (+) **काय** नां ; २ **अर्जुन** पु ख मुं धु गो२ तं , **अर्जुना** नां ; ३ **पुसतां** नां ; ४ **म्हणे त्या** नि.

७५. १ **राती** पु४ नां मुं धु रा तं, **पाती** औं; २ **पावलिया** नि, **येतां** पु४.

७६. १–२ **सकळां रायांचा** मुं ; ३ **तेही** नि पु गो२ , **तोहि** पु४ मुं ; ४ **श्रीवरु** औं मुं ; ५ **आपला** पु मुं ; ६ **ह्मणोनियां** औं.

७७. १ **सामोरें** नि ख गो२ रा ; २ **वाजतो** नि ; ३ **नारियाकुमरें** औं ; ४ **ठेले** नि. नि मध्यें ७६ व ७७ ओव्यांची अदलाबदल आहे.

७८. १ **पावोनि** धु गो रा तं ; २ **सुंदर** ख , **स्वधर्म** धु गो ; ३ **मिनले** पु४ ; ४ **सात्वीकी** औं पु , **सात्य** गो२ ; ५ **वंदिले** औं पु.

भोजनपानादि[1] उपचार[2] प्रीती[3] । श्रीकृष्ण[4] करी येकपंक्ती ।
ऐसा काळ सुखसंगती[5] । कांहीं तेथें[6] लोटला ॥ ७९ ॥
येके[1] दिवसीं यादववीर । येकेयेके[2] लहानथोर ।
रेवतपर्वता[3] समग्र[4] । वनभोजना चालिले ॥ ८० ॥
सर्वें घेतलीं दाराकुमरें । पालाणिलीं[1] रथकुंजरें ।
अनंतवाद्यांचेनि[2] गजरें । समारंभें चालिले ॥ ८१ ॥
वसुदेवाचिया पत्नी । उग्रसेनाचिया मानिनी ।
कामपाळाचिया[1] कामिनी । भिन्नयानीं शोभल्या ॥ ८२ ॥
सोळासहस्र कृष्णपत्नी । पट्टमहिषी[1] आठजणी ।
दासीवेष्टित सुखासनीं[2] । शृंगारूनि[3] चालिल्या ॥ ८३ ॥
येकलक्ष साटी सहस्र । कुंजरयानी कृष्णकुमर ।
अर्जुनेंसी[1] गदाधर[2] । येकेरथीं मिरवले ॥ ८४ ॥
छपन्नकोटी यादववीर । पृथक्[1] संपतीचे[2] सागर ।
रूपगुणीं उदार शूर । कृष्णापाठीं निघाले[3] ॥ ८५ ॥
गगनीं तारकांचिया[1] श्रेणी । तैशा यादवांच्या पत्नी[2] ।
त्यांमाजी[3] सौंदर्याची[4] खाणी । सुलक्षणी[5] सुभद्रा ॥ ८६ ॥

---

७९. १ °पान औं ; २–३ उपचारीति धु ; ३ रिती औं ; ४ कृष्ण औं ; ५ सुसंगतिं गो२ ; ६ एक नि औं.

८०. १ तंव एके नि ; २ एक एक नि , येक येक औं पु नां मुं तं , येकेक ख ; ३ रैवत° नि , स्वेत पर्वता ख , रे वाचाळ पर्वता मुं ; ४ सर्व मुं.

८१. १ पाल्हाणिलीं गो॰२ ; २ आनंदवाद्यांचेनि नि.
ही ओवी खवर्गामध्यें नाहीं.

८२. १ कामफळांच्या गो२.

८३. १ पटमाहेसी धु ; २ सोकासनी औं ; ३ शृंगारेसीं औं.
ही ओवी मुंमध्यें नाहीं. धु तं मध्यें ८३ व ८४ या ओव्यांची अदलावदल आहे.

८४. १–२ अर्जुनासीं शार्ङ्गधर नि.

८५. १ प्रथुक ख गो ; २ संपत्तीचे नि पु धु ; ३ धाविन्नले गो॰२.

८६. १ तारकांच्या नां मुं गो , तारकाची तं ; २ कामिनी नि ; ३–४ सौंदर्याच्या परम मुं ; ५–माजी सुलक्षणी मुं , सुलक्षणिक पु४.

वसुदेवाची[1] नंदिनी । श्रीकृष्णाची[2] सखी[3] बहिणी[4] ।
तीचें[5] लावण्य नरवाणी[6] । केवीं वर्णीं[7] सांग पां ॥ ८७ ॥
सौंदर्याची राशी अमुप[1] । सरस्वतीचें[2] वदनमाप ।
थिटें[3] ह्मणोनि टांकी[4] बाप[5] । सत्यलोका[6] वरौतें[7] ॥ ८८ ॥
शृंगारूनि रत्नाभरणीं[1] । सुवर्णशिबिके मृगलोचनी[2] ।
जातां[3] झळके सौदामिनी । तेवीं पार्थें देखिली[4] ॥ ८९ ॥
वदन लक्षितांची नयनीं । प्रतिमा[1] जडली[2] हृदयभुवनीं[3] ।
वर्मकळे[4] पंचबाणीं । कुसुमशरें ताडिला[5] ॥ ९० ॥
सर्पदर्शनीं[1] अजा[2] स्तब्ध । तैसा देहभावीं मंद[3] ।
हें[4] देखोनि[5] त्या[6] गोविंद[7] । उपहासीत[8] विनोदें ॥ ९१ ॥
वरिवरी तापसाचा[1] वेश । तीर्थयात्रेचा अतिसोस[2] ।
हृदईं कामाचा निवास । हा परमार्थ नेटका ॥ ९२ ॥

---

८७. १ **ते वसु°** नि ; २ **कृष्णाची** पु ; ३-४ **कनिष्ठ भगिनी** नि, **स्वकिय भगीनि** गो२ ; ५ **ते** औं ; ६ **रत्नखाणी** औं, **वदन वाणि** नां ; ७ **वर्णवे** नि औं ख मुं धु , **वर्णे** पु४ नां.

८८. १ **उमप** खवर्ग ( मुं प्रसंप्रा ) ; २ **सरस्पतीचें** गो२ ; ३ **थिटें** गो२, **थिठें** नि ; ४ **सांडी** नि खवर्ग ; ५ **आपेंआप** नि ; ६ **सप्तम** पु , **सप्त-समुद्रा** औं , **सतमापा** पु४ ; ७ **परौतें** नि, **उरउतें** ख , **वरउतें** गो.
ही ओवी रा मध्यें नाहीं.

८९. १ **वस्त्राभरणीं** नि गो ; २ **सुवर्णलोचनी** गो ; ३ **तेजें** मुं ; ४ **देखीलें** पु४.

९०. १ **प्रिती** गो२ ; २ **बाणली** गो , **माडिली** गो२ ; ३ **हृदय-भवनीं** नि ( स प्रसंप्रा ) , **हृद्भुवनी** औं ; ४ **वर्मी भेदलें** नि ; ५ **ताडिले** औं पु गो. ही ओवी मुंमध्यें नाहीं.

९१. १ **°दशनी** पु, **°दर्शनें** औं पु४ मुं गो२; २ **अज** नि , **आजा** पु४ ख धु , **अजात** तं ; ३ **मद** नि औं ; ४ **त्यातें** नि , (–) औं ; ५-६ **देखोनियां** नि गो ; ६ (–) मुं पु४ ख ; ७ **श्रीगोविंद** औं ; ८ **उपहासी** पु.

९२. १ **तापसाचे** औं ; २ **हव्यास** नि , **सौरस** मुं.

अर्जुन ह्मणे गा[१] हृदयस्था । जेणें परिहारें[२] हृदयवेथा[३] ।
मनोवृत्ती होती स्वस्था[४] । तो उपावो[५] मज सांगें[६] ॥ ९३ ॥
वर्म सांगे भक्तपती । रेवतकींहूनि[१] फिरती ।
सुभद्रा वाऊनियां[२] रथीं । हरण तुवां करावें[३] ॥ ९४ ॥
मागां पडेल जो प्रसंग । तो मी संपादीन श्रीरंग ।
यादवीं[१] करितां पाठिलाग । निवारीन[२] तयांतें ॥ ९५ ॥
अर्जुन ह्मणे गा[१] श्रीपती । तुझी कृपावरभगवती[२] ।
प्रसन्न असतां यादव[३] किती । मजसमोर[४] राहावया[५] ॥ ९६ ॥
अर्जुना बोधिली[१] हे[२] युक्ती[३] । पुढां[४] रेवतकपर्वतीं[५] ।
मिळोनि यादवांच्या पंक्ती । महोत्साह[६] मांडिला ॥ ९७ ॥

---

९३. १ रे धु; २ परिहरे औं पु ख मुं गो रा; ३ हृदयव्यथा नि, विरहावस्था गो·२, हृदयावस्था तं; ४ स्वस्थता औं; ५ उपाय नि औं मुं; ६ सांग नां औं मुं रा तं, सांगा पु.

९४. १ रैवतपर्वताहूनि जैं नि, रेवताचळाहुनि औं, रेवताहुनि मुं, रेवतकीं होउनी तं; २ वाहोनियां नि पु४; ३ करावि गो२.

९५. १ यादवां औं पु ख मुं, यादव पु४; २ मी वारीन नि, मीं निवारिन औं.

९६. १ (–) औं; २ °वरें भगवती पु, °कृपाश्री भगवती औं, °कृपा भगवती ख, °वरद भगवती मुं गो·२, °वरद्भक्ती तं; ३ यादवें औं पु गो रा तं; ४ मज सन्मुख पु४; ५ यावया औं मुं.

औंमध्यें खालील ओव्या अधिक आहेत :–

निरोपिसि मातें हरी । तरि कौतुक पाहें राहुनि दुरी ॥
रणनदीचा पैलपारी । नौका होउनि राहें पां ॥ ९६ अ ॥
ऐसें परस्परें प्रिती । बोलतां म्हणे श्रीपती ॥
आतां जाउनि रेवताप्रती । फिरता संधी साधीं पां ॥ ९६ आ ॥

९७. १ बोधोनियां नि, बोधिला औं, बोधलीये पु ४, बोधि ख; २ (–) नि औं पु४; ३ कृष्णोक्ती औं; ४ पुढें ख मुं गो; ५ रैवतपर्वताप्रती नि, रेवतपर्वतीं पु ख नां धु, रेवता पर्वतीं औं, रेंवतकी पर्वतिं पु४, रेवताचळ पर्वतीं मुं; ६ महोत्सव नि.

करिती दिव्यान्नभोजनें[1] । विचित्र[2] पिशितें[3] आसवपानें[4] ।
सुगंधसुमनें हरिचंदनें । परस्परें[5] चर्चिती ॥ ९८ ॥
नृत्यांगना नृत्य करिती । रागोद्धारीं[1] गायन[2] गाती[3] ।
ताळ मृदांग[4] उपांगश्रुती[5] । वीणे वाती[6] सुस्वरें ॥ ९९ ॥
पायसान्नें पंचभक्षीं । ब्राह्मणीं[1] भक्षितां[2] लक्षानुलक्षीं ।
तृप्ती पावोनि वृक्षोवृक्षीं । शय्यासनीं[3] लोळती[4] ॥ १०० ॥
कांहीं दिवस क्रमूनि तेथ । द्वारके चालिले[1] समस्त ।
संधी लक्षूनियां तेथ[2] । वेग[3] केला अर्जुनें ॥ १०१ ॥
करूनि[1] पर्वताची पूजा । द्वारके येतां अच्युतअनुजा[2] ।
अर्जुनें[3] धांवोनि सुतेजा[4] । हस्तकमळीं कर्षिली[5] ॥ १०२ ॥
तारुण्यभरें कामपिसें । पहिलेंचि[1] भावो अर्जुनीं[2] वसे[3] ।
हातीं[4] धरितांचि संतोषें । रहंवरीं वळघली[5] ॥ १०३ ॥
वाऊनियां[1] कनकरथीं । सुभद्रा नेली हातोहातीं ।
सखिया येऊनि सांगती[2] । उग्रसेनादिकांतें[3] ॥ १०४ ॥

---

९८. १ दीव्यान्नें भोजनें पु४ ख गो·२ ; २–४ विचित्रापरिपिसिताशने औं ; ४ अन्नें पु , आसवायनें ख , अन्नपानें गो२ , सुगंधमने ख ; ५ परिमळद्रव्यें नि खवर्ग.

९९. १ रागोद्धारें नि औं पु रा ; २ गायक गो रा , गायनें औं पु ; ३ करिती नि ; ४ मृदंग नि मुं गो·२ ; ५ मधुर श्रुति पु४ , उपसंगश्रुती गो ; ६ वाजती नि खवर्ग , वाहाती गो·२ रा.

१००. १ ब्राह्मण पु·४ ख नां मुं , ब्राह्म औं ; २ भक्षिलीं नि , भक्षिती खवर्ग ( ख प्रसंप्रा ) ; ३ सुखशयनीं नि ; ४ लोळकंबती औं.

१०१. १ मुरडले औं ; २ त्वरीत ध ; ३ वेगें पु४.

१०२. १ करूनियां नि पु४ गो रा ; २ अच्युतानुजा नि पु४, अच्युताग्रजा औं पु मुं , अनुज्या गो२ ; ३ अर्जुन पु४ तं ; ४ वोजा औं ; ५ स्पर्शिली नि , धरियली औं , हर्षली तं.

१०३. १ पहिलाचि नि , पहिले मुं , पहिला गो·२ ; २ आर्जुनेसी ख ; ३ असे नि पु·४ ख ; ४ वरी हाती तं ; ५ वळंघली नि गो.

१०४. १ वाहूनियां नि ख ; २ सांगातीं पु४ मुं ; ३ °दिकांसी नि गो२.

सेवक ह्मणती वसुदेवातें । सुभद्राहरण[1] केलें[2] पार्थें ।
वेगीं निघा धावणियातें । दुरी गेलियां[3] नाटोपे ॥ १०५ ॥
पुढां[1] आलियां[2] यादववीरीं । मागिलेकडे राहिल्या नारी ।
मध्यें येकली सुंदरी । हिरोनि[3] नेली पांडवें[4] ॥ १०६ ॥
सुधर्मसभे[1] यादववीर । बैसले असतां[2] थोर थोर ।
सारण सात्यकी[3] अक्रूर । रुक्मिणीय[4] शांबादी[5] ॥ १०७ ॥
गद भानु[1] शकुनि[2] शठ[3] । पृथु[4] पृथुवीर[5] सत्येक[6] श्रेष्ठ ।
भगकर[7] महोदर[8] बलिष्ठ । चारुदेष्ण[9] कृतवर्मा ॥ १०८ ॥
भोज वृष्णि[1] अंधक[2] बळियाढे । झुंझा[3] सरसावले[4] गाढे ।
ह्मणती पार्थ जातसे पुढें । पाठीलागीं[5] धांवा कां[6] ॥ १०९ ॥
त्राहाटिल्या निशाणभेरी । सनया[1] गाजती[2] सुस्वरीं[3] ।
भयानक रणमोहरी । वीरीं[4] शंख[5] वाईले[6] ॥ ११० ॥

---

१०५. १ **सुभद्रा हरूनि** नि; २ **नेली** नि, **केली** गो·२ रा; ३ **गेल्या** नि गो२.

१०६. १ **पुढें** नि पु·४ नां; २ **आलिया** नि ख; ३ **हिरूनि** नि, **होरोनि** धु; ४ **पांडवीं** गो.

१०७. १ **समग्रसभे** नां, **धर्मसभे** मुं; २ **होते** नि, **असती** खवर्ग; ३ **सात्विकी** पु, **सत्वकी** पु४; ४ **रुक्मिणीकुमर** नि नां, **रुक्मिणेय** पु गो२ रा, **रुक्मियादि** मुं; ५ **सांबादी** नि पु ख रा.

१०८. १–३ **बभ्रु निशट** नि, **भानुमतिया शकुनि निकट** औं, **बभ्रु शकुनी शट** ख; २–३ **शटनी शट** धु, **शंख नि शंठ** रा, **शंकुनी निशट** तं; ४ (–) नि खवर्ग (पु प्रसंप्रा) गो·२ रा; ५ **पृथुकवीर** मुं; ६ **श्रेष्ठ** पु, **सात्यकी** औं मुं पु; ७ **भंगकार** नि, **भग** औं; ८ **महाख** नि; ९ **चारुदंष्ट्र** मुं.

१०९. १–२ **वृष्ण्यंधक** नि; ३ **झुर्जो** नि; ३–४ **झुंजारवीर** औं; ५ **पाठीलागे** औं पु नां धु रा तं; ६ **करा कां** ख, **पां** नां.

११०. १ **सिंहनादें** नि औं, **सींहनाद** पु, **संन्नह** ख, **साहानया** धु, **सेनाह** गो, **सेनाही** गो२, **सन्नाह** तं; २ **गर्जती** नि औं पु·४, **वाजति** ख मुं धु; ३ **भारी** नि औं; ४ **त्यावरी** औं, **वरी** ख; ५ **संख्यें** गो२; ६ **वाहिले** नि नां गो.

कोपें खवळला[१] संकर्षण । ह्मणे पालाणारे सैन्य[२] ।
आजि कुंतीचा नंदन । स्वस्त पावेल ममहस्ते[३] ॥ १११ ॥
धरूनि[१] तापसाचा वेष । मौनें[२] केला[३] गृहप्रवेश ।
भोळा नेणे[४] हृषीकेश । दुष्टबुद्धी खळाची ॥ ११२ ॥
दंभाचारी कृत्रिम साधु । मंद दुरात्मा कामलुब्धु ।
वृष्णिकुळातें[१] कुशब्दु । अपकीर्तीचा लाविला ॥ ११३ ॥
भोजन करूनि पात्र फोडी । तैसी राहाटला[१] येथें[२] परवडी ।
यादवां लाज[३] लाऊनि[४] गाढी । कन्या नेली नेणतां ॥ ११४ ॥
पृथ्वी करीन पांडवरहित । पालथें घालीन इंद्रप्रस्थ ।
लांगळ[१] उचलोनि कृतांत[२] । लोहमुसळ[३] पडताळी ॥ ११५ ॥
पुढती बोले कामपाळ[१] । मौनें[२] असे[३] कां[४] गोपाळ[५] ।
याचा गुप्त[६] प्रगट खेळ । ब्रह्मादिकां नेणवे ॥ ११६ ॥
गमे[१] याचेनि[२] संकेतें । कन्याहरण[३] केलें[४] पार्थें ।
कारण नकळतां आम्हुतें । विचार[५] कांहीं[६] सुचेना[७] ॥ ११७ ॥

---

१११. १ खळवळला गो·२ ; २ सकळ सैन्य नि ; ३ मजहातीं नि , मजहस्तें पु·४ नां मुं धु गो२ रा ;

११२. १ वरूनि ध्र ; २ मौन्यें नि पु ख गो रा ; ३ करूनि नां ; ४ नेणें नि मुं गो·२.

११३. १ कृष्णकुळातें नि , कृष्णी° नां गो२.

११४. १ केली नि ; २ येणें नि पु ; १–२ येथें राहाटला पु४ ; ३–४ लाउनि लाज नां मुं.

११५. १ लांगल नि , नांगर पु , नागर औं रा , लांगुळ पु४ मुं गो·२ , नगर ख , नांगरें नां , लागला तं ; २ कदांत ख ; ३ मुसळ हातीं नि.

११६. १ काये गोपाळु पु , का हा दयाळु औं , दिनदयाळ पु४ , काय दयाळु ख , काय हा दयाळु नां , दयाळु मुं ; २ मौन्यें नि पु नां गो·२ , मौन्य ख ; ३–४ आससी कीं ख ; ४ (–) पु४ नां , (+) हा नि ; ५ कृपाळु पु , नीश्चळु ख ; ६ (–) गो२.

११७. १ अहो नि खवर्ग; २ ययाचेनि पु; ३ सुभद्राहरण औं; ४ केलि गो२ रा ; ५–६ कांहीं विचार पु ; ७ असेना मुं.

बुद्धी कवण[1] ते[2] करावी । कन्या आणावी कीं[3] नाणावी ।
जें मानेल[4] तुझिया[5] जीवीं । तेंचि मान्य सर्वांतें[6] ॥ ११८ ॥

श्रीकृष्ण ह्मणे ऐका[1] वचन । विचारवनीं[2] परिभ्रमे[3] मन ।
येक[4] निश्चय नकळे[5] ह्मणोन । धरूनि[6] मौन[7] राहिलों ॥ ११९ ॥

सैंवरहरण[1] क्षत्रियां[2] । विहित बोलिलें यादवराया[3] ।
येणें विचारें धनंजया[4] । दोष कांहीं दिसेना[5] ॥ १२० ॥

अर्जुनापासूनि[1] राजकुमरी । सोडऊनि[2] आणी[3] ऐसा[4] क्षेत्री[5] ।
मातें न दिसे पृथ्वीवरी । हेही[6] आशंका[7] वाटतसे[8] ॥ १२१ ॥

हो कां पराभवुनि कुमरी[1] । आणिली[2] माना[3] लावण्यलहरी ।
पुढां[4] अर्पावी[5] कवणा करीं[6] । जो याहूनि आगळा ॥ १२२ ॥

यासीं[1] तुळे[2] येके[3] अंशीं[4] । ऐसा न[5] दिसे[6] राजवंशीं ।
रूपविद्या[7] गुणैकरासी[8] । वीर धीर उदार ॥ १२३ ॥

---

११८. १ **केउति** गो२ ; २ **ती** नि धु गो, ( – ) गो२, **आतां** मुं; ३ **कन्या** ख, **किंवां** नां, ( – ) औं गो रा ; ४ **मान्ये** ख ; ५ **तुमच्या** नि नां, **तुमचा** पु४, **तुमचे** ख मुं ; ६ **आमुतें** नि. ही ओवी धु मध्यें नाहीं.

११९. १ **येक** औं ; २ °**वरि** पु४ ; ३ **भ्रमतां** औं, **भ्रमें** मुं ; ४ **येकेक** गो२, **येकच** ख ; ५ **नाकळे** पु, ( – ) ख ; ६–७ **मौन धरोनि** औं पु४.

१२०. १ **कन्याहरण** नि ; २ **क्षत्रियातें** नि, **हें क्षेत्रियां** गो२ रा ; ३ **बळिरायातें** नि, **बळिराया** पु ; ४ °**जयातें** नि ; ५ **असेना** नि मुं गो२.

१२१. १ **अर्जुना जिंकून** नि ; २–५ **आणी ऐसा बळिष्ठ क्षत्री** नि ; ६–८ **तेंही एक अशक्य** नि ; ६ **हे** गो२ ; ७–८ **येक आशंका** खवर्ग रा, **येक मातें आशंका** गो२ ; ८ **येकी वाटे** तं.

१२२. १ **समरीं** औं गो२ रा ; २–३ **आणिलिया** नि औं ख, **आणी-ल्यां** धु ; ३ **मान** पु, **ह्मणाल** गो२ ; ४ **पुढें** नि खवर्ग ; ५ **ओपावी** नि ; ६ **परि** पु४, **घरी** पु. ही ओवी मुं मध्यें नाहीं.

१२३. १–४ **अर्जुनाचे तुळणेसिं** नां ; ३ **एका** नि, ( – ) औं पु ; ४ **जुंझासी** औं पु ; ३–४ **येकल्यासी** मुं ; ५–६ **जन्मला नसे** नि ; ७–८ **गुणी विद्यारासी** ख.

रूपें जैसा मदन[1] काम। वीरविद्ये[2] भार्गवराम।
उदारते[3] मनोधर्म। दाशरथीसारिखा[4] ॥ १२४ ॥
गंभीरपणें क्षीरसमुद्र। शांत[1] जैसा पूर्णचंद्र।
कोपें क्षोभलियां[2] वीरभद्र। भासे[3] शत्रुकुळातें[4] ॥ १२५ ॥
तेजें जैसा प्रतापार्क। विवेकें[1] भासे[2] विदेही[3] जनक।
ऐसा[4] सांडोनियां[5] मूर्ख[6]। कोण[7] तो[8] आन[9] वरावा[10] ॥१२६॥
कौरववंशीं[1] विजयध्वज। पंडुनृपाचा आत्मज।
कुंतिभोजतनयात्मज[2]। भगिनीपुत्र[3] वसुदेवा[4] ॥ १२७ ॥
कवणे[1] अंगीं उणा पार्थ। कन्या तवं[2] हे[3] वराची[4] वस्त[5]।
यावरी दृष्टी पडेल[6] अर्थ। तोचि तुह्मी अनुष्ठा ॥ १२८ ॥
उपेक्षूनि राजहंसा। मुक्तें[1] वोगरिजे[2] वायसा[3]।
आमुचा[4] विवेक होईल तैसा[5]। कन्या[6] देतां[7] आनातें[8] ॥१२९॥

---

१२४. १ मूर्ति औं; २ धनुर्विद्ये औं, रूपविद्या धु, रूपविद्ये पु; ३ उदारता नि, उदारतेसी औं पु, उदारातें नां, उदारत्वें गो; ४ °रथी-रामासारिखा मुं.

१२५. १ शांतिने औं; २ खवळल्या नि मुं, क्षोभला रा तं ३ शोभे मुं; ४ कृतांतकातें औं.

१२६. १ विवेकीं पु ख नां; २ पाहतां नि, जैसा ख; ३ विदेह नि, वीवेकी पु४; ४–५ ऐसियातें सांडुनि औं; ६ मूर्क नि; ७–९ कोणता आणिक औं; ७–१० कोणता वर आणावा नि.

१२७. १ कौरववंशाचा पु, कौरववंशीचा औं; २ °तनयातनुज औं पु गो·२ रा, कौंतिभोजतनुज्यात्मज पु४; ३–४ सुहृद जवळी आमुतें नि, अर्जुननामा जाणें पां पु, अर्जुन नामें प्रसिद्ध औं, आनुज राया धर्माचा पु४, अनुज धर्मरायाचा ख नां मुं; ४ वसुदेवाचा गो रा.

१२८. १ कवण्या औं, कवणा नां मुं गो; २–३ हे तव धु; २–५ देणे तव वरार्थ पु४, देणें तव वरातें ख, तव देणे वरार्थ नां मुं; ३ (–) नि औं पु; ४ पराची नि, (+) च पु; ६ (+) जो नि, (+) तो गो२.

१२९. १ मुक्ता नि, मूक्ति पु४, मुक्त रा तं; २ ओगरिजे नि, उग-रीजे औं, वोपीजे ख; ३ राजहंसा औं; ४ तुमचा नि (स प्रसंप्रा); ५ ऐसा पु·४ ख; ६–८ अर्जुनावीण आणिकांतें औं पु, हिरोनी नेतां नोवरि पु४, हिरोनि आणितां नोवरी ख नां मुं; ७–८ अन्यास अर्पितां नि.

जालें तेंचि[1] मानुनि निकें । अर्जुन परतवा द्वारके ।
पाणिग्रहणविधी[2] कौतुकें । लग्नसिद्धी[3] संपादा ॥ १३० ॥
परिसोनि श्रीकृष्णाची[1] युक्ती[2] । बळदेव मंदावला[3] चित्तीं ।
शस्त्रें टाकोनियां[4] हातीं[5] । ह्मणे[6] होणार[7] होतसों[8] ॥ १३१ ॥
धाडोनि[1] मंत्री[2] पुरोहित । मानें परतविला पार्थ ।
पाणिग्रहणविधीयुक्त[3] । सुभद्रादेवी[4] दीधली[5] ॥ १३२ ॥
च्यारी दिवस सुखसोहळा[1] । समारंभ जना[2] सकळां[3] ।
हेमाभरणें[4] रत्नमाळा । वधूवरांतें[5] अर्पिल्या[6] ॥ १३३ ॥
पार्थ जोडला जामात । वसुदेवातें आल्हाद बहुत ।
देवकी[1] निंबलोण करित । क्षणक्षणा आवडी ॥ १३४ ॥
वर्ष येक हरिसंगती[1] । द्वारकापुरीं[2] करूनि वस्ती ।
उरला वनवास पुष्करतीर्थीं । ऋषिसंगती[3] लोटिला[4] ॥ १३५ ॥

---

१३०. १ **हेंचि** नि खवर्ग ; २ °**ग्रहण करवूनि** नि ; ३ **लग्नविधी** नि औं पु मुं.

१३१. १ **कृष्ण** औं ; २ **उक्ति** नि, **वदंती** औं, **वचनोक्ती** मुं ; ३ **मानवला** मुं , **मंदला** औं ; ४ **ठेऊनियां** नि खवर्ग ; ५ **खालती** नि , **क्षिती** औं ख ; ६ **हो** पु४ ; ७ **हो कां** औं पु , **हो** ख , **तैसेंची** पु४ नां , **कां** मुं ; ८ **होतसे** नि , **तैसेंची** औं पु ख नां मुं , **ह्मणतसे** पु४.

१३२. १ **धाडोनियां** नि ; २ **मैत्री** गो ; ३ **आणि पाणि**° नि ; ४–५ **सुभद्रा विवाहीं अर्पिली** नि.

१३३. १ **सोहळा** औं गो·२ ; २–३ **सुहृदमेळा** औं पु ; ४ °**भरणीं** औं धु गो ; ५ **वधूवरां** नि खवर्ग ( औं प्रसंप्रा ) गो·२ रा ; ६ **अर्पिली** ख नां मुं गो·२ रा.

१३४. १ **देव** गो.

१३५. १ °**संगतीं** नि ( स प्रसंप्रा ) ; २ **द्वारावती** औं ; ३ °**संगतीं** नि ( स प्रसंप्रा ) ; ४ **कार्मिला** औं.

औं मध्यें खालील ओव्या अधिक आहेत;—

**मग ह्मणे धर्मदर्शना । जावें ऐसें उद्वेग मना ॥**
**जाली वनवासाची गणना । निजनगरासीं स्वयें जाणे ॥१३५अ॥**

हर्षयुक्त[१] सुभद्रेसहित[२] । इंद्रप्रस्था[३] पातला[४] पार्थ[५] ।
माता[६] वंदूनि[७] नृपनाथ[८] । मस्तकनमनें[९] पूजिला[१०] ॥ १३६ ॥
सुभद्रेनें[१] करितां नमन । कुंतीधर्मासी[२] आल्हाद पूर्ण ।
कृष्णभगिनी जोडली[३] सून । पार नाहीं भाग्यातें ॥ १३७ ॥
ज्येष्ठ प्रियेचें[१] समाधान । करावया प्रवेशे[२] निकेतन[३] ।
येरी प्रेमें दाटली पूर्ण । मृषा[४] दावी रुसण्यातें[५] ॥ १३८ ॥
पाचारितां याज्ञसेनी । सद्गद बोले प्रीतिवचनीं[२] ।
जेथें यदुराजनंदिनी । तेथेंचि आपण[३] वसावें[४] ॥ १३९ ॥
द्वितीय वधू[१] कर्षितां हातें । शिथिलता ये[२] पूर्वबंधातें[३] ।
जीर्ण[४] घृत नूतन[५] घृतें[६] । फिकें करूनि दाविजे[७] ॥ १४० ॥

---

मग आज्ञा घेउनि यादवांची । श्रेष्ठ वसुदेव उग्रसेनाची ॥
अत्यादरें बळदेवाची । आणि परमात्मा श्रीपती ॥ १३५ आ ॥
सर्वे संपति अपार । अश्व गज रहंवर ॥
रत्नसिबिके सुंदर । आपण कनकरथीं आरूढला ॥ १३५ इ ॥
मग पातला इंद्रप्रस्ता । परमाल्हाद कुंतीसुता ॥
नमस्कारोनि आधिं माता । पाठिं धर्म नमियेला ॥ १३५ ई ॥
भीमसेना अत्यादरें । नकुळसहदेवा परमादरें ॥
क्षमालिंगनीं परस्परें । परम लाभ मानिला ॥ १३५ उ ॥

१३६. १–२ सवें घेऊनि वसुदेवसुता नि; ३–५ पार्थ पातला शक्रप्रस्था नि; ४ पावला पु४ मुं धु तं; ६–८ नमस्कारूनि ज्येष्ठ भ्राता नि; ९ मस्तक सुमने मुं; ९–१० आलिंगन दीधलें नि.

ही ओवी औं पु मध्यें नाहीं.

१३७. १ सुभद्रे माते ख; २ °धर्मा नि खवर्ग; ३ जोडी ख.

१३८. १ प्रियेतें रा; २ पातला नि पु४; ३ अर्जुन नि, फाल्गुन औं; ४ मिष नि; ५ रुसण्याचें नि. ही ओवी पु४ मध्यें नाहीं.

१३९. १ क्रोधें नि, सुबुद्ध औं पु नां, सुबुध पु४, सुसुध ख २ अति° नि, प्रिये वचनीं पु, प्रिया वचनी औं, प्रति वचनी पु४ मुं; ३ आतां नि; ४ असावें मुं.

१४०. १ बंध नि; २ येई नि, हे पु४; ३ पूर्वजातें औं पु, पूर्वपदातें ख नां मुं रा; ४ नूतन नि; ५–६ जीर्ण घृतातें नि; ७ दावित नि.

पार्थें देऊनि आलिंगन । शब्दें[1] केलें शांतवन[2] ।
सुभद्रेनें करूनि[3] नमन । ह्मणे मी दासी सेवेची ॥ १४१ ॥
ऐकोनि यादवीची गोष्टी । द्रौपदीनें[1] धरिली पोटीं ।
कृष्णअनुजा[2] ते[3] धाकुटी । भगिनी[4] माझी तूं माये ॥ १४२ ॥
यापरी आनंद जाला सकळां । धर्मा भीमा सहदेवनकुळा ।
नगरवासियां सुखसोहळा । धर्माश्रयें[1] नित्य[2] नवा[3] ॥ १४३ ॥
सुवर्णसदनीं राजबाळा । ठेविली[1] सुभद्रा[2] वेल्हाळा ।
भोगसंपत्तीचा[3] सोहळा[4] । दृष्टीपुढें खेळतु[5] ॥ १४४ ॥
यादवीचेनि[1] अंगसंगें । सर्व सुखासि[2] ह्मणे उगें ।
घटिकेसमान मानी[3] युगें । सुखानंदें विलासीं ॥ १४५ ॥
लीलाविश्वंभर दिनमणी । स्पर्श[1] करितां कृपाकिरणीं ।
चित्तसूर्यकांतपाषाणीं । उन्मेषानळ[2] अवतरे ॥ १४६ ॥
तो दावाग्नि-दोषदांगीं । दीपिकारूप[1] कथामार्गीं ।
ह्मणोनि मुक्तेश्वर सुसंगीं[2] । श्रोतयांच्या[3] चालत[4] ॥ १४७ ॥

इति श्रीभारते आदिपर्वणि सप्तचत्वारिंशोऽध्यायः ॥

---

१४१. १ **सुशब्दें** नि, **स्नेहें** ख, **शब्दीं** रा तं; २ **समाधान** औं पु; ३ **केलें** नि नां;

१४२. १ **द्रौपदीया** पु·४ नां गो·२, **द्रौपदिये** स ख; २–३ **कृष्णानुजा** नि; ३ **तुं** औं मुं धु, (–) ख; ४ **बहिणी** औं.

१४३. १ **होय तेव्हां** औं पु, **दृष्टीपुढें** पु४, **होयची** ख, **होय** नां, **होय अद्भुत** मुं; २ **नीत** ख, **नीच** नां धु गो२ रा तं; २–३ **खेळतां** पु४, **तिचेनी** मुं.

१४४. १–२ **आनंदगुणभरीत** मुं; ३ **भाग्यें संपतीचा** मुं, **पाहतां लावण्याची** गो; ४ **कळा** गो; ५ **खेळत** नि, **देखिला** मुं, **खोंचतु** गो, **खोलत** रा.

१४५. १ **यादवीचे** नि पु·४ ख; २ **सुखांसी** नि, **सुखेसी** पु४; ३ **मानुनी** ख मुं.

१४६. १ **प्रकाश** नां; २ **उन्मेशानंद** नां.

१४७. १ **°रूपें** नि; २ **सुरंगी** मुं; ३ **श्रोतियातें** औं मुं गो; ४ **चालवितु** औं पु.

॥ श्री ॥

## अध्याय अठ्ठेचाळिसावा

### श्रीगणेशाय नमः

वार्तिक जाणविती गोष्टी । धर्मराजनृपाचे भेटी ।
घेऊनि यादवांच्या कोटी[1] । रामकृष्ण पातले[2] ॥ १ ॥
द्वारकेहूनि दळ[1] अचाट[2] । पातलें इंद्रप्रस्थानिकट ।
कुंजरभेरींचा बोभाट । जाणवित धर्मातें ॥ २ ॥
सन्मुख धाडोनि माद्रीकुमर । रायें[1] शृंगारिलें[2] नगर ।
मखरें तोरणें अपार[3] । गुढिया[4] उभविती[5] गोपुरीं[6] ॥ ३ ॥
श्रीगंध कस्तूरी केशर । शिंपोनि मार्ग केले सधर[1] ।
स्थळोस्थळीं कृष्णागर–। परिमळधूपें[2] धूपिले[3] ॥ ४ ॥
सुमनतैलाची[1] सारणी । गंधरसाचिया[2] खाणी ।
रक्तश्वेतचंदनचूर्णी[3] । ग्रामगर्भी[4] धुळोरा ॥ ५ ॥

---

१. १ **थाटी** औं पु ख ; २ **पावले** पु४.

२. १ **बळ** पु४ ; २ **आचाट** पु·४ ख मुं.

३. १–२ **राजा शृंगारी** खवर्ग ; ३ **आपार** पु४ ख ; ४–५ **पुरीं गुढिया** पु ; ५–६ **नगरीं उभविल्या** नि ; ६ **उभविती** पु.

नि खवर्ग मध्यें पुढील ओवी अधिक आहे:—

**मंडप घातले अपार । अवघे नगरीं झगझगीत[1] थोर ।**
**दिधले[2] आणूनि[3] विस्तार[4] । अतिसुरेख[5] साजिरे ॥ ३ अ ॥**

१ झगमगीत ख , (–) औं मुं ; २–३ दीधलीं वितानें नि ; ४ विस्तारें पु४ नां ; ५ अतिसुंदर नि.

४. १ **सुंदर** नि गो·२ ; २–३ °**धूप अर्पिले** मुं.

५. १ **सुमनतेलाची** खवर्ग ; २ **गंधराजाचिया** खवर्ग गो·२ रा ; ३ **रक्तचंदनचूर्णी** औं पु·४ ख , **रक्तचंदनाचिये चूर्णी** नि नां मुं ; ४ **मार्गगर्भी** नि.

नि खवर्ग मध्यें यापुढें पुढील ओव्या आहेत:—

उपायनें घेऊनि भेटी । पातल्या पौरजांचिया कोटी[२] ।
अक्षवाणीं[३] कनकताटीं । वोवाळिती जनवधू[४] ॥ ६ ॥
यादव पातले नृपद्वारा[१] । परम आल्हाद् कुंतीकुमरा[२] ।
वेगीं धांवोनि[३] सामोरा । ज्येष्ठकनिष्ठां[४] सन्मानी[५] ॥ ७ ॥
येकां[१] केलीं[२] साष्टांग नमनें[३] । येकां[४] दीधलीं[५] आलिंगनें[६] ।
येकां[७] मस्तकअवघ्राणें[८] । आशीर्वचनें[९] पैं येकां[१०] ॥ ८ ॥

---

स्थळोस्थळीं मुक्तझलरी[१] । नानारंगीं[२] रंगकारीं[३] ।
चित्रें[४] चितारिलीं परोपरी । सुशोभीत रमणीक[५] ॥ ५ अ ॥

१ मुक्ताझलरी नि, मुक्तझालरी औं पु ; २ °रंगें औं पु४ ख नां ; ३ रंगकुसरी नि ; ४ चित्रीं नि ; ५ मंदिरें नि.

नगरी[१] घरें शृंगारिलीं । पट[२] पाटाउवें[३] बांधिलीं ।
ध्वजा[४] पताका गगनमंडळीं । चित्रविचित्र शोभती ॥ ५ आ ॥

१ अवघीं नि ; २ पट्ट पु४ ख नां ; ३ पाटावें नि ; ४ ध्वज नि.

आसनें तिवासिया[१] परोपरी । निर्मळ रंगें[२] रंगाकारीं ।
ऐसऐसिया[३] विचित्रीं[४] । शोभायमानें[५] शोभती[६] ॥ ५ इ ॥

१ तिवाशें नि ; २ रंग नि ख ; ३–४ ऐशिचा विचित्रचित्रीं नि ; ५ °मान नि औं मुं ; ६ सुशोभी औं.

ऐसें नगर शृंगारिलें । इंद्रभुवना ऐसें[१] दिसों[२] लागलें[३] ।
दृष्टी पाहातां[४] मन भुललें[५] । देहभाव विसरोनी ॥ ५ ई ॥

१ तुल्य नि ; २–३ शोभलें नि ; ४ देखतां नि ; ५ भुले नि, भुकेलें औं पु.

६. १ **पौरांच्या** नि ; २ **थाटी** औं पु४ ख ; ३ °**वाणें** नि, **अक्षयवाणि** रा, **अक्षयीवाणी** तं, **अक्षोवाणी** गो ; ४ **जनबंधु** औं पु, **नववधु** मुं.

७. १ **राजद्वारा** नि खवर्ग ; २ °**कुमरां** मुं गो२ ; ३ (+) **आले** नां ; ४ **ज्येष्ठ कनिष्ठा** नि, **जेष्ट कनिष्ट** खवर्ग ; ५ **सद्भावें** खवर्ग.

८. १–२ **एकीं केलें** नि खवर्ग ; ३ **नमन** नि खवर्ग ; ४–६ **एकीं दिधलें आलिंगन** नि खवर्ग ; ७ **एकीं** नि ; ८ °**अवघ्राण** नि खवर्ग, **मस्तक आग्रहणें** गो२ रा ; ९ °**वचन** नि खवर्ग ; १० **एकीं** नि.

रेवतीरमण रुक्मिणीनाहो । सुहृदमंत्री आप्तसमूहो[1] ।
सेनापती महाबाहो । अक्रूरनामा भेटला ॥ ९ ॥
उद्धवदेव बृहस्पतिशिष्य[1] । यादवकुळीं[2] कुळावतंस[3] ।
ज्याप्रती ज्ञानाचें[4] रहस्य[5] । हृषीकेश[6] बोलिला ॥ १० ॥
सत्यक[1] सात्यकी प्रद्युम्न । निषठ[2] हार्दिक[3] शुक सारण ।
गदशांबादि[4] मुख्यकरून । परमप्रीती भेटले ॥ ११ ॥
सभेसि आणिले सन्मानें । वोपिलीं विचित्र कनकासनें[1] ।
मृदुमवाळ वोटंगणें[2] । पीकपात्रें झळकती ॥ १२ ॥
गंधपरिमलतांबूलसुमनीं । अनर्घ्यवस्त्रीं[1] दिव्याभरणीं ।
सोइरे[2] गौरविले सन्मानीं । धर्मराजें सुजाणें ॥ १३ ॥

---

९. १ आत्म्यसमूहो नि. निमध्यें ८ व्या व ९ व्या ओव्यांची अदलाबदल आहे.

१०. १ गुरु शिष्य नि खवर्ग (गुरुशिष्यां औं पु); २ °कुळां पु·४, °कुळ औं ख; ३ वसंतमासा औं पु, वसंतमास पु४ ख; ४–५ ज्ञानाच्या रहस्या औं पु; ६ हृषीकेशी औं पु धु.

११. १ सत्य खवर्ग; २ मित्र नि पु·४; २–३ मैत्रेयादि औं, मित्रादिक मुं; ३ हार्दिक्य नि; ४ गदसांबादि नि पु मुं रा. नां मध्यें ही ओवी नाहीं.

खवर्ग मध्यें पुढील ओवी अधिक आहे:—

अवघे यादव समस्त । भेटले आदरसंयुक्त ।
येकमेकां आलिंगित । परोपरी[1] आवडीनें[2] ॥ ११ अ ॥

१–२ अत्यावडी प्रीतीनें औं; २ आवडि ख नां.

१२. १ आसनें मुं; २ वोटिंगणें नि, लोटांगणें पु४ रा.

यापुढें खवर्ग मध्यें पुढील ओवी अधिक आहे:—

अनेक आसनें परिमळिक । दिव्यपरिचीं मृदोळी[1] अमोलिक[2] ।
ऐसीं आसनें देख । कोणासही वर्णवेना ॥ १२ अ ॥

१–२ मृदोळिक पु नां.

ही संबंध ओवी औं मध्यें पुढीलप्रमाणें आहे:—

अनेकासनेचिं बैसके । दिव्य मृदु तेज फांके ।
ऐसि आसनेचीत्रव देखें । न वर्णवती कवणातें ॥ १२ अ ॥

१३. १ अनर्घ्यरत्नीं पु·४ ख नां, अनेक रत्नीं औं मुं; २ सुहृद गो.

आदरें बोले रेवतीपति । सुभद्रा निरवावी वडिलांहातीं ।
यालागीं पातलों तुजप्रती[1] । दुणाउनी[2] सोइरिके ॥ १४ ॥
धर्म ह्मणे विनीतवचनें । आह्मीं पांडवें[1] तुमचीं दीनें ।
हातीं धरूनि श्रीकृष्णें । वाग़विजे अंधातें[2] ॥ १५ ॥
पारिवर्ह[1] कन्या[2] धन[3] । धर्मासि वोपी संकर्षण ।
च्यारी च्यारी शामकर्ण[4] । साळंकार येकेकां[5] ॥ १६ ॥
ऐसिया रथांचीं सहस्रें । सारथी कुशल योजिले धुरे ।
हेमदंडपताकाचिरें[1] । विद्युत्प्राय झळकती ॥ १७ ॥
सुदोहा[1] धेनू अयुत येक । देशांतरींच्या अमोलिक[2] ।
येकवीससहस्रावरी[3] आणिक[4] । सहस्र येक धवळिया[5] ॥ १८ ॥
चंद्रकीरणीं रंगलिया । सुवर्णशृंगी साजिरिया[1] ।
उपमे नंदिनीसारिखिया[2] । धर्मराजा दीधल्या ॥ १९ ॥
पर्वताकार मेघवर्णी । मदोन्मत्त रत्नाभरणीं ।
सादी-शावक-युक्त[1] श्रेणी । कुंजरांच्या सहस्र ॥ २० ॥
शृंगळद्वीपींचे[1] चतुर्दंत । स्फटिकाचळासारिखे[2] श्वेत ।
जयांचिया सुवासें प्राणांत । होत[3] अन्यदेशस्थां[4] ॥ २१ ॥

---

१४. १ **तुह्मांप्रती** नि खवर्ग; २ **दुणावणें** नि, **बोळवण** खवर्ग.

१५. १ **पांडव** नि औं ख नां मुं; २ **आमुतें** नि, **सर्वथा** औं, **आह्मातें** पु४ ख नां मुं.

१६. १ **अपार अलंकार** नि खवर्ग; २ (–) खवर्ग; ३ **धनें** औं पु४ नां मुं; ४ **श्याम**° नि पु तं; ५ **एकैका** नि.

१७. १ °**दंडीं पताका**° नि, °**पताकाचवरें** औं पु४ नां मुं.

१८. १ **सुदुग्धा** गो२, **सुदेहो** पु; २ **रमणिक** मुं; ३ °**सहस्र** नि; ४ **अनेक** पु, **येक** औं, **अमोलिक** मुं; ५ **ढवळिया** नि.

१९. १ **साजरिया** नि औं पु मुं; २ °**सारखिया** नि. मुं मध्यें ही ओवी नाहीं.

२०. १ **संगीं शावक**° नि, **साटी शावक**° औं पु४ ख नां मुं तं.

२१. १ **सिंहलद्वीपींचे** नि, **सिंगळ**° खवर्ग (**सीव्हळ**° पु४), **सृगाळ**° तं; २ **स्फटिकासारिखे** पु४ गो; ३ **होतो** नि; ४ °**देशस्तां** औं पु मुं धु.

पंचघंटाचेनि नाद । स्थानत्रइं[1] गाळिती[2] मद ।
हेमशृंखळा दशनबंध[3] । तेही सहस्र दीधले ॥ २२ ॥
कृष्णवर्णा[1] श्वेतवर्णा[2] । सहस्र[3] अश्वतरी[4] जाणा[5] ।
दिवसामाजी शतयोजना[6] । वातवेगें लोटिती[7] ॥ २३ ॥
त्याही[1] देऊनि यादवनाथ[2] । उष्ट्रें वोपी पंचायुत[3] ।
संतोषोनी कुंतीसुत[4] । अत्यादरें घेतसे[5] ॥ २४ ॥
पृष्टी[1] मिरवलीं बैसकासनें । सुवर्णपाखरा कंठाभरणें[2] ।
मांदुरीयुक्त[3] अश्वरत्नें । लक्षसंख्या[4] वोपिलीं ॥ २५ ॥

---

२२. १ अंगत्रयीं नि खवर्ग; २ गाळिन नि औं पु, चाळिती नां; ३ °बंद औं पु धु.

२३. १ °वर्ण नि खवर्ग (°वर्णे पु४); २ वर्णं नि औं पु४; ३ एक लक्ष नि, येकसहस्र खवर्ग, अश्वसहस्र धु; ४-५ अश्वरत्नें नि खवर्ग; ६ °योजनें नि खवर्ग; ७ चालती नि, पैं जाती औं.

पुढील ओवी नि खवर्ग मध्यें अधिक आहे:—

नानारत्नें आभरणें । वैडूर्य[1] पेरोज जाणें[2] ।
नीळ पाचु[3] नवरत्नें । दीधलीं ते[4] असंख्य ॥ २३ अ ॥

१ (+) पात्रें नि; २ लसणे नि; ३ (+) आदि नि; ४ कीं नि.

पुढील ओवी खवर्ग मध्येंच आहे:—

कोट्यानकोटी असंख्य द्रव्यें । सातखण भरले सुसेव्यें ।
शकट दिधले[1] अपूर्व । धर्मराजासी यादवीं ॥ २३ आ ॥

१ भरिले औं पु ख.

पुढील ओवी नि खवर्गमध्यें अधिक आहे :—

नानावस्त्रें विचित्रें सकळें । अमोलिक मुक्ताफळें[1] ।
आंदण अपार[2] दीधलें[3] । मर्यादेरहित[4] ॥ २३ इ ॥

१ तेजाळ नि; २-३ मर्यादेवेगळें नि; ४ दीधलें धर्मराजासी नि, ज्यासी मर्यादा असेना औं.

२४. १ ऐसें नि खवर्ग; २ °नाथें नि; ३ पांच अयुतें नि औं पु; ४ °सुतें नि; ५ घेतलीं नि.

२५. १ पुष्टी औं पु नां गो; २ मुक्ताभरणें नि; ३ मांदुरायुक्त नि; ४ असंख्यात औं पु.

वस्त्राभरणीं रोगरहिता[1] । तारुण्यसगुणा[2] रूपवंता[3] ।
सर्वकर्मीं[4] ज्यां[5] कुशळता[6] । सहस्र दासी दीधल्या ॥ २६ ॥

सुवर्णाचे मनुष्यभार[1] । समर्पूनियां अपार ।
स्वल्प मानी[2] यादवेश्वर । अर्जुनाचिये आवडी ॥ २७ ॥

धर्मराजें याचि रीती । शालक[1] गौरविले सद्भक्ती ।
भोजनपानादि स्वपंक्ती । वनविहार संतोषें ॥ २८ ॥

यमुनाजळीं रम्यपुलिनीं । पुष्पवाटिकाशृंगारवनीं[1] ।
नगरगर्भीं राजसदनीं । स्वेच्छानंदें क्रीडती ॥ २९ ॥

वळघती[1] कुंजरादि[2] वाहनीं[3] । वाद्यें संतोष[4] देती[5] श्रवणीं ।
नृत्यें[6] कीजती[7] देवांगनीं[8] । सभेपुढां[9] कौतुकें ॥ ३० ॥

---

२६. १ °रहित नि खवर्ग ; २ **तरुणी सुगुणी** नि, **तरुण सगुण** खवर्ग ; ३ **रूपवंत** नि खवर्ग ; ४ **सर्वकामीं** नि : ५ **ज्या** खवर्ग, (–) नि ; ६ **कुशल निरत** नि, **कर्मनिरत** औं, **काम करित** पु४ नां, **कामरहित** पु मुं.

२७. १ **मांदुसभार** नि खवर्ग ; २ **मानीं** नि.

२८. १ **सकळ** औं पु.

२९. १ **पुष्पवटिका**° नि पु४ ख नां मुं.

३०. १ **वळंघती** नि ; २–३ **अश्वकुंजरयानीं** नि ; ४–५ **देती संतोष** नि ; ६ **नृत्य** नि खवर्ग ; ७ **कीजे** नि पु४ ख नां मुं, **करिती** औं पु ; ८ **वारांगनीं** नि, **देवांगणीं** औं पु ; ९ °**पुढें** नि खवर्ग.

यानंतर खवर्ग मध्यें पुढील ओवी आहेः—

**ऐसें आंदण दीधलें अर्जुना । परोपरी अर्पिलें जाणा ।**
**अपार सधना[1] सुवर्णा[2] । संख्या नाहीं तयातें ॥ १ ॥**

१ वर्णें पु४, संधानें औं ; २ संधना पु४, शस्त्रें नाना औं.

यापुढें नि खवर्गमध्यें पुढील ओव्या अधिक आहेतः—

**मग पांचद्दिजण[1] मिळोन[2] । कृष्णासि केलें साष्टांग[3] नमन ।**
**आदरें[4] धरूनि[5] दृढचरण[6] । चुंबन[7] करिती[8] वेळोवेळा[9] ॥२॥**

१ पांचजणें नि, पांचा पांडवीं औं ; २ जाण औं ; ३ (–) औं ; ४ आवडी औं ; ५–६ देउनी आलींगन ख ; ७ नमन ख ; ७–९ वेळोवेळां चुंबिती नि.

**अगा स्वामी देवदेवा[१] । तूं आमुचा विसावा[२] ।**
**भक्ताचा करिसी कुडावा[३] । जगीं[४] तूंचि[५] येक[६] ॥ ३ ॥**

१ देवाधिदेवा नि; २ विसांवा नि; ३ सिधावा नि; ४–५ देवाधिदेवा तूं औं; ६ एकला नि.

**आह्मीं तुझे[१] अतिदीन । जगत्रईं[२] थोर[३] केलें[४] महिमान ।**
**हातीं धरूनियां सान । थोर[५] केलें देवराया ॥ ४ ॥**

१ तुझीं नि; २ आमचें नि; ३ (–) ख; ३–४ वाढविलें पु४; ४ (–) औं मुं; ५ श्लाघ्य नि.

**तूं अनाथबंधु[१] । कैवल्यदानी सिंधु[२] ।**
**अगाध[३] तुझा बोधू । ब्रह्मादिकां नाकळे[४] ॥ ५ ॥**

१ अनाथाचा बंधु नि, अमुचा अनाथ बंधु मुं; २ सुखसिंधु नि, कृपासिंधु औं, परमासिंधु मुं; ३ (+) जगीं नि, (+) स्वामी औं; ४ कळेना नि. नां मध्यें ही ओवी नाहीं.

**आह्मांवरी कृपा केली । हे भुवनत्रईं ख्याती[१] जाली ।**
**कृष्णें[२] पांडवां[३] हातीं[४] कीर्ती[५] करविली[६] । उद्धरिलें[७] चराचर[८] ॥६॥**

१ कीर्ति नि; २ श्रीकृष्णें नि; ३–६ पांडवें रक्षिलीं नि; ५–६ ख्याति केली पु ख; ७–८ °रिलीं चराचरें नि.

**पांडवांचा कैवारी । हें ब्रीद[१] साच मुरारी ।**
**तूं[२] आमुचा[३] साहाकारी[४] । निर्वाणीं[५] जाण[६] पां[७] ॥ ७ ॥**

१ (+) तुझें नि; २–३ आमुचा तूं नि; ४ साह्यकारी नि; ५–७ बा निर्वाणकाळींचा नि, संकटीं आणि निर्वाणीं मुं.

**तूं आमुचा[१] सोयरा । करुणानिधी दामोदरा[२] ।**
**अंतकाळींच्या[३] दातारा । तूंचि[४] येकु[५] ॥ ८ ॥**

१ (+) सखा नि, (+) परात्पर औं; २ शारंगधरा नि; ३ सद्गतीच्या नि; ४–५ तूं इहलोकीं परलोकीं नि; ५ (+) आमुतें औं पु.

नि मध्यें ७ व ८ ओव्यांची अदलाबदल आहे.

**मग लोटांगण घातलें । पायांवरी लोळले[१] ।**
**कृष्णें[२] आळंगिलें[३] । आदरेंकरुनियां[४] ॥ ९ ॥**

१ लोळों लागले नि, लोळते जाले औं; २ मग कृष्णें नि; ३ उचलिले नि; ४ बहु आदरें करु° मुं, थोर प्रेमें आदरेंसीं नि, उठउनि आदरें औं, आदरें पु४, प्रिती आदरेंकरुनी ख.

यापरी सुख[१] भोगूनि[२] तेथें । आज्ञा मागोनि मग[३] धर्मातें ।
यादवेंसीं रोहिणीसुतें[४] । गमन केलें द्वारके ।। ३१ ।।
अर्जुनें राहाविला श्रीकृष्ण[१] । ह्मणे तुझा वियोग क्षण[२] ।
होतां जावो पाहे प्राण । तूं[३] जीवन जगाचें ।। ३२ ।।
अर्जुनाचिये परमप्रीती । कृष्ण राहिला इंद्रप्रस्थीं ।
पार्थ सख्याचीच मूर्ती । नवामाजी[१] आठवी[२] ।। ३३ ।।

---

तूं आमुची जनकजननी । बंधु सुहृदशिरोमणी[१] ।
आमुच्या प्रतिपाळणीं[२] । तूंचि कृष्णराया[३] ॥ १० ॥

१ सहित सुहृदजनीं ख ; २ प्रतिपक्ष पाळणी औं ; ३ स्वामीं देवदवा, (+) कीं नि.

सहितश्रीकृष्ण[१] यादवेंसी । भोजन[२] करविलें[३] परोपरीसी[४] ।
तांबोल[५] दीधलें[६] कर्पुरेसीं[७] । अति आदरें सन्मानें ॥ ११ ॥

१ श्रीकृष्णासहित नि ; २ भोजनें औं ; ३ (–) पु, सारिलीं औं ; ४ स्वपंक्तीसीं नि, सावकाशीं औं, पंक्तीसी मुं, यथारूचीसी ख ; ५ तांबूल नि पु ४ ; ५–७ त्या बोलें अर्पुनी त्यासी ख.

चंदन सुगंध[१] पुष्पमाळा[२] । घातल्या श्रीकृष्णाचिया गळां ।
पूजा वोपिली समसकळां[३] । तृप्त[४] जाले[५] सकळीक[६] ॥ १२ ॥

१–२ पुष्पसुगंधमाळा औं पु ; ३ सकळां औं पु ४ ; ४–५ संतोपले औं, संतोषविलें ख ; ६ सर्वेही नि, समस्त औं पु४.

वस्त्राभरणीं गौरविले । अमोलिक[१] जडित[२] रत्नभार[३] अर्पिले[४] ।
द्वीपोद्वीपींचीं[५] सुढाळें । आदरेंकरुनि कृष्णासी[६] ॥ १३ ॥

१ अमोल्य औं मुं ; १–४ समस्त यादव पूजिले नि ; २ (–) औं ख मुं ; २–४ वस्त्रीं तोषविलें मुं, रत्नाचे पदकमेळें औं ; ३ वस्त्रभार पु ख ; ५ द्वीपींद्वीपींचीं रत्नें नि ; ६ दीधलीं नि.

३१. १–२ **काळ क्रमूनि** नि, **सुखानंदु** औं ; २ **भोजन** पु·४, **भोजनीं** ख नां मुं ; ३ (–) नि औं पु·४ ख मुं ; ४ **रोहिणीकांतें** मुं गो२.

३२. १ **कृष्ण** नि औं ; २ **एक क्षण** नि पु ख नां गो·२, **क्षीण** पु४ ; ३ **तूंचि** गो·२ रा.

३३. १ **मनामाजी** खवर्ग ; २ **आठवली** औं पु, **सांटवी** ख.

पुढां[1] येक वर्षावरी । देवी सुभद्रेचे उदरीं ।
अभिमन्य[2] जन्मला[3] पुष्करीं । जेविं उगवे भास्वतु[4] ॥ ३४ ॥
जयंत[1] जैसा पौलोमीतें[2] । सर्वलक्षणीं[3] अवयव[4] पुरते ।
रूपगुणीं आणि[5] पुरुषार्थें । पितियाहूनि आगळा ॥ ३५ ॥
विशाळाक्ष विशाळहृदय । आजानुबाहु अप्रमेय ।
उपमे[1] तुळावया[2] कार्तिवीर्य[3] । तरी[4] तो वृद्ध बहुकाळीं[5] ॥ ३६ ॥
कुमर देखोनि सुलक्षणु । धर्में वांटिल्या अयुत[1] धेनु ।
द्रव्यदानें[2] याचकजन[3] । तृप्त केले अपाडें ॥ ३७ ॥
यानंतरें[1] द्रुपदबाळे[2] । गर्भशुक्तिकेमाजी सुढाळें[3] ।
निपजलीं[4] पांचै[5] मुक्ताफळें । पंचवीर्यें करूनियां ॥ ३८ ॥
धर्मवीर्यें[1] प्रतिविंध्यनामा । भीम[2] प्रसवला[3] श्रुतसोमा[4] ।
अर्जुनपुत्र तो[5] श्रुतकर्मा । शतानीक नकुळाचा ॥ ३९ ॥
सहदेवाचा श्रुतसेन । येकेक[1] वर्षानंतरें[2] जाण[3] ।
जन्म पावले पांचैजण । द्रौपदेय[4] जाणावे ॥ ४० ॥

---

३४. १ **पुढें** खवर्ग ( **त्यानंतर** औं ); २ °**मन्यु** नि; ३ **उपजला** ख; ४ **भास्वानु** नि, **भास्कर** ख गो२. गो मध्यें ही ओवी नाहीं.

३५. १ **जयवंत** पु४ मुं, **जयातें** औं पु; २ **मौळमिते** औं पु ख मुं; ३ °**लक्ष्मी** पु४, **जयलक्ष्मी** मुं; ४ **आवेव** औं पु; ५ (–) नि.

३६. १ **उपमें** नि; २ **तुळावा** नि; ३ **कातंवीर्य** नि औं पु४; ४ **परि** नां मुं; ५ °**काळें** नि.

३७. १ **सहस्र** औं पु; २ °**दानीं** औं पु·४ ख गो२ रा; ३ °**जनु** नि खवर्ग.

३८. १ **याउपरी** नि औं पु·४, **यापरी** ख नां मुं; २ **द्रौपदीबाळे** अ पु·४ ख नां गो; ३ **सुढाळे** नि पु·४ गो तं; ४ **जन्मलीं** नि; ५ **पांच** नि औं पु४ नां मुं.

३९. १ **धर्मापासाव** नि; २–३ **भीमापासव** नि; ४ **सुतसोमा** नि औं पु; ५ (–) औं पु.

४०. १ **एकेका** नि, **येका** पु४ ख नां मुं; १–३ **वीर्यशौर्यें पैं समान** औं पु; ४ (+) **ते** नि, **द्रौपदीकुसीं** खवर्ग,

जातकर्मादि[1] अनुक्रमें । चूडोपनयनादि[2] संभ्रमें ।
विधीनें संपादिलीं[3] धौम्यें । सांगोपांग सर्वांचीं[4] ॥ ४१ ॥
जाले[1] सर्वशास्त्रीं[2] निपुण । सांग करविलें वेदाध्ययन ।
अर्जुनापासोनि[3] साहीजण । अस्त्रविद्या[4] लाधले ॥ ४२ ॥
साही अतिरथी महावीर । रणपंडित योध्ये[1] चतुर ।
त्यांचा पुरुषार्थ सविस्तर[2] । सहज पुढां परिससी[3] ॥ ४३ ॥
त्यांमाजी सुभद्रेचा कुमर । प्रतापतेजें प्रभाकर[1] ।
अर्जुनगुणाब्धीचा चंद्र[2] । बहुतां गुणीं आगळा ॥ ४४ ॥
त्यातें अवलोकितां दृष्टी । अर्जुना चढे[1] स्वानंदपुष्टी[2] ।
आपुले[3] सकळ[4] विद्येची पेटी । हृदय केलें तयाचें ॥ ४५ ॥
ज्याचा पुरुषार्थ अचाट । द्रोणपर्वीं होईल प्रगट ।
ज्यासी[1] तुळावया वाट[2] । उभयदळीं[3] असेना ॥ ४६ ॥

---

४१. १ **जातिकर्मादि** औं पु·४ ख; २ **चौलोप°** औं पु मुं धु; ३ **°दिलें** नि; ४ **सुजाणें** नि, **सर्वांचें** खवर्ग.

यानंतर खवर्ग मध्यें पुढील ओवी अधिक आहे:—

**ऐसे पुत्र लाधले । जातकर्मादि केलें ।**
**नाम तयां ठेविलें । जें[1] जाणवेल[2] परोपरी ॥ ४१ ॥**

१ तें पु; २ जाणविलें पु·४ मुं.

औं मध्यें २ ते ४ चरण पुढीलप्रमाणें आहेत:—

**तयाचि नामें परिसविलीं वहिलें । जे कां कथिलीं व्यासबोलें ।**
**तेंचि तूतें निरोपीं ॥**

४२. १–२ **सर्वशास्त्रीं जाले** नि खवर्ग; ३ **°पासाव** औं पु४; ४ **धनुर्विद्या** नि, **शस्त्रास्त्र°** खवर्ग.

४३. १ **युद्ध** नि पु·४ ख; २ **विस्तार** पु४, **सविस्तार** ख नां; ३ **परियेसीं** नि, **परिसिजे** धु.

४४. १ **जो भास्कर** नि; २ **इंद्र** मुं, **कुमर** नां.

४५. १ **वाढे** गो·२; २ **स्वानंद पोटीं** गो·२; ३ **आपुली** औं पु४ ख न, मुं गो·२ रा; ४ **सर्व** नि.

४६. १ **ज्यासीं** नि; २ **वांठ** औं, **वांट** नां रा तं; ३ **उभय लोकीं** औं.

सुभद्राभगिनीचिये स्वार्थीं । रणीं आटूनि[1] कुरुसंतती ।
राज्यभोगाचिये[2] संपती[3] । स्वामी केलें तुह्मांतें ॥ ४७ ॥
तो[1] श्रीकृष्ण कृपामूर्ती[2] । गर्भीं रक्षिला परिक्षिती ।
तुझिया पूर्वजांची कीर्ती । विस्तारिली पैं[3] जेणें[4] ॥ ४८ ॥
ऐसियापरी इंद्रप्रस्थीं । धर्मराज धर्मनीती[1] ।
राज्य चालवी चक्रवर्ती । जनकादिकां[2] सारिखें ॥ ४९ ॥
हरिश्चंद्र कां[1] रामचंद्र[2] । तयांतुल्य[3] कुरुनरेंद्र ।
प्रजापाळणीं दयासमुद्र । माधुर्याचा[4] भूतळीं[5] ॥ ५० ॥
जैसी कां[1] प्रिय आपुली काया । तैसी भूतमात्रीं दया ।
विवेकविचारसत्यन्याया[2] । अर्धक्षण न विसंबे ॥ ५१ ॥
आज्ञेनें[1] नेमिले भूपाळ । करभारेसी[2] खोलती[3] सकळ ।
दुष्टदंडणीं[4] जैसा काळ । परमसेवक साधूंचा ॥ ५२ ॥
भीष्मधृतराष्ट्राची आज्ञा । परम मान्य तया प्राज्ञा[1] ।
न दाखवी वक्रतेची[2] संज्ञा । दुर्योधनादिकांसी ॥ ५३ ॥
देव गुरु आणि स्वामी । धर्मावेगळे[1] मनोधर्मीं ।
स्पर्शों नेणिजे[2] नरोत्तमीं । बंधुवर्गीं सद्भावें[3] ॥ ५४ ॥

---

४७. १ आटो नि, वोपूनि मुं, वाटुनि गो २; २ °भोगाचेनि नि, °भोगाची खवर्ग; ३ आर्ती नि, संतती औं पु ख, अर्थी धु.

४८. १ (+) पाहा मुं; २ मूर्ती मुं, गुणमूर्ती धु तं; ३-४ जेणे पैं पु ख नां मुं.

४९. १ धर्ममूर्ती ख गो; २ विदेहीजनका गो.२.

५०. १-२ श्रीरामचंद्र नि पु; ३ यातुल्य पु४ नां मुं; ४ चातुर्याचा नि; ५ भुपती नां, भूलोकीं गो.२.

५१. १ (-) औं ख, स-धु रा, सा-तं, स्व- गो.२; २ °सत्व-न्याया नि पु४ ख नां.

५२. १ आज्ञे औं पु तं; २ °भार खवर्ग; ३ वोळंघती नि, पाठविती औं पु नां मुं, वोपिती पु४ ख, वोळगती गो; ४ दुष्टदळणी पु.

५३. १ प्रज्ञा नि पु रा; २ वीःक्रमतेची पु४.

५४. १ °वेगळा धु रा तं; २ नेदिजे नि औं धु रा, नेंदि पु; ३ स्वभावें खवर्ग.

बाळमित्र[1] कृष्णार्जुन[2] । येक जीव येक प्राण ।
मृगया खेळ भोजन पान । येकत्रशयन[3] सर्वदा ।। ५५ ।।
अर्जुन ह्मणे स्वामी कृष्णा । ग्रीष्मकाळ दाखवी[1] उष्णा ।
उबारेनें[2] माझिया प्राणा । कासाविस होतसे[3] ।। ५६ ।।
सुशीतळ यमुनाजीवन[1] । तेथें करावें[2] जलक्रीडण[3] ।
तेणें होईल तापशमन[4] । समाधान जीवासी[5] ।। ५७ ।।
दिवसा करूनि[1] जळविहार । संध्याकाळीं[2] प्रवेशों नगर ।
जरी हा मानेल विचार। तरी सत्वर चालिजे ।। ५८ ।।
वचन मानलें अधोक्षजा । आज्ञा पुसोनि[1] धर्मराजा ।
सवें घेतल्या पांडवभाजा[2] । द्रौपदी आणि सुभद्रा ।। ५९ ।।
शतानुशत[1] स्त्रियांच्या पंक्ती । द्रौपदी वेष्टित चालती ।
बाळा प्रौढा प्रगल्भा व्यक्ती । साळंकार सुवस्त्रा ।। ६० ।।
वस्त्रगृहें अतिनेटकीं । दीधलीं कालिंदीतटाकीं ।
भक्षभोज्याच्या[1] अनेकीं[2] । कावडी पुढां[3] चालिल्या[4] ।। ६१ ।।
शिल्पिकारीं[1] तात्काळ[2] तेथें । सुवर्णगृहें[3] रत्नखचितें ।
शृंगारवनें सुशोभितें । पुष्पीं[4] फळीं[5] निर्मिलीं ।। ६२ ।।

---

५५. १ बाळमैत्र घु तं, बाळकृष्णां पु४, बाळकृष्ण नां मुं; २ कृष्ण अर्जुन नि, मीत्र सज्जन पु४ नां मुं, संतसज्जन ख; ३ येकशयन पु, येकशय्या औं.

५६. १ दावी औं घु तं; २ उबारोनि नि पु, उभारोनि गो, उभारेन औं तं; ३ करीतसे नि.

५७. १ °जीवनीं खवर्ग; २–३ करावी जलक्रीडणी खवर्ग; ४ °शमनी खवर्ग; ५ जीवासीं नि.

५८. १ करूं नि; २ सायंकाळीं नि.

५९. १ मागोनि औं; २ उभय भाजा नि खवर्ग.

६०. १ °शतें गो रा.

६१. १ °भोज्यें औं पु, °भोज्य पु४ नां मुं; १–२ °भोज्यशडरसेनीकिं ख; ३ पुढें नि खवर्ग; ४ चालविल्या औं ख नां गो२ रा.

६२. १ शिल्पकारीं नि औं पु; २ तत्काळ नि औं; ३ स्वर्ण° नि; ४–५ पुष्पफळीं औं पु४ नां.

यानारूढ[1] नारीनर । अवलोकिती[2] यमुनातीर ।<br>
स्थळें[3] देखोनि मनोहर । ठाईं ठाईं क्रीडती ॥ ६३ ॥<br>
येकी[1] तीरीं येकी[2] नीरीं । येकी[3] विश्रामगृहांतरीं[4] ।<br>
शृंगारवाटिकेमाझारी । स्वेछानंदें क्रीडती ॥ ६४ ॥<br>
सुभद्रा आणि याज्ञसेनी । बैसवोनी[1] नौकायानीं ।<br>
कर्णधाराचिया पत्नी । खेळविती[2] कौतुकें ॥ ६५ ॥<br>
येकी[1] मातल्या आसवपानें । करिती गायनें[2] नर्तनें[3] ।<br>
मधुरस्वरें वाजती[4] वीणे । कळा गमकें[5] दाविती ॥ ६६ ॥<br>
भक्षें भक्षिती घृतपाचितें । फळें सेविती[1] स्वादभरितें[2] ।<br>
स्वेछा[3] प्राशिती रसातें[4] । जेवीं सुधा[5] सुरवरीं[6] ॥ ६७ ॥<br>
तपनजेच्या[1] सुनीळजळीं । नीळोत्पलें सहस्रदळीं ।<br>
नीळ भ्रमरांचिया वोळी । झुंकारती सुस्वरें ॥ ६८ ॥<br>
नीलांबर बिंबलें[1] जळीं । तटें बांधिलीं[2] इंद्रनीळीं ।<br>
माजी घननीळ[3] वनमाळी । नीळकुंतळीं शिखिपत्रें[4] ॥ ६९ ॥

---

६३. १ **तेथें मिळाले** नि, **ज्या नगर** पु·४ नां, **नगरलोक** मुं, **नगरीचे** औं ; २ **अवलोकोनि** नि ; ३ **स्थळ** नि पु४ नां मुं तं.

६४. १ **एक** धु ; २ **एक** धु ; ३–४ **विश्रामले ग्रहांतरीं** धु.

ही ओवी नि खवर्ग मध्यें नाहीं.

६५. १ **बैसोनियां** नि खवर्ग ( **बैसति येकें** ख ) ; २ **खेळ खेळ°** नि, **खेळती तेथें** खवर्ग.

६६. १ **एक** नि पु४ मुं ; २–३ **गायन नर्तनें** नि ; ३ **किर्तनें** पु४ ; ४ **वाजविती** नि गो२, **वाती** धु ; ५ **गती** नि, **आंगें** गो, **झगमग** गो२. नि खवर्ग मध्यें चरणक्रम ३–२ असा आहे.

६७. १ **भक्षिती** औं पु·४ मुं ; २ **स्वानंदभरितें** पु४ ख ; ३ **स्वेच्छे** नि ; ४ **रसायनातें** खवर्ग ; ५ **सुद्धांशु** औं नां मुं, **सुधारस** ख ; ६ **चकोरीं** खवर्ग.

६८. १ **तपनतनयेच्या** नि.

६९. १ **निर्मळ** औं पु ; २ **बांधलीं** नि ; ३ **तमालनील** नि ; ४ **शिखिपिच्छ** नि, **शिखिपिछें** खवर्ग. औं मध्यें २–४ चरण पुढीलप्रमाणें आहेत:–

**पार्थ भूपाळ येकमेळीं । जलविहारकल्लोळीं ।**<br>
**नीळकुंतळीं शिखिपिछें ॥**

तमाळनीळ छाया वनीं । पडतां[१] नीळिमा आतली धरणी ।
नीळिमा[२] लागतां[३] पाषाणीं[४] । जन्म[५] गरुडपाचीतें[६] ॥ ७० ॥
कृष्णनीळिमा देखतां जनीं । नीळशामता[१] जडली नयनीं ॥
तें[२] चिन्ह[३] अद्यापि लोचनीं । जीवमात्रीं देखिजे ॥ ७१ ॥
कृष्ण[१] शाम[२] कमळनयन । जळीं क्रीडतां[३] जळक्रीडण ।
चरणस्पर्शें जळचरगण । दिव्यदेहो[४] पावती[५] ॥ ७२ ॥
सांडोनियां लोकदाटी[१] । कृष्णार्जुन[२] सरितातटीं[३] ।
बैसले[४] सुरतरुतळवटीं । तवं आश्चिर्य[५] देखिलें ॥ ७३ ॥
तप्तहाटकरंगी[१] पुरुष । पिंगटवर्ण स्मश्रुकेश ।
वेढूनियां कृष्णवास । उभा ठेला सन्मुख[२] ॥ ७४ ॥
विशाळशाळतरु[१] सरळा[२] । तैसा[३] प्रचंड[४] तेजागळा[५] ।
खदिरांगार स्त्रवती[६] डोळां[७] । तैसी[८] प्रभा[९] फांकत[१०] ॥ ७५ ॥
यज्ञोपवीत जटाधारी । ब्राह्मण प्रार्थी जोडल्या[१] करीं ।
क्षुधिता[२] मातें[३] ये अवस्वरीं[४] । भोजन[५] दीधलें[६] पाहिजे ॥ ७६ ॥

---

७०. १ **पुढती** पु॰४ ख नां मुं, **पूर्ण** औं ; २–४ **तें चिन्ह अद्यापि जीवनीं** खवर्ग ; ५–६ **जीवामात्रीं देखिजे** खवर्ग ; ६ °**पाचूचे** नि.

७१. १ **नीळश्यामता** नि ; २–३ **तीं चिन्हें** नि.
ही ओवी खवर्ग मध्यें नाहीं.

७२. १ **श्रीकृष्ण** नि ; २ **श्याम** नि ; ३ **खेळतां** नि खवर्ग ; ४ °**देह** नि खवर्ग ; ५ **पावले** नि खवर्ग.

७३. १ **लोकराहटी** नि औं नां, **लोकराहाटी** ख ; २ **कृष्ण अर्जुन** नि ; ३ **यमुनातटीं** नि ; ४ **बैसतां** नि ; ५ **आश्चर्य** नि गो॰२.

७४. १ °**हाटकवर्णी** नि ; २ **सन्मुखीं** पु.४ ख नां गो रा तं.

७५. १ **विशालताळ**° औं पु नां धु ; २ **सरळे** खवर्ग ; ३ **तैसे** खवर्ग ; ४ **बाहुप्रचंड** औं ; ५ **तेजागळे** नि खवर्ग, (**तेजाळ** औं) ; ६ **तैसे** ख नां ; ६–७ **नेत्रकमळ** औं ; ७ **डोळे** खवर्ग ; ८–१० **अंगप्रभा फांकली** नि.
ही ओवी मुं मध्यें नाहीं.

७६. १ **जोडल्यां** पु नां गो२ ; २ **क्षुधित** खवर्ग, **क्षुधा** औं गो२ ; ३ **मज** नि ; ४ **अवसरीं** नि पु४ मुं गो रा ; ५ **अन्न** पु४ ; ६ **दिल्हें** पु॰४.

राहोनि खांडववनानिकट[1] । तृप्त करावें मज यथेष्ट ।
तुह्मीं सर्वार्थीं अतिश्रेष्ठ । हें[2] परिसोनि[3] पातलों[4] ॥ ७७ ॥
श्रीकृष्ण ह्मणे ब्राह्मणोत्तमा । कवण[1] भोजनरसीं[2] प्रेमा ।
तो[3] प्रगटूनि[4] सांगतां[5] आह्मां । तृप्त[6] करीन[7] तात्काळीं[8] ॥७८॥
येरू[1] बोले यथार्थवचन । तूं तवं जाणता सर्वज्ञ ।
मी पावक हुताशन । तृप्त नोहे[2] षड्रसीं ॥ ७९ ॥
देवेंद्राचें खांडववन[1] । त्याचें केलियां[2] समूळ दहन ।
तें[3] मज इछेचें[4] भोजन । निर्मोचन रोगाचें ॥ ८० ॥
स्वशक्ती[1] करितां खांडवदहन[2] । इंद्र मोकळी[3] मेघजीवन ।
तेणें ज्वाळा होती[4] क्षीण । यत्न कांहीं चलेना[5] ॥ ८१ ॥
तुह्मीं सोडूनि[1] अस्त्रजाळा । निवारूनि मेघमाळा ।
खांडव[2] वोपिल्यां मज अनळा । आरोग्यता[3] संतुष्टी[4] ॥ ८२ ॥
तक्षक नाग शक्रमित्र[1] । तेथें वसताहे[2] सहपुत्र[3] ।
यालागीं रक्षी सहस्रनेत्र । जीवां[4] खांडववासियां ॥ ८३ ॥
ऐसें बोलतां चित्रभानु । आवेशले कृष्णार्जुनु ।
ह्मणती दाखवीं खांडववनु । करीं भक्षण मनेछा[1] ॥ ८४ ॥

---

७७. १ खांडोवना° पु ख ; २–४ म्हणोनि येथें मी आलों नि.

७८. १ कवणे नि ; २ रसीं ख ; ३ तें नि खवर्ग ; ४ प्रगट करोनि नि ; ५ (–) नि , सांग औं पु ख , सांगीजे पु४ मुं ; ६–७ सांगतां तृप्ती नि ; ७ करूं खवर्ग गो२ ; ८ तात्काळ खवर्ग.

७९. १ येरी पु४ ; २ नोव्हे नि , नठहे पु४ मुं.

८०. १ खांडोवन पु ख नां धु ; २ केलिया नि ; ३ तेंचि नि ; ४ इच्छित नि खवर्ग.

८१. १ स्वशक्ती नि ; २ खांडववनदहन नि ; ३ मोकलील नि ; ४ होतील नि ; ५ असेना खवर्ग , न चाले नि.

८२. १ सांडोनी पु४ ख ; २ °वन नि ; ३ आरोग्य होईल नि ; ४ संतुष्ट औं पु.

८३. १ सहपुत्र नि , सहस्त्रपुत्र खवर्ग ; २ वसे नि ; ३ शक्रमित्र नि खवर्ग ; ४ जीव खवर्ग.

८४. १ मनइच्छा नि ख नां गो.

मघवा मोकलूनि मेघातें । पाहों कैसा वारील तूतें ।
पुढां[1] वर्तले[2] कथेतें । उत्तराध्याइं बोलिजे[3] ॥ ८५ ॥

---

८५. १ पुढें नि खवर्ग; २ वर्तेल औं पु; ३ परिसणें नि.
यापुढें नि खवर्ग मध्यें पुढील ओंव्या अधिक आहेत:—

मग अर्जुनें काय केलें । कृष्णासि[1] नमस्कारिलें ।
स्तवनपूजे[2] आरंभिलें । अतिआदरें[3] साक्षेपें[4] ॥ १ ॥

१ श्रीकृष्णातें नि; २ °पूजन नि; ३–४ अत्यादरें करूनी नि औं.

जगन्मोहना[1] मुरारी । भक्तकाज[2] कैवारी ।
आमुचा[3] साह्यकारी[4] । परात्पर[5] परमपुरुषा[6] ॥ २ ॥

१ म्हणे जग° नि, जय जग° औं; २ तूं भक्तांचा नि; ३ पांडवांचा नि; ३–४ तूं परात्पर नरहरी औं पु; ५ ( – ) औं पु; ५–६ परमपुरुषा स्वामिया नि.

अनादि[1] परब्रह्मा । ब्रह्मादिक नेणती महिमा[2] ।
अवतरलासि[3] पुरुषोत्तमा । आह्मालागीं[4] देवराया[5] ॥ ३ ॥

१ तूं अनादि नि; २ सीमा ख मुं; ३ अवतार धरिसी नि; ४–५ आम्हां दीनांकारणें नि.

आमुचे[1] जीवींचे[2] जीवन । संकटीं रक्षिता[3] आमुचा प्राण ।
माता पिता बंधुजन[4] । तूंचि आह्मां आधार ॥ ४ ॥

१ आमुच्या नि; २ जीवांचें नि, ( – ) मुं; ३ रक्षिसी नि; ४ बंधुस्वजन औं

आह्मीं[1] दीन अनाथ । भक्तवत्सल[2] समर्थ ।
तूं[3] अनाथाचा[4] नाथ[5] । ब्रीद[6] जगीं[7] तुज[8] साजे[9] ॥ ५ ॥

१ ( + ) तुझे नि, ( + ) केवळ औं; २ ( + ) स्वामी तूं नि; ३–५ ऐसें ब्रीद सत्य सत्य नि; ६–९ जगीं एक तूं साच नि.

तूं मेघश्याम सांवळा । गळां गुंजांचिया[1] माळा ।
ह्रदईं कौस्तुभ तेजाळा[2] । शोभा देत[3] साजिरी ॥ ६ ॥

१ वैजयंती पु४ मुं; २ शोभला नि, झळाळा औं, तेजागळा मुं; ३ दिसे पु.

• तूं सुखाचा सोहळा । दीनाच्या[1] दयाळा ।
तूंचि येक मायाळा[2] । वैकुंठनायका[3] श्रीहरि[4] ॥ ७ ॥

१ आम्हां दीनाच्या नि; २ चक्रपाळा नि; ३–४ वैकुंठवासी नारायणा नि.

मुगुट रत्नखचित । श्रवणीं कुंडलें झळकत ।
कासे[1] पीतांबर शोभत । विजूसारिखा[2] झळाळी[3] ॥ ८ ॥

१ कांसे नि; २ विद्युत्प्रायें औं मुं, वीयुलते ख; ३ चमकत औं, सारीखें ख.

टीका व्यासाची मोटकी । कथा वनितांमाजी[1] नेटकी ।
श्रवणवेधास्तव त्रिलोकीं[2] । विश्वमोहनी बोलिजे ।। ८६ ।।
लीळाविश्वंभर[1] सद्गुरु[2] । सकळ सिद्धांचा[3] ईश्वरु ।
बोलवी[4] तितुकें[5] मुक्तेश्वरु । निरोपीत[6] भारतीं ।। ८७ ।।

इति श्रीभारते आदिपर्वणि अष्टचत्वारिंशोऽध्यायः ।।

---

श्रीनिवास[1] मुकुंद[2] । आदि[3] तूं परमानंद[4] ।
गोपीजीवनआनंदकंद[5] । श्रीअनंता[6] तूं[7] ।। ९ ।।

१-२ श्रीनिवासा मुकुंदा नि ; ३ (+) अंतीं औं पु ; ४ °नंदा. नि ; ५ गोपीजनानंदकंदा नि ; ६-७ श्रीकांता अनंता नि.

लक्ष्मीनिवासपरात्परा[1] । परमपुरुषा श्रीधरा ।
वैकुंठनिवाससारंगधरा[2] । गरुडध्वजा जगदीशा ।। १० ।।

१ लक्ष्मीवासा परात्परा नि ; २ आदि अनादि विश्वंभरा नि.

ऐसी[1] स्तुती[2] करितां । श्रीकृष्ण[3] जाला[4] बोलता[5] ।
आरंभीला[6] तत्वता । अतिप्रेमें करूनी ।। ११ ।।

१ (+) अर्जुनें औं ; १-२ ऐसें स्तुति स्तवन नि ; ३-५ श्रीकृष्णें आश्वासिलें पार्था नि ; ६ आलिंगिलें नि.

याच्या पुढें ख मध्यें पुढील ओवी अधिक आहे:-

हृदयहृदयस्थ बोलणें । वाउर भेद दाउनी स्तवनें ।
हां गा अर्जुना वाण्य वाणनें । कैंचें सरे तुज मज ।। १२ ।।

८६. १ वर्णितां मज औं, वानितां मज पु; २ तीं लोकीं नि, त्रैलोकीं पु४ मुं धु तं. गो मध्यें ही ओवी नाहीं. औं पु मध्यें चरणक्रम ३-२ असा आहे.

८७. १-२ गुरु लिळावीस्वांभरु ख ; ३ सिद्धांचे नि, सीद्धिचा ख गो ; ४ बोलती नि ; ४-५ बोलविती कौतुकें औं पु ; ६ निरोपणनीति औं नां, निरोपनीति ख, निरोपण मुं.

श्री

## अध्याय एकुणपन्नासावा

### श्रीगणेशाय नमः

कुरुराज चतुर[1] चक्रवर्ती[2] । जन्मेजया धरत्रीपती[3] ।
ह्मणे[4] वैशंपायना सुमती । शिरोमणी[5] वक्तयां[6] ॥ १ ॥
जाळावया खांडवारण्य[1] । वैश्वानरा काय कारण ।
हें विस्तारें करीं कथन । मजप्रती व्यासाज्ञा[2] ॥ २ ॥
वक्ता[1] ह्मणे नरेंद्रमौळी । श्वेतकी[2] राजा भूमंडळीं[3] ।
ऐश्वर्यवंत जैसा बळी । महादानी[4] धर्मात्मा ॥ ३ ॥
तेणें मांडिलें दीर्घसत्र[1] । द्वादशवर्षी[2] पवित्र ।
ऋषी मीनले विद्यापात्र । वेदत्रई[3] जाणते ॥ ४ ॥
ऋत्विज नेमिले[1] श्रेष्ठ श्रेष्ठ । जैसे अगस्ती कां वसिष्ठ ।
दक्षणादानीं[2] सुखसंतुष्ट[3] । सर्व केले नरेंद्रें ॥ ५ ॥
द्वादशवर्षें करितां यज्ञ । श्रम पावले[1] ऋत्विजगण ।
धूम्रें क्षीण जाले नयन । तेणें पीडा पावले ॥ ६ ॥

---

१. १ ( – ) नां गो·२ ; १-२ **चक्रचतुरमूर्ती** पु ख मुं, **चक्रचतुर्मूर्त्ती** पु४ ; ३ **धरित्री°** नि तं ; ४ ( – ) पु४ ख मुं ; ५–६ **विज्ञापना परिसिजे** नि ; ६ **वक्तया** औं पु४ ख नां मुं गो२.

२. १ **खांडववन** नि ख नां मुं ; २ **सर्वज्ञा** नि खवर्ग.

३. १ **मुनी** नि ; २ **श्वेतकीनाम** नि, **श्रुतकीर्ति** औं पु मुं, **श्वेतकेतु** पु४ ; ३ **भूतळीं** नि ; ४ **महाउदार** नि, **महोदधी** मुं.

४. १ **महासत्र** नि खवर्ग ( नां प्रसंप्रा ) ; २ **द्वादशवार्षिक** नि, °**वर्षें** औं पु·४ ख , °**वर्षकी** नां ; ३ °**त्रयी** स पु नां रा.

५. १ **मीनले** नि पु४ नां ; २ **दक्षिणा°** नि औं तं ; ३ **सुखी संतुष्ट** नि , **संतुष्ट** औं पु·४ मुं.

६. १ ( + ) **अवघे** मुं.

नेत्रीं लागल्या[1] जळधारा । उष्णता[2] पातली[3] शरीरा ।
मग सांगती राजेश्वरा । शक्ति आमुची खुंटली[4] ॥ ७ ॥
देखोनि ब्राह्मणाच्या श्रमा । रायें समाप्ति[1] केली[2] होमा ।
ऋत्विज गेले पैं[3] स्वाश्रमा[4] । चक्षुवेथेकरूनी[5] ॥ ८ ॥
यावरी[1] शतयेक[2] संवत्सर । लोटल्यां[3] श्वेतकी राजेश्वर ।
पुढती[4] करावया[5] अध्वर । हांव[6] बांधे[7] मानसीं ॥ ९ ॥
ह्मणोनि पातला याजकांप्रती[1] । ऋत्विज होऊनि[2] कृपामूर्ती ।
याग संपादा हे विनंती । वारंवार करीतसे ॥ १० ॥
ऋषी[1] बोलती सखेद शब्द । दृष्टी निःशेष जाली[2] मंद ।
शक्तिहीन आह्मी वृद्ध । क्लेश आतां न टकती[3] ॥ ११ ॥
राजा ह्मणे महाभागा । सेवेसि चुकलों नाहीं मागां ।
उदास करूनि[1] ह्मणा[2] यागा । करूं[3] न[4] सकों[5] हें[6] काय[7] ॥१२॥
कृपा करूनि मज दीनातें । स्वहस्तें संपादा यज्ञातें ।
जे जे[1] इच्छा असेल तुमतें[2] । ते स्वमुखें निरोपा ॥ १३ ॥
अत्याग्रहीं[1] पडोनि राजा । वारंवार विनवी द्विजां ।
कांहीं क्रोधाचिया तेजा । स्पर्श केला तेकाळीं ॥ १४ ॥

---

७. १ लोटल्या औं पु ; २–३ उष्ण पातलें औं पु ख , उष्णें तापलें ब्रह्म पु४ ; ४ कुंठली गो·२.

८. १–२ समाप्त केलें नि औं पु४ नां ; ३ (–) नि औं गो२ ; ४ निजाश्रमा नि , आश्रमा पु·४ ख मुं गो ; ५ चक्षुव्यथेकरूनियां नि , °करितां पु·४ मुं.

९. १-२ लोटल्या एक नि ; ३ पुढें नि ; ४–५ करावया महा नि ; ६ हाव नि औं पु४ ख नां ; ७ बांधी नि , बाधे गो२ रा.

१०. १ याजकाप्रति नि ; २ हो गो२.

११. १ ऋत्विज नि , ऋषेश्वर मुं ; २ झालीसे नि ; ३ होती नि.

१२. १–२ होवोनि माझिया नि ; २ ह्मणी पु , ह्मणे पु४ ख नां गो२ ; ३–५ न करूं म्हणा नि ; ५ शके पु·४ ख ; ६–७ हे वाक्यें औं पु·४ ख नां.

१३. १ (–) नि ; २ तुम्हांतें नि ख मुं गो·२ ; ३ आज्ञा ख.

१४. १ मग आग्रहीं पु४ मुं , मग आत्यग्रहीं ख.

जालियां[1] आज्ञेचें[2] उत्तर[3] । आणिक ऋत्विज ऋषेश्वर ।
प्रार्थूनि[4] माझा[5] हा अध्वर । संपादीन प्रयत्नें ॥ १५ ॥
ऐकोनि ब्राह्मणीं कोपिजे । ह्मणती अवस्य आळस[1] न कीजे ।
सांगों[2] त्या[3] रीती वर्तिजे । यागसिद्धीकारणें ॥ १६ ॥
जाऊनि कैलासगिरिवरा । तपें तोषवीं[1] श्रीशंकरा ।
सिद्धी पाववील अध्वरा । याजक[2] होऊनि[3] निजांगें[4] ॥ १७ ॥
आज्ञा होतांचि[1] नरेशा[2] । श्वेतकी पातला[3] कैलासा ।
नमस्कारूनि व्योमकेशा । तपश्चर्या मांडिली ॥ १८ ॥
निराहार निरोदक[1] । इंद्रियनेमें निजनिष्टंक[2] ।
तपोबळें त्रिपुरांतक । प्रसन्न[3] करूं[4] मांडिला[5] ॥ १९ ॥
द्वादश अथवा षोडशदिनीं । फळीं[1] मूळीं[2] स्वल्पजीवनीं ।
प्राण रक्षूनि अनुष्ठानीं । अहोरात्र तिष्ठतु ॥ २० ॥
पातया पातें न लवीत[1] नयनीं । ऊर्ध्वबाहू येकचरणी ।
वृक्ष तैसा[2] निश्चळ धरणी[3] । शिवस्मरणीं सर्वदा ॥ २१ ॥
षण्मास जालियां[1] तपश्चर्या । करुणा आली कैलासराया ।
ह्मणे प्रसन्न जालों सखया । माग वेगीं वरातें ॥ २२ ॥

---

१५. १–२ **आज्ञेचें झालिया** नि; ३ **निरुत्तर** नि मुं, **निरोत्तर** औं पु·४ ख; ४–५ **आणूनियां** नि औं, **अर्पूनियां** पु४ ख मुं, **अर्जुनियां** पु.

१६. १ **आलस्य** खवर्ग; २ **सांगोन** औं पु·४ ख; ३ **ते** नि.

१७. १ **तोषवी** नि, **तोषवा** पु, **तोषविजे** औं नां; २–४ **ऋत्विज होवोनियां** नि.

१८. १–२ **होतां नरवरेशा** नि; ३ **पावला** नि.

१९. १ **निरुदक** नि; २ °**निष्टक** नि; ३–५ **आराधिला सद्भावें** गो·२; ५ **आदरिला** नि.

२०. १–२ **फळमूळ** औं पु·४ मुं, **फळाहारीं** नि; २ **पुष्पीं** नां.

२१. १ **लावी** नि मुं, **लवितां** धु, **लवीच** ख, **लवी** औं पु·४ गो·२; २ **जैसा** औं पु ख मुं धु; ३ **धरणीं** नि धु.

२२. १ **झालिया** नि, **जालेया** गो·२.

राजा ह्मणे आत्मलिंगा । आरंभ करीतसें महायागा ।
ऋत्विज होऊनि उमारंगा । संपादिलें[1] पाहिजे ॥ २३ ॥
हांसोनि बोले त्रैलोक्यराज । हें तवं[1] नव्हे[2] आम्हुचें काज ।
माझेनि वरप्रदानें सहज । याग पावेल सिद्धीतें ॥ २४ ॥
प्रस्तुत सांगतसें नेम[1] । तो[2] चालवीं अतिउत्तम[3] ।
तेणें होसील पूर्णकाम । हें निर्धारें जाण पां ॥ २५ ॥
कुंजरशुंडाप्रमाणचतुरा[1] । अखंड न खंडतां[2] घृतधारा ।
द्वादश वर्षें वैश्वानरा । तृप्त[3] तुवां करावें ॥ २६ ॥
त्यावरि[1] आलियां[2] माझे भेटी । जे[3] कामना[4] असेल पोटीं ।
ते मी पुरवीन धूर्जटी[5] । हें साचार मानी[6] पां ॥ २७ ॥
ईश्वरें कथिलें त्याचिपरी । पावक अर्चिला वसुधारीं[1] ।
पुढती येऊनि त्रिपुरारी । मनोभावें वंदिला ॥ २८ ॥
शंकर ह्मणे माझिया[1] अंशी[2] । अत्रिपुत्र[3] दुर्वासऋषी ।
ऋत्विज होऊनि तव[4] यज्ञासीं । संपादील सामर्थ्यें ॥ २९ ॥

---

२३. १ **संपादिला** नि औं ख.

२४. १ (–) नि ; २ **नोहे** औं पु गो२.

मुं मध्यें या ऐवजीं पुढील ओवी आहे:—

**माझें वरप्रसादें ते । याग पावती सिद्धीतें ।**
**यागीं संतुष्टोनि भक्तीतें । इच्छिलें फळ देतसे ॥ २४ ॥**

२५. १ **योग उत्तम** मुं ; २ **तोच्चि** खवर्ग ( **तेचि** पु४ ) ; ३ **तूं सुगम** मुं.

२६. १ **°शुंडादंडप्रमाण°** खवर्ग ( नां प्रसंप्रा ), **°शुंडासमान°** धु ; २ **खंडे** पु४ ख ; ३ **हृदयांत** पु·४ मुं.

२७. १ **यावरी** खवर्ग ; २ **आलिया** नि , **आलेया** गो·२ ; ३–४ **जे कां मानलें** मुं ; ५ **धूर्जटी** नि मुं ; ६ **जाण** ख.

२८. १ **वसोधारीं** नि , **वसुधारीं** औं पु नां मुं धु तं.

२९. १ **माझिये** नि औं पु४ ख गो तं ; २ **अंशीं** नि नां , **वंशी** ख गो·२ , **ऐसी** औं पु·४ मुं ; ३ **आत्रेय** पु·४ ख ; ४ (–) खवर्ग.

ऐसें बोलोनि विश्वनाथें । आज्ञापिलें दुर्वासातें[1] ।
रायें मांडिलें सत्रातें । समारंभें तेकाळीं ॥ ३० ॥
ऋषी पातले अपार । सदस्य मीनले थोरथोर ।
हवी[1] प्राशितां[2] वैश्वानर । तृप्त जाला अपाडें ॥ ३१ ॥
रत्नधनाचे गिरिवर[1] । धेनु वस्त्रें अश्व[2] कुंजर ।
दक्षणादानीं[3] ऋषेश्वर । अभर[4] केले नरेंद्रें ॥ ३२ ॥
संपादूनि त्या[1] अध्वरा । राजा पातला निजनगरा[2] ।
संतोषऊनि नारीनरां । आशीर्वाद घेतले ॥ ३३ ॥
तेणें सुकृतें नृपसत्तमा[1] । त्यागूनि मनुष्यदेहाची[2] प्रतिमा ।
पावला अक्षय स्वर्गधामा । श्वेतकेतु[3] या रीती[4] ॥ ३४ ॥
हवी[1] प्राशिलें अपार । कुपथ्यें निरोधिलें उदर ।
व्याधीं[2] व्यापिला[3] वैश्वानर । कासावीस होतसे ॥ ३५ ॥
आहुती घ्यावया आणिके[1] यज्ञीं । अरुचि पडली उभय[2] वदनीं ।
देह आतला पांडुरवर्णी । निचेष्टित निस्तेजें[3] ॥ ३६ ॥
ब्रह्मयाप्रती[1] येऊनि वेगें म्हणे शरीर व्यापिलें रोगें ।
परिहरे[2] तो उपाय सांगें । तूं समर्थ सर्वार्थी[3] ॥ ३७ ॥

---

३०. १ दुर्वासयातें औं पु.

३१. १ हविष्य नि , हविष औं मुं ; २ भक्षितां नि.

३२. १ डोंगर ख ; २ वाजी नि औं पु·४ मुं , गज नां रा तं , रथ गो·२ ; ३ दक्षिणा° नि औं पु४ ख ; ४ सुखी नि खवर्ग ( आभार ख ).

३३. १ ( – ) नि खवर्ग ( नां प्रसंप्रा ) ; २ स्वनगरा नि.

३४. १ नरेंद्रोत्तमा नि, नरसत्तमा औं पु·४ घु , नरसंतमा ख नां , नरोत्तमा मुं ; २ मनुष्य स ; ३ श्वेतकी राजा नि ; ४ परी नि खवर्ग ( नां प्रसंप्रा ).

३५. १ हविष्य नि , हविष औं मुं ; २–३ त्या व्याधीनें नि.

३६. १ आणिका नि ; २ ( – ) नि ; ३ निस्तेज नि मुं गो२.

३७. १ ब्रह्मयातें नि ; २ परिहारे नि पु४ घु ; ३ सर्वांसीं नि.

ऐकोनी बोले पद्मयोनी । दिव्य औषधी खांडववनीं ।
त्या[1] भक्षिल्या रोगबंधनीं । मुक्त होसी[2] पावका ॥ ३८ ॥
खांडव दाहिल्यां[1] वैश्वानरा । अंतरीं दुष्टरोगाचा थारा ।
भस्मेल ज्यापरी[2] संसारा । नाश हरिहरचिंतनें[3] ॥ ३९ ॥
ऐसें बोलतां चतुरानना[1] । पावक पातला[2] खांडववना[3] ।
दग्ध करितां सहस्रनयना[4] । जाणवलें तात्काळीं ॥ ४० ॥
ऐरावताचे दूत करटी[1] । प्रेरिता जाला कोट्यानकोटी ।
शुंडातोय[2] भरोनि वृष्टी[3] । करिते जाले पावकीं ॥ ४१ ॥
बहुशीर्षांचे[1] नाग बळिष्ट । मस्तकीं घेऊनि उदकघट ।
सिंपोनियां हव्यवाट । शांत केला क्षणार्धें ॥ ४२ ॥
अवमानला हुताशन । न चले बळ अथवा यत्न ।
ब्रह्मयाप्रती दीनवदन । क्लेश सांगे मागुती[1] ॥ ४३ ॥
श्रष्टा[1] सांगे उपाय गहन । भूतळीं नर आणि[2] नारायण ।
देहधारी कृष्णार्जुन । देवकार्या अवतरले ॥ ४४ ॥
त्यासी[1] जाऊनियां शरण । मागोनि घेईं खांडववन ।
तिहीं[2] अंगिकारिलियां विघ्न । करूं न शके सुरेंद्र ॥ ४५ ॥
ऐसें बोलतां कमळासन[1] । यमुनातटीं[2] कृष्णार्जुन ।
त्यांप्रति येऊनि[3] हुताशन । बद्धपाणी विनवितु[4] ॥ ४६ ॥

---

३८. १ **तें** नि पु, **ते** औं पु४ मुं ; २ **पावसी** नां धु.
३९. १ **दाहिल्या** नि; २ **जैसा** नि; ३ **हरिहरकीर्तनें** खवर्ग ( नां प्रसंप्रा ).
४०. १ °**ननु** नि ; २ **पावला** नि पु मुं ; ३ °**वनु** नि; ४ °**नयनु** नि.
४१. १ **किरिटी** औं पु मुं, **किरटि** पु४ ख गो.२ ; २ **शुंडा** नि खवर्ग ( नां प्रसंप्रा ) ; ३ **तोयवृष्टी** नि खवर्ग ( नां प्रसंप्रा ).
४२. १ **बहुवर्णांचे** औं पु ख, **बहुफणांचे** मुं.
४३. १ **मागुता** औं पु, **मागुतीं** नां गो.२ रा
४४. १ **स्रष्टा** नि औं, **श्रेष्ठ** पु.४ नां, **श्रेष्ट** धु गो.२ ; २ (–) औं पु ख.
४५. १ **त्यांसीं** नि रा ; २ **तेहीं** पु४ मुं रा तं.
४६. १ **चतुरानन** नि ; २ **यमुनातीरीं** नि, **यमुनाजळीं** रा ; ३ **जाऊनि** नि ; ४ **विनवीत** नि औं पु.४ गो रा.

वर्मे बोधितां[1] प्रजापती । आशेनें पावलों[2] तुह्मांप्रती ।
कृपा करूनि उभयमूर्ती । खांडवभक्ष[3] मज द्यावें ॥ ४७ ॥
अर्जुन बोले अभयवचन । तूतें वोपिलें खांडववन ।
यया[1] बोला नाहीं आन । करीं भक्षण मनेच्छा[2] ॥ ४८ ॥

---

४७. १ बोधवितां नि; २ आलों नि, पातलों खवर्ग (नां प्रसंप्रा) गो॰२ रा; ३ °भक्ष्य नि, खांडवभोजन औं पु, खांडवन पु४.

नि खवर्ग यामध्यें पुढील ओव्या जास्त आहेत:—

मग[1] अग्नीनें कृष्णासि देखोन । केलें साष्टांग नमन ।
ह्मणे तूं[2] ब्रह्म परिपूर्ण । परब्रह्म[3] पूर्णत्वें ॥ ४७ अ ॥

१ (–) नि औं; २ (–) नि; ३ परमतत्व औं, सर्वसाक्षी ख.

तूं भक्तकाजकैवारी । मुरुमर्दन[1] मुरारी ।
वेगीं होई साहाकारी[2] । मजलागीं जनार्दना ॥ ४७ आ ॥

१ °मर्दना तूं नि; २ साह्यकारी नि.

परमपुरुषा जगदीशा । तूंचि एक परेशा ।
जगदात्मया सर्वेशा । आत्मरूपा[1] ॥ ४७ इ ॥

१ (+) तूं नि ख मुं.

मेघश्याम सांवळा । आपाद रुळे[1] वनमाळा ।
तेजप्रकाश[2] सोज्वळा[3] । घननीळा श्रीकृष्णराया[4] ॥ ४७ ई ॥

१ रुळती नि; २–३ कासे पीतांबर पीवळा औं; ४ श्रीकृष्णा नि औं.

अनंतगुणपरिपूर्णा । सच्चिदानंदा गुणनिधाना[1] ।
कृपासिंधु करुणाघना[2] । लक्ष्मीपती[3] नारायणा[4] ॥ ४७ उ ॥

१ गुणैकघना नि; २ गुणनिधाना नि, अनाथदीना औं; ३–४ लक्ष्मीवरा जगदीशा नि, लक्ष्मीनिवासा श्रीहरी औं.

वरील ई व उ ओव्यांची नि मध्यें अदलाबदल आहे.

ऐसी स्तुती करितां हुताशन । श्रीकृष्ण जाला सुप्रसन्न[1] ।
हस्तक[2] मस्तकीं ठेऊन । अभय देत श्रीहरी ॥ ४७ ऊ ॥

१ प्रसन्न नि औं पु; २ हस्त नि औं पु मुं.

४८. १ इया नि मुं, येया नां; २ मनइच्छा नि.

वेऊनि निर्जरांचा भार । युध्या[1] आलियां[2] सुरेश्वर ।
पराभवीन जेवीं[3] जळधर । महावात विध्वंसी ॥ ४९ ॥
देवतायुद्धीं मानवशस्त्रें । अभंग उरावीं[1] खडतरें ।
ऐसिया[2] आशंकेचें वारें । स्पर्शो नेंदणें[3] मानसा[4] ॥ ५० ॥
अस्त्रें असती[1] दिव्यरूप । परी त्यां[2] योग्य नाहीं चाप ।
युद्धीं आवरी खटाटोप । ऐसा रथही असेना ॥ ५१ ॥
दुष्टदंडक[1] हा[2] श्रीपती । या[3] योग्य शस्त्र[4] नाहीं हातीं[5] ।
असो आतां भलतया[6] रीती । कार्य तुझें संपादूं ॥ ५२ ॥
ऐकोनि बोलिजे अनळमित्रें[1] । मी देईन दिव्य शस्त्रें[2] ।
वज्र प्रेरितां सहस्रनेत्रें । तेंही[3] भंगे[4] जयांसी ॥ ५३ ॥
विजयनामा[1] अतिसुतेज । रथ वोपीन वानरध्वज ।
चक्रीं[2] मित्र[3] नक्षत्रराज । जडले तैसे भासती ॥ ५४ ॥
अभंग चाप अक्षई[1] भाते । वरुणदत्त देईन तूतें ॥
विधीनें वोपिले सोमातें । दानवहननाकारणें[2] ॥ ५५ ॥
ऐसें बोलोनि तियेकाळीं[1] । बुडी देऊनि यमुनाजळीं ।
क्षणें[2] पातला वरूणाजवळीं । वृत्तांत[2] सांगे तयातें ॥ ५६ ॥

---

४९. १ **युद्धा** नि औं मुं रा ; २ **आलिया** नि मुं ; ३ **जेंवी** नि , **जेवी** स.

५०. १ **कैसीं उरती** नि , **खडतरती** औं पु·४ , **खडतर** ख ; २ **ऐसें** नि औं पु·४ ख ; ३ **नेदी** नि ख मुं , **नेंदी** औं पु·४ , **पाहे** गो , **नेणे** रा ; ४ **मानस** नि मुं , **मानसीं** पु , **मानसें** औं पु४.

५१. १ **अति** औं पु४ मुं ; २ **तयां** नि नां.

५२. १ **दुष्टा दंडक** औं पु ख ; २ ( – ) नि खवर्ग तं ( नां प्रसंप्रा ) ; ३ **परि या** नि ; ४ **अस्त्र** नि पु४ मुं ; ५ **हस्तीं** नि ; ६ **भलते** औं गो·२.

५३. १ **अनिळ**° औं ख नां मुं धु गो·२ रा तं ; २ **अस्त्रें** नि ; ३–४ **न होय भंग** नि.

५४. १ **विजई नामा** औं पु·४ ख गो२ रा ; २–३ **उभयचक्रीं** औं पु मुं , **उभयेक्षेत्री** पु४.

५५. १ **अक्षय** नि ; २ **दानववधाकारणें** पु४.

५६. १ **तये**° नि पु४ मुं गो· ; २ **क्षिणें** पु४ गो ; ३ **व्रतांत** औं पु४ मुं–

ह्मणे उदारा जळेश्वरा । पश्चिमदिग्वधूच्या[1] वरा ।
सुधावासिया रत्नाकरा । लोकपाळा परियेसीं ॥ ५७ ॥
बळें भूभार उतरावया । धर्म आणि[1] साधु स्थापावया ।
विष्णुअंशें[2] देवकार्या । धरातळीं अवतरले ॥ ५८ ॥
येक नारायण येक नर । श्रीकृष्ण[1] आणि अर्जुनवीर ।
त्यांसी चालवीं मित्राचार । दिव्यास्त्रांतें[2] देऊनी ॥ ५९ ॥
दानववधालागीं पूर्वी । गांडीव निर्मिलें ब्रह्मदेवीं[1] ।
अक्षय[2] भाता[3] ठेविला[4] ठेवी[5] । दिव्यास्त्रांची[6] स्वहस्तें[7] ॥६०॥
दिव्यरथ वानरकेतें[1] । स्रष्ट्यानें[2] वोपिला[3] सोमातें ।
सोमें सर्व सामग्री[4] तूतें[5] । स्नेहभावें[6] अर्पिली[7] ॥ ६१ ॥
ते[1] तूं देईं अर्जुनातें । तो फेडील भूभारातें ।
संतोष वाटेल[2] हरिहरांतें । तेही तूतें मानवती ॥ ६२ ॥
कौमोदकी प्रचंड गदा । सुदर्शन[1] चक्रायुधा ।
भावें अर्पूनि गोविंदा । येश[2] घेईं सभाग्या ॥ ६३ ॥

---

५७. १ **पश्चम**° खवर्ग ( औं प्रसंप्रा ) धु.

५८. १ (–) नि खवर्ग ( नां प्रसंप्रा ) गो·२ रा ; २ **कृष्णार्जुन** नि, °**अंश** खवर्ग.

५९. १ **कृष्ण** नि ; २ **दिव्य अस्त्रें** नि मुं.

६०. १ **असे देवीं** नि ; २ **आणि** नां धु ; ३ **भाते** नि औं पु·४ ख गो, **बीजें** धु नां ; ४ **ठेविले** नि औं पु४ गो, **निर्मिलीं** नां धु ; ५ **पाही** धु नां ; ६ **दिव्यास्त्रें** औं पु४ ख मुं ; ६–७ **सुवर्णकवचीं वेष्टिले** नि.

६१. १ °**केतुसहितें** औं पु ; २ **श्रेष्ठत्व** नि, **श्रेष्ठ्यानें** पु·४ ख, **श्रेष्ठेनें** नां धु गो·२ रा, **श्रद्धेनें** मुं ; ३ **ओपिलें** नि ; ४ **सामग्रीसीं** नि औं पु·४ रा, **सामग्रीतें** मुं धु गो ; ५ (–) मुं धु ; ६ **स्नेह**° नि औं पु ख मुं तं ; ७ **अर्पिला** औं पु·४ धु.

६२. १ **तें** नि पु·४, **तो** ख ; २ **होईल** नि.

मुं मध्यें ३ व ४ चरण पुढीलप्रमाणें आहेतः—

**तोही तुझ्या उत्तीर्णतें । फेडिल येच अवसरीं ॥**

६३. १ **सुदर्शना** नां गो२ रा ; २ **यश** नि पु·४ मुं तं.

संतोषोनि जळचरनाथ[1] । चाप तूणीर अमोघ रथ ।
देऊनि स्वाहास्वधेचा कांत । बोलविला सन्मानें ॥ ६४ ॥
सीघ्र[1] येऊनि पार्थाप्रती । गांडीवचाप दिधलें हातीं ।
दिव्य स्वर्गाचीये[2] दीप्तीं । भानुतेज लोपलें ॥ ६५ ॥
जें जें अस्त्र कल्पिजे युद्धीं । तें तें प्रसवे तूणीरनिधी[1] ।
जैसी[2] शास्त्रज्ञाचां[3] वादीं[4] । शब्दमाळा न खंडे ॥ ६६ ॥
वानररूपी त्रिलोचन । ध्वजीं बैसला विराजमान ।
जयाची गर्जना परिसोन । महाप्रळयो जगातें[1] ॥ ६७ ॥
उच्चैश्रवातें[1] जिंकिती त्वरें । तैसे च्यारी[2] वारु जुंपिले धुरे ।
सिंधुमेघाचेनि गजरें[3] । महा गर्जना जयांची ॥ ६८ ॥
नमस्कारूनि रुक्मिणीपती । गदाचक्र वोपिलें[1] हातीं ।
सारथी होऊनि बैसला रथीं । मुख्यासनीं अर्जुन ॥ ६९ ॥
मस्तकें नमूनि हुताशना । करूनि[1] रथासि[2] प्रदक्षणा[3] ।
आसनीं बैसतां अर्जुना । वीरश्रिया वरियेलें ॥ ७० ॥
शस्त्रबळ वाहनबळ[1] । लाहोनि दोघे उतावेळ[2] ।
निकट बैसऊनि अनळ[3] । खांडववना पातले ॥ ७१ ॥

---

६४. १ जलधर° नां धु, जळनीधिनाथ पु४.

६५. १ थडीसी नि; २ तेजाच्चिये नि, स्वर्गाच्चिये नां गो रा, शस्त्राच्चिये धु, स्वर्गाची दे तं.

६६. १ तूणीरसंधी नि, कल्पायुधि पु४, नीरावधी ख, नवनिधी मुं; २ जेंवी नि; ३–४ शास्त्रज्ञाचे संवादी नि खवर्ग ( नां प्रसंप्रा ).

६७. १ भूतांतें नि, जिवांतें गो२.

६८. १ उच्चैःश्रव्यातें नि; २ ( – ) नि; ३ सरें नि.

६९. १ दिधलें मुं.

७०. १–३ मग रथासि करून प्रदक्षिणा नि.

७१. १ वहन° नि औं पु मुं; २ उतावीळ औं पु·४ मुं गो·२ रा, अवेळ ख; ३ अनिळ पु·४ रा.

समीप निश्चळ करूनि[1] रथा । ह्मणती स्वामिया[2] वन्हिनाथा[3] ।
भक्षणीं[4] वेग[5] करीं[6] आतां । मागां[7] पुढां[8] न विचारीं[9] ॥ ७२ ॥
ऐसी होतां अभयवाणी । ज्वाळा धडकल्या चौकोनी[1] ।
धूम[2] सुसाटें भरला गगनीं । पक्षियां पळणी मांडली[3] ॥ ७३ ॥
गगनीं वाढला[1] कनकाचळ । तैसे येकवटले[2] ज्वाळ ।
माजी कोंडले जीव सकळ । निर्गम कोण्हा दिसेना ॥ ७४ ॥
प्रार्थूनि बोलिजे[1] द्विजपावकें । खांडववनीं वसे[2] जितुकें ।
येक न्यून नव्हतां[3] मुखें । म्यां भक्षिलें पाहिजे ॥ ७५ ॥
तरीच पावेन[1] अक्षय तृप्ती । उदरीं[2] होईल रोगनिवृती[3] ।
भुवनत्रई तुमची कीर्ती । विस्तारेल वीर हो ॥ ७६ ॥
अवश्य ह्मणोनि विजई पार्थ । परिघीं[1] घातला बाणावर्त[2] ।
कृष्णचक्र फेरे देत । भोवों लागलें चौफेरी ॥ ७७ ॥
जीव पळों[1] जाती जिकडे । रथाचा[2] वेग पावे तिकडे ।
शरीर[3] छेदूनि दुधडें[4] । बळें होमी[5] हुतांशीं ॥ ७८ ॥

---

७२. १ (–) ख ; २ **स्वामी** औं पु·४ मुं ; २–३ **स्वहास्वधेच्या नाथा** नि ; ४ **भक्षण** नि औं पु ख नां, **भक्षावया** मुं ; ५ **वेगें** नि, **वेगी** ख ; ५–६ **करात्रें जी** औं ; ७–८ **मागेंपुढें** नि खवर्ग ; ९ **पाहें** नि.

७३. १ **चहूंकडूनी** नि, **चहुंकोणी** पु, **चहुंकोनी** औं ख मुं ; २ **धूम्र** नि औं पु·४ मुं ; ३ **मांडिली** नि औं पु४ मुं रा.

७४. १ **विरूढला** नि धु, **चढला** ख ; २ **प्रजळले** औं पु, **प्रज्वळले** पु४ ख मुं.

७५ १ **बोलें** पु४ ख नां मुं गो रा तं ; २ **जीव** औं, **दिसे** पु४ ख मुं ; ३ **न होतां** नि पु४.

७६. १ **पाविजे** पु४ ; २ **हृदयीं** नि ; ३ °**निवृत्ती** नि औं पु मुं तं.

७७. १ **परिघ** नि, **प्रसिद्ध** पु·४ ख मुं ; २ **बाण आवर्त** पु·४ मुं, **बाणपर्वत** नां धु.

७८. १ **पळोनि** नि खवर्ग ( नां प्रसंप्रा ) ; २ **बाणाचा** नि, **चक्राचा** पु ; ३ **शिरें** नि, **शीर** औं पु ख मुं गो२ तं, **शर** पु४ ; ४ **धडमुंडें** ख ; ५ **होमिती** औं पु गो२.

शशक[1] जंबूक वृक[2] मार्जार[3] । रुक्ष वानर अरण्यसूकर[4] ।
चित्ते[5] चितळें[6] तरस तगर । सैरावैरा धांवती ॥ ७९ ॥
गवे रोही कृष्णसारंगें[1] । खड्गमृगें[2] कस्तुरीमृगें[3] ।
सुरभी धेनुवा[4] लगबगें[5] । झडा[6] देती पळावया[7] ॥ ८० ॥
कुंजर करिणी सिंह शार्दूळ । शरभपक्षी महाविशाळ ।
गंडभैरवाचे[1] मेळ । वन्हिवग्रीं[2] कोंडले[3] ॥ ८१ ॥
जवादी[1] प्रसवतीये[2] बिडाळीं[3] । वन्ही चर्चिला सुपरिमळीं[4] ।
सुवर्णमूषकाचिये[5] बिळीं[6] । चिचुंदरी[7] दडाल्या[8] ॥ ८२ ॥
कृष्णागर हरिचंदनें[1] । कर्पूरकर्दळीदमनकवनें[2] ।
जळतां सुवासमहापवनें[3] । मळयाचळ[4] पळविला[5] ॥ ८३ ॥

---

७९. १ **सबे** पु, **शेष** पु४; २ **व्याघ्र** नि; ३ **मार्जर** खवर्ग (औं प्रसंप्रा); ४ **मर्कट अपार** नि, **अपार** औं पु·४ ख मुं; ५ **शूकर** नि पु·४ ख मुं; ६ **चितळ** नि औं ख मुं.

८०. १ °**सारंग** नि खवर्ग गो२ तं; २ °**मृग** नि खवर्ग ( नां प्रसंप्रा ) गो२ तं; ३ °**मृग** नि खवर्ग ( नां प्रसंप्रा ) गो२ तं; ४ **धेनु** नि ( स प्रसंप्रा ); ४–५ **धेनु कालवंग** औं पु, **धेनु कोळवंग** पु४, **धेनु काळांग** ख, **काळवेग** मुं; ५ **लगबग** नि धु गो२ रा; ६ **झडी** नि ( स प्रसंप्रा ) पु·४ मुं, **झडपा** औं, **झडे** धु; ७ **पळाव्या** पु गो२ रा तं.

८१. १ °**भैरियांचे** नि, °**भैरवरुंडांचे** धु गो, °**भैरुंडाचे** तं, **गंडभेरुडाचे** रा; २ **वन्हिचक्रीं** नि औं पु ख मुं गो·२ रा, **वन्हीपक्षी** पु४; ३ **कोंदले** पु४ नां धु, **पीडीले** गो२.

८२. १ **जीवादि** पु४, **जवळी** ख, **जया** गो२; २ **प्रसवती** नि औं पु·४ ख मुं गो२ रा; ३ **बिडाळी** नि नां तं, **विडाळीं** पु धु मुं, **विडाळें** ख गो·२; ४ **सुपरिमळें** ख गो·२; ५ **सुगंधमूषकाचीये** औं पु; ६ **बिळें** गो·२; ७ **चुचुंदरिया** नि; ८ **दाटल्या** नि औं पु·४ ख, **जडाल्या** तं.

८३. १ °**चंदन** औं पु ख नां मुं गो२; २ °**कर्दळीकेतकीवनें** नि, °**कर्दळीकंदबवन** औं पु, °**कर्दळिकावन** ख, °**वन** नां मुं गो२; ३ **सुवास पवनें** नि, **सुवासें महापवन** औं पु ख, **सुवासें महापवनें** पु४; ४ **महाचळा** नां गो२ रा तं; ५ **लोपला** धु, **पालविला** मुं.

शाल्मलीवनें[1] गुगुळवनें[2] । कुंकुमकेशरें[3] वाळविपिनें[4] ।
दग्ध होतां दिशांचीं[5] घ्राणें । दिव्यगंधें कोंदलीं ॥ ८४ ॥
अठराभार[1] वनस्पती । दशलक्ष विहंगमजाती ।
चतुष्पदांचिया व्यक्ती[2] । तीस लक्ष बोलिलिया[3] ॥ ८५ ॥
अकरा[1] लक्ष कीटकभेद । उभयवदनीं जातवेद ।
भक्षण करितां स्वादास्वाद । न विचारित मातला ॥ ८६ ॥
सप्तजिव्हा[1] ज्वाळमाळी । मेदरुधिराच्या[2] अंजुळी[3] ।
प्राशन करितांही[4] आगळी[5] । तृषा[6] कांहीं वोलेना[7] ॥ ८७ ॥
सरितासरोवरींचीं जळें । कढों लागलीं महाज्वाळें ।
जळचर[1] उकडोनि येकवेळे[2] । भस्म जाले[3] जीवनेंसीं[4] ॥ ८८ ॥
श्वापदपक्षियांच्या[1] कोटी । रुदितशब्दांच्या बोभाटीं ।
बाळकें कवळोनियां पोटीं । प्रळयानळीं भस्म[2] जाले[3] ॥ ८९ ॥
विश्वासी[1] गमला[2] कल्पांतकाळ । तापें तापलें भूमंडळ ।
दाटले धूम्राचे कल्लोळ । सत्यलोकावरौते ॥ ९० ॥

---

८४. १ शाल्मलीकुळें पु·४ मुं; २ गुग्गुळ° नि तं; ३–४ °केशरबिल्व· वनें नि मुं, °केशरीबिल्ववनें औं पु·४ ख नां ; ५ हिशांचीं नि ( स प्रसंप्रा ).

८५ १ असंभार औं पु·४ ; २ याती नि औं , जाती नां, पंक्ती धु , युक्ती पु४ ; ३ बोलती नि , बोलिजे पु४ , बोलिल्या औं पु ख मुं गो·२ रा.

८६. १ अठरा नि.

८७. १ तृप्तजिव्हा पु ख मुं , कृष्णजिव्हा औं , तप्तजिव्हा पु४ ; २ रुधिरमेदाच्या नि ; २–३ मेरु दिसे वडवानळी औं , मेरुधीश वडवानळीं पु ; ४ करितां नि ; ५ अंजुळी औं पु ; ६ तृष्णा नि खवर्ग ( ख प्रसंप्रा ) गो रा ; ७ तोलेना नि , बोलेना पु ख नां मुं धु रा तं , न बोले गो·२.

८८. १ °चरें नि खवर्ग ( नां प्रसंप्रा); २ °वेळे नि नां रा , °वेळ औं पु·४, केवळ ख ; २ झालीं नि खवर्ग ( नां प्रसंप्रा ); ४ हुताशीं नि.

८९. १ श्वापदें पक्षि° नि ; २–३ भस्मल्या नि औं पु , भस्मले पु४ मुं गो·२ रा , भस्मती ख.

९०. १ विश्वा ख नां ; १–२ वैश्वानर नि , विश्वासित्र पु४ धु , विश्वामित्र मंगळ औं पु.

हाक गेली अमरभुवना[1] । वन्ही लागला खांडववना[2] ।
तो[3] माजला[4] नावरे[5] कोण्हा[6] । विश्व[7] ग्रासूं पाहातसे[8] ॥ ९१ ॥
क्रोध नावरे सुरेश्वरा । जीमूत[1] प्रेरिले[2] सत्वरा[3] ।
वर्षोनियां मुसळधारा । धूमकेतू शांतवा ॥ ९२ ॥
मेघ गर्जीनले[1] आकाशीं । विद्युल्लता शक्रधनुषीं[2] ।
गाराजळधारा[3] हुतांशीं[4] । अपार वर्षों[5] लागल्या[6] ॥ ९३ ॥
गांडीव सजूनियां[1] मुष्टी । वायव्यास्त्र सोडितां[2] किरीटी ।
मेघ भंगले बारा वाटीं । अभ्र कोठें दिसेना ॥ ९४ ॥
रागें[1] चक्र ताडितां शक्रें । पार्थें टाकिलें[2] कंकपत्रें ।
ऐरावताचीं[3] सर्वगात्रें । संधोसंधी[4] भेदिलीं[5] ॥ ९५ ॥
वर्मीं लागतांचि घावो । अंकुशें लोटितां[1] न घली[2] पावो ।
आश्चिर्य[3] करी अमररावो । ह्मणे अर्जुन नाटोपे ॥ ९६ ॥
सुरेंद्रमित्र तक्षक फणी । वनीं नसतां लागला वन्ही ।
गृहीं[1] भार्यापुत्र[2] दोन्ही । पावकचक्रीं कोंडलीं ॥ ९७ ॥

---

९१. १ **इंद्रभुवनीं** नि, **इंद्रभुवना** खवर्ग ( नां प्रसंप्रा ); २ °**वनीं** नि; ३–४ **होम जाला** मुं; ४ **मातला** पु४ ; ५ **नाटोपे** नि खवर्ग ( **नाचरे** नां ); ६ **कोण्ही** नि, **कवणा** पु ४ ख; ७ **विश्वा** नि; ८ **पहातसे** नि.

९२. १ **जीमूति** खवर्ग ( नां प्रसंप्रा ) गो·२ ; २ **प्रेरिला** ख नां गो·२ ; ३ **सत्वरां** नि.

९३. १ **गर्जिन्नले** नि ( स प्रसंप्रा ) पु४ गो·२ रा ; २ °**धनुष्यीं** नि पु·४ गो२ ; ३ **गाराजळ वर्षाव** नि, **गारा वर्षाव** खवर्ग ( नां प्रसंप्रा ) ; ४ **हुताशीं** नि ख; ५ **पडों** नि पु·४ ख मुं ; ६ **लागले** नि पु.

९४. १ **सजोनियां** नि ; २ **सोडी** नि औं नां मुं.

९५. १ **कराग्रें** खवर्ग ( नां प्रसंप्रा ) ; २ **टाकिलीं** नि , **लोटिलें** खवर्ग ( नां प्रसंप्रा ); ३ **ऐसें वर्ततां** औं पु४ मुं , **पुढें येकेक** ख ; ४ **संधी संधी** नि औं पु४ ख मुं , **संधसधी** गो·२ ; ५ **भेदिलें** पु४.

९६. १ (+) **हि** नि ; २ **घाली** नि ख नां गो२ ; ३ **आश्चर्य** नि गो·२.

९७. १–२ **पुत्रभार्या** नि.

माता[१] मोहें[२] पसरोनि वदन । पोटीं सूदला[३] अश्वसेन[४] ।
आधीं गिळिला मुखाकडून । पुछ[५] पाठी ग्रासिलें ॥ ९८ ॥
पळोनि जातां गगनमार्गें । पार्थें शिरछेदिला[१] वेगें ।
माता निमाली परी[२] अंगें । पुत्र जीवें वांचला ॥ ९९ ॥
पळोनि गेला कुरुक्षेत्रा । तेथें तक्षक भेटला पुत्रा ।
भार्या निमाली तेणें[१] नेत्रां । अश्रुपात लोटले ॥ १०० ॥
असो[१] कोपला अमराधीश । मोकळी शिळांचा पाऊस ।
हांसोनि बोले हृषीकेश । ऐसेंचि जालें गोकुळीं ॥ १०१ ॥
तेवेळीं उचलोनि गोवर्धन । म्यां रक्षिले गौळीजन[१] ।
वदे प्रत्योत्तर[२] अर्जुन । आजिही[३] तूंचि[४] रक्षिता ॥ १०२ ॥
सोडूनि तीक्ष्ण[१] बाणजाळा । तिळप्राय तोडूनि[२] सांडिल्या[३] शिळा ।
जैशा[४] दुरुक्ती बोलतां[५] खळा । सहिष्णु वारी विचारें ॥ १०३ ॥
खांडव रक्षावें[१] निजस्वार्था । साह्य व्हावें[२] अमरनाथा ।
ह्मणोनि असुरांचियां चलथा । पार्थाउजू धावींनल्या ॥ १०४ ॥

---

९८. १–२ मातेनें नि; २ ह्मणे खवर्ग (नां प्रसंप्रा); ३ सुटला पु४ नां; ४ वैश्वाशैन्य पु४, अश्वासून ख नां मुं; ५ पुच्छ नि.

९९. १ शीर छेदिलें नि गो रा, सीर छेदूनि पु४ ख मुं; २ (–) पु४ ख मुं. औं पु मध्यें ही व पुढील ओवी नाहीं.

१००. १ ऐकतां ख.

१०१. १ मग नि, ऐसा खवर्ग (ऐकोनि औं).

१०२. १ गोकुळींचे जन नि, गोकुळजन मुं गो२, गोपाळजन रा, गोकुळींजन पु४ गो; २ प्रत्युत्तर नि पु; ३ आजि पु४ नां मुं धु; ४ तूं औं पु.

१०३. १ तिक्षण पु४ ख नां धु गो२ रा; २ फोडिल्या नि, फोडूनि औं पु४ ख मुं गो रा, तोडिल्या नां धु; ३ (–) नि नां मुं धु; ४ जैसी खवर्ग (जैसा नां); ५ बोली औं पु, बोले पु४ ख.

१०४. १ रक्षावया पु४ ख; २ करावें नि, होवावें गो२ तं.

दैत्य दानव गंधर्व यक्ष । राक्षस काळेय[1] अकरा लक्ष ।
मंदेहपौलोमाचे[2] लक्ष[3] । शस्त्रपाणि पातले[4] ॥ १०५ ॥
वज्रतुंड शरांच्या कोटी । येकसरें मोकळी किरीटी ।
संगीं श्रीकृष्ण[1] जगजेठी । चक्र प्रेरी[2] हातींचें ॥ १०६ ॥
पार्थशरांचिये महामारीं । सुदर्शनचक्र द्वादशधारी[1] ।
शिरें तुटोनि पृथ्वीवरी । हास्य[2] करिती गदगदां ॥ १०७ ॥
जेवीं कां[1] कमळें खुडिती[2] माळी । कणसें खुडिजेति[3] कृषीवळीं ।
तैसी[4] असुरांच्या सिसाळीं[5] । रासी[6] जाली[7] भूखळां[8] ॥ १०८ ॥
ना[1] ते[2] धरा[3] भद्रकाळी । रक्तकुंकुम लेपूनि[4] भाळीं[5] ।
जपाकुसुमाच्या अंजुळी । कृष्णें[6] पार्थें[7] वाहिल्या[8] ॥ १०९ ॥
गगनींहूनि वर्षतां[1] रुधिरा[2] । पावक ह्मणे हे वसुधारा[3] ।
पाठीं[4] घडें[5] सांडती[6] सैरा[7] । तेचि[8] भावी अवदानें ॥ ११० ॥

---

१०५. १ पावले नि नां, पातले धु, काळिकेय औं ख, काळकेय पु, कळाकेये पु४, काळ तं; २ मंदेह पौलोम नि, मध्यमपाळ औं पु ख मुं, मध्यपाळ पु४; ३ पांचलक्ष नि खवर्ग; ४ धाविन्नले नि.

१०६. १ कृष्ण पु४ ख मुं धु; २ प्रहरी औं पु, फेरे पु४, पेरी रा.

१०७. १ सहस्रधारी नि खवर्ग ( नां प्रसंप्रा ); २ हांस्य औं पु गो.

१०८. १ (–) नि औं पु नां मुं धु; २ खुडीजे पु४ ख, खुडितां पु मुं, खुडी धु, खुंटीती गो·२; ३ खुंटिजेति नि, खाणिती गो·२, खांडिजेति रा तं; ४ तेंवि नि; ५ सिसावळीं नि; ६–८ भूमंडळीं राशी जाल्या मुं, कृष्णें पार्थें वाहिलीं गो·२; ७ झाल्या नि औं पु·४ धु; ८ भूखळीं नि, भूतळीं औं पु, आवनिये पु४, भुमीसी ख.

१०९. १–३ नातरी ते नि; ४–५ रेखून कपाळीं मुं; ६–७ कृष्णपार्थां पु रा, पार्थकृष्णा पु४, कृष्णपाईं ख मुं; ८ अर्पीलें ख.

११०. १ वर्षे खवर्ग ( नां प्रसंप्रा ), वर्षती गो २, पडतां नि; २ रुधिरें नि, रुधिर खवर्ग ( नां प्रसंप्रा ); ३ वसोर्धारे नि, वसोर्धार पु४, वसुधार औं पु, वसंधर ख, वसुंधरा नां धु; ४–७ पोटीं पडती असुरशिरें नि; ५–७ रिचवती घडें शिरें औं, घडाडीत वैश्वानर मुं; ६ पडती पु·४ ख; ८ तीं नि.

पडिल्या[1] असुरांचिया[2] कोटी[3] । उरले[4] रिघाले[5] दिग्पटीं[6] ।
सुपर्ण[7] ह्मणती[8] पोटीं[9] । महानिर्वाण[10] दिसताहे ॥ १११ ॥
देखोनि कोपला पर्वतशत्रु[1] । शचीरमण सहस्रनेत्रु[2] ।
सुरांसि[3] ह्मणे मानवपुत्रु[4] । मृत्यु जाला अमरांतें[5] ॥ ११२ ॥
वेगीं अवघे येकत्र मिळा । येकदांचि[1] मोकळा शरजाळा ।
पार्थ पराभऊनि कळा[2] । सोज्वळ करा सुरांची[3] ॥ ११३ ॥
वळंघला श्वेतचतुर्दंती । दंभोळीधारा[1] पुसिल्या[2] हातीं ।
हें[3] देखोनि सुरांचिया पंक्ती । शस्त्रास्त्रीं सिद्ध[4] जाल्या[5] ॥११४॥
दंड धरूनि[1] धर्मराजु । रागें[2] लोटला[3] पार्थाउजू ।
गदा भवंडीत[4] सुतेजु । धनेश्वर[5] धावींनला[6] ॥ ११५ ॥
वरुणें[1] घेऊनियां पाश[2] । ह्मणे[3] घेईन पांडवयश[4] ।
कृत्रिम[5] अवलंबूनि[6] रोष । शिव धांवे शूळेंसीं ॥ ११६ ॥

---

१११. १–३ **सुरासुर जाले हिंपुटी** पु४, **सुपर्वा ह्मणती पोटी** ख; ४–६ **न निवारवे शरथाटी** पु४, **घेउं पडती लक्षकोटी** ख; ५ **निघाले** औं गो·२ रा; ६ **दिक्पाटीं** नि, **दिक्पाटीं** पु; ७ **सुपर्वाण** नि औं पु (स प्रसंप्रा), **सुपर्णा** नां गो२; ७–९ **शक्र ह्मणे हे संकटीं** ख; ८ **भाविती** नि; १० **महाविघ्न** नां धु तं. मुं मध्यें ही ओवी नाहीं.

११२. १ **सहस्रनेत्रु** ख; २ **पर्वतशत्रु** ख; ३ **सर्वासि** औं; ४ **अमरपुत्रु** खवर्ग (नां प्रसंप्रा); ५ **वज्रानें** नि (स प्रसंप्रा).

११३. १ **सर्वही** औं पु·४, **अवघे** ख मुं; २ **एकला** नि नां, **काळा** पु४, **या काळा** धु, **लिळा** गो; ३ **सुरमुखें** नि धु.

११४. १–२ **दभोदि वसविला** पु४; २ **सुदली** औं पु ख मुं; ३ (–) ख नां धु, **हे** पु४ रा तं; ४–५ **सिद्धल्या** नि, **सज्जल्या** औं.

११५. १ **करूनि** नां; २–३ **धावींन्नला** पु४; ४ **भवंडिता** नि मुं; ५–६ **धांविनला नैऋत्य** औं पु, **निघाला तो लवलाहे** पु४ ख मुं.

११६. १ **वरुण** नि नां; २ **वरुणपाश** पु४ ख मुं गो·२ रा; ३ (+) **मी** नि; ४ **पांडवांचें यश** नि खवर्ग (नां प्रसंप्रा); ५–६ **अवलंबूनि कृत्रिम** औं पु.

उपडूनि[1] प्रचंड औषधी । अश्विनौदेव धावींनले क्रोधीं ।
पर्वत घेऊनियां खांदीं । त्वष्टा रागें धावींनला ॥ ११७ ॥
स्कंद लोटला[1] घेऊनि शक्ती । मृत्यु पातला[2] परशहस्तीं[3] ।
प्रतोद घेऊनि गभस्ती । फिरउं[4] ह्मणे अश्वातें[5] ॥ ११८ ॥
सजूनियां धनुष्यबाण । युद्धा पातला प्रभंजन ।
लोहमुसळ पडताळून । जयनामा धावींनला[1] ॥ ११९ ॥
अर्यमा आला[1] घेऊनि परिघ । मित्राहस्तीं चक्र अमोघ ।
सोम आणि पूषा भग[2] । कार्मुकपाणी पातले[3] ॥ १२० ॥
आदित्य रुद्र[1] मरुत वसव[2] । साध्य[3] आणि[4] विश्वदेव[5] ।
हे मुख्य करूनि अमर[6] सर्व । संग्रामार्थ पातले ॥ १२१ ॥
परिघप्राय[1] वेढूनि रथा । घ्या घ्या ह्मणती कृष्णपार्था ।
जैसे पाखांडी[2] वेदांता[3] । जिंकावया जल्पती ॥ १२२ ॥
अमितास्त्र जपोनि वाणी । येकयेक[2] विंधिला[3] दाहा बाणीं ।
शस्त्रें हातींचीं[4] उडवूनी । वर्मस्थळीं खोंचले ॥ १२३ ॥

---

११७. १ उचलोनि गो॰२.

११८. १ उठीला नां धु; २ पावला नि पु ख नां, धांवला औं, लोटला मुं; ३ फरश° पु ख नां, पाश° मुं; ४ फिरा नि नां धु; ५ अवघ्यांतें नि.

११९. १ पातला नां धु. गो मध्यें ही ओवी नाहीं.

१२०. १ लोटला नि गो२; २ भाग पु नां मुं धु गो२, भोग गो; ३ धांवले नि औं, धाविन्नला पु४ मुं. ख मध्यें ही ओवी नाहीं.

१२१. १ (–) औं; २ वासव औं पु; ३–४ साध्यादि औं ५ विश्वेदेव नि औं; ६ (–) औं पु.

१२२. १ °प्राये खवर्ग (मुं प्रसंप्रा) धु; २ पाषांडी औं पु॰४ गो२ पाशांडी ख गो, पाखंडी तं; ३ वेदार्था नि.

१२३. १ अगस्त्यास्त्र नि औं पु ख मुं, अमीतशास्त्र नां धु; २ एकैक नि; ३ विंधिले नि पु४ गो२; ४ हस्तींचीं नि.

मुसळप्राय सायकधारें । मारूनि उडविले माघारे[१] ।
जेविं[२] प्रळईं महासमीरें[३] । वृक्ष जाती दशदिशा ॥ १२४ ॥
येक मूर्छित पडिले धरणी । येक ऊर्ध्व[१] उडाले[२] गगनीं ।
येक पडिले[३] सिंधुजीवनीं[४] । निचेष्टित शरमारें ॥ १२५ ॥
जेविं विघ्नाचिया कोटी । गणेश भवंडी[१] बारावाटीं[२] ।
नातरी हुनमंताचिये दृष्टी । भूतश्रृष्टी उरेना ॥ १२६ ॥
नातरी पातकांचिया[१] लक्षा । येक हरिनाम करी रक्षा ।
तेविं निर्जरांचिया[२] पक्षा । पराभविलें[३] अर्जुनें ॥ १२७ ॥
अमरगणीं काढिला मोड । ह्मणती न जिंकवे होड ।
संग्राम पार्थाचा[१] अवघड । धैर्य[२] सहसा[३] न धरवे ॥ १२८ ॥
पुढती[१] कोपोनि सुरेश्वरें । अर्जुन ताडिला शिळाशिखरें[२] ।
पडे पडे[३] तवं कुंतिकुमरें[४] । बाणधारा[५] तोडिलें[६] ॥ १२९ ॥
तवं गर्जीनली आकाशवाणी । विचार धरीं कां[१] वज्रपाणी ।
नरनारानण हे[२] दोन्ही । कृष्णार्जुन जाण पां ॥ १३० ॥

---

१२४. १ **माघारें** नि औं पु४ गो·२ ; २ **जैसे** नि , (+) **महा** औं पु ; ३ **समीरें** औं पु.

१२५. १–२ **उडविले ऊर्ध्व** नि ; २ **उडविले** पु४ ख ; ३ **टाकिले** नि , **पाडिले** औं पु ख ; ४ **समुद्रजीवनीं** नि.

१२६. १ **उडवी** नि , **विभांडी** मुं , **भोंवडी** औं पु धु ; १–२ **लिळा विभांडी** पु४ ; २ °**वाटी** नि औं नां मुं.

१२७. १ **पातकाच्चिया** नि पु ख नां ; २ °**च्चिये** नि ; ३ **पराभऊनि** औं पु·४ ख , **पराभव केला** गो२.

११८. १ **पार्थासीं** नि ; २–३ **सहसा धैर्य** औं पु ख नां , **सहसा धीर** पु४ ; ३ **सर्वथा** धु.

१२९. १ **पुडती** औं पु·४ ; २ **शैलशिखरें** नि ख रा , **शेल्यशिखरें** औं पु·४ मुं गो२ ; ३ (–) पु४ ख ; ४ **पांडुकुमरें** नि ; ५ °**धारें** नि , °**धारीं** ख , **प्राण**° तं ; ६ **फोडिलें** नि , **तोडिल्या** रा.

१३०. १ (–) नि पु४ ; २ (–) ख नां ;

यातें पराभऊनि येश[1] । पावे ऐसा कवण पुरुष ।
आतां सांडूनि संग्रामसोस । जाये[2] वेगीं माघारा[3] ॥ १३१ ॥
अतिताई[1] पातकी प्राणी । मरोनि उपजले[2] खांडववनीं ।
त्यांतें निमित्य[3] करूनि वन्ही । भूभार येहीं[4] फेडिजे[5] ॥ १३२ ॥
राक्षस तामस महापापें[1] । जालीं[2] श्वापदें[3] पादपें[4] ।
ह्मणौनि कुष्णार्जुन साक्षेपें[5] । नाश करिती[6] तयांचा ॥ १३३ ॥
यांसी[1] करूं[2] जातां[3] युद्ध[4] । जय[5] न[6] पवसी[7] पावोनि[8] खेद ।
आतां वदूनि[9] सख्यशब्द[10] । येश[11] उरवीं आपुलें ॥ १३४ ॥
ऐसें[1] ऐकोनि[2] अमरनाथ । माघारला विबुधेंसहित[3] ।
अग्नीसि ह्मणती कृष्ण पार्थ । निःशंक[4] आतां[5] वेटाळीं[6] ॥ १३५ ॥
विशेष[1] मातला महावन्ही[2] । अपार भक्षिल्या जीवश्रेणी[3] ।
वनस्पतिरसांच्या[4] रसपानीं । ज्वाळाजिव्हा[5] पोळल्या[6] ॥ १३६ ॥

---

१३१. १ यश नि मुं गो२ तं; २ जावें नि औं पु ख मुं, जा पु४, जाई गो, जायें रा; ३ माघारें नि खवर्ग ( नां प्रसंप्रा ) गो·२.

१३२. १ आततायी नि, अतीत्याई औं पु·४ ख मुं रा; २ उपजे नि औं पु ख मुं, विचरे पु४; ३ निमित्त नि; ४ यांहीं नि, इहीं औं पु मुं धु; ५ फेडिला नि.

१३३. १ °पापी नि औं, °पाप पु·४ ख; २ झाले नि, जाळी नां; २–४ जन्मले खाडोवनीं संतापी औं, जाळी स्वापद परदर्पे पु·४ ख; ३ स्वापद गो·२; ३–४ स्वापद परदर्पें मुं; ४ पादपी नि; ५ साक्षेपीं नि औं, साक्षेप पु·४ ख; ६ केला औं.

१३४. १ त्यांसि पु·४ ख नां मुं, जयासी गो; २–३ करीतां ख नां; ४ युध्य पु४ धु गो२; ५–६ अपमान मुं; ७-८ पावोनि पावसी नि पु·४ गो२, पवोनि पावसी औं गो रा, पावोनि करिसी मुं; ९ वंदुनि धु गो२ तं; १० सरळ शब्द नि (स प्रसंप्रा), सेव्य शब्द औं, सखेद शब्द ख; ११ यश नि मुं गो२.

१३५. १–२ ऐकोनियां नि; ३ विबुधांसहित नि औं ख गो·२; ४–६ भक्षण करीं निःशंक ख; ६ वेढाळी नां.

१३६. १ विशेषें नि औं, वीश नां, निशेष गो; २ वन्ही औं पु·४ ख मुं; ३ श्वापदश्रेणी नि औं पु·४ ख नां, खांडवश्रेणी मुं गो·२ रा; ४ वनस्पतींच्या नि औं पु·४ ख मुं; ५ जाळजीव्हा पु, ज्वाळामाळ औं; ६ तोषल्या नि पु·४ ख मुं, तोशला औं.

वन्ही तोषला[1] स्तवी सांग । अनंतयुगीं अनंत याग ।
ऋषीराजीं केले सांग । परि[2] मी[3] तृप्त नव्हेची[4] ॥ १३७ ॥
वसोनि शंकराचिये दृष्टी । प्रळई भक्षिली[1] सर्व सृष्टी ।
परी[2] आजिचे ऐसी तुष्टीपुष्टी[3] । नाहीं तेथें पावलों ॥ १३८ ॥
वसउनी शेषाचीं[1] मुखबिळें[2] । युगांतीं[3] दाहिलीं सातै[4] तळें[5] ।
परी आजिचिये ऐसी तेणें[6] काळें । तृप्ती नाहीं पावलों ॥ १३९ ॥
फळाहार लंकादहनीं[1] । आजि पारणें सुखभोजनीं ।
तुमचा[2] उपकार उभयवदनीं । बोलों न सकें सर्वथा ॥ १४० ॥
शत्रु वधूनि सर्व[1] धात्री[2] । अर्जुना भोगिसी[3] येकछत्री ।
कृष्णनाम स्मरतां वक्त्रीं[4] । होय[5] सायोज्य[6] पापियां[7] ॥१४१॥
ऐसिया आशीर्वादशब्दें । गर्जना कीजे[1] जातवेदें ।
खांडव भक्षितां[2] सुस्वादें । परम तृप्ती पावला[3] ॥ १४२ ॥
मय दानव नमूचा[1] भ्राता । पूर्वी मंदोदरीचा पिता ।
शिल्पविद्येचा[2] विधाता । विश्वकर्मा दैत्यांचा[3] ॥ १४३ ॥

---

१३७. १ (+) भोजनी पु; २ तेथ औं; २–३ तरि मी पु·४, तिहीं मुं; ४ न झालों नि.

१३८. १ भक्षुनि औं पु·४ ख; २ परंतु धु; ३ तुष्टी नि मुं, पुष्टी औं.

१३९. १–२ शेषाचे मुखानळें औं पु; ३ कल्पांतीं औं पु; ४ सप्त नि औं ख मुं धु गो२, सातही पु·४ नां; ५ पाताळें नि औं ख मुं, कुळें गो·२; ६ ते नि पु४, तिये औं, (–) ख मुं, येणें धु.

१४०. १ लंकाभुवनीं पु४; २ तुमचे नि औं पु ख.

१४१. १–२ खर्गधारीं औं पु·४ ख मुं; २ धरित्री नि; ३ राज्य भोगीं औं; ४ वक्रीं नि; ५–७ सायुज्यपदीं पावसी नि, सायुजपद पावसी खवर्ग (नां प्रसंप्रा).

१४२. १ केली गो, करिजे पु; २ भक्षित औं पु·४; ३ पावलों खवर्ग.

१४३. १ नमुचीचा नि रा, मनुचा औं पु·४ ख गो, मनुजांचा मुं, मुनि गो२; २ (+) मुख्य नि; ३ असुरांचा नि.

त्याचा वास खांडववनीं । वन्हिभेणें पळतां[1] गगनीं ।
पावकें दावितां चक्रपाणी । चक्र काढी वधावया ॥ १४४ ॥

प्राणभयें[1] आक्रंदोन । अर्जुनासि आला शरण ।
पार्थें दीधलें अश्वासन[2] । तूतें न मरीं[3] सर्वथा[4] ॥ १४५ ॥

अर्जुनें देतां अभयदान[1] । चक्र आवरी मधुसूदन[2] ।
तो[3] येक[4] आणि[5] अश्वसेन[6] । तक्षकपुत्र दुसरा ॥ १४६ ॥

ऋषेश्वरवीर्यें[1] सारंगपक्षी[2] । चौघे चुकले[3] पावकभक्षीं[4] ।
ऐसे[5] साही[6] खांडवकक्षीं[7] । अक्षई[8] प्राणें वांचले ॥ १४७ ॥

सारंग वांचले वैश्वानरीं । ते[1] कथा[2] परिसावी[3] पुढारीं[4] ।
व्यासवचनाचे[5] आधारीं[6] । मुक्तेश्वर[7] कवि[8] वदे[9] ॥ १४८ ॥

इति श्रीभारते आदिपर्वणि एकोनपञ्चाशत्तमोऽध्यायः ॥

---

१४४. १ पळाला नां मुं.

१४५. १ पावकभयें खवर्ग ( नां प्रसंप्रा ); २ आश्वासन नि पु४ ; ३ मारीं नि पु४ गो ; ४ सर्वथां पु४ ख , सर्वदां मुं.

१४६. १ अभयवचन नि ; २ मदसुदन पु४ ख नां गो ; ३–६ यापरी मय वांचला आन नि.

१४७. १ °वीर्यें नि ( स प्रसंप्रा ) ; २ शाङ्गर्पक्षी नि ; ३ वांचले नि ; ४ पावककुक्षीं नि; ५ असे नि; ६ हे नि खवर्ग ( नां प्रसंप्रा ); ७ खांडवभक्षीं नि, खांडवकुक्षी खवर्ग ( नां प्रसंप्रा ) ; ८ साही नि.

१४८. १–४ पावक तृप्त जाला परोपरी खवर्ग ( नां प्रसंप्रा ) ; ५–६ व्यास वदला ते अवसरीं नि , खांडवदहन अर्जुन करी खवर्ग ( नां प्रसंप्रा ) ; ७–९ ऐसी कथा जाहली औं ख , ऐसी कथा वर्तली पु मुं.

यापुढें औं पु ख मुं मध्यें पुढील ओव्या अधिक आहेत :-

जन्मेजय ह्मणे वैशंपायना । सांग भीमाचिया आख्याना ॥
त्याचा पराक्रम मना । ऐकोनि हर्ष होतसे ॥ १ ॥

ऐकें राया गुणनिधी । सोमवंशीं परम[1] उदधी[2] ।
चित्त देऊनियां आधीं । श्रवणीं[3] ऐकें[4] सर्वस्वें[5] ॥ २ ॥

१–२ ज्ञानउदधी ख, बळउदधी मुं; ३–४ श्रवण करीं औं ख; ५ नरेंद्रा ख.

नारद भूप्रदक्षणा । करूनि[1] आला[2] जाण ।
येतां श्रोणितपुरसगुण[3] । प्रवेशला ब्रह्मऋषी[4] ॥ ३ ॥

१–२ करित असतां पैं औं; ३ °पुरपट्टण औं; ४ देवऋषी औं.

तेथील राजा कुंभ[1] जाण । त्यासि सहस्त्रभुजा दंडप्रमाण[2] ।
परम[3] पराक्रमें प्रविण । तेणें नारदा देखिलें ॥ ४ ॥

१ कुंभक औं, कुंक्षक मुं; २ प्रमाण ख; ३ (–) ख.

त्यासि[1] सन्मानें बहुत । पूजा करी विध्युक्त ॥
स्नेहादरें[2] अत्यंत । पुसता जाला स्वमुखें[3] ॥ ५ ॥

१ राजा औं; २ स्नेहवादें औं; ३ निजमुखें औं, साक्षेपें मुं.

स्वामी त्रिभुवनामध्यें । मजसीं दारुण युद्धें ॥
करी ऐसा कवण[1] प्रसिद्धें । आहे[2] तो[3] मज सांगावा[4] ॥ ६ ॥

१ वीर औं, (–) ख; २ असेल औं; २–३ अहे नाहीं ख; ४ सांगीजे औं, सांग ख, सांग पां मुं.

मग नारदें सांगीतलें । इंद्रप्रस्तीं पंडुपुत्र भले ।
भीमसेन युद्धीं[1] आगळें[2] । तो येक असे तूं[3] जाण[4] ॥ ७ ॥

१–२ बाहुबळें औं; ३–४ वीर पैं औं, सुजाणा ख, जाण पां मुं.

ऐसें ऐकोनियां राजा । नारदचरणा लागला वोजा ।
मजसवें युद्ध करी पैजा । त्यासी[1] युद्ध[2] करीन[3] ॥ ८ ॥

१ त्या सर्वैंसी मुं; १–३ ये तरी त्यासी भीडेन ख.

नारद इंद्रप्रस्ता आला । भीमसेनासि भेटला ।
वार्ता सांगों लागला । युद्धाची तया[1] ॥ ९ ॥

१ (+) तेक्षणीं औं.

भीमें नारदा नमस्कारिलें । चला जी[1] जावों वहिलें ।
युद्ध करीन बाहुबळें । क्षणमात्रें[2] त्यासवें ॥ १० ॥

१ (+) तेथ औं; २ क्षत्रमात्र पु, क्षत्रयेक ख.

धर्मराजासि[1] येऊन । भीमें केलें[2] नमन[3] ।
निरोप द्यावा मजलागुन । युद्धालागी[4] सत्वर ॥ ११ ॥

१ धर्मापाशीं औं , धर्मासमीप मुं ; २ ( + ) साष्टांग मुं ; २–३ घातलें लोटांगण ख ; ४ जावया स्वामी ख.

धर्मराजें संबोखिलें[1] । ह्मणे न[2] वजावें[3] गा वहिलें ।
पुन्हां[4] मस्तक चरणीं ठेविलें । निरोप द्यावा ह्मणौनी[5] ॥ १२ ॥

१ संमोखिलें औं , बोळखीलें ख ; २–३ तव जावें औं ; ४ मागुती ख मुं ; ५ जी महाराजा मुं.

मग[1] ह्मणे कुंतीसि पुसों[2] चला[3] । भीम आला मातेजवळा ।
साष्टांगीं नमस्कार[4] केला । मी जातों युद्धालागीं[5] ॥ १३ ॥

१ तो औं ; २–३ पुसे वहिला औं ; ४ प्रणिपात औं ; ५ युद्धासी औं ख.

विजयीं होइं बा आत्मजा । धर्मराजाचिया अनुजा ।
राक्षस वधूनि पैजेसीं[1] वोजा[2] । आशीर्वाद[3] दीधला[4] ॥ १४ ॥

१–२ सौख्य भोजा औं , सुख दे प्रजा ख मुं ; ३–४ राज्य भोगीं अक्षयीं औं.

नारद आणि[1] भीम[2] गेले । श्रोणीतपुरातें पावले ।
राजयासी सांगीतलें[3] । वीर[4] आला युद्धासी ॥ १५ ॥

१–२ भीम दोघे औं ; ३ सांगोनि पाठविलें औं ; ४ भीम औं.

राजा सेनेसि हाकारी । अवघे सन्निध[1] निघा[2] बाहेरी ।
भीम आलासे सत्वरीं । युद्धाकारणें मजसवें[3] ॥ १६ ॥

१ ( – ) औं मुं ; २ निघाले औं मुं ; ३ मजलागी पु.

युद्ध केलें[1] प्रबळ । भीमें मारिले सकळ ।
विध्वंसिलें अवघें कुळ । क्षणार्धें[2] तेकाळीं ॥ १७ ॥

१ मांडले औं ख ; २ क्षणमात्रें औं मुं.

यावरी राक्षसपुत्र[1] दोघे[2] आले । अति दारुण युद्ध केलें ।
दोघांचें शीर छेदिलें । निमिष्यार्धें करूनी ॥ १८ ॥

१ राजपुत्र ख मुं ; २ ( – ) ख.

राजा[1] सांगोनि[2] पाठवी भीमा । तुवां जिंतिलें वीरोत्तमा
आतां जाईं गा ग्रामा । परतोनियां आपुल्या ॥ १९ ॥

१–२ राज्यासनीं मुं.

**येक लक्ष गज मारिले भीमें । गजदंत मोडिले[1] पराक्रमें ।**
**धर्मराजासि[2] मंचकप्रेमें[3] । करावया नेतसे[4] ॥ २० ॥**

१ तोडिले ख मुं ; २ धर्मा औं ; ३ मनोधर्में औं ; ४ न्यावया पु , ते जाले मुं.

**इतुकें करूनियां कंदन । राजा[1] माव करून[2] ।**
**कऱ्हा[3] जाला[4] येऊन । राहे[5] भीमापुढें ॥ २१ ॥**

१ (+) स्वयें औं ; २ करी आपण ख ; ३–४ कर जोडल्या मुं ; ५ (+) उभा औं ख मुं.

**ऐसा[1] जात जातां कऱ्हा । थोर जाला सत्वरा ।**
**त्यावरि[2] बैसोनि भीम[3] बरा[4] । आला नदीजवळिके ॥ २२ ॥**

१ ऐसे पु ; २ भीमें औं ; ३–४ त्या अवसरा औं.

**तेथें स्नान सारिलें । श्रम युध्याचे परिहारिले ।**
**मग निद्रे जाकलिलें[1] । भीमासि ते काळीं ॥ २३ ॥**

१ आकळिलें औं . मुं मध्यें ही ओवी नाहीं.

**तवं[1] दैत्यें काय केलें । भीमासि गिरिवरी टाकिलें ।**
**तत्क्षणें[2] भीमें[3] प्राण[4] त्यजिले[5] । पातयापातें न लगतां ॥२४॥**

१ मग त्या औं; २–५ भीमें प्राणातें क्षीणीं त्यजिलें औं, तत्क्षणिं शतचुर्ण जाले ख.

**हे सूचना द्वारके देखा । कळली श्री[1] यदुनायका ।**
**धांवोनि आला तात्काळिका । धर्माजवळी[2] श्रीपती[3] ॥ २५ ॥**

१ तया औं ख ; २–३ धर्मरायाजवळिके ख मुं.

**धर्में नमन आलिंगन । देऊनि पुसे[1] कोठें[2] भीमसेन ।**
**गेला[3] असे[4] तें संपूर्ण । सांगीतलें पाहिजे ॥ २६ ॥**

१ ह्मणे औं , (–) मुं ; २ (–) औं ख ; ३–४ कोठें गेला औं.

**धर्म बोले श्रीकृष्णासी । भीम गेलासे युध्यासी ।**
**वार्ता आणिली सायासीं । नारदें[1] स्वभावें ॥ २७ ॥**

१ नारदमुनीहीं औं.

**भीमसेन निमाला । कृष्णें खेद मानिला ।**
**पांडव दुःखी जाला । अमर्याद तेकाळीं[1] ॥ २८ ॥**

१ (–) पु , पैं मुं.

नारदें[1] संमोखिलें[2] । मग[3] कृष्णें काय[4] ह्मणितलें ।
चला जाऊं वहिलें । भीमसेना उठवावया[5] ॥ २९ ॥

१ (+) तयां औं, (+) स्वमुखें ख; २ सांगितलें ख; ३ (−) ख, तव मुं; ४ (−) औं मुं; ५ उठउं पु ख.

नारद नकुळ आणि कृष्ण । तिघे निघाले पाहोनि प्रश्न ।
श्रोणितापुरा पावले पवन- । वेगें[1] निकट[2] नगरासी[3] ॥ ३० ॥

१–३ टाकोनिया माघारें औं.

तेथें येका देवालयीं । बैसले देखा उद्विग्न हृदइं ।
तवं[1] राजकन्या ते समयीं । पूजुं आली शक्तिसी[2] ॥ ३१ ॥

१ (+) ते ख; २ शक्तितें ख.

करूनि पूजा तत्काळ । चाले[1] तवं देखे नकुळ ।
त्यासि घालीन[2] ह्मणे[3] माळ । आली जवळिके[4] निर्भर ॥ ३२ ॥

१ चालिली औं; २–३ घालावया औं; ३ ह्मणौनि पु; ४ जवळ औं ख.

तवं श्रीकृष्णें ह्मणीतलें । भीमासि कोठें लोटिलें ।
तें दाखवीं वहिलें । झडकरी[1] आह्मांसी ॥ ३३ ॥

१ झडकरुनी औं.

मग दावीत[1] सुंदरी । भीम पडिला गिरीपडारीं ।
अमृतदृष्टी पाहोनि शरीरीं[2] । कृष्ण[3] ह्मणे[4] उठ[5] वहिला[6] ॥ ३४ ॥

१ वेगीं दावी औं; २ कृष्णें झडकरी पु, मुरारी औं; ३–६ उठीं बा वहिलें वेगें, पु, ह्मणे उठ बा झडकरी औं.

मग[1] निघोनि[2] चौघेजण । बाहेरि आले पैं[3] जाण[4] ।
दैत्यासीं युध्य दारुण[5] । निर्वाण केलें त्या काळीं ॥ ३५ ॥

१–२ निघोनियां ख मुं; ३–४ नलगतां क्षण औं, तेथुन मुं; ५ करून मुं.

जीवें दैत्य मारिला । पुत्रासि राज्यपट दीधला ।
नकुळ तेथें[1] वरियला । प्रभावतीनें[2] ॥ ३६ ॥

१ मग ख मुं; २ ते काळीं औं.

जालें नकुळाचें लग्न । प्रभावतीसि शीघ्र घेउन ।
इंद्रप्रस्ता चौघेजण[1] । पातले हो[2] संतोषें[3] ॥ ३७ ॥

१ पांचैजण ख; २ पैं औं; ३ तत्काळीं ख.

**धर्मा कुंतीसि भेटले । श्रीकृष्णासि सन्मानिलें ।**
**मग हरीनें[1] प्रयाण केलें । द्वारकेसी[2] ॥ ३८ ॥**

१ देवाधिदेवें औं ; २ (+) तेक्षणीं औं , द्वारकानाथें द्वारके ख मुं.

**ऐसी भीमाची कथा । जन्मेजय[1] ऐकता ।**
**वैशंपायन सांगता । यथोचित[2] जाण[3] पां[4] ॥ ३९ ॥**

१ (+) होय मुं ; २–४ यथोचितें करूनी औं , यथोचितेंसी ख मुं.

पुढील दोन ओव्या पु४ मध्येंही आहेतः—

**खांडवदहन जालें । सारंगपक्षी वांचविले ।**
**तें पाहिजे परिसिलें । व्यासवचन[1] निर्धारें ॥ ४० ॥**

१ व्यासवचनें पु४.

पुढील ओवी नि मध्येंही आहेः—

**मुक्तेश्वरकवि वदे । कृष्णपांडवांचीं ब्रीदें[1] ।**
**अमृतरस[2] रसमदें[3] । श्रोता[4] क्षुधा[5] सरेना[6] ॥ ४१ ॥**

१ बिरुदें नि ; २ अमृतसार मुं ; ३ समदें पु , अमंदें मुं ; ४–५ श्रद्धा सुधा नि; ५–६ क्षुधारस देना मुं.

पुढील ओवी औं पु मध्येंच आहे:—

**इति आदिपर्वणि[1] कथा[2] । श्रवणें मेळवी परमार्था ।**
**वैशंपायन धरित्रीनाथा । अत्यादरें सांगत ॥ ४२ ॥**

१–२ आदिपर्वकथा औं.

श्री

## अध्याय पन्नासावा

### श्रीगणेशाय नमः

राजा पुसे अतिआवडी[1] । वैशंपायना संशय फेडीं ।
प्रळयपावकाचे तोंडीं । पक्षी कैसे वांचले ॥ १ ॥
ते[1] कथेचा वर्षोनि घन । निववीं[2] माझे संतप्त[3] श्रवण ।
वक्ता[4] वदे[5] त्रिलोचन । स्कंदाप्रती पैं जैसा ॥ २ ॥
ह्मणे[1] कुरुकुलनलिनीसूर्या । सावध परिसें जन्मेजया[2] ।
खांडवदाहीं त्या पक्षियां । वन्हिराजें रक्षिलें ॥ ३ ॥
मंदपालनामा[1] ऋषी । तपोतेजें प्रकाशराशी ।
शरीरदंडणें[2] सायासीं[3] । पुण्य[4] अपार जोडिलें[5] ॥ ४ ॥
श्रेष्ठधर्मज्ञाचे[1] पंक्ती । ऊर्ध्वरेता[2] शंसितव्रती[3] ।
स्वाध्यायशीळ मनोवृत्ती । निरोधूनि वर्ततां[4] ॥ ५ ॥
देह त्यागूनि काळगती । पातला[1] पितृलोकाप्रती ।
दिव्यभोगाचिये[2] संपती[3] । सामर्थ्य हातीं[4] दिसेना ॥ ६ ॥

---

१. १ **आवडी** खवर्ग ( नां प्रसंप्रा ).

